# दि भाभा अणुसंशोधन केंद्र कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्यादित, मुंबई .

DRAFT 64th AGM

# ६४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा

## दिनांक -२३/०८/२०२५

## इतिवृत्त

## वार्षिक सर्वसाधारण सभा

**दि भाभा अणुसंशोधन केंद्र कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्यादित, मुंबई .**
**अधिमंडळाची ६४ वी वार्षिक सर्व साधारण सभा दिनांक २३ ऑगस्ट २०२५ रोजी डि ए ई कॅन्व्हेंशन सेन्टर, अणुशक्तीनगर, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती.**

**<u>सभेपुढील विषय:</u>**

1. ६३व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
2. संचालक मंडळाने सादर केलेल्या दिनांक १ एप्रिल २०२४ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीचा वार्षिक अहवाल व दिनांक १ एप्रिल २०२४ ते ३१ मार्च २०२५ अखेरचे वैधानिक लेखापरीक्षित ताळेबंद व नफा-तोटा पत्रक स्वीकारून त्यास मान्यता देणे.
3. सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाच्या नफा विभागणीस मान्यता देणे.
4. सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाकरिता मंजूर केलेल्या अंदाजपत्रकापेक्षा जास्त झालेल्या खर्चास मंजुरी घेणे व सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षाकरिता संचालक मंडळाने मांडलेल्या अंदाज पत्रकास मान्यता देणे.
5. शासकीय लेखापरीक्षक यांच्या सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षाच्या हिशोब तपासणी अहवालाची नोंद घेणे.
6. सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षासाठी वैधानिक लेखापरीक्षकाची नियुक्ती करणे.
7. सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षाच्या लेखापरीक्षणात दोषांचे जाहीर वाचन करून त्या संबंधीच्या दोष दुरुस्ती अहवालाची (compliance report) नोंद घेणे.
8. संचालक मंडळाने सुचविलेल्या उपविधी दुरुस्तीस (परिशिष्ट ‘अ’ प्रमाणे ) मंजुरी देणे.
9. संस्थेच्या उपविधीनुसार सेवानिवृत्त सभासदांना ‘नाममात्र सभासद’ करून घेणे त्याबाबत सविस्तर चर्चा करून निर्णय घेणे.
10. व्यवस्थापक भरती आणि गो कॅशलेस (तात्काळ बँकिंग) संदर्भातील माहिती सभागृहात सादर करून चर्चा करणे.
11. अधिमंडळाच्या ६४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत अनुपस्थित असलेल्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करणे.
12. माननीय अध्यक्ष यांच्या परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयांबाबत विचार करणे.

DRAFT 64th AGM

**श्री. बाहुबली चौगुले (मानद सचिव) :** नमस्कार,
आपल्या दि भाभा अणुसंशोधन केंद्र कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्यादित, मुंबई च्या 64 व्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये मी उपस्थित सर्व मान्यवरांचे स्वागत करतो, मी सभागृहाच्या बाहेर जे सभासद उपस्थित आहेत त्या सर्व सभासदांना विनंती करतो की त्यांनी कृपया सभागृहाच्या आत यायचे आहे.

**श्री. राम परब (युईडी) :** एक माईकची व्यवस्था अजून करण्यात यावी.

**श्री. बाहुबली चौगुले (मानद सचिव) :**सभासदांच्या सोयीसाठी अजून एक माईकची व्यवस्था करावी, धन्यवाद, मी संस्थेचे अध्यक्ष श्री हेमंत कोळी यांना विनंती करतो की संस्थेचे पदसिद्ध अध्यक्ष श्री गिरीश शेनई सर, उपाध्यक्ष श्री. अविनाश तिरपुडे सर यांना मंचावर येण्यासाठी आमंत्रित करावं, तसेच संस्थेचे संचालक, संचालिका, तज्ञ संचालक तसेच आज या संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत विशेष उपस्थित असलेले वैधानिक लेखापरीक्षक श्री जगदीश रणदिवे, सहकार सल्लागार श्री संदीप पाटील आणि अंतर्गत लेखापाल श्री सतीश शाक्य व तसेच विधी सल्लागार एडवोकेट श्री विशाल निंबाळकर या मान्यवरांना मी मंचावर येण्याची विनंती करत आहे. तज्ञ संचालक श्री अरुण कोळी सर यांना विनंती करतो की त्यांनी मंचावर यायचे आहे.

DRAFT 64th AGM

मी संस्थेचे पदसिद्ध अध्यक्ष श्री गिरीश शेनई सर यांना विनंती करतो की 64 व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे अध्यक्ष पद स्वीकारावं, तसेच महापुरुषांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून, आणि दीप प्रज्वलन करून आजच्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सुरुवात करावी.

मी विनंती करतो पदसिद्ध अध्यक्ष श्री गिरीश शेणई सर यांनी महाराष्ट्राचे आराध्य दैवत श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करावा, उपाध्यक्ष श्री अविनाश तिरपुडे सर यांना विनंती करतो की त्यांनी भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करावा, अध्यक्ष श्री हेमंत कोळी यांना विनंती करतो की त्यांनी डॉक्टर होमी जहांगीर भाभा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करावा, मी मान्यवरांना विनंती करतो की त्यांनी दीप प्रज्वलन करावं आणि कार्यक्रमाची सुरुवात करावी.

**श्री. बाहुबली चौगुले (मानद सचिव) :** सर्व मान्यवरांचे आभार, सर्वप्रथम मी या आर्थिक वर्षात संस्थेचे सभासद, सुरक्षा आणि पोलीस दलातील जवान, डॉक्टर, नर्सेस, कला, क्रीडा, साहित्य आणि सामाजिक क्षेत्रातील दिवंगत व्यक्तींना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी सर्वांनी दोन मिनिट उभे राहून त्यांना श्रद्धांजली अर्पण करावी अशी विनंती करतो.
विनंती करतो संस्थेचे पदसिद्ध अध्यक्ष श्री गिरीश शेनई सर यांनी आजच्या कार्यक्रमात उपस्थित संस्थेचे वैधानिक लेखापरीक्षक श्री जगदीश रणदिवे सर यांना पुष्पगुच्छ देऊन त्यांच स्वागत करावं, तसेच श्री संदीप पाटील सर यांना

पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत करावं,  यानंतर मी संस्थेचे पदसिद्ध उपाध्यक्ष श्री अविनाश तिरपुडे सर यांना विनंती करतो अंतर्गत लेखापाल श्री सतीश शाक्य यांचा पुष्पगुच्छ देऊन स्वागत करावं, तसेच विधी सल्लागार एडवोकेट विशाल निंबाळकर यांचे मी संस्थेचे अध्यक्ष हेमंत कोळी यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत करावं.
धन्यवाद.

श्री हेमंत कोळी यांना विनंती करतो की त्यांनी संस्थेचे पदसिद्ध अध्यक्ष श्री गिरीश शेनई सर यांचा पुष्पगुच्छ देऊन स्वागत करावं.

त्यानंतर मी संस्थेचे उपाध्यक्ष श्री विवेक भागडिया यांना विनंती करतो की संस्थेचे पदसिद्ध उपाध्यक्ष श्री अविनाश तिरपुडे सर यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करावे.

पदसिद्ध अध्यक्ष श्री गिरीश शेनई सर यांनी आपले अध्यक्षीय मनोगत व्यक्त करावं अशी मी त्यांना विनंती करतो.

**श्री. गिरीष शेणई साहेब (पदसिद्ध अध्यक्ष) :** आजच्या बीएआरसी सोसायटीच्या या 64 व्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये मंचावर उपस्थित असलेले संस्थेचे अध्यक्ष हेमंत कोळी साहेब उपाध्यक्ष विवेक भागडिया आणि खजिनदार राजेश चौधरी व संचालक मंडळ आणि या सभेला उपस्थित असणारे सर्व सन्माननीय सभासद मी आपल्या सर्वांचे स्वागत करतो आजच्या सभेमध्ये आमचा रोल हा एक ऑब्सरवर म्हणून आहे तो रोल आम्ही निभावण्याचा व पार पाडण्याचा पूर्ण प्रयत्न करू म्हणूनच मी संस्थेने चांगलं काय केलं वाईट काय केलं याबद्दल मी काहीही बोलणार नाही कारण मी आस्थापनेचा माणूस आहे त्यामुळे हे बोलणं चुकीचं राहील त्यामुळे आम्ही जी काही सुधारणा करू शकलो त्यातली पहिली सुधारणा तुमच्यासमोर आहे मागच्या वेळेस बघितलं की प्रत्येकाला इलेवंथ आवरला काय प्रश्न विचारला की कुठली गोष्ट उपलब्ध करणे कठीण जा,त हा एक प्रयत्न त्याचप्रमाणे मागचे मिनिट्स ऑफ मीटिंग आपण वेबसाईटवर अपलोड केले आहेत. मला वाटते खूपच कमी सोसायटीज असतील की ज्यांचे मिनिट्स वेबसाईटवर मिळतील तर हा प्रयत्न आम्ही केला सभासदांच्या सूचना होत्या किंवा त्यांच्या काही क्वेरीज होत्या त्या पण एक,दोन मीटिंग घेऊन दूर करण्याचा प्रयत्न केला जेणेकरून जी मीटिंग स्थगित होते किंवा दोन दिवस सभा चालते ते टाळण्याचा प्रयत्न आम्ही केलेला आहे आणि आत्ताच आपण तीन युगपुरुष त्यांना मानवंदना दिली, पण फक्त ही मानवंदना देऊन थांबता कामा नये, त्यांचं आचरण आपल्यात बिंबवायचा त्याप्रमाणे वागण्याचा प्रयत्न आपण केला पाहिजे असे मी इथे सांगू इच्छितो, कारण मला वाटतं की या तिघांची तुम्ही एक जर बायोग्राफी बघितली तर त्यांनी वेळेला खूप महत्त्व दिलं, माझी या सभेला एक विनंती आहे की आपण सुद्धा वेळेला महत्त्व द्या, तुमचे जे काही प्रश्न असतील ते मुद्देसूद मांडा, त्याप्रमाणेच आपण पुढे जायचं आहे. आणि त्या अजेंडा प्रमाणे पुढे जायला आपण सर्वांनी मदत कराल अशी अपेक्षा बाळगतो ,आणि वेळेचे भान ठेवून सगळ्यांनी ही सभा पुढे पार पाडावी, मी जास्त काही बोलत नाही, धन्यवाद.

DRAFT 64th AGM

**श्री. बाहुबली चौगुले (मानद सचिव) :** सभागृहामध्ये मागच्या बाजूला जे सभासद बसले आहेत, त्यांना मी विनंती करतो की त्यांनी कृपया समोर येऊन बसायचे आहे, मी संस्थेचे अध्यक्ष श्री हेमंत कोळी यांना विनंती करतो की त्यांनी आपलं मनोगत व्यक्त करावं.

**श्री. हेमंत कोळी :** शुभ दुपार, सर्व सन्माननीय सभासदांचे 64 व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत मी स्वागत करत आहे महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर, भारतीय अणुऊर्जेचे जनक श्री होमी जहांगीर भाभा, यांना विनम्र अभिवादन करून मी संस्थेचे पदसिद्ध अध्यक्ष, पदसिद्ध उपाध्यक्ष, त्याचप्रमाणे संस्थेचे मानद सचिव, खजिनदार आणि उपस्थित संचालकांचे व सन्माननीय सभासदांचे 64 व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत स्वागत करतो. सर्वप्रथम या आर्थिक वर्षात दिवंगत झालेले सभासद शास्त्रज्ञ डॉक्टर नर्सेस सुरक्षा पोलिस दलातील जवान यांच्या करिता श्रद्धांजली अर्पण करीत आहे. आपल्या संस्थेच्या सन 2024 ते 25 या अहवाल वर्षाचा लेखाजोखा सन्माननीय भागधारक सभासदांसमोर मांडताना आम्हास अतिशय आनंद होत आहे आपल्या संस्थेने विविध स्तरावर नेतृत्व करत प्रगती केलेली आहे आपल्या सर्वांच्या साक्षीने पतसंस्था गतवर्षीपेक्षा या आर्थिक अहवाल वर्षात रुपये 198.81 कोटी अधिक वार्षिक उलाढाल केली आहे. आमच्या संचालक मंडळाने संस्थेची आर्थिक परिस्थिती सुस्थितीत ठेवण्यासाठी लवचिकता आणि वचनबद्धता दाखवली आहे. आपली संस्था पर्यायाने कर्जदार आणि ठेवीदार सभासदांवर अवलंबून आहे अहवाल साली सभासदांचे एकूण 504 कोटी 37 लाख 97 हजार 764 रुपये इतक्या ठेवी आपल्या संस्थेमध्ये अबाधित आहेत .या त्यांच्या ठेवी वृद्धिंगत करण्यासाठी आमचे संचालक मंडळ कटिबद्ध आहे. अहवाल सालात सभासदांच्या वेगवेगळ्या कारणांनी आर्थिक गरजांची पूर्तता करण्यासाठी गतवर्षीच्या कर्ज रकमेमध्ये 175.88 करोड वाढ करून कर्ज रुपये 1124 कोटी वाटप करण्यात आले. आम्ही कर्जवसुलीस प्राधान्य दिले असून कर्ज वसुली सुरळीत चालू आहे. विक्रम कर्ज संरक्षण निधी योजना अंतर्गत साधारण कर्ज विशेष कर्ज व दीर्घकालीन मुदत कर्ज आणले आहे. अहवाल सालात एकूण 19 दिवंगत सभासदांची मृत्यू नोंद झाली आहे. या दिवंगत सभासदांची 30 कर्ज प्रकरणे तसेच त्यांच्यावर असलेले दोन कोटी 41 लाख 80 हजार 610 रुपये अहवाल वर्षात निरस्त करण्यात आले आहे. मार्च 2025 अखेर कर्ज थकबाकी 1 कोटी 51 लाख 27 हजार 586 रुपये असून कर्जाची थकबाकी ०.१५% टक्के आहे. एकूण एनपीए ३ करोड ६८ लाख ९४८ रुपये असून त्याचे कर्जाशी असलेले प्रमाण ०.३६% इतके आहे. अहवाल साली निव्वळ नफा पंधरा कोटी साठ लाख सहा हजार 904 इतका झाला आहे तो सुदृढ आर्थिक व्यवस्थापन आणि सभासदांमध्ये वाढता विश्वास दर्शवितो, यावर्षी आम्ही आमच्या सेवा अधिक सुलभ व सभासदांच्या अनुकूल बनवण्यासाठी डिजिटल सेवा म्हणजेच एसएमएस अलर्ट वेबसाईट सेवा सुरू केल्या आहेत जेणेकरून सभासदांना त्यांच्या खात्याची सहज माहिती मिळू शकेल आमच्या संचालक मंडळाचा कारभार स्वीकारल्यानंतर पतसंस्थेचे कामकाज पूर्ण पारदर्शक पद्धतीने आणि सचोटीने केल्याचा

DRAFT 64th AGM

आम्हाला सार्थ अभिमान आहे आमच्या संस्थेने ऑडिट वेळेवर पूर्ण केले असून आपल्या संस्थेला अ वर्ग प्राप्त झाला आहे, अहवालाची आर्थिक स्थिती भक्कम असल्याचे आपणास या अहवालावरून दिसून येते.

विद्यमान संचालक मंडळाने केलेल्या नेतृत्व आणि कामगिरीचे ठळक मुद्दे म्हणजे तत्काळ बँकिंग यांच्याकडून येणे असलेल्या एकूण रक्कमे पैकी पाच कोटी वसूल करण्यात आम्ही यशस्वी झालो आहोत. स्टेट बँक ऑफ इंडिया यांच्याकडून सीएमपी निशुल्क पोर्टल सुरू करून सभासदांच्या ठेवी ताबडतोब त्यांच्या बँक खात्यात ट्रान्सफर करणे सुरू केले आहे सभासदांना कर्ज जास्तीत जास्त रुपये सत्तावीस लाख मिळत होते, त्यामध्ये वाढ करून रुपये पन्नास लाख मर्यादेपर्यंत कर्ज वाटप केले जात आहे. विक्रम कर्ज सुरक्षा निधी योजना अंतर्गत आतापर्यंत 37 दिवंगत सभासदांचे चार कोटी 97 लाख 290 रुपयांचे कर्ज निरस्त करण्यात आले आहे, त्यामुळे दिवंगत सभासदांचे कुटुंबीय व जामीनदार यांच्यावरील आर्थिक भार संपुष्टात आला आहे. संस्थेचा टर्न ओव्हर 926 कोटी वरून 1124 कोटी पर्यंत झाला आहे. संस्थेची गुंतवणूक जी 61 व्या वर्षात 53 कोटी रुपये होती, त्यात वाढ होऊन आता संस्थेची गुंतवणूक 96 कोटी रुपयांपर्यंत पोहोचली आहे ,म्हणजेच गेल्या अडीच वर्षात 81.30% वाढ झाली आहे.

DRAFT 64th AGM

विद्यार्थी गुणगौरव करताना त्यांच्या गुणाप्रमाणे बक्षीस रक्कम न देता सर्व विद्यार्थ्यांना समान न्यायाने एकसारखी रक्कम देऊन त्यामधील विसंगती दूर करण्यात आली आहे. सभासदांना सभासद वर्गणीवर पर्शियल विड्रॉवल फॅसिलिटी देऊन त्यांचा टीडीएस वाचवण्यास मदत केली आहे. दीर्घकालीन कर्जावरील व्याजदर विक्रम कर्ज सुरक्षा संरक्षण योजने अंतर्गत १०.३५% वरून ९.८% आला आहे. दीर्घकालीन कर्जावरील व्याजाची आकारणी दैनंदिन पद्धतीने उतरत्या क्रमाने त्या दिवसाच्या आरंभिक शिल्लक रकमेवर सुरू करण्यात आली आहे. रुपये 35 लाखापर्यंत कर्जासाठी दोन जामीनदार व 35 लाखाच्या वरील कर्जासाठी तीन जामीनदार घेऊन कर्ज दिले जात आहे, संस्थेचे कामकाज सकाळी 9 ते सायंकाळी 5 दुपारच्या जेवणाच्या सुट्टीशिवाय अविरत सुरू केले आहे. तसेच ऑफिसचे कार्यालयीन कामकाज प्रत्येक महिन्याच्या शनिवारी सुरू ठेवून सभासदांना सुट्टीच्या दिवशीही अविरत सेवा सुरू केली आहे. सभासदांच्या बचत खात्यावरील रक्कम रोख 5000 रुपये महिन्यातून एकदा देण्यास सुरू केले आहे.

सेवानिवृत्ती,राजीनामा इत्यादीकारणाने सभासदत्व संपुष्टात आलेल्या सभासदांना सन्मानित करण्यासाठी त्यांच्या सन्मान राशीत वाढ करून प्रतिवर्ष पूर्ण सभासदत्व रुपये 500 प्रमाणे समान राशी देऊन त्यांचा गौरव करण्यात येत आहे. संस्थेच्या वेबसाईटवरून सभासदांना त्यांच्या खात्याची लाईव्ह इन्फॉर्मेशन उपलब्ध करून दिली जात आहे. तसेच बीएआरसी तारापूर. BRIT वाशी, नवी मुंबई, आरएमसी परेल येथील युनिटच्या सभासदांना संस्थेकडून प्रत्येक महिन्याच्या ठरवण्यात आलेल्या दिवशी सेवा देण्यात येत आहे. संस्थेच्या सभासदांच्या प्रति असलेल्या आपुलकीच्या भावनेतून आर्थिक वर्ष 21- 22, 22 -23, 23- 24 या काळातील

सभासदांनी न घेतलेला लाभांश 16 लाख 43 हजार 513 रुपये दिनांक 18 ऑगस्ट 2025 पर्यंत येणाऱ्या गणेश उत्सवापूर्वी सभासदांच्या खात्यावर वर्ग करण्यात आला आहे. ज्या सभासदांची संड्री रक्कम देणे असलेले एक कोटी 31 लाख 63 हजार इतकी रक्कम सभासद बंधू भगिनींच्या बँक खात्यात जमा करण्यात आली आहे. गणेशोत्सवापूर्वी सभासद वर्गणी वरील व्याजदर 10% प्रमाणे रुपये 19 कोटी 44 लाख 37 हजार 161 रुपये सभासद बंधू आणि भगिनी यांच्या खात्यावर वर्ग केले गेले आहेत. पार्शियल विड्रॉवल फॅसिलिटी साठी प्रयत्न करून सहकार आयुक्त यांच्याकडून मंजुरी मिळवली, तसेच सभासदांना इन्कम टॅक्स कलम 194 नुसार टीडीएस (TDS) भरावा लागत आहे, अशा सभासदांना या फॅसिलिटी चा फायदा देऊन त्यांचा टीडीएस (TDS) वाचवण्यास मदत केली आहे.

विक्रम साराभाई भवन, DCSEM, डीपीएस, एनआरबी आणि हेवीवॉटर बोर्ड मधील सर्व सन्माननीय सभासद बंधू भगिनींसाठी भारतीय अंतराळ संशोधनाचे जनक थोर शास्त्रज्ञ डॉ विक्रम साराभाई यांच्या जन्म स्थितीचे अवचित्य साधून 12 ऑगस्ट 2025 रोजी विक्रम साराभाई भवन येथे संस्थेचे विस्तारित कक्ष सुरू केले आहे. गेली तीन वर्षे संस्थेची गंगाजळी 25 टक्क्यावरून 10 टक्के माननीय आयुक्त निबंधक सहकारी संस्था पुणे यांच्याकडून मंजूर करण्यात आपण यशस्वी झालो आहोत. आतापर्यंत निवृत्त झालेल्या सभासद बंधू आणि भगिनींना नाममात्र सभासद (नॉमिनल मेंबरशिप) देण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत, वेध भविष्याचा आम्ही संस्थेचे हित जोपासण्यासाठी कटिबद्ध आहोत, राहून गेलेली कामे, आम्ही वेळेवर पूर्ण करण्याचा निर्धार व्यक्त केला असून त्याप्रमाणे कामाला सुरुवात केली आहे. तात्काळ बँकिंग- गो कॅशलेस यांच्याकडून येणे असलेली रक्कम वसूल करणे यासाठी त्यांना वकिलामार्फत रीतसर नोटीस दिली आहे. जर त्यांनी देणे रकमेची पूर्तता केली नाही तर हे प्रकरण न्यायप्रविष्ट करून त्यांची वसुली करणे, करिअर जंक्शन प्लेसमेंट कन्सल्टन्सी यांच्याकडून नोकर भरती बाबत न केलेल्या कामकाजाबद्दल अदा केलेली रक्कम वसूल करून घेणे यासाठी वकिलामार्फत नोटीस देण्यात आली असून, जर रक्कम वसूल झाली नाही तर त्यांचे प्रकरण न्याय प्रविष्ट करून त्यांच्याकडून वसुली करण्यात येईल.

DRAFT 64th AGM

सन 2020-21 च्या आर्थिक वर्षापासून सभासदांना मिळालेल्या व्याज रकमेवर आयकर विभागाने कायदा नियम 1994 अनुसार आकारलेल्या टीडीएसमुळे सभासदांना त्रास होत आहे यासाठी आम्ही दिलगिरी व्यक्त करत आहोत. मनुष्य प्राण्याला बुद्धिमत्ता विचारशक्ती व भावना देणगी स्वरूपात मिळालेल्या आहेत. माणसाचे खरे पण हे तुम्ही काय करता यावर अवलंबून आहे, सामाजिक बांधिलकी साठी आपल्या देशात मोठी परंपरा लाभलेली आहे. संस्थेचे कामकाज अधिक गतिमान व अधिक कार्यक्षमतेने व्हावे याकरिता आणि सभासदांना चांगली सेवा देण्याकरिता आम्ही कटिबद्ध आहोत. आपल्या संस्थेचे घटक जसे की संस्थेचे गुंतवणूकदार,कर्जदार सभासद, हितचिंतक यांच्याशी संबंधित आणि संस्थेच्या कर्मचाऱ्यांकडून अधिकाधिक सेवा देण्याकरिता आम्ही कटिबद्ध आहोत.

सहकार चळवळ सुदृढ बळकट करण्यासाठी योगदान देता येईल याकरिता आम्ही वचनबद्ध आहोत. संस्थेच्या प्रगतीसाठी अहोरात्र झटणारे संचालक मंडळ, संस्थेचे कर्मचारी, सभासद ठेवीदार आणि कर्जदार यांनी दिलेल्या सहकार्यामुळे प्रोत्साहनामुळे संस्थेची यशस्वी वाटचाल झाली आहे, या सर्वांचे आम्ही आभारी आहोत. आपल्या सर्वांना उदंड आरोग्यदायी आयुष्य लाभो सौख्य व समृद्धी लाभो ही मनोभावे प्रार्थना करून मी माझे मनोगत पूर्ण करतो जय हिंद, जय महाराष्ट्र.

सभासदांना एक विनंती आहे की सभासदांनी अजेंडा प्रमाणे प्रश्न विचारावे, सर्व प्रश्नांची उत्तरे मंचावरून दिली जातील. हे सभागृह मिळवण्यासाठी आम्हाला शेवटच्या दिवसापर्यंत भरपूर मेहनत करावी लागली आहे. मंचावर बसलेल्या सर्व मान्यवरांचा, सन्माननीय सभासदांनी मान ठेवावा, संस्थेच्या सचिवांची तब्येत ठीक नसल्याकारणाने त्यांच्या ऐवजी संस्थेचे माजी सचिव शिवाजी हगवणे, माजी खजिनदार शिव सिंघा रॉय, तसेच विद्यमान उपाध्यक्ष विवेक भागडिया, संचालक संतोष ढमढेरे, सभेला संबोधित करतील याची सर्व सभासदांनी नोंद घ्यावी, यापुढील सभा संस्थेचे सचिव बाहुबली चौगुले यांनी सुरू करावी.
धन्यवाद.

DRAFT 64th AGM

**श्री. बाहुबली चौगुले (मानद सचिव) :** धन्यवाद, अध्यक्ष महोदय यानंतर मी संस्थेचे व्यवस्थापक श्री. आर. के. मोरे यांना विनंती करतो की त्यांनी 64 व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या अहवालामध्ये असलेल्या काही प्रिंटिंग मिस्टेक्स वाचून दाखवाव्यात.

**श्री.आर के मोरे (व्यवस्थापक):-** पान क्रमांक 1 वरती विषय क्रमांक 10 मध्ये बदल करण्यात आलेला आहे, तो बदल असा आहे करिअर जंक्शन प्लेसमेंट, नोकर भरती व्यवस्थापक भरती आणि गो कॅशलेस तत्काळ बँकिंग संदर्भातील माहिती सभागृहात सादर करून चर्चा करणे, अशी या विषयाची नोंद करून घ्यायची आहे. पान क्रमांक 16 वरती मुद्दा क्रमांक 20 मध्ये ज्ञानरत्न सन्माननीय सभासदांच्या पाल्यांचा गुणगौरव मध्ये ज्ञानरक्त असं झालेला आहे त्या ऐवजी ज्ञानरत्न असे वाचावे, पान क्रमांक 17 वरती मुद्दा क्रमांक 21, तरुण कुमार श्रीवास्तव हे असतापनेतून झाला आहे त्या ऐवजी आस्थापनेतून असे वाचावे. पान क्रमांक 31 मुद्दा क्रमांक 21 नंबरचा पॉईंट विक्रम कर्ज संरक्षण योजना याच्यामध्ये ज्या सभासदांचे कर्ज निरस्त केले आहे, तिथे स्पेशल आणि जनरल लोन म्हणजे ऑर्डिनरी लोन असे वाचावे आणि सर्वात शेवटी इनर पेज सर्वांचे शेवटचे पान आपण सभासदांचा गौरव करतोय तिथे चुकून गुणगौरव असं झालेला आहे अशोक कुमार यादव यांचे गुणगौरव च्या ऐवजी गौरव सभासदांचा असं वाचावं धन्यवाद.

**श्री.डी.एस राजापुरे (डीआरएचआर) :** अजून एक करेक्शन तुमच्या नजरेतून राहून गेलेले आहे, ते मी सांगू इच्छितो. अध्यक्षीय मनोगत पेज नंबर सहा वर तुम्ही छापले, विक्रम कर्ज संरक्षण निधी अंतर्गत 30 कर्ज प्रकरणे

त्यांच्या दिवंगत असलेल्या कर्जातून दोन कोटी 41 लाख 80 हजार लिहिले आहे, आणि तीच अमाऊंट पुढच्या पानावर पॉईंट नंबर 11 मध्ये दोन कोटी 49 लाख लिहिलेले आहे, पाच सहा वर आणि पान सात वर पॉईंट नंबर 11 आणि पाच सहा वर विक्रम कर्ज संरक्षण निधी हेड अदर नोंद करून ठेवली आहे.

**श्री.आर के मोरे (व्यवस्थापक):-** धन्यवाद साहेब मी नोंद करून ठेवली, पण मी सांगायला विसरलो पेज नंबर सात वरती मुद्दा क्रमांक 11 यामध्ये जे 2025 मध्ये 19 सभासद मयत झाले त्यांची 30 कर्ज प्रकरणे म्हणजे Ordinary लोन आणि स्पेशल लोन अशी धरून त्यांचे 2 कोटी 41 लाख 80 हजार 610 च्या ऐवजी 2 कोटी 49 लाख झाले ते 2 कोटी 41 लाख असं वाचण्यात यावं मी नोंद केली होती पण सांगायला विसरलो क्षमस्व.

**श्री. बाहुबली चौगुले (मानद सचिव) :** यानंतर संस्थेच्या 64 व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या विषय पत्रिकेला मी सुरुवात करत आहे. विषय पत्रिकेतील विषय क्रमांक 1, 63 व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे. संस्थेच्या 63 व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त संस्थेचे पदसिद्ध अध्यक्ष श्री गिरीश शेनई सर यांनी सूचना दिल्याप्रमाणे आपण संस्थेच्या संकेतस्थळावर 20 जानेवारी 2025 रोजी आपण इतिवृत्त पब्लिश केले होते. तसेच आपण सभासदांना विनंती केली होती कि काही सूचना असतील, त्याच्याबद्दल काही शंका असतील काही चेंजेस असतील, तर त्या 15 फेब्रुवारी पर्यंत, अशा सूचना आम्ही देण्यासाठी त्यामध्ये नोंद केली होती. त्या अनुषंगाने दोन सभासद बंधू भगिनींनी त्यांच्या काही सूचना दिल्या. त्या आम्ही चेंज करून घेतल्या. आणि आतापर्यंत कुठल्याही सभासद बंधू भगिनींनी या इतिवृत्तावरती काही चेंजेस आमच्याकडे कळवले नाहीत. तरी मी सभागृहाला विनंती करतो, की 63 व्या अधिमंडळाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करून, त्याला सूचक आणि अनुमोदक द्यावे ही विनंती.

DRAFT 64th AGM

**श्री. मुकुंद वैराळकर (एऍण्डएसईडी) :** आत्ताच 63 व्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त आपल्या सचिवांनी मांडलेले आहे आणि त्यावरती मान्यता पण द्यायची आहे, तत्पूर्वी 63 व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ब्रेकिंग न्यूज ठरलेला एक विषय तो म्हणजे तरुण कुमार श्रीवास्तव, या निवृत्त सभासदाचे 63 व्या सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्त यामध्ये दिलेला जो ठराव होता, त्या ठरावाला अधीन राहून आपल्या संस्थेचे पदसिद्ध अध्यक्ष सन्माननीय श्री शेनाई साहेब, तसेच त्या वेळचे संस्थेचे पदसिद्ध उपाध्यक्ष सन्माननीय श्रीराम साहेब या दोघांनी जो कणखरपणा दाखवला, मी अभिनंदन करतो आणि हा अभिनंदनचा ठराव मी सर्वांपुढे मांडतो, की त्यांनी गेल्या दोन वर्षापासून कोळंबलेला हा विषय, तरुण कुमार श्रीवास्तव या ठरावांमध्ये घेऊन त्यांची जी काही येणे बाकी होती ती, या संचालक मंडळाकडून खरोखर वसूल करून दिली. त्याबद्दल मी या दोघांचे पदसिद्ध अध्यक्ष, तसेच पदसिद्ध उपाध्यक्ष यांचे आभार व्यक्त करतो. तसेच संचालक मंडळाचे सुद्धा आभार व्यक्त करतो, की त्यांनी या विषयांमध्ये जी तत्परता दाखवली, त्याबद्दल मी येथे अभिनंदनचा ठराव मांडतो तसेच सभागृहातून तो संमत झाला असे मी सांगतो.

**श्री. बाहुबली चौगुले (मानद सचिव) :** धन्यवाद, वैराळकर साहेब यानंतर सूचक अनुमोदक द्यावा अशी विनंती करतो.

**<u>ठराव :-</u> ठराव पास करण्यात आला की 63 व्या वार्षिक सर्वसाधारण सभेने दिलेल्या निर्णयानुसार संचालक मंडळाने कै. तरुणकुमार श्रीवास्तव यांच्या कर्जाची रक्कम रु.10,24,741/- व आपुलकी सभासद निधीचे रु.1,00,000/- लाख वसूल केलेबाबत सर्व संचालक मंडळाचे अभिनंदनपर ठराव पास करण्यात आला.**

**सूचक : श्री. मुकुंद वैराळकर (एॲण्डएसईडी)**
**अनुमोदक: श्री. मनोज वाडेकर (आर इ डी)**

**ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.**

DRAFT 64th AGM

**श्री. बाहुबली चौगुले (मानद सचिव) :** -धन्यवाद साहेब यानंतर विषय क्रमांक दोन वरती जातो.

**श्री. मुकुंद वैराळकर (एॲण्डएसईडी) :** एक मिनिट साहेब, विषय क्रमांक 1 ला सूचक आणि अनुमोदक साठी खूप वेळ आहे, अजून थोडा शांततेने घ्या, तत्पूर्वी मी सचिवांना विनंती करतो की त्यांनी गेल्या 63 व्या सर्वसाधारण सभेच्या मिनिट्स मध्ये पेज क्रमांक 109 मध्ये गेल्या वेळेस एक सूचना आपल्याकडे आली होती, कृपया पेज क्रमांक 109 जरा वाचून दाखवलं तर बरे होईल.

**श्री. बाहुबली चौगुले (मानद सचिव) :** वैराळकर सर, पेज क्रमांक 8 वरती तुमचा स्टेटमेंट आहे त्याच्याबद्दल बोलताय का? आपण या अजेंडा मध्ये प्रश्न क्रमांक 1 पासून इथून सुरुवात करा, वैराळकर सर मला इथे एक पॉईंट मेन्शन करायचा आहे की 63 व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त, त्या वार्षिक सभेमध्ये झालं ते आपण ऑलरेडी संस्थेच्या संकेतस्थळावरती मेन्शन केलं होतं, तिथे प्रश्न येतो त्याला वाचून कायम करणे त्याच्याबद्दल तुमच्या काही हरकत असतील तर पदसिद्ध अध्यक्षांच्या परवानगीने नंतर घेऊ.

**श्री. मुकुंद वैराळकर (एॲण्डएसईडी) :** सचिव साहेब, विषय असा आहे की 63 व्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे हा आपला अजेंडा आहे, आणि हा आपल्या अजेंडा मधलाच विषय आहे म्हणूनच मी सांगतोय की अभिनंदनचा ठराव आहे टेन्शनमध्ये येऊ नका.

**श्री. बाहुबली चौगुले (मानद सचिव) :** मला मान्य आहे, तुम्ही सन्माननीय सभासद आहात, सभागृहामध्ये तुम्ही नेहमी संस्थेच्या भल्यासाठी बोलत असतात, काही हरकत नाही आपण आपलं मत मांडावं.

**श्री. मुकुंद वैराळकर (एऍण्डएसईडी) :** या अजेंडा मध्ये प्रश्न क्रमांक 1 यांनी सोसायटीचा मॅनेजर आणला का एक प्रश्न उपस्थित झाला होता, त्यानंतर मॅनेजरच्या संदर्भामध्ये आपण काय केलं हा दुसरा प्रश्न? परंतु त्यासोबतच या संचालक मंडळामध्ये अनुभवाचा फार मोठा अभाव आहे, माझी या सभागृहातर्फे यांना एक विनंती आहे , की यामध्ये कोणीतरी एक अनुभवी व्यक्ती जो त्यांच्या उपविधीप्रमाणे तज्ञ संचालक म्हणून काम करेल तो त्यांनी दोन वर्षांमध्ये भरलेला आहे का? तज्ञ संचालकाची नेमणूक करणे निवड करणे हा संपूर्णपणे संचालक मंडळाचा अधिकार आहे आणि या अधिकारांमध्ये त्यांनी हे पद भरायचा आहे? त्यांच्या या पॅनलचे नाव सहकार परिवर्तन पॅनल, तज्ञ संचालक म्हणून जे कोणी नियुक्ती केले जातील, किंवा करणार आहेत किंवा करायचे असेल असे त्यांचे मानसिक स्थिती असेल तर, याच्या पुढचा गोंधळ होऊ द्यायचा नसेल तर, यांनी व्यवस्थितपणे AGM सामोरे जायचे असेल तर तज्ञ संचालकाची नियुक्ती करावी, आणि तो तज्ञ संचालक पूर्णपणे या पॅनलच्या कुठल्याही सभासदाच्या किंवा पॅनलच्या रिलेटेड नसावा, पूर्णपणे विरोधी असावा हे गरजेचे झाले आहे. कोणीतरी एक विरोधी व्यक्ती येथे यांच्यामध्ये जोपर्यंत बसत नाही तोपर्यंत हे व्यवस्थित काम करणार नाहीत अशा पद्धतीचा हा एक ठराव होता. याबद्दल मला खरोखरच पूर्ण संचालक मंडळाचे अभिनंदन करायचे आहे की त्यांनी त्यांच्या जे काही सहकार पॅनलचे आहेत त्या पॅनलच्या व्यतिरिक्त विरोधी पक्षातील किंवा विरोधी पॅनल मधील एक तज्ञ संचालकाची निवड केली त्याबद्दल मी संपूर्ण संचालक मंडळ यांचा अभिनंदन करतो आणि हा जो ठराव मांडला होता त्याला मी संमती देतो, प्रश्न भरपूर उपस्थित होतील या विषयावरती परंतु माझा ठराव आणि माझा विषय हा फक्त तुमच्या अभिनंदनचा आहे, एवढेच संपूर्ण लक्षात घ्यायचं याच्यापुढे जे काही होईल किंवा या विषयावरती काय उत्तर येतील, त्याच्याशी माझा कुठल्याही प्रकारचा काहीही संबंध नसेल धन्यवाद.

DRAFT 64th AGM

**श्री. बाहुबली चौगुले (मानद सचिव) :** धन्यवाद साहेब, तुमच्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्त मध्ये पेज क्रमांक 108,109 नुसार संस्थेचे सन्माननीय सभासद मुकुंद वैराळकर जी यांनी विनंती केली होती की संस्थेच्या तज्ञ संचालक पदी एक नियुक्ती व्हावी या अनुषंगाने संचालक पदी आम्ही श्री अरुण कोळी साहेब यांची नियुक्ती केली आहे त्याच्या अनुषंगाने संस्थेच्या वेबसाईट वरती आणि बीटीएस वरती ही परिपत्रक काढून याचा सर्व सन्माननीय सभासद बंधू-भगिनींना सूचना दिलेली होती आणि परत मी वैराळकरांचा खूप धन्यवाद देतो की त्यांनी हा अभिनंदनचा प्रस्ताव इथे मांडला आणि सूचक अनुमोदक द्यावा अशी माझी विनंती आहे.

**<u>ठराव :-</u> ठराव पास करण्यात आला की संचालक मंडळाने माजी सचिव श्री अरुण रघुनाथ कोळी यांची 'तज्ञ संचालक' पदी निवड केली. श्री. अरुण कोळी यांच्याकडे असलेल्या कामकाजाच्या**

**अनुभवाचा उपयोग संस्थेच्या पुढील प्रगतीच्या वाटचालीस करून घ्यावा व याबद्दल श्री. अरुण कोळी व संचालक मंडळाचे अभिनंदनपर ठराव सर्वानुमते पास करण्यात आला.**

**सूचक : श्री. मुकुंद वैराळकर (एऍण्डएसईडी)**
**अनुमोदक : प्रकाश पाटील (एस आय आर डी)**

**ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.**

**श्री. यदुवीर सिंग (एचएलयुडी) :**एक मिनिट क्या मॅटर चल रहा है, सब रूको एक्सपर्ट डायरेक्टर की बात हो रही है, खराब हो रहा है.

**श्री. गिरीष शेणई साहेब (पदसिद्ध अध्यक्ष) :** मला सांगा आपला हा अजेंडा आहे का 63 व्या अधिमंडळाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे अध्यक्ष म्हणून मी माझी पावर वापरतोय आणि फक्त इतिवृत्तावर कोणाचं काही करेक्शन असेल तेवढेच सांगा ऑलरेडी ऑल्मोस्ट फेब्रुवारी मध्ये बरोबर 20 जानेवारीला अपलोड केला ऑल्मोस्ट चार-पाच महिन्यांपासून वेबसाईटवर सूचना मागवल्या होत्या तुमच्या प्रतिक्रिया किंवा सूचना त्याचप्रमाणे चेंजेस झालेले आहेत आणि ह्याच्यापुढे मला इतर कुठलेही डिस्कशन नको आहे फक्त इतिवृत्त कायम करायचं की नाही सूचना ज्या आहे त्या तुम्ही दिलेल्या होत्या झाल्या की नाही हा एवढाच विषय आहे बाकी कुठलाही ठराव आता मांडायचा नाही.

DRAFT 64th AGM

**श्री. यदुवीर सिंग (एचएलयुडी) :** आपने उसका अनुमोदन मांगा था, आगे इस बात पे कोई डिस्कशन नही होगा. अजेंडा छोडके मे वापस विषय क्रमांक एक पर आता हुं धन्यवाद.

**श्री. प्रकाश पाटील (एसआयआरडी) :** 63 व्या आमसभेमध्ये आपण डायरी विषयी जो भरपूर चर्चा झालेला विषय, त्यामध्ये भरपूर वेळ गेला होता. आपण सांगितल्याप्रमाणे चौकशी समिती नेमली.

**श्री. गिरीष शेणई साहेब (पदसिद्ध अध्यक्ष) :** पाटील फक्त इतिवृत्ताबद्दल बोला. तुम्ही त्याच्याबद्दल बोलत नाही आहात. इतिवृत्तामध्ये त्याच्यात काही चेंज पाहिजे का एवढाच आहे.

**श्री. प्रकाश पाटील (एसआयआरडी) :**साहेब आज अजेंडा यापुढे काही डिस्कशन होणार नाही, या इतिवृत्तांमध्ये डायरीचा मुद्दा आहे, त्या वरती विषय चर्चेला जात आहे. 12 व्या विषयात हा मुद्दा कसा काय घेतला जाणार?

**श्री. गिरीष शेणई साहेब (पदसिद्ध अध्यक्ष) :** पाटील इतिवृत्तावर डिस्कशन आपण करत नाही आहोत आपल्याला इतिवृत्त वाचून कायम करायचा आहे.

**श्री. संतोष कांबळे (बी ए आर सी हॉस्पिटल):-** साहेब इतिवृत्त वाचन करण्यासोबत हे पास करावा लागतो. त्या संदर्भातच बोलतोय, गेल्या वेळेला डायरी संदर्भात आपणच मान्यता दिलेली आणि डायरीचे पैसे जोपर्यंत माजी संचालक शिवाजी हगवणे हे पैसे देत नाहीत, तोपर्यंत हा मुद्दा यामध्ये आलेला नाहीये. त्यामुळे आपण हा मुद्दा इथे आम्ही कसा पास करणार? हा मुद्दा आपण इथे मांडलेलाच नाहीये.

**श्री. गिरीष शेणई साहेब (पदसिद्ध अध्यक्ष) :** मिनिट्स ऑफ मीटिंग मुद्दा अजेंडा काय आहे, तो अजेंडा जरा वाचा, प्लीज 63 व्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

**श्री. संतोष कांबळे (बी ए आर सी हॉस्पिटल):** सर तुम्ही प्लीज ऐका, मी तुम्हाला विनंती करतोय.

DRAFT 64th AGM

**श्री. बाहुबली चौगुले (मानद सचिव) :**अध्यक्ष साहेबांनी सांगितलं त्यानुसार हे इतिवृत्त संस्थेच्या संकेतस्थळावरती जानेवारीपासून पोस्ट केलं होतं, तुमच्या काही हरकती असतील तर फेब्रुवारी पर्यंत आम्ही तुम्हाला सांगितलं होतं तेव्हापासून ते आज पर्यंत काही हरकती असतील तर तुमच्या त्या इथे नोंदवा आणि ह्या इतिवृत्ताला सूचक आणि अनुमोदक द्या.

**श्री. संतोष कांबळे (बी ए आर सी हॉस्पिटल):** तुम्ही अहवालामध्ये पान क्रमांक 25- 26 वर जे नियम टाकले आहे ते वाचा पहिले, हे सगळे एजीएम मध्ये मान्यता देतात.

**श्री.एस.एस.महाजन (एफआरडी):** आपण इथे इतिवृत्त कायम करतो आहोत, किती म्हणजे सर्व गेल्या बैठकीमध्ये ज्या गोष्टींवर ती चर्चा झाली ते आपण मान्य करत आहोत त्याच्याबद्दल जर उल्लेखावर कोणी जर तुमच्या आक्षेप घेतोय तर तुम्हाला ते ऐकून घ्यावे लागेल तुम्ही म्हणताय तो विषय घेऊच नका सर कसं शक्य आहे तुम्हीच मान्य केलेल्या गोष्टींवरती आम्ही आक्षेप घेत आहोत की या गोष्टींचा उल्लेख ज्या पद्धतीने मान्य झाला होता तसा आला नाही तो उल्लेख कसा असावा यावर कोणाचा ऑब्जेक्शन असेल तर तुम्ही त्याला आता बोलू न देणे. हे योग्य नाही त्या इतिवृत्तातला तुम्हाला फरक दाखवला जाणं हे योग्य आहे.

**श्री. गिरीष शेणई साहेब (पदसिद्ध अध्यक्ष) :** तुमचे आक्षेप नोंदवण्यासाठी जानेवारीपासून ते फेब्रुवारीपर्यंत सोसायटीच्या संकेतस्थळावरती हे मिनिट होते. मला एवढेच सांगा की हे इतिवृत्त कायम करायचे की नाही.

**श्री. मुकुंद वैराळकर (एऍण्डएसईडी) :** अध्यक्ष महोदय मी सभागृह तर्फे आपल्याला सांगू इच्छितो की आम्हाला हे इतिवृत्त कायम करायचे नाही. विषय आटोपला जर एजिएम पुढे चालू द्यायचे असेल तर आपण स्पष्टीकरण द्या, किंवा नसेल तर आजची सभा तहकूब करा.

**श्री.राजेश कळके (सीडीएम):** साहेब असं करून चालणार नाही, इतिवृत्त जर कायम करायचा आहे तर त्यामधील झालेल्या ठरावावरती चर्चा ती ही आपल्याला करावीच लागणार आहे आणि इतिवृत्त तुम्ही तुमच्या सोयीनुसार घेऊ नका, कारण तिरपुडे साहेबांना मी जवळजवळ तीन-चार महिने भेटतोय,आम्ही डायरी अहवालाच्या संदर्भात प्रश्न विचारले तुम्ही आता नियम सांगणार त्यामुळे इतिवृत्त आम्हाला मान्य नाही जे सभागृहाला आवडेल तेच होईल, कारण तुम्ही तसा प्रोटोकॉल सांगितलेला आहे, सभागृह उच्चतम स्थानावर आहे.

**श्री.एस.एस.महाजन (एफआरडी):** साहेब गेल्या वर्षी आर्थिक वर्षात जे जे काय झालं ते ह्या इतिवृत्तांमध्ये दिलेले आहे लिहिलेले आहे, अगदी बरोबर, टेक्निकली इट इज राईट ना, मग आपण काय ठरावाची लँग्वेज समजून घ्या अर्थ समजून घ्या, त्या वार्षिक सर्वसाधारण सभेत तुम्ही असा ठराव आहे तो मांडा, त्याच्यावर लोकांचं मत घ्या,

DRAFT 64th AGM

**श्री.बाहुबली चौगुले (मानद सचिव) :** 63व्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये जे डिस्कशन झालं ते इथे लिहिलं गेलंय हे. मी विनंती करतो सभेमध्ये जे बोलणं झालं ते, या सभागृहात, या पटलावरती परत सभासदांच्या समोर मांडले, त्याच्या मधले जे ठराव आहेत, त्याबद्दल आपण इथे बोलत आहोत.

**श्री. मुकुंद वैराळकर (एऍण्डएसईडी)** तुम्ही सांगताय फेब्रुवारी महिन्यामध्ये हा अहवाल पोस्ट केलाय, AGM मीटिंग 23 ऑगस्ट 2025 रोजी आहे, जो काय ठराव आहे, जे काय असेल ते सर्व एजएम मध्ये संमत करायचा आहे, त्यामुळे तुम्ही फेब्रुवारी - एप्रिल - मे कधीही मिनिट्स टाका, बाय लॉज आहे, कुठले तरी नियम आहेत? कृपया तुम्ही एवढे लक्षात घ्या. पेज नंबर 43 फक्त तुम्हीच वाचा थोडासा, याच्यावरती स्पष्टीकरण येऊ द्या, काहीच न बोलणं योग्य नाहीये. तुमची तब्बेत  ठीक नाही मला मान्य आहे.

**श्री.एस.एस.महाजन (एफआरडी):** आपण आता मुद्दा मांडलेला आहे, आपल्या अजेंडानुसार 63व्या सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्ताला कायम करणे, आम्ही सर्व तुम्हाला मिळून सांगतो आहोत.  नाही करत.

**श्री. गिरीष शेणई साहेब (पदसिद्ध अध्यक्ष) :** मला वाटतंय यांच्यात डिफरन्स ऑफ ऑपिनियन आहे, मॅनेजिंग कमिटी मध्ये आणि सभासदांमध्ये असे वाटते. माझं वैयक्तिक मत आहे की मागच्या 63 व्या वार्षिक सभेत जे काही डिस्कशन झालं, मला वाटतंय आपल्यासारखी मिनिट्स ऑफ मीटिंग क्वचितच बघायला मिळतील.

**श्री.बाहुबली चौगुले (मानद सचिव) :** सर मी तुमच्या शब्दाला मान देऊन एवढं सांगितलं की, त्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये जे डिस्कस झालं ते इथे आलय ना, या मुद्द्याला टेक्निकली आपल्याला अप्रू करायच, कायम करायच.

**श्री. मुकुंद वैराळकर (एऍण्डएसईडी) :** आम्ही हे नाही कुठे बोलतोय.

**श्री.बाहुबली चौगुले (मानद सचिव) :** मग सर Approve करा ना, सूचक आणि अनुमोदक द्या.

**श्री. मुकुंद वैराळकर (एऍण्डएसईडी) :** परंतु या शब्दालाही काही अर्थ आहे,

**श्री.बाहुबली चौगुले (मानद सचिव) :** एक मिनिट ऐकून घ्या ना,

DRAFT 64th AGM

**श्री. मुकुंद वैराळकर (एऍण्डएसईडी) :**असं सांगा तुम्ही की हा जो विषय आहे, हा पेज क्रमांक मिनिट्स 43 मध्ये आलेला विषय आहे, हा या इतिवृत्ताच्या व्यतिरिक्त जेव्हा आपल्याला या अजेंड्यावर येईल तेव्हा आम्ही हा विषय प्राधान्याने इथे घेऊ, हे तर तुम्ही हे तर तुम्ही क्लियर करा, काहीच नाही बोलायचं म्हणजे, इतिवृत्त कायम करायचं, मिटिंग झाली, इतिवृत्त कायम आहे, काय 100/- रुपयाच कुपन घेतल, ते घेऊन घरी जायचं?

**श्री.बाहुबली चौगुले (मानद सचिव) :**सर, या इतिवृत्त मध्ये जिथे जिथे काही ठराव आलेले आहेत डिस्कशन केलेल आहे. तो तो विषय जेव्हा येईल त्याच्यावरती डिटेलमध्ये इथे एक्सप्लेनेशन देण्यात येईल.

**श्री. मुकुंद वैराळकर (एऍण्डएसईडी)** : धन्यवाद.

**श्री.एस.एस.महाजन (एफआरडी):** जो माणूस शब्द बोलतोय तो पूर्ण आपण लिहितो तर जो अहवाल आलेला आहे त्याच्या त्या वेळेला जे काही आपण बोललो किंवा डिस्कस केलं ते पूर्ण याला आहे की नाही हे आपल्याला बघायचं आहे तर हा जो पहिला अजेंडा आहे त्याबाबत आहे ती 63 व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत काही डिस्कस झालं ते पूर्णतः याच्यात आलेला आहे की नाही मुद्दा एवढाच आहे, त्याच्यावर असलेल्या मुद्द्यांवर डिस्कशन हा विषय हा पहिला अजेंडा मध्ये नाहीये अध्यक्ष महोदय एक मिनिट तुम्ही मंचावरून जे काही मिनिट प्राप्त झाले

आहेत ते आले त्यामध्ये पण आपले कमेंट आहे येणाऱ्या पुढच्या AGM आधी जो काही अहवाल येईल तो तुम्हाला कळविण्यात येईल हे आपण स्टेटमेंट दिलेला आहे.

**श्री.संतोष कांबळे (बी ए आर सी हॉस्पिटल):-** चौगुले साहेब, तुम्ही मगाशी सांगितलं ना की ठराविक लोकांना बोलून तुम्ही उत्तर दिलेत. सगळ्यांना आता बोलून उत्तर द्यायचेत.

**श्री.बाहुबली चौगुले (मानद सचिव) :** ज्या ज्या सभासदांनी त्यावर आक्षेप घेतला, त्यांच्या हरकती नोंदवून घेऊन, त्यांनाच बोलावलं ज्यांच्या हरकती होत्या, त्याच्यामध्ये चेंजेस केले.

**श्री.संतोष कांबळे (बी ए आर सी हॉस्पिटल):** तुम्ही ठराविक लोकांना बोलावलं ना ?

**श्री.बाहुबली चौगुले (मानद सचिव) :**थोडासा शब्दाचा अर्थ वेगळा होतोय संतोष कांबळे साहेब, विनंती करतोय, मी जे काय बोलतोय ते अध्यक्षांच्या परमिशनुसार त्यांच्या मार्गदर्शनानुसार आपण हे इतिवृत्त संस्थेच्या संकेतस्थळावर टाकलं त्याच्या अनुषंगाने बीटीएस वर एक नोटीस टाकले, त्यामध्ये फॉरमॅट दिला होता सदर इतिवृत्तामध्ये ज्या सभासदांना काय सूचना असेल, काही चेंजेस हवे असेल त्यांनी त्या फॉरमॅटमध्ये संस्थेमध्ये पंधरा तारखेपर्यंत द्यावेत, ते इन्कार्पोरेट करण्यात येतील ज्या ज्या सभासदांनी त्यावर आक्षेप घेतला, त्यांच्या हरकती नोंदवून घेऊन त्यांनाच बोलावलं, ज्यांच्या हरकती होत्या, त्याच्यामध्ये चेंजेस केले, तुम्ही आला असता तर नक्कीच तुमचंही हरकती नोंदवून घेऊ काही बदल असता तर तो केला असता.

DRAFT 64th AGM

**श्री.संतोष कांबळे (बी ए आर सी हॉस्पिटल):** पण तुम्ही म्हणाला ठराविक लोकांना बोलावलं त्यांच्या सूचना घेतल्या आणि चेंज केला.

**श्री.बाहुबली चौगुले (मानद सचिव) :** हा शब्द समजून घ्या, ज्या सभासदांनी याच्यावरती हरकती घेतल्या कांबळे साहेब फक्त त्यांनाच आम्ही इथे बोलावून तुमच्या हरकतीची नोंद घेतली.

**श्री. संतोष कांबळे (बी ए आर सी हॉस्पिटल):**ह्या ठरावावर तुम्ही काय करेक्शन घेतलं,हे कसं कळणार आम्हाला,

**श्री.बाहुबली चौगुले (मानद सचिव) :** काय ॲक्शन झाली हे नंतर येणार ना,

**श्री.संतोष कांबळे (बी ए आर सी हॉस्पिटल):**अहो ते कधी येईल हे आम्हाला कधी कळणार याच्यासाठी अ‍ॅक्शन घ्यायची आहे .

**श्री.बाहुबली चौगुले (मानद सचिव) :** साहेब जेव्हा विषय येईल, त्यावेळी सांगितलं ना की त्याच्यावरती त्याची उत्तरे देण्यात येतील. विनंती करतो ठराव क्रमांक 1 ला सूचक आणि अनुमोदक द्या.

**श्री. विलास घोरपडे (एफडी):** प्रथम आपल्या संचालक मंडळामध्ये जे बदल झालेत मॅनेजिंग कमिटी मध्ये मॅनेजिंग कमिटीचे सेक्रेटरी, उपाध्यक्ष खजिनदार, यांना खूप खूप शुभेच्छा, आता जो विषय चाललाय एक नंबर इतिवृत्त वाचून कायम करणे त्यासाठी आम्ही तयार आहोत, परंतु बारावा जो विषय आहे, एनी अदर मॅटर अजेंडा आहे तो प्रथम याच्यानंतर, विषयावर घेण्यात येत असेल तर आम्ही याला परवानगी देतो, या विषयावरती जो 43 पान क्रमांकावर ती मुद्दा आहे तो इथे चर्चेला घ्या, वेळ वाया घालवू नका. बारा नंबरचा विषय अजेंड्यावर दोन क्रमांकाला घ्या. जर तसं तुम्ही करणार असाल , तर आम्ही विषय क्रमांक एक ला मान्यता देऊ, 364 दिवस तुमच्या आहेत हा एक दिवस आमचा आहे,

DRAFT 64th AGM

**श्री. प्रकाश पाटील (एसआयआरडी):** मागे मला आठवतंय बिल्डिंग फंडाचा विषय होता, तो अजेंडा आपण एक नंबर वर घेतला होता मला वाटतं सगळ्यांना माहिती असेल ,घेता येतो सभागृह सर्वोच्च आहे. विलास घोरपडे यांनी ज्या पद्धतीने सांगितलं त्या पद्धतीने आम्ही पास करू जो अर्जंट आहे तो आपण दोन नंबर वर घेऊन हे तुम्ही मान्य करा तर आम्ही पास करतो, अध्यक्ष साहेब मी एक सांगतो काय चर्चा होणार आपले बाकीचे विषय राहणार बॅलन्स शीट पास करायचे आहे, अकराशे करोडचा आपला व्यवहार आहे बॅलन्स शीट एवढी मोठी आहे त्याच्यासाठी आता बोलायला भरपूर काय आहे साहेब मी बोललोय हा दोन नंबर अजेंडा घ्या, चौगुले साहेब दोन नंबर घ्या काही हरकत नाही आम्ही फटाफट मीटिंग संपवतो आम्ही वेळ घेणार नाही.

**श्री.बाहुबली चौगुले (मानद सचिव) :**पाटील साहेब तुम्ही बोलला तुमच्या सूचना, मी ऐकले मी तुम्हाला विनंती करतो तुमच्या काही हरकती असतील ते नोंदवा.

**श्री. प्रकाश पाटील (एसआयआरडी) :** हरकती नाही आहेत साहेब.

**श्री.बाहुबली चौगुले (मानद सचिव) :** बारा नंबर मध्ये माननीय अध्यक्षांच्या परमिशन ने घेऊ,

**श्री. प्रकाश पाटील (एसआयआरडी):**आमच्या हरकती नाही आहेत,आम्ही आत्ता पास करूया लगेच मिनिट्स, जर तुम्ही अजून मिनिटच पास होणार नाही तर पुढे सभा कशी चालेल , दोन नंबर अजेंडा जो -तो बारावा विषय आहे, तो आपण घ्यावा ताबडतोब.

**श्री. बाहुबली चौगुले (मानद सचिव) :**सन्माननीय सभासदांना मी विनंती करतो की तुमच्या हरकती नोंदवा आणि आपण बारा नंबर मध्ये नक्की घेऊ, आधी दोन-तीन-चार जे विषय महत्त्वाचे आहेत ते मुद्दे आपण क्लिअर करू, जर आपण बाराव्या अजेंडाला गेलो तर त्याचा अर्थ असा होईल की अगोदरचे 11 विषय पास झाले.

**श्री.एस.एस.महाजन (एफआरडी):**एक मिनिट सभेच्या जे काही कामकाजाचे नियम आहेत त्या नियमानुसार अध्यक्षांना हक्क असतो की ते त्यांच्या अजेंड्याचा क्रम बदलू शकतात, आणि जे आपल्याला आता विलास घोरपडे जी नी सांगितलं एक साधी सोपी गोष्ट होती, तुम्ही फक्त क्रम बदला. आम्ही हो म्हणतो. हो म्हणायला त्यांना क्रम बदलायला. हो म्हणायला तुम्ही जर तयार होत नाही, तर आम्ही कसं हो म्हणायचं. आम्ही तर मीटिंग लवकरात लवकर संपावी याच्यासाठी सांगतो आहोत. तुम्ही फक्त तुमच्या हातात जे काही, तुम्हाला ज्या पावर्स आहे, त्या याच्यामध्ये फक्त क्रम बदलायला हो म्हणा. अर्धा मिनिटामध्ये हा ठराव मंजूर घ्या.

DRAFT 64th AGM

**श्री. गिरीष शेणई साहेब (पदसिद्ध अध्यक्ष) :** मला कोऑपरेट लॉस जास्त माहित नाही.

**श्री. राम परब (युईडी) :** अध्यक्ष महोदयांना विनंती आहे, सर तुम्ही मगाशी टाइमिंगच खूप महत्त्व दिल आम्हाला म्हणून, यांना काय समजत नाही का, एक टाइमिंग द्या, घ्या ना 12 नंबर 1 नंबर. कशाला तुम्ही एवढं टेन्शन घेता?, होऊन जाऊ द्या ना एकदा, तो विषय संपेल. तुम्हाला आम्ही नेहमी सांभाळतो आणि आजही सांभाळू. पण योग्य गोष्ट आहे ती आमचे पण घ्या, आम्ही एकदा येतो वर्षात तुमच्या समोर, प्रश्न दिले तुम्हाला लिहून, शेवटच्या क्षणी उत्तर देतात.

**श्री. बाहुबली चौगुले (मानद सचिव) :** धन्यवाद.

**श्री. गिरीष शेणई साहेब (पदसिद्ध अध्यक्ष) :** आपल्याकडे लीगल कन्सल्टंट आहेत, आपण त्यांचा ओपिनियन घेऊया, आणि त्यांच्या ओपिनियन नुसार आपण करूया पाटील साहेब, निंबाळकर साहेब,

**श्री. राम परब (युईडी) :** सर एक मिनिट, लीगल ADVIOSR यांना कोणी बोलवलं? तुम्ही असं यांना AGM मध्ये बोलवण्याची गरज असते का? जर आम्हाला लीगल कडे जायचं असेल तर AGM घेऊ नकात, आम्ही तिकडे जातो ना ,

**श्री. बाहुबली चौगुले (मानद सचिव) :** साहेब, मी तुमच्या प्रश्नाच उत्तर देऊ इच्छितो. आपण गेल्या वर्षीच्या 63व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचलं, 63 व्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये, गेल्या वार्षिक सभेमध्येच, तुमचीच मागणी होती की आपण या सभेमध्ये कोणीही एक्सपर्ट नाहीयेत. त्यामुळे आपल्याला इथे जर लीगल कन्सल्टंट, टॅक्स कन्सल्टंट आणि जर संस्थेचे ऑडिटर येत असतील तर उत्तम होईल ही मागणी होती, म्हणून आपण सगळ्यांना बोलावल,

**श्री. राम परब (युईडी):**हो सेक्रेटरी महोदय, आम्हाला ते काही मान्य नाही, आम्हाला सरां ची एक गोष्ट पटली,वेळ आहे, वेळेमध्ये बाजी मारायची आहे, एक प्रश्न आमच्या हट्टासाठी घ्या, तुम्ही अगोदर घ्या,

**श्री.एस.एस.महाजन (एफआरडी):**सर आता तुम्ही म्हटलात की मला माहिती नाहीये, आपणच छापलेल्या अहवालाच्या याच्यात कोणापेक्षा कोण मोठं हे दिलेल आहे, आणि त्यात सर्वसाधारण सभेचा सभागृह मोठा आहे, तुम्हीच छापलय आम्ही नाही छापलेलं.

DRAFT 64th AGM

**श्री.राजेश कळके (सीडीएम):** सल्ला घेताना माझी सेक्रेटरी हगवणे यांचा सल्ला घ्या ना, कारण बिल्डिंग फंडचा विषय आहे ना, पहिला घेतला होता त्यांना माहिती आहे सेक्रेटरी ना, माजी सेक्रेटरी सांगा, विषय वरती घेता येतो का नाही, आपल्याला त्याच्यासाठी लीगल कन्सल्टंट काय गरज आहे, कन्सल्टंट गरजच नाही. आणि सभागृह हे उच्च स्थानावर आहे. माजी सेक्रेटरी शिवाजी साहेब सांगा, तुम्ही घेता येतो का नाही.

**श्री. गिरीष शेणई साहेब (पदसिद्ध अध्यक्ष) :** माझी अशी विनंती आहे की या बाबतीत आपण, निंबाळकर आलेले आहेत त्यांच ओपिनियन घेऊया.

**श्री.राजेश कळके (सीडीएम):** साहेब, सभागृहाला एक्सपर्ट वगैरे येणार आहेत, म्हणून सूचना दिली होती का?

**श्री.एस.एस.महाजन (एफआरडी):** आपल्याला मी नमूद करू इच्छितो, ही सर्वसाधारण सभा ही आपल्या सभासदा ची आहे, याच्यामध्ये बाहेरची व्यक्ती बोलू शकत नाही असा नियम आहे. त्यामुळे आम्ही कन्सल्टंटना तिथं बसायला काही बोललो नाही हे नशीब समजा, त्यांना तिथं बसून त्यांना ज्या विषयावर बोलवण्यात आलं असेल त्या विषयावर त्यांनी मध्ये बोलावं, अन्य ठिकाणी ते बोलू शकत नाही, त्यांनी बोलू नये .

**श्री. प्रभात सिंग (सीडीएम):** माननीय सर मे प्रभात सिंग सीडीएम, सर हम जो यहा बात कर एक्सपर्ट बुलाये, वो बुलाये एक्सपर्ट हमारी कमिटी के लिए होते, है जो उससे सीख के लेगी हमको बतायेगी, अगर उनकी कपेबिलिटी

इतनी नहीं है, की वो उनसे सीख के हमे बता सके तो किसलिए बैठे है ,वहा पे एक्सपर्टने जो लिगलर बोला है, आपको हमने इसलिये चुनके भेजा, ना की आप ये समझने लायक है, जब आप ही नही समज पाये वो आपको क्या समझा रहा है, तो आपको उसको बुलाना पडा, अगर कोई ऐसा हो रहा है ,लास्ट चालू चालू मिटिंग प्रॉब्लेम आ रही है ,उसकी राय लेंगे लेकिन सुरू से ही अपंग हो उसके डिपेंड हो रहे है, तो वो नही चलेगा,

**श्री.बाहुबली चौगुले (मानद सचिव) :** गेल्या वर्षीच्या इतिवृत्त मध्ये पेज नंबर 27 मध्ये श्री. सारंग सरांनी विनंती केली होती की, आपण इथे कोणीही एक्सपर्ट नाही आहोत, तर सभागरामध्ये जर सभाच्या वेळी संस्थेतर्फे जर ऑडिटर्स, लीगल अडवायजर उपस्थित असलं, तर त्यांच्याकड आपण सल्ला घेऊ शकतो. एक विनंती केली होती. त्या विनंतीला अनुसरून, आपण या सभेमध्ये मान्यवरांना बोलवलं.

**श्री. प्रभात सिंग (सीडीएम):** सर हम आपसे सहमत है, आगे आगे चलके सोसायटी चलाने के लिए कोई बाहर से आदमी हायर कर लेंगे आप, उसको खडा कर देंगे हमारे सामने. फिर क्या मतलब रह गया, सर जवाब तो आपको देना पडेगा.

**श्री. बाहुबली चौगुले (मानद सचिव) :** माझी विनंती आहे प्रभात सिंग सर, एक मिनिट असंसदीय शब्द नका वापरू प्लीज. या सभागृहाच खूप मोठं आहे.

DRAFT 64th AGM

**श्री. राम परब (युईडी) :** चौगले सर, एक मिनिट इकडे लक्ष द्या, फक्त माझ्याकडे लक्ष द्या, वेळेच खूप महत्व आहे. ऐका पूर्ण त्यांनी तुम्हाला सूचना दिली, ठराव नाही दिलाय, सारंग यांनी सूचना दिली, ती त्यांची सूचना होती, इथे ठराव लागतात, या गोष्टीसाठी ठराव घेतला का तुम्ही, तेव्हा वेळ वाया घालू नका, 14वा प्रश्न आहे, बारावा घ्या ना पटकन, कशाला वेळ वाया, आम्ही वर्षातन एकदा येतो, ठराविक प्रश्न विचारतो आण योग्य विचारतो, तुम्हाला बोलायला हट्ट काय, एवढे काय नाराजी आमच्यावर, ऑफिसमध्ये नेहमी सहयोग करतो, सगळ्या मिटिंगला, मग आमच एवढे इज्जत ठेवा.

**श्री. डी.एस धोत्रे (सीडीएम):** अध्यक्ष महोदय, मी डी एस धोतरे (सीडीएम). आता जो सन्माननीय सभागृहानी जी आपल्याला सूचना करत आहेत, की आपण विषय विषयाचा क्रम बदलावा, जरूर तो बदलावा, आपल्या सभागृहाचा मान ठेवून पण तत्पूर्वी आपल्या त्या सहकार कायद्याचा थोडासा अभ्यास करून, जो आपल्या बायोलॉज मध्ये उपविधीमध्ये तशी तरतूद आहे का, जर असेल तो तर ताबडतोप, तो प्रक्रिया बघा आणि तो विषय होत असेल तर पटकन वरती घ्या, विषय आपल्याला वेळ नको हे आजच्या आज आपल्याला हे सभा संपवता येईल.

**श्री.राजेश कळके (सीडीएम):** हे जे काही विषय मांडले जातात, ते संस्थेच्या हितासाठी मांडले जातात, आणि सभागृह तुम्हाला आदेश देतोय की बारावा जो आहे तो दुसऱ्या क्रमांकाने घ्यावा,

**श्री.एस.एस.महाजन (एफआरडी):** अध्यक्ष, महोदय मगासपासून मी आत्ता जो प्रश्न मांडण्यात आला की हे आपल्या कायद्यामध्ये बसतं का, अध्यक्ष महोदय लक्षात घ्या कायद्यामध्ये मध्ये काय बसत हे मगाशी पण मी तुम्हाला सांगितलं, आत्ता पण सांगतोय आणि कोण मोठं कोण लहान याच क्रमांक तुम्ही दिलेल आहे आणि ते सभागृहाला तुम्ही जे मान्य केलेल आहे त्याला तुम्ही नाही का म्हणताय,

**श्री. गिरीष शेणई साहेब (पदसिद्ध अध्यक्ष) :** महाजन साहेब. या सभागृहापेक्षा ही कॉन्स्टिट्यूशन ऑफ इंडिया सर्वात मोठी आहे, हे लक्षात घ्या. कायद्याला लागून नसलेल, कुठलही विधेयक पास करू शकत नाही. सभागृह हे सुप्रीम हा विषय जो आहे, तो इथल्या पुरता आहे, याचा अर्थ आपल्या हातात काही आहे असं होत नाही,

**श्री.एस.एस.महाजन (एफआरडी):** अध्यक्ष महोदय, मी ते म्हणत नाही, नियम पुस्तिका दाखवतोय, आपल्या उपविधीमध्ये काय लिहिल ते सांगतो, त्याच्याने होऊ शकतं.

DRAFT 64th AGM

**श्री. गिरीष शेणई साहेब (पदसिद्ध अध्यक्ष) :**तेच सांगतो तुम्हाला की माझी विनंती अशी होती आपल्याकडे एक्सपर्ट माणूस अवेलेबल आहे त्यांच मत घेऊ.

**श्री.डी.एस राजापुरे (डीआरएचआर) :** जर तुम्हाला क्रमवारी चेंज करता येत नसेल, तर 1 नंबर अजेंडा आहे, तसाच. ठेवून त्याला कुणीही अनुमोदक देणार नाहीये, तुम्ही 2 नंबर अजेंड्याला जावा तो तसाच राहू द्यावा, तो शेवटी घ्या, आम्हाला तो पास नाही करायचा, सभागृहामध्ये कुणालाही त्याच्यावर पास करण्याची इच्छा नाही. मी आता बोलायला उठलो की सभागृहाच्या वर्तनावरून असं दिसतय, की सभागृहाला हा एक नंबर अजेंडा पास करण्याची इच्छा नाहीये, नेक्स्ट अजेंडावर जावा, तो तसाच राहू द्यावा, तुमचा पूर्ण अजेंडा संपतील, पुन्हा एक नंबर अजेंडावर यावा अशी माझी विनंती आहे,

**श्री. बाहुबली चौगुले (मानद सचिव) :**माझी विनंती आहे सर, एक मिनिट ऐका, तुम्ही एक सन्माननीय सभासद आहेत, कुठल्याही वार्षिक सर्वसाधारण सभेचे जे विषय असतात ते एक ते पाच असू देत की एक ते दहा बारा असू देत त्याच्यामध्ये क्रमवारी चेंज होते, पण माननीय अध्यक्षांच्या परमिशनने सगळ्यात शेवटी जो विषय असतो, तो शेवटीच राहतो, तो कधीही वरती येत नाही, असं एक्सपर्ट लोकांच जे म्हणणं आहे, मी इथं सभागृहाला मांडतो, वरचे विषय तुम्ही वर खाली करू शकता, पण माननीय सभासदा अध्यक्षांच्या परमिशनने एनीदर मॅटर येतात, साहेब हे शेवटीच राहतात,

**श्री.डी.एस राजापुरे (डीआरएचआर) :**हो, मी तो विषय काढलाच नाही, मी काय बोला सभागृहाची मनस्थिती नाहीय, सूचक अनुमोदक देण्यासाठी, त्यामुळे तो अजेंडा तिथेच ठेवून तुम्ही पुढच्या अजेंड्याला जा, बारावा एकवर घ्या असं मी बोललो नाही, सभागृहाची मनस्थिती अशी दिसते की तो अजेंडा पास नाही करायचा, त्याला सूचक अनुमोदक नाही द्यायचं, तर आपल्याला काहीतरी निर्णय घ्यावा लागल म्हणून मी म्हणतोय.

**श्री.बाहुबली चौगुले (मानद सचिव) :** हाच निर्णय माननीय अध्यक्ष सरांनी पण सांगितला होता, सर एक मिनिट ऐका ना, सूचक अनुमोदक द्या आणि यातले जे विषय असतील ते माननीय अध्यक्षांच्या परमिशन आपण नंतर घेऊ.

**श्री. राम परब (युईडी) :**साहेब आम्हाला तुमचा विषय समजला, एक मिनिट हाऊस काय आहे, बारावा ना, हाऊस बद्दल तुम्हाला काय आहे की नाही, जर हाऊस तुम्हाला बोलता, तुम्ही काय बोलता आजच्या सभेचे सुप्रीम कोण आहेत कोण आहे, तुम्ही सांगा, तुम्ही म्हणता ना तुमच्याकड उत्तर पाहिजे, जर आम्ही आहोत. आमची इच्छा आहे त्या गोष्टीवर चर्चा होऊन जाऊ दे, आम्ही वारंवार इथून बोलतोय, टाईमाची तुम्हाला पडलेली नाही.

DRAFT 64th AGM

**श्री.बाहुबली चौगुले (मानद सचिव) :** भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेला कायदा सगळ्यात मोठा आहे. लक्षात घ्या, मी तुमच्यासमोर मांडलं की 1 ते 10 विषय जे असतील, आपण विषय क्रमांक 1 ला सूचक द्या, त्याच्यामधले जे विषय आहेत ते आपण नंतर घेऊ.

**श्री.सुरेश कुमार :** इधर सब लोग अजेंडा डिस्कस करने के लिए और जल्दीसे मिटिंग खतम करने के लिए आया है, और हमारा भी विचार मीटिंग जल्दी खतम करेअजेंडा कमप्लीट करे, हाऊस पुरा मेंबर्स आपको रिक्वेस्ट कर अजं बदलाव करके, बा नंबर अजेंडा लोगो को लगता है अजेंडा मे कुछ इम्पॉर्टंट चीज है, वो इम्पॉर्टंट चीज करेगा, तो आगे का अजेंडा मे बढ सकता है,, और ये आपके परव्यू मे है, अजेंडा चेंज करके आगे पीछे लेने के लिए, तो वापस ये हाऊस पुरा हाऊस आपको रिक्वेस्ट कर रहा, अजेंडा चेंज करके 12 नंबर अजेंडा, पहिले लेने के वापस एक बार आपको रिक्वेस्ट कर आप एक डिसिजन ले लो अजेंडा चेंज करके हाऊस का मन मानके अजेंडा, चेंज करके आगे लेके जा, थँक्यू

**श्री. गिरीष शेणई साहेब (पदसिद्ध अध्यक्ष) :**थँक्यू

**श्री.बाहुबली चौगुले (मानद सचिव) :** ठराव क्रमांक एक ला सूचक आणि अनुमोदक द्या.

**श्री. हेमंत कोळी :** सूचक आणि अनुमोदक द्या.

**श्री.एस.एस.महाजन (एफआरडी):** अध्यक्ष महोदय तुम्ही एक नंबरचा विषय तुम्हाला मोकळा करायचा आहे. तुम्ही म्हणताय सूचक, अनुमोदक विषयाच्या बाजूने द्या कायम करण्यासाठी. मी सांगतो तो पूर्ण करा क्लियर करू. सभागृहाला विनंती करतो मी जो पॉईंट मांडतोय, त्या विषयाला धरून त्याला कोण सूचक अनुमोदक देतय का ते बघावं, आम्ही हे जे तुम्ही इतिवृत्त आहे हे कायम करू इच्छित नाही.

**श्री. आनंद गवाणकर (एचपीडी) :**आता जे दिलेल आहे इतिवृत्त मागच्या सभेचं ते आम्हाला पारित करायचं नाही, बरोबर मान्य नाहीय,

**श्री. हेमंत कोळी :**ठराव क्रमांक एक ला सूचक आणि अनुमोदक द्या.

**श्री. विलास घोरपडे (एफडी):**अहो असं मागून नाही मिळत हो, सभागृह काय सांगतय, सभागृह पूर्ण सांगत, की नाही,

DRAFT 64th AGM

**श्री. प्रकाश पाटील (एसआयआरडी):**तुम्ही सर्वांनी हातवरती करून सांगा, सर्वांनी हातवर करा क्रमवारी आपल्याला चेंज करून हवी असेल तर.

**श्री.मनोज वाडेकर (आरईडी):**बघा, आता सर्वांना चेंज करून हवी आहे, एक दोन जण नाही पूर्ण एजीएम आहे, इथे पूर्ण ऊस बोलते हातवरती करा तुमची अशी मनमानी चालणार नाही इथे, तुम्हाला ऐकाव लागेल,

**श्री. आनंद गवाणकर (एचपीडी) :** प्लीज रेज हँड्स

**श्री. विलास घोरपडे (एफडी) :** बघा याच्यातून मार्ग काढा, हॅलो याच्यातून तुम्ही पण तिकडून, आम्ही पण इकडून असं होणार नाही, तुम्ही त्याच्यामध्ये जे आहेत मिनिट्स आहेत. इतिवृत्त कायम झाल्यानंतर लगेच घेणार आहात का, ज्या विषयावर आम्ही सांगेल ते विषय लगेच घेत असणार, तर लगेच घ्या, त्या मिनिट जे आहेत इतिवृत्ता मधले. ते लगेच घ्या, कायम झाल्यावर सेकंड नंबर लगेच त्याचाच घ्या,

**श्री. आनंद गवाणकर (एचपीडी) :** सेक्रेटरी.

**श्री. मनोज खेडेकर (एसआयआरडी):** -महोदय, हॅलो अध्यक्ष महोदय सर्वसामान्याची पब्लिक इकडे बसलेले आहे. त्यांना माहिती आहे की ही जी सभा आहे, पब्लिक साठी आहे, सर्व मेंबर साठी आहे, तर सर्व मेंबर बोलताय की एखादा विषय पूर्ण करा, तर प्लीज त्याचा मान ठेवा साहेब, आता जर तुम्ही विषय मीटिंग चालू केली आणि आता वादावादी नकोय, सगळेजण आपला अमूल्य वेळ देऊन आलेले आहेत, तर तोच विषय कंटिन्यू करा, प्लीज सर नाहीतर असं होत की तुम्हाला हा विषय डावलून काहीतरी, तुमचा मन करायचा म्हणून आणि आपले जे चेअरमन साहेब आहेत ते अस करू शकत नाही. उलट तुम्ही त्यांना रिस्पेक्ट दिला पाहिजे, तुम्ही आग्रह करू नका. माननीय अध्यक्ष साहेब, लोक म्हणताय तुम्ही आग्रह का करताय, लोक एवढे बहुमताने सांगताय तुम्हाला, त्या विषयात काहीतरी गांभीर्य आहे, म्हणून लोकांनी तो विषय अगोदर घ्यायला,

**श्री.बाहुबली चौगुले (मानद सचिव) :** पहिल्यांदाच की सभा अजेंड्यानुसार 1 ते 11 पर्यंत जाणार त्याच्यामध्ये आपण विषय कसेही वर घेऊ शकतो. बारावा विषय हा कायद्याने अध्यक्षांच्या परमिशनच्या नंतरच असतो एनी ऑदर मॅटर.

**श्री.एस.एस.महाजन (एफआरडी):**चौगुलेजी आपण ठरवून आलात का? कसही काही हो इतिवृत्त कायम करायचंच?

DRAFT 64th AGM

**श्री.बाहुबली चौगुले (मानद सचिव) :**नाही

**श्री.एस.एस.महाजन (एफआरडी):** मग आम्ही सगळे सांगतोत आम्हाला इतिवृत्त कायम नाही करायचं, एक नंबर अजेंडा पूर्ण झाला, का तुम्ही मग त्याला आडून बसलाय, करा पुढे सुरुवात आम्ही, इतिवृत्त कायम करत नाही,

**श्री. आनंद गवाणकर (एचपीडी) :** सर एक आठवण करून देतो, मागे मडगावकर पॅनलच्या काळात बिल्डिंग फंड utilization चार नंबरला विषय होता तो सभागृहाने पूर्ण विनंती करून एक नंबरला चर्चेला घेतला, त्यावेळेस सीसी मध्ये सभा व्हायची, तर ह्या गोष्टी होतात. एजीएमचा मान तुम्ही पण ठेवा, आम्ही पण ठेवतो, मडगावकरच्या काळामध्ये आणि हेच यातले अर्धे लोक तेव्हा खाली होते, यांनी चार नंबरचा विषय पहिल्यांदा करायला लावला, हा बिल्डिंग फंडचा बरोबर आहे, मग ज्यावेळेस एजीएम सांगते आम्हाला, आम्ही सांगतोय की हा विषय दुसऱ्यांदा घेऊया,

**श्री.राजेश कळके (सीडीएम):** मी सभागृहाला सांगू माजी सेक्रेटरी आहेत ना, हे मंचावर बसलेले याच सगळ्या जणांनी बिल्डिंग बंडलचा विषय पहिला घेतला होता,

**श्री.बाहुबली चौगुले (मानद सचिव) :** साहेब तो Any other matter मध्ये होता,

**श्री. आनंद गवाणकर (एचपीडी) :** एक मिनिट आणखीन एक आठवण करून देतो, त्याचा इतिवृत्त छापताना मडगावकरनी काय छापलं, सदर विषयावर गोंधळ घालता, काही सभासदांनी म्हणून चर्चा होऊ शकली नाही, असं नाही झालं, आम्ही सर्व सभागृहांनी, सभागृहाने त्याच्यावर बहुमताने चार नंबरचा विषय एक नंबरला घेऊन चर्चा केली आणि बहुमताने तो फेटाळून लावला, असं मी पत्र पण मडगावकरला दिलं पण त्यांनी त्या पुढच्या इतिवृत्तामध्ये ते छापलं नाही.

**श्री. बी ए पालवे (पीडी) :** एक मिनिट मी बी.ए. पालवे, एक तास झालाय तुम्ही एकाच विषयावरती आढून आहेत, हा विषय का तुम्ही पुढे घेत नाहीत, आम्हाला काही कामधंदे आहेत का नाहीत, आमचा विषय 12 नंबर घेतलाच पाहिजे, नाही तर सभा बरखास्त करा, याच्या पलीकडे काही नाही पाहिजे, किती वेळ झालाय हेच ऐकून घेत हे, ते बोलतात, आम्हाला जे ऐकायच ते भेटत का? तुम्ही सेक्रेटरी, तुम्ही अध्यक्ष आहेत, आम्हाला दुसरं काही काम नाही का, फक्त हेच ऐकायचं आमचा विषय आताच झाला पाहिजे, याच्या पलीकडे आम्ही काहीच बोलू शकत नाही.

DRAFT 64th AGM

**श्री. मुकुंद वैराळकर (एऍण्डएसईडी)** :अध्यक्ष महोदय, मला असं वाटत की आपण उगाच हा विषय ताणून राहलो, या 12 नंबर मध्ये या सभागृहाला काय पाहिजे हे यामध्ये आहे आणि मगाच तुम्ही सांगितलेल आहे, तुम्ही बोलले ना की हे इतिवृत्तामध्ये आहे जे काय असेल हे पॉईंट आपण प्राधान्याने घेऊ बस फक्त एक शब्द वापरा ना, की याला तुम्ही या इतिवृत्ताला वाचून कायम करा, नेक्स्ट येणारा जो सब्जेक्ट आहे नंबर दोन वरती मी हा विषय यामधील 12 नंबर मधील डायरीच जे प्रकरण आहे, त्या विषयावरती मी चर्चा करतो, एवढच एक बोला, दोन नंबरला तेवढच आहे, 10 मिनिटाचा विषय आहे. तेवढं ते करून टाकू एकदार कुठलंतरी एक एक प्रकरण तुम्ही बंद करत पुढे चला, एक तास गेला.

**श्री.बाहुबली चौगुले (मानद सचिव) :**वैराळकर साहेब, मला इथे तुम्ही दोन ठराव द्या, पहिला ठराव असा असेल की 63 व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच इतिवृत्त तुम्ही कायम करताय, नंबर दोन की बारावा विषय वरती घेण्यासाठी जे सूचक आणि अनुमानदक द्या,

**श्री. मुकुंद वैराळकर (एऍण्डएसईडी)** : ऐका ना चौगुले, जरा ऐकायची तयारी ठेवा या ठरावाला सूचक म्हणून मी माझं नाव देतो.

**श्री.एस.एस.महाजन (एफआरडी)**: एक मिनिट ही सर्वसाधारण सभा, ही कामगारांच्या, इन्वेस्टरच्या भल्यासाठी आहे की इथं हा व्यावहारिक डील चालला हे, केलं तर मी करेल, आणि ते केलं तर मी करेल, हा कुठला विषय ही कुठली पद्धत की, तुम्ही मला जर परत दिलं, तर आम्ही पुढे हा विषय घेऊन नाहीतर, नाही घेणार. अहो, जी सभा चालली आहे, जे तुम्हाला सगळ् सभागृह सांगतय ते न ऐकता तुम्ही सभागृहाबरोबर डील करतायत, व्यवहार करता आहात?

**श्री.बाहुबली चौगुले (मानद सचिव)** : सर शब्द चुकीचा करत आहात, तुम्हाला विनंती करतो.

**श्री.एस.एस.महाजन (एफआरडी):** शब्द हे अतिशय शुद्ध आहेत आणि स्वच्छ अर्थाचे आहेत आणि वाक्यही तेवढ्या शुद्ध आणि स्वच्छ अर्थाचा आहे यात चुकही नाही, एकही असंसदीय असभ्य शब्द नाही,

**श्री. मुकुंद वैराळकर (एऍण्डएसईडी)** : सूचक

**श्री. प्रकाश पाटील (एसआयआरडी) :** अनुमोदक

DRAFT 64th AGM

**विषय क्र.1: 63 व्या अधिमंडळाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**
**वार्षिक सर्वसाधारण सभा ठराव क्र.1: ठराव पास करण्यात आला की 63 व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून सर्वानुमते कायम करण्यात आले.**

**सूचक : श्री. मुकुंद वैराळकर (एऍण्डएसईडी)**
**अनुमोदक : श्री. प्रकाश पाटील (एसआयआरडी)**

**ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.**

**श्री. राम परब (युईडी) :** चौगले सर, तुम्ही बोलता शब्द चांगले वापरा, पण गेल्या वर्षाच्या जनरल बॉडीला, इथून काय शब्द आला, माहिती आहे का तुम्हाला? खाली बस, भांडायला गेलो, भरपूर विषय आहेत, आम्ही तुम्हाला सांभाळलाय, तेव्हा आमचे विचार पहिले घ्या. सर्वसामान्य सभासद आहेत, हे टेक्निशियन लोक वगैरे आहेत, आम्ही रोज चांगली भाषा बोलतो.

**श्री.राजेश कळके (सीडीएम):** हॅलो मिटिंगला वेळू घालू नका, सभा पाच दिवस चालायची.

**श्री.मनोज वाडेकर (आरईडी):** आपण जो लास्ट टाईम ठराव घेतला होता, डायरी संदर्भातला टेंडरिंगचा, त्याच्यावरती काय चौकशी आलं हे सगळया सभागृहाला कळू द्या,

**श्री.बाहुबली चौगुले (मानद सचिव)** :वाडेकरजी आधी विषय वाचू द्या, मी विनंती करतोय तुम्हाला परत ते सांगतो माननीय अध्यक्षांच्या परमिशननी बोलू द्या, मला माननीय अध्यक्षांच्या परमिशननी विषय क्रमांक 12 हा दोन वरती आला, आणि तो विषय मी वाचून दाखवतोय, माननीय अध्यक्ष यांच्या परवानगीनी ऐनवेळी येणाऱ्या विषयाबाबत विचार करणे या अनुषंगाने सभासदांच्या काही प्रश्न असतील, तर विचारा

**श्री.मनोज वाडेकर (आरईडी):** हॅलो पेज नंबर 13 वर इतिवृत्तात जो ठराव मांडण्यात आला लास्ट वेळेला, लास्ट मीटिंगला, त्या ठरावावरती जी चौकशी समिती स्थापन होणार होती, त्या चौकशी समितीमध्ये काय निघालं हे सांगा.

**बाहुबली चौगुले (मानद सचिव)** : 63 व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्ताच्या पेज क्रमांक 13 नुसार, सन्माननीय पदसिद्ध अध्यक्षांनी एक चौकशी कमिटी नियुक्त केली, त्या चौकशी कमिटीमध्ये जे मेंबर्स होते, त्यांनी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांना बोलवलं, त्यांच्या कडून चौकशी साठी डॉक्युमेंट्स मागवण्यात आले, त्या अनुषंगाने संस्थेकडून ते सगळे डॉक्युमेंट्स चौकशी कमिटीच्या समोर मांडण्यात आले, चौकशी कमिटीच्या समोर ते मांडल्यानंतर चौकशी कमिटीने परत पदाधिकाऱ्यांच्या कडून काही लेखी खुलासा मागवला, तो लेखी खुलासा संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी त्या कमिटीकडे सुपुर्द केला. त्याच्यानंतर त्या कमिटीने जो अहवाल बनवला, तो अहवाल पदसिद्ध अध्यक्ष पदसिद्ध उपाध्यक्ष यांच्याकडे दिलेला आहे. त्या अहवालाची कुठलीही प्रत संस्थेकडे आली नाही.

DRAFT 64th AGM

**श्री.मनोज वाडेकर (आरईडी):** बाहुबली साहेब, त्या विषयाने ऐका ना, मुळात प्रश्न समजले नाहीत की आपण एक चौकशी कमिटी AGM मध्ये मिळून बनवली होती, अध्यक्ष साहेबांनी ती कमिटी बनवली. कमिटी झाली, चौकशी झाली, आणि तिथे दोषी सापडले असतील तर एजीएमला सांगा, ठराव आपला जो आहे त्या पद्धतीने आपण करू, या ठरावात सरळ सरळ लिहिलय की, ठराव असा करण्यात येत आहे की डायरी छपाईच्या टेंडर प्रोसेसिंग मध्ये चुकीच्या पद्धतीने टेंडरिंग झाले, याची शहनिषा करून, ज्या पद्धतीने कोट कचेरीची शिक्षा होईल त्याला ला संचालक मंडळ पात्र असेल आणि जी रक्कम डायरी छपाई करता लागली ती या संचालक मंडळाच्या संचालक मंडळाने आपल्या खिशातून भरायची आहे, असा हा ठराव या सभेतून पास झालाय मग याच्यावरती काय आलय चौकशी ते कळू द्या. आपण ठरावावरती जाऊया,

**श्री.बाहुबली चौगुले (मानद सचिव)** :मी तुमच्या प्रश्नाला तेच उत्तर दिलं, की संस्थेकडून जे डॉक्युमेंट्स जे काही खुलासा हा त्या कमिटीला देण्यात आला.

**श्री.मनोज वाडेकर (आरईडी):**साहेब कमिटी अध्यक्षानी यांनी गठन केली होती ते उत्तर देतील, यात तुम्ही का उत्तर देताय,

**श्री.बाहुबली चौगुले (मानद सचिव)** : मग तुम्ही मला प्रश्न विचारला,

**श्री.मनोज वाडेकर (आरईडी):**मी अध्यक्षांनाच बोललो, मी पहिल्यांदाच अध्यक्षांना बोललो,अध्यक्ष महोदय हा ठराव आहे आणि याच्यावरती चौकशी झाली, काय सापडलं हे सभागृहाला कळू द्या ठीक आहे.

**श्री.एस.एस.महाजन (एफआरडी):** चौगुलेजी आपली तब्यत ठीक नसेल आपण बसा, जो इथं आमच्या प्रश्नांना, आम्हाला सामोर जायला समर्थ आहे अशा व्यक्तीने हे करावं.

DRAFT 64th AGM

**श्री. मुकुंद वैराळकर (एऍण्डएसईडी):**अध्यक्ष महोदय धन्यवाद, आपण जे आपल्या संमतीने ही कमिटी प्रस्थापित केली, या कमिटीमध्ये पदसिद्ध उपाध्यक्ष, सुद्धा या कमिटीमध्ये आहेत, आणि मला असं वाटते की ते एसआरएनडब्ल्यू चे DEO आहेत, त्यांनी या विषयावरती स्पष्टपणे आणि स्पेशल काहीतरी निर्णय घेतला असेल, जे काय असेल ते कारण धाडयून न ठेवता. बघा जे काय आहे विषय जर क्लियर करायचा असेल, तर स्पष्टपणे सभागृहाला उपाध्यक्ष सांगतील अशी मी त्यांना विनंती करतो, उपाध्यक्षांच्या तोंडूनच आपल्याला येऊ द्यायचा आहे, कारण प्रशासकीय व्यक्ती आहे ,प्रशासकीय व्यक्तीच्या मार्फतच हा विषय झालेला आहे. आणि त्यांनीच याच उत्तर द्याव.

**श्री. अविनाश तिरपुडे साहेब (पदसिद्ध उपाध्यक्ष):** ठीक आहे, बर माझी सर्वांना विनंती आहे, की कृपया शांतता ठेवा, नी जी आपली ही AGM आहे ती शांततेपणे पार पाडण्याकरता मदत करावी अशी माझी कृपया आपल्या सर्वांना विनंती आहे. तर हा जो विषय आहे मागच्या AGM मध्ये ह्या ठिकाणी मी तुमच्या इथे बसलेलो होतो खाली, कारण की त्यावेळेला मी पदसिद्ध उपाध्यक्ष म्हणून नव्हतो. तर ह्या विषयांमध्ये जी चर्चा झाली होती की एक इन्वेस्टीगेशन कमिटी फॉर्म करा. तर त्याकरिता आपले पदसिद्ध अध्यक्ष जे आहेत त्या सरांनी एक इन्वेस्टीगेशन कमिटी फॉर्म केलेली होती. त्या इन्वेस्टीगेशन कमिटीने जे पण डायरीच्या संदर्भामध्ये जे डॉक्युमेंट्स होते, जे कोटेशन मागवण्यात आले, ज्या निविदा मागवण्यात आल्या, त्या सर्व डॉक्युमेंट्स त्यांना मागवण्यात आल्या, आणि जे ह्या परचेस प्रक्रियेमध्ये जे इन्वॉल्व होते, त्या सर्वांना प्रश्न विचारण्यात आले आणि ते सर्व त्यांनी तीन ते चार दिवसाच्या पूर्ण अथक प्रयत्नानंतर त्यांनी आपला एक रिपोर्ट तयार केला, आणि पदसिद्ध अध्यक्षांना

सबमिट केला, त्यानंतर पदसिद्ध अध्यक्षांना तो सबमिट होऊन डायरेक्टर पर्सनल ॲडमिनिस्ट्रेशन प्रशासनाचे जे हेड आहेत त्यांच्याकडे आला, आणि त्यांनी एसआरडब्ल सेक्शनला मार्क केला, त्यानंतर त्याच्यावर पूर्णपणे जे जी प्रशासनाची प्रक्रिया आहे, त्याप्रमाणे त्याच्यावर इन्वेस्टिगेशन करण्यात आलं, आणि त्याच्यामध्ये असं निदर्शनात आलं की जी टेंडरिंग प्रोसेस आहे ती व्यवस्थित पार पाडण्यात आली नाही तर त्यानंतर तो विषय जो आहे त्यामध्ये फाईलमध्ये सबमिट होऊन जे आमचे सक्षम प्राधिकारी आहेत, आदरणीय कंट्रोलर साहेब, त्यांनी त्याच्यावर पूर्णपणे विचार करून, एक्झामिन करून असा निर्णय घेतला, की ह्या प्रक्रियेमध्ये टेंडरिंग प्रोसेस मध्ये व्यवस्थित प्रक्रिया पार पाडण्यात आली नाही, जी टेंडरिंग प्रोसेस आहे तर त्यानुसार जे मानद सेक्रेटरी आणि ट्रेजर ह्या दोघांना शोकज नोटीस इशू करण्यात आली आणि त्यांच्याकडनं त्याच्यावर अपेक्षित उत्तर आलेलं आणि त्या सर्वांच एक्झामिन पुन्हा करून त्याच्यावर अंतिमतः असं ठरवण्यात आलं की ह्यांना एक वॉर्निंग लेटर देण्यात यावं आणि अशा प्रकारची जर पुन्हा पुन्हा अशा प्रकारच जर घडलं अशा प्रकारचे जर त्यांच्याकडन चुका झाल्या, तर त्याच्याकरता कारवाई करण्यात येईल आणि दुसरा एक पत्र पदसिद्ध अध्यक्षांच्या हस्ताक्षराने सेक्रेटरी आणि ट्रेजर संस्थेचे यांना इशू करण्यात आले की यामध्ये सगळ्या जे बोर्ड ऑफ डायरेक्टर्स आहे, त्यांना पण सूचना देण्यात आल्या की यानंतरच्या ज्या प्रक्रिया होतील, टेंडरिंग प्रक्रिया किंवा परचेस प्रक्रिया त्याच्यामध्ये कसल्याही प्रकारची चुकी होऊ नये, आणि याच्यानंतर काय काय काळजी घ्यायला पाहिजे, टेंडरिंग मध्ये किंवा कुठल्या काही कशामध्ये त्यामध्ये तुमच्या डॉक्युमेंटरी एविडन्सस बरोबर पाहिजे, आणि व्यवस्थितपणे जे काही टेंडरिंग प्रोसेस होईल ती प्रोसेस व्यवस्थितपणे पार पाडण्यात यावी. त्याकरता काय काय त्याच्यामध्ये उनिवा होत्या, त्या उनिवा त्यांना दाखवण्यात आल्या आणि त्यांच्याकडन त्याचे उत्तर घेण्यात आलं की याच्यामध्ये येणाऱ्या येणाऱ्या भविष्यामध्ये जर तुम्ही टेंडरिंग करणार किंवा काही पण करणार तर त्याच्यामध्ये जे ज्या नियम आहेत, आणि अटी आहेत त्या पूर्णतः पाडल्या पाहिजेत ठीक आहे तर एवढे याच्यामध्ये आहे, त्यानंतर प्रश्न आला की हा अहवाल तुम्ही मागितला होता तर अहवाल मागितला होता त्याकरता तुमच्या, जे तुमचे जे अर्ज आले होते, त्यांची पण शहानिषा करून एक्झामिन करून कंट्रोलर साहेबांना, आम्ही सबमिट केलं होतं पण त्यांनी म्हटलं की हा कॉन्फिडेंशियल रिपोर्ट आहे त्यामुळे हा इतर कोणाला देण देऊ शकता नाही, बस हा त्यांचा निर्णय होता. आणि तो आम्ही तुम्हाला कळवलेला आहे त्याच्यावर काही आणखी तुम्हाला जर तक्रारी करायच्या असल्या तर तुम्ही पूर्णतः करू शकता, तुम्ही पूर्ण त्याकरता बंधनकारक नाही, आहात बस एवढ बोलून मी संपवतो, धन्यवाद.

**श्री. मुकुंद वैराळकर (एऍण्डएसईडी):**धन्यवाद, उपाध्यक्ष महोदय एवढा मोठा विषय गेल्या दोन वर्षापासून चालतोय, आणि यामध्ये फलित काय, एक वार्निंग लेटर असे, वार्निंग लेटर, तर एका एकाला प्रत्येक कर्मचाऱ्याला, चार चार पाच पाच आले असतील.

**श्री. अविनाश तिरपुडे साहेब (पदसिद्ध उपाध्यक्ष):** प्रशासनाचा विषय आहे, त्यामुळे प्रशासनाने त्यांना जे योग्य कारवाई वाटली ते योग्य कारवाई केलीय.

DRAFT 64th AGM

**श्री.मनोज वाडेकर (आरईडी):** मुळात सगळयांनी शांतपणे ऐका मुळामध्ये आता आपले, उपाध्यक्षांनी सांगितलं की त्यांनी टेंडरिंग प्रक्रिया ही चुकीची केली होती. आपल्याला काय हवय की अहवालामध्ये काय आढळून आलं तथ्य काय हे आपल्याला आढळायचं त्यांनी शिक्षा काय दिली वॉर्निंग लेटर दिली काय दिली हा आपल्या सोसायटीचा भागच नाहीये, तो त्यांचा वेगळा भाग आहे मॅनेजमेंटचा प्रशासनाचा आणि आपल्या सोसायटीचा भाग वेगळा आहे आपण सोसायटीवाल्या सर्वांनी हेच ठरवलं होतं, की जर त्यांची चुका आढळल्या त्यांनी चुकीच्या पद्धतीने केलय या सगळ्या गोष्टी असतील तर त्यांनी हे छपाईला जे लागले होते पैसे हे परत भरायचेत हा आपला ठराव आहे आणि आपण आपल्या ठरावाप्रमाणे जायचं त्यांनी काय कारवाई केली त्याच्याशी आपल्याला घेण नाहीये. त्यांनी शोकॉस्ट नोटीस दिली वगैरे आपल्या ठरावा पद्धतीने आपण जायचं त्यांनी चौकशी हे सापडलय की त्यांनी चुकीच्या पद्धतीने सगळ्या गोष्टी हाताळल्या,

**श्री. विवेक भागडीया :** With the Permission of chair, मी बोलतो वाडेकर साहेब, तुम्ही जे आता सांगितलं ना त्यात प्रत्येक गोष्टी खरी नाही तुम्ही जे सांगितलं ना की सर्व काही चुकीच आहे, सर्व काही चुकीचं नाही, साहेबांनी काय सांगितलं, जे कमिटीला आढळल आहे, ते प्रोसिजरल लॅब्स आहे.

DRAFT 64th AGM

**श्री.मनोज वाडेकर (आरईडी):** आपण आहे ना काय झालं, काय नाही याच्यावरती डिटेल मध्ये करायचं असेल, ना परत मी सगळे प्रूफ काढून रेडी आहेत, तुम्हाला जर डेबिटच करायचे आहे, तर आपण रेडी आहोत, तुम्ही सांगा तुम्ही कुठल्या पद्धतीने व्यवस्थित केलं मी सांगतो तुम्ही कशा पद्धतीने चुकीचं केलं तुम्ही त्या गोष्टीवर येऊच नका साहेब, साहेब समिती स्थापन झाली होती. त्यांनी त्यांचा अहवाल सांगितला याच्यावर तुम्हाला क्लेरिफिकेशन मागितलच नाही आपण.

**श्री. विवेक भागडीया :**आम्ही क्लेरिफिकेशन देतच नाही साहेब.

**श्री.मनोज वाडेकर (आरईडी):** तर मी इथून प्रूफ करायला रेडी आहे,

**श्री.राजेश कळके (सीडीएम):** एका मुद्द्याला पकडू नका, संस्थेचं नुकसान झालेल आहे का नाही?

**श्री. विवेक भागडीया :** कसं झालय मला सांगा ना?

**श्री.राजेश कळके (सीडीएम):**सांगतो कसं झालं ते ऐका, आता तुम्ही शांत रहा 200 रुपयाची डायरी दाखवली तुम्ही प्रत्यक्षात 100 रुपयाची डायरी आहे, तुम्ही दोन बोगस कंपन्या पेपरवर दाखवल्या, म्हणजे तुम्ही किती चलाकी केली आहे, आम्ही प्रू करू शकतो.

**श्री.मनोज वाडेकर (आरईडी):** मुळात 80 रुपयाची डायरी 185 रुपयानी तुम्ही आणली, कंपनी तुम्हाला सांगतो, मुंबईची सगळ्यात नंबर वन ची कंपनी शहा ट्रेडर्स म्हणून.

**श्री.राजेश कळके (सीडीएम):** तुम्ही जर इनोसंट होतात, तर डायरीची किंमत कमी का नाही होती, मग तुम्ही इनोसंट आहात ना मग डायरीची किंमत कमी का नाही.

**श्री. अविनाश तिरपुडे साहेब (पदसिद्ध उपाध्यक्ष):** नाही साहेब, याच्यावर प्रशासनाने जी कारवाई करायची ती कारवाई केलेली आहे,

**श्री.राजेश कळके (सीडीएम):** त्याच्यामध्ये, संस्थेच नुकसान झालेल आहे की नाही?

DRAFT 64th AGM

**श्री.मनोज वाडेकर (आरईडी):** ऐका ऐका ऐका प्रशासनाने जी कारवाई करायची होती ती केली आणि आता एजीएम जी कारवाई करायची आहे, ती करेल जो ठराव झाला आहे त्या पद्धतीने आपण पुढे जाणार आहोत.

**श्री. विलास घोरपडे (एफडी) :** हे पहा गदारळ नको, आपण शांतपणे त्यांनी जे सांगितल ठराव केलेला आहे तो पास झालेला आहे, त्याप्रमाणे जाऊ तर तुम्हाला, जे शोकोज नोटीस आले किंवा त्यांनी उपाध्यक्षांनी जे सांगितलेल आहे, त्याच्यामध्ये तथ्य आहे याच्यामध्ये तथ्य असं आहे की टेंडरिंग प्रक्रियेमध्ये प्रॉब्लेम झालेला आहे, पण आम्ही गेल्यावेळी हेच खालून सांगत होतो की टेंडरिंग प्रक्रियाच बोगस आहे, त्याच्यामुळेच ही आपली ही समिती नेमण्यात आली होती. प्रक्रिया भोगस आहे याच्यावरूनच ही झाली होती समिती नेमण्यात आली होती, आणि मेन त्याच्यातच हे सापडलेले की प्रक्रिया ही चुकीची होती, आलेले टेंडर फेक होते.

**श्री. विवेक भागडीया :** परत रिपीट करा क्वेश्चन,

**श्री. विलास घोरपडे (एफडी) :** परत तोच विषय,

**श्री. विवेक भागडीया :** मला बरोबर तुमचा प्रश्न समजू द्या.

**श्री. विलास घोरपडे (एफडी) :** गेल्यावेळी पण हाच विषय झाला होता की टेंडर प्रक्रिया चुकीची होती, टेंडर हे बनवले गेले होते, टेंडर जे इतर होते ते फेक होते, याच्यावरतीच आपली चर्चा होऊन कमिटी बसवली,

**श्री. विवेक भागडीया :** प्रक्रिया चुकीची नव्हती,

**श्री. विलास घोरपडे (एफडी) :** ठराव झालाय त्याच्यावरून हे आपण एक कमिटी घटित केली आणि कमिटी अंती जे होईल. आता तर तुम्हाला कमिटी अंती तुम्हाला आपल्याला मिळालेच आहे, शोकज नोटीस मिळाले, त्याच्यामध्ये तुम्हाला हे यांनी हे डिसाईड केल की बाबा तुम्ही सापडलेल्या टेंडर प्रक्रियेमध्ये प्रॉब्लेम आहे, त्या पद्धतीने आता आपण जे ठराव केला त्या पद्धतीने जाऊ,

**श्री. विवेक भागडीया :** टेंडर प्रक्रियेमध्ये प्रोसिजरियल चुका आहेत ते पहिला पण साहेबांनी सांगितल आहे.

**श्री.राजेश कळके (सीडीएम):** मग त्यामुळे संस्थेचा फायदा झाला? मी म्हणतो. तुम्ही केलेत. करू शकत नाही होतो की हे करा घोरपडे ऐका, हे सगळ सभासदांनी केल अस म्हणायचं का तुम्हाला? टेंडरंग प्रक्रिया केली कोणी? अहो आम्ही शोधून काढली की बोगस आहे म्हणून. एक वर्ष लागल उपाध्यक्षांनी स्वतः सांगितलेल आहे, की टेंडिंग प्रक्रिया.

DRAFT 64th AGM

**श्री.मनोज वाडेकर (आरईडी):**जो रिपोर्ट दिला आहे, रिपोर्ट मध्ये क्लिर कट केलेला आहे की टेंडिंग प्रक्रिया ही दोषी होती. ठराव पास झालेला आहे की, छपाईला जे लागले होते पैसे हे परत भरायचेत हा आपला ठराव आहे.

**श्री. विवेक भागडीया :** तुम्ही पूर्ण वाचा साहेब, जरा पूर्ण वाचा.

**श्री.मनोज वाडेकर (आरईडी):**ठराव करण्यात येत आहे की डायरी छपाईच्या टेंडिंग प्रोसेस मध्ये चुकीच्या पद्धतीने टेंडिंग झाले याची शहानिशा करून ज्या पद्धतीने कोर्ट कचरी शिक्षा होईल, त्याला संचालक मंडळ पात्र असतील आणि जी रक्कम या डायरी छपाई करता लागली ती या संचालक मंडळाने आपल्या किशातून भरायची आहे, असा ठराव या सभागृहातून पास करण्यात आला ठीक आहे.

**श्री.संतोष ढमढेरे :**अध्यक्ष साहेबांच्या परवानगीने मी या विषयावरती थोडस आपल मार्गदर्शन करू इच्छितो, सभागृहामध्ये जो आता ठराव आता आपल्याला खेडेकर यांनी वाचून दाखवला त्या ठरावामध्ये क्लियर कट लिहिलेल आहे. ठरावामध्ये आस्थापनेने जी चौकशी केली, त्या चौकशीमध्ये कुठल्याही प्रकारचा अहवाल संस्थेला ला प्राप्त झाला नाही, ही बाब आता आपल्याला इथे वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये आम्ही मांडलेली

आहे, महत्त्वाचा दुसरा मुद्दा की त्यामध्ये त्यांनी कुठल्याही पद्धतीचा अहवाल संस्थेला प्राप्त झालेला नसल्याने फक्त त्यांनी प्रोसिजरल लॅब्स मध्ये त्यांनी सांगितलं. आणि आपण ठराव पास करताना त्याच्यामध्ये क्लिअरकट असं लिहिलं होतं की कोर्ट कचेरी केल्यानंतर तर माझी सभागृहाला विनंती आहे, की जर सभागृहाला ह्या विषयावरती हरकत असेल, तर त्यांनी त्याच्या पुढच्या कारवाई करता जायचंय,

**श्री.मनोज वाडेकर (आरईडी):** संचालक साहेब तुम्ही पूर्णतः चुकीच्या गोष्टी सांगताय.

**श्री.राजेश कळके (सीडीएम):**तुम्ही चुकीच्या गोष्टी सांगतात, सभागृहाला विषयाच विषयांतर करू नका ठरावामध्येच, तुम्ही वाचा की याच्यात दिलेल आहे, कोर्ट कचरी हा पुन्हा वाचा ना ज्या पद्धतीने कोर्ट कचेरीला शिक्षा होईल, वाचा होईल त्याला संचालक मंडळ पात्र असेल, म्हणजे यांना शिक्षा तरी कोटकचेरी पद्धतीने मिळेलच, पण जे संस्थेचे यांनी विनाकारण 36 लाख रुपये खर्च केलेत ना, ते परत भरायचे हे यात नमूद केलेल आहे. वाचा तुम्ही.

**श्री.संतोष ढमढेरे :**मी फक्त एकच सांगतो, याच्यामध्ये कोर्ट कचेरी हा शब्द आलेला आहे, वार्षिक सर्वसाधारण सभा हा ठराव पास करते इथून संचालक मंडळाला सुद्धा अधिकार आहे, संचालक मंडळ तुम्ही जो दिलेला ठराव आहे हा सर्व मताने आम्ही हा अमान्य करत आहोत, या उपर जर तुम्हाला वाटत असेल, तर तुम्ही कोर्टामध्ये जा त्यानंतर जे काही निर्णय येईल तो संचालक मंडळाला मान्य असेल,

DRAFT 64th AGM

**श्री.मनोज वाडेकर (आरईडी):** आम्हाला कोर्टात पाठवता, तुमची मनमानी चालणार नाही

**श्री.राजेश कळके (सीडीएम):** तुमची मनमानी चालणार नाही. तुम्ही कोर्टात पाठवता.

**श्री.संतोष ढमढेरे :** ही मनमानी नाहीय. वार्षिक सर्वसाधारण सभा कळके साहेब,

**श्री.एस.एस.महाजन (एफआरडी):** अध्यक्ष, ठराव पास होता त्यावेळेला तुम्ही ठरावाला मान्यता दिली, आताही तुम्ही बोललात की आम्ही ठरावाला मान्यता दिली होती, आहे ठरावा पद्धतीनेच आम्ही चाललोय, ठरावा पद्धतीनेच ऐका म्हणूनच तुम्ही दोषी आढळला, तर तुम्हाला कोर्ट कचेरी प्रमाणे शिक्षा मिळेलच, पण तुम्हाला हे पैसे परत भरायचेत.

**श्री. प्रकाश पाटील (एसआयआरडी) :**सभागृहातल्या मिनिट्स आपण पास केले, म्हणजे हा ठराव पास झालेला आहे लक्षात ठेवा.

**श्री. राम परब (युईडी) :** साहेब एक मिनिट माझ ऐका, तुमच्या पर्सनालिटीला उत्तर सोबत नाहीय. मी तुम्हाला चांगला ओळखतो, माझ्या माहितीनुसार या डायरी प्रक्रिया सुद्धा मॅनेजमेंट कमिटीमध्ये तुम्ही विरोध केलेला, कारण तुमच्या ह्या पर्सनालिटीला सोबत नाही. मी तुम्हाला चांगला ओळखतो, त्यावेळी फिरवायची भाषा कोर्टाची, भाषा करू नकात, जे काय ठरलेल आहे, पैसे द्यायचे असेल त्याच्यावर चर्चा करा.

**श्री.संतोष ढमढेरे :**त्याला मी उत्तर देतो ऐकून घ्या, परब साहेब बोलले, त्या गोष्टीला गेल्या वर्षीच्या ठरावामध्ये जेव्हा डायरीच्या विषयावरती शब्द विचारले होते, वाडेकरांनी विचारलं होतं, त्यावेळेस मी स्वतः सांगितलं होतं मी विरोध केला होता, बरोबर आहे पण जेव्हा जिथे, अयोग्य गोष्ट घडते तिथे बोलणं हे कर्तव्य समजतो, मी स्वतःच आणि आताही आताही ज्या पद्धतीने इथे अयोग्य घडतय.

**श्री.मनोज वाडेकर (आरईडी):** भाषण देऊ नका, पद्धत नाही.

**श्री.राजेश कळके (सीडीएम):** तुमच्या चुकीसाठी, आमचे पैसे खर्च करून तुम्हाला अधिकारच नाहीय.

DRAFT 64th AGM

**श्री.संतोष कांबळे (बी ए आर सी हॉस्पिटल):-** साहेब एखादा ठराव पास झाल्यानंतर तो रद्द करता येतो का? कमिटीला ठराव पास झाल्यानंतर नामंजूर करता येत का? तुम्ही सांगा?

**श्री.संतोष ढमढेरे :**त्या विषयावरती बोलतो साहेब.

**श्री.संतोष कांबळे (बीएआरसी हॉस्पिटल):** आपला मिनिट पास झालय.

**श्री.संतोष ढमढेरे :**आता तुम्ही बोललात, तुमचा प्रश्न समजला मला उत्तर तर देऊ द्या. मी तुम्हाला काय म्हणतोय, की गेल्या वर्षी सुद्धा आपला पहिला विषय काय होता इतिवृत्त वाचून कायम करणे, त्या विषयामध्ये जेव्हा डायरी प्रकरणावरती आपण चर्चा केली, डायरी प्रकरणावरती आपण जेव्हा भाष्य केलं, तर आपण इतिवृत्त वाचन कायम केलं, इथे सहकार तज्ञ त्यांच्याशी बोलल्यानंतर मला असं लक्षात आलं, की ठराव आपण एखादा केल्यानंतर त्याच्यामध्येच पुन्हा दुसरा ठराव घेता येत नाही, कायद्याने त्याला मान्यता नाही, ही गोष्ट तुम्ही लक्षात घ्या, आणि त्यामुळे तो जो ठराव आहे, मागच्या आजच्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये जो आपण केलेला आहे, तो सुद्धा इथे ग्राह्य होत नाही, हे सुद्धा बाब आपण लक्षात घ्या, कायद्याने कोर्ट कचेरीला, त्या पद्धतीने जाता येणार नाही,

**श्री.संतोष कांबळे (बी ए आर सी हॉस्पिटल):-** हा मग ठराव इतिवृत्तामध्ये मांडायचा नाही,

**श्री.संतोष ढमढेरे :**ऐका इतिवृत्तामध्ये जो ठराव,आहे तो कुठे आम्ही बदलतोय,

**श्री.संतोष कांबळे (बी ए आर सी हॉस्पिटल):-** माझं काय म्हणण आहे, तुम्ही इतिवृत्तांत मंजूर केल ना? तुम्ही मग हा ठराव इतिवृत्तांत मांडायचा नाही, तुम्हाला कायदा माहीत होता ना? तुम्ही हा ठराव इतिवृत्तांत का मांडला?

**श्री.संतोष ढमढेरे :**ऐका साहेब, तुम्ही बोलताय, इतिवृत्तामध्ये ठराव का मांडला? इतिवृत्तामध्ये जो ठराव आला तो ठराव वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये इथे जे जे विषय चर्चेला गेले मुद्दे आहेत.

**श्री.संतोष कांबळे (बी ए आर सी हॉस्पिटल):-** ठराव कॅन्सल करता येत नाही? आणि इतिवृत्तानंतर मंजूर करता,

**श्री.संतोष ढमढेरे :**तुम्हाला मी काय सांगितलं की हा जो ठराव आपण केला, इतिवृत्तामध्ये आला, पण कायद्याच्या चौकटीमध्ये जेव्हा आपण जाऊ, मी त्याच्या पुढच्या गोष्टी सांगतोय,

**श्री.संतोष कांबळे (बी ए आर सी हॉस्पिटल):-** एक मिनिट, तुम्ही आमच्या इथून मंजूर करून घेतल की नाही?

DRAFT 64th AGM

**श्री.संतोष ढमढेरे :**बघा इतिवृत्त मंजूर झालय.

**श्री.संतोष कांबळे (बी ए आर सी हॉस्पिटल):-** मग त्याच्यामध्ये तुम्ही बदल करू शकणार का?

**श्री.संतोष ढमढेरे :**इतिवृत्ता मध्ये कुठलाही बदल नाही. वार्षिक सर्वसाधारण सभेने जो ठराव आता इथे वाचून दाखवला, तो जसाच्या तसा त्याच्यामध्ये एका शब्दाचाही बदल नाही.

**श्री. धनंजय धेंडे (डीसिएसइएम) :** अध्यक्ष महोदय, आता मला बोलू द्या जरा, सर याच्यावरती मी थोडासा प्रकाश टाकू शकतो की, वाडेकर साहेबांनी जो डायरीचा प्रश्न घेतला, कळके साहेबांनी जो प्रश्न घेतला, त्याला माझी सहमती आहे, परंतु मला अध्यक्ष महोदयांना एक विनंती आहे की तुम्ही आम्हाला परवानगी द्या, की कोर्टामध्ये जाण्यासाठी आणि तो कोर्टामध्ये सिद्ध झाला की मग यांच्यावर कारवाई करू,

**श्री.राजेश कळके (सीडीएम):** वेळ काढू पणा होईल.

**श्री.मनोज वाडेकर (आरईडी):** आपल्याला ऑलरेडी चौकशी समितीने रिझल्ट दिल आहे, समिती स्थापन झाली, त्या समितीने केली सहनिशा, हे सापडलं की हे लोक दोषी आहेत, तर हा ठराव इथे त्या पद्धतीने लागू झाला पाहिजे.

**श्री.एस.एस.महाजन (एफआरडी):** आपण आता जे काही व्यासपीठावरन सांगता, ही सभा अध्यक्ष महोदयांच्या अध्यक्षतेखाली होते, व्यासपीठावरन येणारी कोर्ट कचेरी करा इथपर्यंतची मतं, ही आपल्या संमतीने आली आहेत का ? अध्यक्षांनी उत्तर द्याव? अध्यक्ष तुम्ही जे मत मांडताय ते व्यासपीठातर्फे मांडतात, व्यासपीठाचे अध्यक्ष जे आहेत, त्यांनी तुम्ही मांडलेल्या कोटकचेरी करा? आपल्याच बांधवांवर या मताला अध्यक्ष महोदयांच संमती आहे का?

**श्री. गिरीष शेणई साहेब (पदसिद्ध अध्यक्ष) :**मी तुम्हाला माझ्या सुरुवातीच्या भाषणात सांगितलं की. मी आम्ही पदसिद्ध अध्यक्ष आणि पदसिद्ध उपाध्यक्ष आहोत आम्ही आस्थापनाचे रिप्रेझेंटेटिव्ह आहोत. ना तुमचे आहोत. ना त्यांचे आहोत. आम्ही न्यूट्रल आहोत. कुठलीही जनरल बॉडी, लॉ चवर नाहीये. कॉन्सिट्यूशन ऑफ इंडिया भारताची राज्यघटना सुप्रीम आहे. त्यामुळे मी याच्याबद्दल काहीही मत देणार नाही. हे तुम्ही आणि ते त्या दोघांनी ठरवायच आहे. आम्ही ऑब्झर्वर आहोत, आम्ही याच्यावर कुठलीही प्रतिक्रिया देणार नाही.

DRAFT 64th AGM

**श्री.एस.एस.महाजन (एफआरडी):** ओके, मी आता दुसर मत मांडतो, आत्ताच साहेबांनी सांगितलं की ह्या याच्यामध्ये दोषी मिळाले त्यांना तुम्ही कॉज ऑफ वगैरे, किंवा आम्ही त्यांना नोटीस दाखवायला सांगितली त्यांनी आम्हाला काहीतरी सांगितलं आम्ही ते सगळं सभेसमोर मांडलं, सर तेच सांगतो मी तुम्ही सभेसमोर मांडलं, तुम्हाला ते दोषी मिळाले, तुम्ही आपल्या कंट्रोलर समोर नेण्यासाठी ठेवलेल आहे, आता मी सांगतो की जी आपली उपविधी आहे, त्या उपविधीमध्ये सभासदत्व रद्द करण्याचे एक कारण देण्यात आलंय, तर ते जे कारण देण्यात आलंय, त्या याच्यामध्ये स्पष्ट लिहिलेल आहे एखाद्या सभासदाने जर आपल्या संस्थेचा नुकसानास जर कार्य झालं, त्याच्याकडे अशा काही गोष्टी घडल्या, तर त्या लोकां त्यांच सभासदत्व रद्द करावं लागतं, करता येतं, एजीएम हा निर्णय घेऊ शकते, त्याच्यानुसार मग आम्ही यांचा सभासदत्व रद्द करण्यासाठी तुम्हाला, आता सांगावं म्हणजे, यांच्या कार्यक्याचे पदही जाईल, आणि हे कमीत कमी एक वर्षाच्या आत जर यांच्यावर केलेला आरोप सिद्ध नाही, झाला तरच परत येऊ शकतात. जर आरोप सिद्ध झाला, तर हे परत संस्थेमध्ये येऊ शकत नाहीत, आता आम्ही प्रशासनाने बनवलेला, जसं सरांनी सांगितलं त्या याच्यानुसार ते जर आम्ही मान्य केलं, तर आम्ही उपविधीच्या याच्यानुसार सांगतो यांचा या क्षणी सभासदत्व रद्द करून यांना खाली पाठवा.

**श्री. संतोष के बी(सीडीएम):** सर के वी संतोष सीडीएम से, लास्ट AGM की डिसिजन के अनुसार एक कमिटी फॉर्म कि, कमिटी की रिपोर्ट, AGM प्रस्ताव करने के प्रॉब्लेम उसमे को कॉन्फिडेंशियल क्लोज, उल्लेख किया है

ये पेशनही, कर सकता दुसरी सवाल है निर्णय किया हुवा कमिटी की डिसिशन आना चाहिये? जो भी पर्सनल डिपार्टमेंट मे ले रहे डिसिजन को एजीएम से कोई लेना देना नही है क्युकी BARC को ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी केस मे या उसकी संचालक मंडल को पर्सनल डिव्हिजन के साथ या उनको कंट्रोलर सर के आदेश के अनुसार काम करने के निर्णय नही है, हमने डिसिशन लिया हुवा चीज है कमिटी की रिपोर्ट, वो कमिटी की रिपोर्ट इधर पेश करने के लिए क्या प्रॉब्लेम है? यदि कमिटी की रिपोर्ट आया है, वो इधर पेश करने आप लोगो को क्या तकलीफ है? उसमे ऐसा कोनसा कॉन्फिडेंशियल क्लोज है, जो हम नही सुनते है जो नही सुन सकता ऐसा कौनसा चीज लिखा गया है? कमिटी AGM ने अपॉईमेंट किया हुवाm कमिटी की रिपोर्ट, एजीएम मे देने के लिए क्या प्रोब्लेम है, हमे सिर्फ एजम की कमिटी की रिपोर्ट चाहे, उन कल्पट हो या नही हो वो, रिपोर्ट इधर सभा मे रखने के लिए क्या प्रॉब्लेम है उसमे कोसा चीज है, कोणसा कॉन्फिडेंशियल है मात्र कमिटी को छुपाना चाहते, कमिटी को छुपाना चाहते है, पब्लिक को छुपाना चाहते है, डिपार्टमेंटल क्लोज है देश के विरुद्ध कुनही है, सोसायटी के विरुद्ध सोसायटी की आम सभा के सामने पेश करने, सर आप बताईये वो रिपोर्ट इधर पेश करने के लिए क्या प्रॉब्लेम है, ऐसा कु प्रॉब्लेम है तो, हमे बताई, आम सभा मे आप लोगोने निर्णय किया था, ये रिपोर्ट इधर पेश करेंगे वो पेश ऐसा कोनसा चीज चुपे हुए है, हम नही सुन सकते, हमने ये नही पूछ रहा है उन्होने काम की जगह पर कुछ किया हुवा रिपोर्ट दे दो,, हम ये बोल रहे है हमने हमने लास्ट इयर प्रश्न किया हुआ, बाद की रिपोर्ट के लिए कमिटी बनाया गया था, वो कमिटी की रिपोर्ट वो कमिटी को चुने गये लोगो के बीच मे पेश नही कर सकते, ये कोनसी बात है, और वो रिपोर्ट के लिए आप लोग कंट्रोलर के पास जा रहे, वो रिपोर्ट के लिए आप पर्सनल डिव्हिजिशन के पास जा रहे, आम सभा के लोगो के सामने चुने हुए रिपोर्ट आमसभा पेश करो, जवाब दिजिये सर.

DRAFT 64th AGM

**श्री. प्रकाश पाटील (एसआयआरडी) :** सर, मागच्या वेळेस तुम्हीच सांगितलं होतं, समितीचा रिपोर्ट सादर करण्यात येईल म्हणून तर कृपया सादर केला तर बरं होईल. कारण सगळ्यांना माहिती पडेल, नक्की प्रक्रिया कशी कशी झाली, ओके राहिला हा, विषय दुसरा विषय आणखी यामध्ये सापडता आहेत, जीएसटी सुद्धा फसवले, जीएसटी मध्ये या लोकांनी, अध्यक्ष महाराज खूप सांगतात इथे डायरी सांगतात 6% जीएसटी वाचवला, इथे जीएसटी वाल्यांना कोणी तक्रार केली ना, यांना हातकड्या लागतील,

**श्री. आर. वि. हटवार (एमएमडी):** अध्यक्ष महाराज, मी राजेंद्र हटवार, मी म्हणतोय की सभेला delay होतय.

**श्री.मनोज वाडेकर (आरईडी):** हे ना सोसायटीच्या भविष्यासाठी घातक लोक आहेत, ज्या चुका केलेत, ते लोकांसमोर येऊ द्या, एक तास गेल तरी चालेल.

**श्री. आर. वि. हटवार (एमएमडी):** मी तेच म्हणतोय की, जे बोलणार आहे ते कॅपेबल व्यक्तींना बसवा, कारण वरून जो संदेश जातोय, तो चुकीचा जातोय आम्ही इथे आमच्यापैकीच निवडून दिलेले सदस्य आहेत, जे वर बसलेले आहे, आणि ते आम्हाला सांगतात, तुमचा अहवाल किंवा तुमचं म्हणणं आम्हाला मान्य नाही.

**श्री.संतोष ढमढेरे :**पदसिद्ध अध्यक्ष साहेब. एक विनंती आहे आता वाडेकर यांनी जो शब्द वापरला होता की हे संचालक मंडळ सोसायटीच्या भविष्यासाठी घातक आहे हा शब्द काढून टाकावा ही विनंती,

**श्री. संतोष के बी(सीडीएम):** कृपया मेरा सवाल की जवाब दिजिय,

**श्री. अविनाश तिरपुडे साहेब (पदसिद्ध उपाध्यक्ष):** आपका सवाल का जवाब ऐसे है, की प्रशासन के पास रिपोर्ट आया है, सर्वस्व प्रशासन की जिम्मेदारी है, क्या करने का.

**श्री.एस.एस.महाजन (एफआरडी):** अध्यक्ष महोदय, आपण तुम्ही जे सांगितलं त्या अहवालाच, त्या मध्ये तुम्ही मान्य केलंत की, बाबा ते टेंडरिंग प्रोसेस मध्ये गडबड झाली आम्ही दोन जणांना बोलवलं त्यांना कारणे दाखवा नोटीस सांगितली, तुम्ही म्हणताना चला, सभागृह काही नाही, संस्थेचे सभासद काही नाही, मान्य पण सर जर तुम्ही म्हणताय ,त्याच याला धरून मी तुम्हाला सांगतोय. साहेब नियम आहे, ज्या सभासदाने संस्थेचा नुकसान केलं, संस्थेच्या प्रती प्रतिष्ठेला कलंक, मी शुद्ध भाषेत शांतपणे शांत शब्दात बोलतोय, जर याच्यामध्ये असं लिहिण्यात आलंय की जर संस्थेच नुकसान केलं असं जर आढळून आलं, जे तुम्ही मगाशी मान्य केल तर त्याच सभासदत्व रद्द होणार, याच्यात लिहिलेल तेवढा हक्क सगळ्यांना आहे, तर आम्ही तुम्हाला ते सांगतो, आम्हाला तुम्ही आता म्हणता की ते दाखवू शकत नाही, जस आपल्या BARC च्या पेपर सारख्या काही मोठ्या गोष्टी ज्या बाहेर आल्या तर देशाच नुकसान होईल. तर तुम्ही जे सांगितलत ना तो निर्णय आम्ही मान्य करतो आणि नियमानुसार उपविधीनुसार, त्यांच सभासदत्व रद्द करून त्यांची पद काढून घ्यावीत, ही विनंती करतो, तुम्ही कायद्याला धरूनच चाला, कायद्याच्या पुढे ना तुम्ही ना मी आता म्हणाल की कायदा मोठा नाहीये, आम्ही सांगतो ते मोठं आम्हाला काय करणार आता.

DRAFT 64th AGM

**श्री. राजेश शिरगावकर :** अध्यक्ष महोदय राजेश शिरगावकर, आता संचालक मंडळ जो विषय चाललाय त्यांनी सरळ सांगितलं की या गोष्टीसाठी तुम्ही कोर्टात जा, मग इथे जे हाऊस आहे, हा त्याचा संपूर्ण अपमान आहे. जर हाऊस म्हणते की त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे, जर आम्ही जर प्रत्येक गोष्टीच्या कोर्टात जायच मग कशाला मीटिंग घ्यायची, मीटिंग मध्ये येऊ नका ना आम्ही प्रत्येक गोष्ट कोर्टात जायचं का? तुम्ही काही म्हणजे तुम्ही स्वतःच्या मनमानी कारभार करणार, आणि नंतर मग जेव्हा कारवाईची गोष्ट आली, की सांगणार की कोर्टात जा,

मग हाऊस कशाला पाहिजे, कशाला पाहिजे AGM? जर ऐकणार नसाल, तुम्ही त्या गोष्टी मान्य करणार नसाल, आणि शेवटी जेव्हा आरोप सिद्ध झाले की तुम्ही सांगणार की कोर्टात जा, तर मग कशाला एजम घ्यायची नाही,

**श्री. अविनाश तिरपुडे साहेब (पदसिद्ध उपाध्यक्ष):** नाही, आरोप सिद्ध झाले किंवा नाही, हे प्रशासन ठरवेल, हो प्रशासनाचा तो निर्णय आहे.

**श्री. दिनेश माने (पीडी):**उपाध्यक्ष, साहेबांनी मगाशी सांगितलं का या डायरी प्रकरणामध्ये सेक्रेटरी आणि खजिनदार हे दोघेच फक्त दोषी आढळून आलेले आहेत, त्यांच्या रिपोर्ट प्रमाणे, परंतु मला वाटत, संचालक पूर्ण मंडळ 15 जणांची बॉडी आहे ही जबाबदार असली पाहिजे या गोष्टीला असं माझं स्पष्ट मत आहे, माझं वैयक्तिक मत आहे, ते तुम्ही पटलावर घ्या किंवा नका घेऊ, ते तुमचा भाग आहे, परंतु कुठल्याही प्रक्रियेमध्ये प्रक्रिया राबवताना संपूर्ण कमिटीला विचारलं जातं, प्रत्येक महिन्याला तुमच्या मासिक मीटिंग होत असतात, त्या मासिक मीटिंगमध्ये ते ठराव पास केले जातात, त्या ठराव पास पास केल्यानंतर त्याला सूचक अनुमोदक असतं, आणि त्याच्यानंतर टेंडरिंग प्रोसेस आहे. ती प्रोसेस राबवली जाते पण ठीक आहे आता त्यांनी कबूलच केलेले टेंडरिंग प्रोसेस चुकीचे पेपरला नाही दिलेली किंवा तीन निविदा नाही मागवल्या तर ते त्यांनी मान्य केलेल आहे, परंतु माझा एकच महत्त्वाचा मुद्दा आहे का या ठिकाणी फक्त सेक्रेटरी
आणि खजिनदार यांना अध्यक्ष साहेबांनी, त्या ठिकाणी दोषी ठरवलय, तर माझं स्पष्ट स्पष्ट मत आहे, का 15 जणांची जी कमिटी आहे मॅनेजिंग कमिटी, ही कमिटीच या प्रकरणाला दोषी असली पाहिजे असं माझं स्पष्ट मत आहे.

DRAFT 64th AGM

**श्री. अविनाश तिरपुडे साहेब (पदसिद्ध उपाध्यक्ष):** नाही, दोषी ठरवलं किंवा नाही हा तुम्ही स्वतःच निर्णय घेतलेला आहे. तो ते कसे आहे जे प्रशासनाच्या जी पद्धती आहे त्या पद्धतीमध्ये गेलेला आहे,

**श्री. प्रभात सिंग (सीडीएम):** सरजी आपनेही बोला है टेंडरिंग मे गलती हुई है.

**श्री. डी.एस धोत्रे (सीडीएम):** तुम्ही सांगितलं की फक्त ट्रेजर आणि सेक्रेटरी हे दोघां दोषी आहेत. त्यांनाच नोटीस पाठवली गेली पण बायलॉज प्रमाणे चेअरमन, वाईस चेअरमन,सेक्रेटरी, ट्रेजर, हे पहिले चार जबाबदार आहे, त्याच्यानंतर बाकीचे संचालक मंडळ,

**श्री. अविनाश तिरपुडे साहेब (पदसिद्ध उपाध्यक्ष):** या ठिकाणी पदसिद्ध अध्यक्ष आणि उपाध्यक्ष मी, जे आहे आम्ही न्यूट्रल आहोत ते, त्याच्यामध्ये कस आहे की हे टेंडरिंग प्रोसेस मध्ये लापसेस झालेले आहे हे, त्याच्यामध्ये आहे पण ते, त्याच्यामध्ये दोषी आहेत किंवा नाही हे प्रशासनाचा निर्णया आहे.

**श्री. डी.एस धोत्रे (सीडीएम):** नोटीस दिली ना, सर त्या दोघांना नोटीस दिली आणि लॅपसेस काय आहेत, त्या के बी संतोष ते विचारल की लॅपसेस काय आहेत ते कमिटी सभागृहासमोर येऊ द्या, लॅपसेस समोर आल्याच्यानंतर आपल्याला त्याच्यावरती योग्य तो निर्णय घेता येईल.आणि ह्या संपूर्ण प्रक्रियेमध्ये ते दोनच का दोषी धरले झाले, जर चेअरमन, वाईस चेअरमन तिथे, मग ते का नाही दोषी.

**श्री. अविनाश तिरपुडे साहेब (पदसिद्ध उपाध्यक्ष):** डिसिजन बोर्ड ऑफ डायरेक्टर नी घेतलेला आहे, ठीक आहे, सेक्रेटरी आणि ट्रेजर हे महत्त्वाचे असतात.

**श्री. डी.एस धोतरे (सीडीएम):** नाही मग, चेअरमन आणि वाईस चेअरमन महत्त्वाचे नाहीत का? चेअरमन आणि वाईस चेअरमन महत्वाचे नाहीत, का ? सर चेअरमन सगळ्यात महत्त्वाचा पदाधिकारी आहे, मेन तो दुवा चेअरमन आहे. वाईस चेअरमन कधी येतो, जर चेअरमन अब्सेंट असेल, चेअरमनच्या अनुपस्थितीमध्ये, वाईस चेअरमन असतो.

DRAFT 64th AGM

**श्री. प्रकाश पाटील (एसआयआरडी) :** अध्यक्ष महोदय, हा जो डायरीचा जो विषय झाला ना हे, फक्त शिवाजी हगवणे आणि ट्रेजर यांनीच निर्णय घेतला का? संचालक 15 लोक बसलेले आहेत, ना सर्वांना माहिती होत ना?

**श्री. डी.एस धोतरे (सीडीएम):** जर तुम्ही आतमध्ये चौकशा केल्या, वावचरच्या प्रक्रिया कशी असते, पहिला ट्रेजर, अकाउंटिंग याच्यानंतर त्यांच्या सह्या पाहिजेत, परंतु त्या जर तुम्ही वावचर्स बघितले गेले तर, त्याच्यावरती या दोघांच्या कधी कधी सह्या नसतात, तर चेअरमनच्या आहेत आणि वावचर्स पास झालेले आहेत. हे तिथ तुम्ही बघू शकता. मग तेथ वावचर सगळयांना बघायचा अधिकार आहे, प्रत्येकाला सांगतो, तुम्ही बोलता ना सगळं जागरूक आहात तुम्ही, तुम्ही किती जागरूक आहात, किती जणांचे वावचर्स बघितले, ते जाऊन नाही नाही गेले किती तुम्ही आम्ही गेले आम्ही तुम्ही आम्ही गेले बाकी गेलेत का नाही गेलेले मग म्हणून ते सांगतो, तर कमिटी इन्वेस्ट इन्वेस्टिगेशन कमिटी आहे, ना ती बाय का झाली, बस इन्वेस्टीगेशन कमिटी बायस का झाली?

**श्री.राजेश कळके (सीडीएम):** अध्यक्ष हे बघा आम्ही वावचर्स, बिल प्रत्येक वेळेला मागत आलो, द्यायला मागत नाही किती लेटर्स दिले दोन दोन चार चार महिने उत्तर देत नाहीत कसं काय समजायचं आणि जे काय होईल, ना सर्व कमिटी जबाबदार आहे जे काय होईल ते सगळ कमिटी जबाबदार आहे, चांगल्या आणि वाईटाला कोण एक जबाबदार नाही आहे सगळे जबाबदार आहे त्याला संस्थेच नुकसान झालय हे महत्त्वाच आहे कोण जबाबदार असण्यापेक्षा कमिटीमुळे गडबड झालेली आहे, सगळे पैसे भरून द्यावे लागतील. आम्ही तसा ठराव करणारच आहोत आता तुम्ही ठरवा काय करायचं,

**श्री.सुरेश कुमार :** अध्यक्ष महोदय सर लास्ट AGM, हमने एक डिसिजन लिया है, जो उसका जिम्मेदार है, उनसे पैसा वापस भरेगा करके.

**श्री. प्रभात सिंग (सीडीएम):**अध्यक्ष बैठे है, माननीय सोसायटी के अध्यक्ष है, जवाब दे, कभी उपाध्यक्ष उठ जाते है, कभी इधर से, साइड से, सदस्य उठा दिए गये, एक तरफ बोलते है. परमिशन लेके बोला. अध्यक्ष साहेब.

**श्री.मनोज वाडेकर (आरईडी):** मूळ आपला विषय भटकतोय, विषय हा आहे की, हे आता जे नुकसान झालंय आपलं ते हे किती दिवसात भरणार हे, यांच्याकडून कबूल करून घ्यायचंय,

**श्री.बाहुबली चौगुले (मानद सचिव) :** वाडेकरजी, संस्थेकडे एक तर अहवाल प्राप्त नाहीये. नंबर दोन वाडेकरजी प्रश्न विचारला उत्तर सांगतोय,

**श्री.मनोज वाडेकर (आरईडी):** एक माझं पण तुम्हाला मत आहे, एक सजेशन आहे, दोन मिनिट तुम्ही येता, दोन मिनिट ते येता, म्हणजे काय प्रत्येक जण आपला मत मांडता असे, इथे हे नका करू, एक जण उभे रा, व्यवस्थित उत्तर द्या, तुम्हाला त्रास आहे तुम्ही बसून घ्या.

DRAFT 64th AGM

**श्री.बाहुबली चौगुले (मानद सचिव) :** साहेब तुमचा काय प्रॉब्लेम आहे का? मी उत्तर देतो ना त्यांच्या प्रश्नाचं साहेब लक्षात घ्या, ही संस्थेची सभा आहे.

**श्री. बी. ए. पालवे (पीडी) :** माझं एक मिनिट ऐका, ज्या टायमाला आम्ही उत्तर विचारतो, त्या टायमाला तुमची तबेत ठीक नसते,

**श्री. बाहुबली चौगुले (मानद सचिव) :** काही हरकत नाही, काही हरकत नाही, तुमच्या रागाला थोडस कंट्रोल करा, साहेब वार्षिक सर्वसाधारण सभा आहे, प्लीज तुमचा राग थोडासा कंट्रोल कमी करा, वाडेकर साहेबांनी प्रश्न विचारला संस्थेच किती नुकसान झालं. मी स्पष्ट आधी सुद्धा बोललो की संस्थेकडे तो अहवाल आला नाही.

**श्री.मनोज वाडेकर (आरईडी):**नोटीस का?

**श्री.बाहुबली चौगुले (मानद सचिव) :**दोन पदाधिकाऱ्यांना च्या कडून खुलासा मागवण्यात आला, आणि ऑफिस बेरियर म्हणून त्या दोन संचालकांनी माजी सचिव आणि खजिनदार यांनी त्या कमिटीला रिटर्न मध्ये तो खुलासा दिला.

**श्री.मनोज वाडेकर (आरईडी):** बाहुबली साहेब, सरांनी आता थोड्या वेळापूर्वीच सांगितलं, की आम्ही यांना वॉर्निंग दिली, वॉर्निंग कशाची दिली? तुम्ही चुकीचं काम केलं त्याची दिली. हे लक्षात घ्या.

**श्री.बाहुबली चौगुले (मानद सचिव) :** तुम्ही सभागाराला misguide करताय, अहवाल संस्थेमध्ये प्राप्त झाला नाही. अहवालाची कॉपी जेव्हा कमिटीकडे गेली, कमिटीच्या अनुषंगाने जे काही action घ्यायची आहे, त्याची एक प्रत संचालक मंडळाला सांगितले, आणि त्याच्यामध्ये असं कुठं प्रूफ होते, की संस्थेच नुकसान केलं संचालकानी केल हे कुठं लिहिलय,

**श्री. मुकुंद वैराळकर (एऍण्डएसईडी) :**काय म्हणायचं, ऐकून घ्या ना साहेब, एकदम गरम नका.

DRAFT 64th AGM

**श्री.बाहुबली चौगुले (मानद सचिव) :** नाही आवाज वाढला, सर सॉरी

**श्री. मुकुंद वैराळकर (एऍण्डएसईडी) :** इथं बसल्यावरती, इथं डोक्यावरती बर्फाची लादी घेऊन बसाव, एकदम शांत.

**श्री.बाहुबली चौगुले (मानद सचिव) :** मान्य साहेब.

**श्री. मुकुंद वैराळकर (एऍण्डएसईडी) :** कारण कसा आहे, की हा रिपोर्ट अजून तुमच्याकडे आलेलाच नाहीये, तुम्हीच म्हणताय हो आता माझा प्रश्न पदसिद्ध उपाध्यक्षांना आहे. किती वेळ झाला आपण हा एकच विषय घेऊन चाललोय जर या झालेल्या व्यवहारामध्ये अनियमितता आहे. त्यांनी प्रू केलेला आहे आणि प्रू झालंय, म्हणूनच त्यांनी दोन लोकांना शोकॉस नोटीस, मला उपाध्यक्षांना फक्त एवढच विचारायचं आहे, कारण आधी पण मी विचारल त्यांना की ही जी प्रोसिजर आहे ही इन्वेस्टिगेशनची प्रोसिजर पूर्णपणे संपलेली आहे का आणि जर ही प्रोसिजर संपलेली असेल, तर आपली सोसायटी ही पूर्णपणे महाराष्ट्र शासनाच्या अत्यारीत असल्यामुळे महाराष्ट्र शासनाच्या नियमावर आधारित असून चालते. ठीक आहे आम्ही मान्य करतो आणि आदरही करतो. आपल्या डिपार्टमेंटचा नाव लय मोठा आहे. कुठेतरी या नावाला कलंक लागू नये, हे आम्हाला मान्य आहे आणि पूर्णपणे माहिती आहे. परंतु जर समजा यामध्ये काहीच नसेल तर आता आमचा हा एवढा वेळ कशा करता, वाया घालवणार आलो तुम्ही स्पष्टपणे सांगा की झालेला व्यवहार अनियमित झालेला आहे यामध्ये प्रश्नच नाही कारण दोन लोकांना

शोक कॉस्ट नोटीस दिलेली आहे, यांचा मंथली मीटिंग जे होत असते त्यामध्ये यांच्याकडे डाटा उपलब्ध असेल आम्ही बघितलेला नाही आहे. की हा जो ठराव झाला या ठरावाला या ठरावाच्या बाजूने किती मत पडली आणि याला विरोध किती लोकांनी केला हे तर स्पष्टपणे असेल तुम्ही तुमच्या अतारीत असल्यामुळे तुम्ही यांना हे स्पष्ट विचारा आणि या सभागृहाला स्पष्ट असे एक उत्तर द्या की इन्वेस्टिगेशन पूर्ण झालेले आहेत, आम्ही आमच्या शासनाच्या वतीने यामध्ये लीगल advise घेऊन या संचालक मंडळावरती काय कारवाई करण्यात येईल, याच तुम्ही एक गवाही द्या आणि विषय आटपवा कशाकरता आपण हा एवढा विषय लांबून आलो साहेब स्पष्टपणे फक्त तुमच्या दोन शब्दाची आम्हाला ऐकण्याकरता आम्ही इथे आतुर बसलेलो आहोत फक्त एवढं सांगा. आणि विषय क्लोज करून टाका. धन्यवाद.

**श्री.एस.एस.महाजन (एफआरडी):** आता मुकुंद वैराळकर नी जे मत मांडलं की या संदर्भात आपण आम्हास गवाही द्या, तर आम्हाला ग्वाही नाही किती काळामध्ये आपण त्यावरती ॲक्शन घेणार आहात, याचं उत्तर हवय, दुसरी गोष्ट मगासपासून चौगुलीचे जे एक शब्द वापरता आहेत एक वाक्य वापरतायत, काजी तुम्ही लोकांनी त्याकडे लक्ष दिलं की नाही माहित नाही, की तो अहवाल जो आहे तो उपाध्यक्षांकडे आहे. बरोबर संस्थेकडे आलेला नाही. काही चुकीचं बोललो, मी मात्र आता मी बोलल्यावर माझे शब्द खराब आहेत बोलू नये, मला एक सांगा साहेब, तुम्ही उपाध्यक्ष आहात ते संस्थेचे ना, पदसिद्ध जरी असलं तर ते पद संस्थेचा आहे. की BARC च आहे, जर पदसिद्ध उपाध्यक्षांकडे जर अहवाल आहे, तर तो मग संस्थेकडे झाला की मॅनेजमेंट कडे, गडबड, नाही क्लियर होत कारण की तुम्ही संस्थेचे पदसिद्ध अध्यक्ष आहात, जर संस्थेच्या पदसिद्ध अध्यक्ष उपाध्यक्षांकडे काही आहे, याचा अर्थ ते संस्थेकडे आहे, मग मगासपासून चार ते पाच वेळा चौगुले साहेब म्हणतात, संस्थेला भेटलं नाही, संस्थेला भेटलं नाही. अहो काय भेटलं नाही तुमच्याच, उपाध्यक्षांकडे आहे म्हणजे याचा अर्थ फक्त गोंधळ, उत्पन्न करायचा प्रश्न पूर्ण होऊ द्यायचा नाही, ही रेषा दिसते मगासपासून, कुठल्याही गोष्टीवरती निर्णय घेतला जात नाहीये, का तर ते म्हणतात आमच्याकडे आलं नाही, आणि त्या संस्थेच्या उपाध्यक्षांकडे मात्र आलय, हे मान्य करतात, म्हणजे ते तुम्हाला पदसिद्ध उपाध्यक्षांना संस्थेचा भाग मानत नाहीत.

**श्री.बाहुबली चौगुले (मानद सचिव) :** महाजन सर जेव्हा एखादं पत्र पेपर संस्थेच्या इनवर्ड मध्ये येतं, तेव्हा ती संस्थेची कॉपी होते, संस्थेच्या दप्तरी इनवर्ड नोंद झाली का?

**श्री.एस.एस.महाजन (एफआरडी):** मला बोलू द्या, संस्थेच्या उपाध्यक्षांकडे पत्र आलं आणि तुम्ही म्हणतात की नियम आहे, इन्वर्ट झाल्याशिवाय ते संस्थेला भेटलं नाही, कमिटीने केवढी मोठी चूक केली, कमिटीने संस्थेला इन्वर्ट न करता उपाध्यक्ष पत्र दिलं.

**बाहुबली चौगुले (मानद सचिव) :** जर संस्थेच्या दप्तरी डॉक्युमेंट्स नोंद इनवर्ड झाली, ते संस्थेची कॉपी आहे.

DRAFT 64th AGM

**श्री.एस.एस.महाजन (एफआरडी):** संस्थेकडे अहवाल प्राप्त कमिटीने संस्थेला न कळवता, त्यांनी आपसामध्ये उपाध्यक्षांकडे दिला असं तुम्ही म्हणताय. आपण कार्यालयीन काम करतो आहोत आपण कार्यालयीन काम करतो आहोत तुम्ही सांगितल्याप्रमाणे नियम आहे की एखाद्या कार्यालयामध्ये जेव्हा पत्र जात ते इन्व्ट झालं तरच ते कार्यालयाच इन्वर्ट नाही झालं तर ते कार्यालयात पोच झालं असं गृहीत धरलं जात नाही. आपल्या मॅनेजमेंटने, आपली संस्था व्यवस्थित चालावी, आणि याचा व्यवस्थित निकाल लागावा. जे काही चुका आहेत, त्या बाहेर यावा म्हणून कमिटी बनवली, त्या कमिटीला आम्हीही मान दिला आणि तुम्ही म्हणताय त्या कमिटीने एवढ्या मोठ्या संस्थेच्या आपल्या कंपनीतल्या चांगल्या लोकांना निवडक लोकांना घेऊन गेलेल्या कमिटीने त्यांचा रिपोर्ट हा उपाध्यक्षांना कार्यालयीन मार्गाने न देता डायरेक्ट दिला, तुम्ही असं म्हटलं मी नाही.

**श्री.बाहुबली चौगुले (मानद सचिव) :** संबंधित कमिटीने आपला रिपोर्ट पदसिद्ध अध्यक्ष, उपाध्यक्ष ज्यांनी ही कमिटी बनवली होती त्यांच्याकडे रिपोर्ट दिला.

**श्री.एस.एस.महाजन (एफआरडी):** मग जर ही उपाध्यक्ष जे आपले पदसिद्ध आहेत, त्यांच्याकडे जर दिलेला आहे, आणि त्या संस्थेचे पार्ट आहेत तर मग तुम्ही एक तर असा ब्लेम करताय की त्यांनी रेगुलर प्रोसेस सोडून उपाध्यक्षांनी दिला, ते गोपनीय पद्धतीने पॅक करून, इन्व्ट करून त्यांनी त्यांच्याकडे दिलेला असेल, आणि नाही जर तुम्ही असं म्हणतात की त्यांच्याकडे तुम्ही जर संस्थेचा पार्ट आहात, आणि जर तुम्हाला दिलं याचा अर्थ संस्थेकडे ती वस्तू पोच झाली.

DRAFT 64th AGM

**श्री.राजेश कळके (सीडीएम):** पदसिद्ध अध्यक्ष अहवाल स्वतः जवळ का ठेवतायत, ते डिक्लेअर करू द्या ना, का असं आहे का की आणखीन काही मोठी गडबड आहे?. का ते डिक्लेअर करायला बघत नाही? अहवाल लपवतायत? अरे ही आपली पतसंस्था ही स्वायत्ता आहे, आणि आपल्यासाठी तो रिपोर्ट बघणं आम्हाला बंधनकारक, म्हणजे आमच्या अधिकार आहे, तुम्ही तुमच्या जवळ ठेवला. मुळात काय माहिती आहे, इन्वेस्टिगेशनला वेळ लावला नाही, रिपोर्ट बनवायला लावला, एक वर्ष लागत, 70 हजार कोटीचा सिंचन घोटाळा सहा महिन्यात रिपोर्ट येतो आणि 35 लाखाच्या तुम्हाला एक वर्ष लागतं, आणि तो पण तुम्ही अजूनही दाखवत नाहीये, मग असं काय त्या रिपोर्ट मध्ये आहे.

**श्री. प्रकाश पाटील (एसआयआरडी) :** आणि तो रिपोर्ट बनवायला कोणी सांगितलं, हे आम सभागृहाने, आमच्या पुढेच नाही.

**श्री.राजेश कळके (सीडीएम):** म्हणजे मालकालाच तुम्ही दाखवत नाहीये,

**श्री.बाहुबली चौगुले (मानद सचिव) :** कळके साहेब आपली संस्था आस्थापनेच्या आत आहे आणि त्या आस्थापनेद्वारे दोन सीनियर ऑफिसर ऍडमिनिस्ट्रेशनर म्हणून आपल्या पतसंस्थेमध्ये आहेत.

**श्री.राजेश कळके (सीडीएम):** त्यांनी रिपोर्ट दाखवायचा नाही का?

**श्री.बाहुबली चौगुले (मानद सचिव):**मी तुम्हाला तेच सांगतोय, सन्माननीय अध्यक्ष साहेबांनी जी कमिटी नेमली, त्या कमिटीचा रिपोर्ट सन्माननीय अध्यक्ष सरांना जाणार ना, त्याच्या अनुषंगाने सन्माननीय अध्यक्ष, उपाध्यक्षांच्या त्या कमिटीकडन जे काही पत्राचा खुलासा मागवला गेला, तो पत्राचा खुलासा दोन संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी दिला, आता याच्यामध्ये वाडेकर साहेब म्हणतात की एवढं नुसकान झालं, एवढं भरा, बघा दोन गोष्टी आहेत एक फायनान्शली काय मिसबेव झालय का इथं वाडेकर साहेब तुम्ही कसं म्हणताय की इतक नुकसान झालं?

**श्री.राजेश कळके (सीडीएम):** अरे कागपत्री दोन बोगस कंपन्या उभ्या केल्या,

DRAFT 64th AGM

**श्री.बाहुबली चौगुले (मानद सचिव) :** कमिटी सांगेल ना,

**श्री.मनोज वाडेकर (आरईडी):**तीन वॅलिड टेंडर असतील ना, पूर्ण ऐका, आता परत तुम्ही तेच बोलता, मला बोलू द्या.

**श्री.बाहुबली चौगुले (मानद सचिव) :** तुम्ही बोलला ना इथे.

**श्री.मनोज वाडेकर (आरईडी):** अरे आता तुम्ही काय बोललात, मला तुम्ही सांगा, आता मला सांगू द्या, मला बोलू द्या, मी सांगतो कस नुकसान झालं सांगतो.

**श्री.बाहुबली चौगुले (मानद सचिव) :** साहेब, वाडेकर साहेब हा कमिटीचा निर्णय आहे.

**श्री. मनोज खेडेकर (एसआयआरडी):** साहेब आपल्या वाडेकर साहेबांना प्रश्न विचारला ना,

**श्री.राजेश कळके (सीडीएम):** सेक्रेटरी साहेब, नुसता डायरीचा विषय नाहीये आमच्याकडे, ना पोतडी भरून पुरावे आहेत, बऱ्याच काय काय गोष्टी आहेत काढायला लावू नका, डायरीमध्ये डायरीतच राहू द्या.

**श्री.बाहुबली चौगुले (मानद सचिव) :** विषय भरकटला जातोय.

**श्री.राजेश कळके (सीडीएम):** तुम्ही भरकवताय,

**श्री.बाहुबली चौगुले (मानद सचिव) :** तो अहवाल कमिटीने दिलाय, तो आस्थापनेकडे आहे.

**श्री. राम परब (युईडी) :** ओ साहेब, तुम्ही ज्यावेळी प्रचार करत होतात. मागच्या कमिटीवरती ब्लेम करत होतात, आमची डोकी पिकवली ना, आम्ही नव्हतो, तुम्ही आम्हाला जागृत केलेले आहात, त्या सोसायटीमध्ये असं होतं म्हणून आमच्याकडे ना अलीबाबाची पोटली भरलेली आहे, म्हणून ह्याच्यावर डायरेक्ट काहीतरी निर्णय घ्या,

**श्री. विलास घोरपडे (एफडी) :** हे पहा, चौगले साहेब, तुम्ही बोलताय की, AGM कशी झाली, काय झाली हे सगळं .आम्ही पाठीमागच्या AGM मध्ये पूर्णतः मांडलेल आहे, त्याचा लेखाजोखा सुद्धा मांडलेल आहे, टेंडर प्रक्रिया कशी होते? मी तुम्हाला सांगणं आता योग्य नाही, तर कसं आहे पहिला, टेंडर प्रक्रियेमध्ये वॅलिड टेंडर हा पहिलाच मुद्दा आहे, आपल्याकडे येणारे टेंडर हे वॅलिड असले पाहिजेत, आणि ते वॅलिड नव्हते इथूनच तुमची सुरुवात झालेली, आणि वॅलिड आहे का नाही हे करण तुमचं गरजेच आहे,

DRAFT 64th AGM

**श्री.बाहुबली चौगुले (मानद सचिव) :** कमिटीचा रिपोर्ट बद्दल मी बोलतोय,

**श्री.एस.एस.महाजन (एफआरडी):** ऐकून घ्या, कस आहे, तुम्ही सांगितलंत की समिती कडून रिपोर्ट उपाध्यक्षांना गेला, पदसिद्धतांना मी तुम्हाला काही वेळापूर्वी, काही पंधरा दिवसापूर्वी साधारणतः मी प्रश्न टाकला होता, त्याची तुम्ही मला रिप्लाय दिलेला आहे, की आपण ह्या विषय मांडला जाईल. त्यावेळेला चर्चा करू, आता मी सांगतो ना की जी कमिटी, एक साधारणता हे असतं, की प्रोसेस तुम्ही जी सांगितलीत मला नव्हतं माहिती वाटतं, की इन्व्हर्ट झाल्याशिवाय पुढे ते ऑफिशियल होत नाही, तरी देखील त्या कमिटीने उपाध्यक्षांना डायरेक्टली दिला रिपोर्ट, आता मी जी प्रश्न विचारलेली, त्याची फक्त उत्तर तुम्ही सांगितलेल्या पत्राप्रमाणे विषय मांडला जाईल, सर्वसाधारण बैठकीत त्यावेळेला उत्तर दिलं जाईल, कमिटी खरोखर नेमली कोणी? त्यामधले नेमके कमिटीचे सदस्य कोण होते, सहकार क्षेत्रातला मॅनेजमेंट मधला म्हणत नाहीये मी, सहकार क्षेत्रातला त्या लोकांना खरोखर अनुभव होता का? सहकार क्षेत्रात कशा तऱ्हेने खरेदी होते हे, तरी त्यांना माहिती होतं का? आणि जर जर मॅनेजमेंटचे होते ना तर आपली एवढी 30 - 35 लाखाची खरेदी करण्याचा तरी त्यांना अनुभव होता का? की माझ्यासारख्या टेक्निशियन, फिटर, शिन्नी, हातोडी वाल्याला तुम्ही कमिटीत बसवलंत मुळात, त्या कमिटीने बनवलेला अहवाल आहे तो खरोखर योग्य आहे का? साहेबांनी मान्य केला सगळं केलं त्यांनी त्या याच्यानुसार हे केलं, पण ज त्यांनी जे काम केलं ना ती कामकाजाची पद्धत नेमकी कशी होती, मी हे सगळे प्रश्न तुम्हाला पाठवलेले, तुम्ही आज उत्तर

देणं तुमच्या लेखी पत्रानुसार बंधनकारक आहे, तुमच्यावरती समितीला नेम नेमका अध्यक्ष कोण होता? समितीच्या याच्यामध्ये बैठका किती झाल्या गेल्या वेळची मीटिंग गेली आत्ताची मीटिंग गेली जाते? असा त्या समितीने सगळं करत असताना तुमचा खर्च तुम्ही त्या कमिटीवर किती गेला? की त्यांनी सोयस्कर अर्थ द्यावा नाही. म्हणा मी चुकलो असं किती तुम्ही त्या कमिटीला प्रवास खर्च झाला असेल, एवढ्या बऱ्याचशा ठिकाणी त्यांना फिरायला लागलं त्याच्यामध्ये त्यांना भत्त्या वगैरे किती दिले? आणि हा अहवाल जर तुमच्याकडे आला आणि साहेबांनी सांगितल की आम्ही कारवाई केली आहे जे की आपल्या संस्थेत चा एक कार्यकारणीचा भाग आहे, मग तो जर सर्व काही क्लियर आहे, आणि या प्रश्नाची तर तुम्ही सर्व काही क्लियर उत्तर देऊ शकता तुम्ही मान्य केलेल्या पत्राप्रमाणे तर मग आता तो अहवाल समोर मांडायला तुम्हाला काय अडचण आहे, सोयस्कर द्या, हव तर हे प्रश्न मी तुम्हाला तुमच्या उत्तरासहित वरती देतो, वाचून वाचून एक एक उत्तर द्यावं,

**श्री. मनोज खेडेकर (एसआयआरडी):** 100 प्रश्न गेलेले आहेत, मग त्यातल फक्त तुम्ही पाच प्रश्नाची उत्तर दिलेत व्यवस्थितपणे तर कृपया ह्या गोष्टीचा मान ठेवा साहेब,

**श्री.बाहुबली चौगुले (मानद सचिव) :** ती कमिटी आस्थापनेने नेमली होती, बरोबर त्यामुळे त्यात एक तर सहकार तज्ञ किंवा सहकार बद्दल जे काही असेल ते कोणी नव्हतं नंबर एक, ती कमिटी अस्थापनेने नेमली होती, त्यामुळे ऑन दट एड सम कमिटीचे किती मिटिंग झाल्या हे आपल्याला कल्पना नाही,
त्याच्यामध्ये ज्या कमिटीमध्ये जे मेंबर्स होते, त्यांना मानधन किंवा असं काही दिलं याची कल्पना नाही, मोस्टली सोसायटी कड अशा कुठल्याही प्रकारच मानधन सदर कमिटीला देण्यात आलेलं नाहीये,

DRAFT 64th AGM

**श्री.एस.एस.महाजन (एफआरडी):** कमिटी पूर्णपणे मॅनेजमेंटने बनवलेली आणि त्या कमिटीने जो अहवाल यांना दिला तो आपल्या पदसिद्ध उपाध्यक्षांना दिलेला अहवाल आपण मान्य केला. म्हणजे पदसिद्ध उपाध्यक्षांनी तेही आपलेच प्रतिनिधी आहेत, आपल्याच कार्यकारणीचा भाग आहे. चुकलं तर चुकलं सांगा ना. त्या कमिटीने या ट्रेंडिंग फोर्सिस मध्ये चूक झालेल्याची पूर्णपणे तुम्हाला कल्पना दिली. तर इतका वेळ सभागृह साधं म्हणतय चूक झाली, नुकसान झालं, भरून द्यावं, मग काय याला टाळताय, अध्यक्षांनी याच्यावरती निर्णय द्यावा.

**श्री. अविनाश तिरपुडे साहेब (पदसिद्ध उपाध्यक्ष):** हॅलो महाजन साहेब प्रश्न असा आहे, की we are bound to the order given by the controller BARC ठीक आहे, त्यामुळे प्लीज सायलेन्स, असा नुसता गोंधळ घालून आपण सभा पुढे नेता येणार नाही, त्यामुळे याच्यावर तोडगा काय आहे की तुम्हाला जर पुन्हा, काही त्याच्यावर पत्र द्यायच असेल कंट्रोल साहेबांना तुम्हाला रिपोर्ट पाहिजे, त्याकरता तुम्ही त्यांना निवेदन देऊ शकता. किंवा तुम्हाला जे कुठे पण काय पुढची प्रक्रिया आहे, जिथे तिथे कुठे तुम्हाला कमप्लेंट करायची आहे, काय करायच आहे रजिस्ट्रार कडे जायच आहे, तिथे तुम्ही जाण्याकरता तुम्ही पूर्णतः स्वतंत्र आहात आणि याच्या पुढचे

जे मुद्दे आहेत ते कृपया घ्या, आणि पुढे जाऊ द्या सभेला तिथे थांबून राहू द्या नका, नाहीतर इथे रात्रीचे 12 वाजतील तरी का हे सभा संपणार नाही,

**श्री.एस.एस.महाजन (एफआरडी):** म्हणजे साहेब तुम्हाला असं म्हणायचं की ज्यांना तुम्ही दोषी ठरवलं.

**श्री. अविनाश तिरपुडे साहेब (पदसिद्ध उपाध्यक्ष):** बघा दोषी ठरवला हा मुद्दा मी बोललेलो नाही. जे प्रशासनाची जे प्रक्रिया आहे जी प्रोसिजर आहे, तुम्ही जरी एखादा लाप्स केलात, समज कुठे घोटाळा झाला किंवा काय, किंवा समजा तुम्ही एलटीसीच्या याच्यामध्ये गेलात आणि तुम्ही जर कोणती चुकीची प्रक्रिया वापरली, खोटे तिकीट दिले किंवा काय दिले तर सगळ्यात पहिले तुम्हाला शोकाच इशू होतो की तुमच्या मुद्दा मांडण्याला. कुणाला पण आपण फाशी देतो, अशी देत नाही त्यांच्या पहिले उत्तर ऐकतो, After taking in consideration the reply given by the society members treasures and Hon, secretory, the decision is has taken by the hon. Controller BARC and matter now closed. Now you wants any further representation, you are free to give.

DRAFT 64th AGM

**श्री.एस.एस.महाजन (एफआरडी):** आपण हे जे उत्तर देताय हे मॅनेजमेंट म्हणून, मला प्रेशराईज करता आहात,

**श्री. अविनाश तिरपुडे साहेब (पदसिद्ध उपाध्यक्ष):** प्रेशराईज करण्याचा प्रश्न नाही,

**श्री.एस.एस.महाजन (एफआरडी):** मला काय बोलायच ते बोलू द्या सर, तुमचा आवाजही वाढला आणि तुमचा स्वरही चेंज झालेला आहे. आम्ही सभासद आहोत, आम्हाला अडचणी विचारता येतात आणि मी मुद्देसूर मांडलेलं जर ठरवलं असतं, तर माझ्या मुद्द्यांच उत्तर पाच मिनिटात झालं असतं, तुम्ही काही बोलायची गरजही नव्हती. तुम्ही तुमच्या हक्काने सांगितलं BARC Controller त्याच्यावर जो काही ॲक्शन घेतील. ते मान्य आहे. आम्हीही मान्य करतो. तुम्ही तुमचा दृष्टिकोन सांगितलात ना, मान्य आहे आम्हाला, आता मला सांगा गेल्या वर्षी जर तुम्ही स्पष्टपणे यांनी मान्य केलं होतं, आम्ही यांना मान्य करायला त्या वेळेला जबरदस्ती केली नव्हती आणि अज मॅनेजमेंट तुम्ही केली नव्हती, मग जर गेल्या वेळेला भरून द्यायची यांनी मान्य केलेलं,आणि आज एक मिनिट, मला बोलू द्या, कारण की मी फक्त गेल्या वेळेला झालेल्याच गोष्टी, ज्या तुमच्या लिखाणात त्या सांगतोय, लिखानाच्या बाहेर मी नाही, की गेल्या वेळेचा तुमच्या इतिवृत्तामध्ये केले की असा ठराव पास झाला, की जो कोण दोषी निघेल त्यांच्याकड ते पैसे कार्यकारणी पूर्ण संचालक मंडळ भरून देईल तर मग त्यांनी नाही तर सर सांगा मॅनेजमेंट सभागृहानी काय सांगितलं त्यालाही विचारत नाही, आम्ही मॅनेजमेंट कड आहोत आमचे निर्णय लादायला,

**श्री. अविनाश तिरपुडे साहेब (पदसिद्ध उपाध्यक्ष):** मॅनेजमेंटचा निर्णय सांगितला.

**श्री. शबीर आलम (एफटीडी):** सर जो डायरी का बात कर रहे है, ये जांच की प्रक्रिया जो है, ये निष्पक्ष नही है, दोही लोग कटघरे मे क्यू खडे है? आपसे जानना चाहूंगा दोही लोगो की तरफ क्या टेंडरिंग प्रक्रिया मे सिर्फ दोही लोग इनवॉल्व थे? या पुरी कमिटी थी तो दोही लोगो के उपर जांच का दायरा क्यू रखा गया? बाकी लोगो के उपर क्यू नही?

**श्री. अविनाश तिरपुडे साहेब (पदसिद्ध उपाध्यक्ष):** शबीरजी ऐसा है, की जो मुखिया होता घर का उसी को पुछा जाता है. बाकी बोर्ड ऑफ डायरेक्टर मेंबर,

**श्री. यदुवीर सिंग (एचएलयुडी):** हम लोगो को अनौपचारिक चर्चा के दौरान ये कहा था, आश्वासन दिया था, आप भी बैठे थे एक महिना पहिले की ये जो रिपोर्ट, है उसको वेबसाईट पे डालेंगे, उसका क्या हुवा, जरा सदन को बताये, आप ऐसा कोई अध्यक्ष बोले उन्होने कहा साबने कहा था,

**श्री.राजेश कळके (सीडीएम):**साहेब साहेबांनी कबूल केलं होतं, आपण किती जण होतो, हात वर करा मीटिंग मध्ये साहेबांनी कबूल केलं होतं, त्याचा अंशिक स्वरूप वेबसाईटवर टाकण्यात येईल,

DRAFT 64th AGM

**श्री. अविनाश तिरपुडे साहेब (पदसिद्ध उपाध्यक्ष):** तर साहेब पण कंट्रोलरच्या वर नाही आहेत,

**श्री.राजेश कळके (सीडीएम):** नेमक त्या रिपोर्ट मध्ये हा रिपोर्ट का लपवला जातो काय आहे, नेमकं

**श्री. अविनाश तिरपुडे साहेब (पदसिद्ध उपाध्यक्ष):** लपवण्याचा प्रश्न नाही,

**श्री.राजेश कळके (सीडीएम):** मग आमच्या मालकांच नुकसान होत ना अहो,20000 लोकांच नुकसान त्यांच्या कष्टाच.

**श्री. अविनाश तिरपुडे साहेब (पदसिद्ध उपाध्यक्ष):**Decision has been given the authority.

**श्री.राजेश कळके (सीडीएम):** तुमच्या डिसिजनने आमचं नाही ना समाधान नाही होतय.

**श्री. अविनाश तिरपुडे साहेब (पदसिद्ध उपाध्यक्ष):** समाधान नाही होत तर तुम्ही जाऊ शकता ना, पुढे जाऊ शकता.

**श्री.राजेश कळके (सीडीएम):** मग तुम्ही काय केलं चौकशी,

**श्री. संतोष कांबळे (बी ए आर सी हॉस्पिटल):**साहेब, मला वाटतं तुम्ही तो डिसिजन दिला आहे, नोटीस यांना दिली आहे, मला वाट यांची नैतिक जबाबदारी म्हणून सगळ्या 12 लोकांनी राजीनामा द्यावे.

**श्री. अविनाश तिरपुडे साहेब (पदसिद्ध उपाध्यक्ष):** तो वेगळा मुद्दा आहे तुम्ही काहीतरी ठरवा, त्याच्यामध्ये असं नैतिक आहे का?

**श्री.संतोष कांबळे (बी ए आर सी हॉस्पिटल):** याच्यामध्ये घोटाळा झाला ना,

**श्री. अविनाश तिरपुडे साहेब (पदसिद्ध उपाध्यक्ष):**घोटाळा झाला किंवा नाही तुम्ही स्वतः ठरवता त्याच्यामध्ये, घोटाळा घोटाळा शब्द वापरून, स्वतः ठरवताय,

DRAFT 64th AGM

**श्री. मनोज खेडेकर (एसआयआरडी):** साहेब सर्वप्रथम तुम्ही सांगितलेल आहेत, की अध्यक्ष आणि उपाध्यक्ष आम्ही न्यूट्रल आहोत, याच्यामध्ये जर मागच्या AGM मध्ये ऑलरेडी ठराव झालेला आहे, आणि जर सगळी कोरम आताची पण रेडी आहे, की जर ह्याच्यावरती पुन्हा एकदा चौकशी झाली पाहिजे, वगैरे आणि साहेब जसे बोले की काही अहवाल कॉन्फिडेंशल आहे, तर actually साहेब पतसस्था आहे, आणि आपण ही जी वार्षिक सभा घेतो ही पब्लिकला कळण्यासाठी घेतो, की अध्यक्ष आणि या संस्थेमध्ये काय चाललेल आहे, म्हणून वगैरे तर याच्यामध्ये मध्ये असं काही नाही, की कॉन्फिडशन आहे, म्हणून साहेब, त्यामुळे कृपया सगळ्यांनी सगळ्या कोरम सगळ्यांना मान्य आहे की हा रिपोर्ट हा जो हवा तो सगळ्यासमोर साक्ष व्हावा, म्हणून वगैरे, आणि याच्यावरती अजून कमिटी निर्णय घेण्यात यावा म्हणून, इकड खूप प्रश्न येत आहेत पण त उत्तर येत नाही,

**श्री. यदुवीर सिंग (एचएलयुडी) :**एक साल हमलोग मेंबर लोग इंतजार कर है. कुछ तो निकल के आयगा, BARC जैसा स्थापना इतने अच्छे अच्छे ऑफिसर होने के बाद कुछ तो निकल के आयगा, अभी आगे चलके क्या आने वाला है, कैसे भरोसा करेंगे, अभी खराब हो अपने मेंबर से कमिटी बने, और एक महिने के अंदर इनसे पैसा वसूल करके,

**श्री. मुकुंद वैराळकर (एऍण्डएसईडी):**अध्यक्ष महोदय आपल्या परवानगीने आणि सभागृहाच्या सुद्धा परवानगीने, उपाध्यक्ष साहेबांना एक प्रश्न मी आधीच विचारला, त्यांनी अजूनही स्पष्टपणे त्याच उत्तर दिलेलं नाहीये, माननीय उपाध्यक्षांना मी सभागृहाच्या वतीने एवढीच एक विनंती परत पुन्हा करतो, की जो काही कॉन्फिडेंशियल रिपोर्ट आहे. चौकशी समितीमध्ये जे काही अंतिम झालेला असेल तो रिपोर्ट आज, आम्ही सभागृहातर्फे एक ठराव संमत करतो की तुम्ही आमच्या वतीने माननीय कंट्रोलर साहेबांना, या ठरावाची एक प्रत देऊन 15 दिवस म्हणा किंवा एक महिना म्हणा , तुमच्या याच्यानुसार तो रिपोर्ट आम्हाला या सभागृहाला मिळावा, याकरता असा तुमच्या तुमच्या मार्फत आम्ही एक ठराव या, सभागृह आज पारित करीत आहे,

**श्री. गिरीष शेणई साहेब (पदसिद्ध अध्यक्ष) :** आमच्या मार्फत करायची काही जरूर नाहीये, स्वतः करू शकता, तुम्हाला पाहिजे ठराव, तुम्ही म्हणताय सभागृहाचा ठराव संमत करेल, त्याला काय आमची हो किंवा ना, आम्ही त्याला काही म्हणू शकत नाही. तुम्ही काय जे काय करायचं करू इच्छित ते करा, डोनट इन्वॉल्व अस,

**श्री. मुकुंद वैराळकर (एऍण्डएसईडी) :**धन्यवाद साहेब

DRAFT 64th AGM

**श्री. गिरीष शेणई साहेब (पदसिद्ध अध्यक्ष):** आम्ही न्यूट्रल आहोत,

**श्री. मुकुंद वैराळकर (एऍण्डएसईडी):**मी सभागृहाच्या वतीने एक ठराव प्रस्तुत करतो, आजच्या 64 व्या एजीएम मध्ये ठराव ठेवण्यात येत आहे की. डायरी प्रकरणामध्ये जे काही इन्वेस्टिगेशन झालं, आणि जो काही रिपोर्ट प्रशासनाला सबमिट झाला, त्याची प्रत माननीय पदसिद्ध, उपाध्यक्ष यांनी कंट्रोलर साहेबांना, AGM विनंती म्हणून एक रिपोर्ट सबमिट करायचा आहे, आणि तो या सभागृहातील रिपोर्टची प्रत दाखवायची आहे, असा ठराव सर्वानुमते आम्ही हातवरती करून संमत करत आहोत.

**श्री. गिरीष शेणई साहेब (पदसिद्ध अध्यक्ष) :**मी मगाशी तुम्हाला सांगितलं की हा ठराव आम्हाला दोघांना मंजूर नाही, तुम्हाला करायच तर करा, अध्यक्ष उपाध्यक्ष याच्यात येणार नाही.

**श्री. मुकुंद वैराळकर (एऍण्डएसईडी) :** माननीय अध्यक्ष साहेब, मी तुम्हाला म्हटलच नाही आहे, अध्यक्ष आणि उपाध्यक्ष तुम्ही पूर्णपणे प्रशासनाचे आहे त्यामुळे तुम्हाला वघळून, सभागृह बसलेला आहे, या सभागृहाला मी विनंती केली आणि आता हा ठराव सभागृहाने हात वरती करून मान्य केलेला आहे, कृपया यामध्ये ठराव प्रत आमच्याकडे आल्यानंतर किंवा या संपूर्ण सभागृहाला प्राप्त झाल्यानंतर काय करायचं हे सभागृह ठरवेल ना, परंतु तुरतास हा विषय तरी कुठेतरी थांबेल किती, लांबनावर आता हा तुम्ही फक्त एवढ मान्य करा की तुम्ही तुमच्या

कारण तुम्ही प्रशासनाचे पदाधिकारी इथे म्हणून बसलेले आहेत, तुम्ही सोसायटीचे पदाधिकारी ही आहेत, आम्ही सभागृहाच्या वतीने तुमच्या जवळच हा ठराव मांडू शकतो. दुसऱ्या जवळ नाहीय,

**श्री. गिरीष शेणई साहेब (पदसिद्ध अध्यक्ष) :** तुम्ही मागा, ओके तुम्हाला जे काही करायचं ते करा, पण आम्ही दोघही तुम्हाला डायरेक्टली तुम्ही अप्रोच करू शकता कंट्रोलला आमच्या थ्रू जायची काही जरूर नाही

**श्री. मुकुंद वैराळकर (एऍण्डएसईडी) :**नाही तुम्ही प्रशासनाचे तुम्ही पदाधिकारी आहे साहेब तुमची नेमणूक प्रशासनाने इथे केलेली आहे, त्यामुळे हा ठराव  तुमच्या मार्फतच जाईल अशी मी तुम्हाला विनंती करतो.

**श्री. मनोज खेडेकर (एसआयआरडी):** अध्यक्ष साहेब तुम्ही आता स्वतः सांगितलेल आहे की ठराव तुम्ही समत करून घ्या, तुम्ही आता थोड्यापूर्वी बोलत की तुम्ही ठराव करा.

**श्री. गिरीष शेणई साहेब (पदसिद्ध अध्यक्ष) :** मी ठरावा बद्दल बोलतच नाही.

DRAFT 64th AGM

**श्री.राजेश कळके (सीडीएम):** जोपर्यंत चौकशीचा अहवाल येत नाही तोपर्यंत आपली मीटिंग तहकूप करावी, आम्हाला इंटरेस्ट त्या चौकशीच्या अहवालातच आहे. कारण संस्थेच नुकसान झालेल आहे. आम्हाला रिपोर्ट येऊ द्या, पुन्हा मीटिंग होऊ द्या. आपण दरवर्षी नेहमीच सतत मीटिंगच घेऊया. अगोदरच काळजी घेतली असती तशी वेळ आली नसती, नाहीतर आम्हाला सरकारी इन्वेस्टिगेशन जी संस्था आहे, तिच्याकडे जाव लागेल, रिपोर्ट घेऊन, तुम्ही चूक केलेली आहे, तुम्ही बोगस कंपन्या दाखवून गुन्हा केलेला आहे, आणि जाणूनबुजून केलेला आहे तुम्हाला इनोसंट कधीच म्हणता येणार नाही, तुम्ही डजंट करा.

**श्री. मुकुंद वैराळकर (एऍण्डएसईडी) :**यानंतर मीटिंग चालवायची का थांबवायची कृपया कारण आमच्या या सभागृहाच्या बाजूने आता कोणीही या विषयावरती चर्चा करणार नाहीये, जे काय बोलायचं तेवढं सगळं बोलून झालं, एकच विषय एकच विषय आता गेले अडीच तास झाले, तेवढाही जर पुढे जात नाही तर काही फायदा नाहीये, काय करायचं हे पदसिद्ध अध्यक्ष आणि उपाध्यक्ष आपण ठरवा आणि निर्णय आम्हाला द्या, धन्यवाद.

**श्री. राम परब (युईडी) :** हे बघा निर्णय होऊ द्या, नंतर जा असं बाहेर गेलं तर नंतर काय पण पास होईल, इथे सभा बरखास्त झालेली नाहीये, प्लीज.

**श्री.राजेश कळके (सीडीएम):** संस्थेच्या अध्यक्षांनी सुरुवात केली होती, सभा त्यांच्या शेवट होऊ द्या, तुम्ही बसून घ्या.

**श्री. प्रकाश पाटील (एसआयआरडी) :**प्लीज सगळ्यांनी, कृपया कुणी बाहेर जाण्याचा प्रयत्न करू नका, ते आता मीटिंग तहकूप करणार आहेत, आता जसं ठरवल्याप्रमाणे अध्यक्ष साहेब, आपल्याला सांगतीलच कुणी जाऊ नका

**श्री. गिरीष शेणई साहेब (पदसिद्ध अध्यक्ष) :**सभा कुठल्याही प्रकारे तहकूप होणार नाही, सभा कंटिन्यू आहे. ज्यांना थांबायचं ते थांबू शकतात आणि जी काय आपण निर्णय प्रक्रिया मदत करू शकतात, थँक्यू

**श्री.राजेश कळके (सीडीएम):** डायरीचा हा विषय चालूच राहणार आहे आमचं नुकसान झालेल आहे.

**श्री.बाहुबली चौगुले (मानद सचिव) :**जर विषय नंबर 12 झाला असेल तर आपण क्रमांक दोनवर परत जाऊ.

**श्री. दिनेश माने (पीडी) :**अध्यक्ष साहेब, संपूर्ण सभागृहाची आपणास विनंती आहे का जो आपण अहवाल बनवलाय या पूर्ण कमिटीवर तर तो अहवाल सभागृहपुढे सादर करावा, जेणेकरून यातून पुढे काहीतरी मार्ग निघून आपल्याला पुढच्या विषयाकडे जाता येईल नाहीतर, मग हा विषय असच रेंगाळत राहील, याच्यामध्ये तुमचा रिपोर्ट कळाला सभागृहाच जर समाधान झालं, तर सभागृह नक्कीच त्या ठिकाणी मान्य करेल, परंतु सभागृहाच जर समाधान नाही रिपोर्ट झालं, तर सभागृह पुढे जाण्यास देखील त्या ठिकाणी तयार असेल, आपले BARC मधले अधिकारी आहेत त्याच्यामुळे प्रॉब्लेम काय होतो त्यांचा रिपोर्ट त्यांच्याकडे झाकून ठेवलेला आहे, त्याच्यामुळे तो सभागृहाला दिसत नाहीये तो सभागृहाला कळणं गरजेच आहे, जेणेकरून आपल्याला पुढच्या विषयाला सुरुवात करता येईल, आणि दुसरा विषय म्हणजे ज्या ठिकाणी रजिस्ट्रार ऑफिसला जरी जायचं झाल, एखाद्या सभासदास. तर तुमचा रिपोर्ट कळल्याशिवाय तिथे जाता येणार नाही, कारण का तुमच्या रिपोर्ट मध्ये जर योग्य तुमचा रिपोर्ट असेल, तर पुढे जाण्याची गरज भासणार नाही म्हणून हा रिपोर्ट कृपया करून आपण आपण सभागृहाला दाखवावा अशी विनंती करतो आणि सभागृहाला देखील विनंती करतो का आपण कृपया बसावं, एका जागी बसून घ्यावं, जेणेकरून हा विषय मार्गी लागेल आपण जर उठून गेलात तर आपण प्रत्येकाने कुपन घेतलेले आपली सगळ्यांची हाजिरी लागलेली आहे, इथे सगळे विषय मंजूर होतील, लक्षात ठेवा, त्याच्यामुळे आपण कोणी उठून जाऊ नये, आपणास विनती आणि तुम्हाला विनंती कमिटीला, का आपण जो अहवाल सादर केला तो सभागृहाला दाखवावा.

DRAFT 64th AGM

**श्री.बाहुबली चौगुले (मानद सचिव) :**धन्यवाद माने सर, पहिल स्टेटमेंट परत देतो की अहवाल संस्थेमध्ये प्राप्त झालेला नाहीये.

**श्री. मनोज खेडेकर (एसआयआरडी):** हा अहवाल प्राप्त करण्यासाठी तुम्ही काय प्रयत्न केले का? तुम्ही काय लेखी प्रयत्न केलेले का लेटर दिले का?

**श्री.बाहुबली चौगुले (मानद सचिव) :**आम्हाला माननीय कंट्रोल साहेबांनी जर परमिशन दिली आणि जर संस्थेकडे अहवाल प्राप्त झाला तर तो अहवाल सभासदांना देण्यात येईल.

**श्री.डी.एस राजापुरे (डीआरएचआर) :** चौगले साहेब मी तुम्हाला दीड ते दोन महिन्यापूर्वी एक लेटर दिलं होतं, त्यामध्ये लिहिलं होतं चौकसी समिती नेमली आहे का, त्यांचा रिपोर्ट तुमच्याकडे आला आहे का? आला नसेल तर तो मिळवून घेण्यासाठी तुम्ही का काही कागदोपत्री व्यवहार केला आहे? का ह्याचं उत्तर मला काहीही मिळालेल नाही, मी हे लेटर दिलेले एक ते दोन महिन्यापूर्वी.

**श्री.बाहुबली चौगुले (मानद सचिव) :** राजापुरे साहेब त्यावेळी मी सांगितलं होतं की की संस्थेमध्ये तो अहवाल आम्हाला मिळालेला नाहीय.

**श्री.श्री.डी.एस राजापुरे (डीआरएचआर) :** मी प्रश्न विचारला तुम्ही लेखी उत्तर द्यायला पाहिजे. इतका दिवस तुम्ही उत्तर नाही दिलेले,

DRAFT 64th AGM

**श्री.बाहुबली चौगुले (मानद सचिव) :** मी तुम्हाला लेखी उत्तर नाही देऊ शकलो, दिलगीर व्यक्त करतो, पण मी तुम्हाला त्याच वेळी सांगितलं की, अहवाल संस्थेमध्ये उपलब्ध नाहीय. आणि अहवाल तो कमिटीने बनवला, आम्ही त्या कमिटीला अप्रोच केला नाही, ज्यावेळी कमिटीचा रिपोर्ट येईल, त्यावेळी नक्की सांगू.

**श्री. प्रवीण सावंत (सीडीएम):** पदसिद्ध अध्यक्षांना माझी विनंती आहे की, पदसिद्ध अध्यक्ष असतील, पदसिद्ध उपाध्यक्ष असतील, या पदाची जी काही कर्तव्य आहेत, ज्या जबाबदाऱ्या आहेत, या तुम्ही जाहीरपणे सांगून टाका, या भूमिकेत राहू नका की, मी एक इथे निरीक्षक आहे, मी इथे ऑब्झर्वर आहे, ही सभा यापूर्वी जे जे पदसिद्ध अध्यक्ष होते, त्यांनी हँडल केली. त्यांनी या भूमिकेत कधीच गेले नाही, की मी ऑब्झर्वर म्हणून, तुम्हाला सांगतो. खारपाटे साहेब पदसिद्ध अध्यक्ष होते. खारपाटे साहेब सीसी मध्ये सभा चालली होती, आणि संचालक मंडळाने चुकीच्या पद्धतीतती 30 हजाराचा व्यवहार झालं. 30 हजाराच्या व्यवहाराला पदसिद्ध अध्यक्षांनी उत्तर दिलं होतं, अशी जबाबदारी झटकली नव्हती. पदसिद्ध अध्यक्ष खारपटे साहेबांनी सांगितलं होत, या सभागृहालाचा मान राखून या संचालक मंडळाने 30 हजार रुपये भरावेत असा त्या ठिकाणी सभागृहासमोर निर्णय झाला होता, लक्षात घ्या. साहेब तुम्ही जबाबदारी झटकू नका, तुमचे अधिकार आहेत, या सभागृहाने दिलेल्या निर्णयाचा मान राखणं हे तुमचं कर्तव्य आहे. तुम्ही या संचालक मंडळाला सांगायला पाहिजे, आतापर्यंत तुम्ही त्यांना नोटीस दिले, गुन्हा अजून

ते कबूल झालेत की नाही ते पुढची गोष्ट, तुम्ही या सभागृहाला सांगता, तुम्ही कोर्ट कचेरी करा, सभागृहातून कोणी कोर्टकरी स्वखर्चाने करू शकत नाही, कारण डिपार्टमेंटच्या याच्यामध्ये स्वखर्चाने काय करतील, सोसायटी सगळ्यांची आहे, जे काही नुकसान झाले, ते प्रत्येकाच्यासाठी थोडा थोडा भाग आहे, त्यासाठी आम्ही प्रत्येक वैयक्तिक माणूस काय हजारो रुपये खर्च करेल, तो प्रश्न नाहीये सभागृहाचा मान राखून तुम्ही या संचालक मंडळाला सांगायला पाहिजे की, ठीक आहे अजूनही निर्णय झालेला नाहीये. जर काय चुकीच्या पद्धतीत जे काही सभा आपल्या सोसायटीचा नुकसान झालंय, तर या संचालक मंडळाने ती जबाबदारी घ्यावी, असा एक निर्णय तुम्ही या ठिकाणी जाहीर करायला पाहिजे, मी याच्यात पडणार नाही, तुम्ही काय करायचं त्या कंट्रोलरला करा, कंट्रोलर आणि हे सगळ हे सभागृह माझ्यासारखे व्यक्ती कधी सोसायटीत जाऊन, कुठल्याही प्रकारचं कुठल्याही प्रकारची विचारणा करता करत नाही, फक्त एकच दिवस आमचा हक्काचा असतो त्या दिवशी आम्ही इथे उपस्थित असतो, आणि आम्ही आमचे प्रश्न मांडत असतो, कारण सोसायटीच्या भल्यासाठी जेणेकरून कुठलही चुकीचं काम होत नाही, इथे जी मंडळी बोलतात ते चुकीचं काम न होण्यासाठी बोलतात ते स्वतःचा वेळ खर्च करून इथे येऊन आपल्या म्हणण मांडतात, आणि त्याचा मान तुम्ही ठेवला पाहिजे, साहेब तुम्ही जबाबदारी झटकू नका, जर काही चुकीच झाल असेल तर तुम्ही या संचालक मंडळा, आदेश द्या की जे काही नुकसान सोसायटीच झाल असेल, त्याला जबाबदार तुम्ही एवढा एकच शब्द ठेवा, ते भर न भरो, खारपाटे साहेबांनी 30 रुपये भरायला सांगितले होते कोणी भरलेले नाहीत, कोणत्याही संचालक मंडळाने ते 30 हजार रुपये भरलेले नाहीत या ठिकाणी मी सांगतो, तुम्ही हा निर्णय इथे जाहीर करा जे होईल ते पुढे आता तुम्ही निर्णय जाहीर करा.

DRAFT 64th AGM

**श्री. गिरीष शेणई साहेब (पदसिद्ध अध्यक्ष) :**सावंत साहेब, धन्यवाद पहिली गोष्ट तुम्हाला सांगू इच्छितो, काहीतरी ठराव मांडला, काहीतरी अभिनंदन वगैरे केलं, ओके, तर मला वाटतं तुम्ही जी काय जबाबदारीची जाणीव करून दिलीत, मला ती थोडीफार मी निभवायचा प्रयत्न केला, या वेळेला पण केला, समिती आम्ही नेमली सभागृहाचा मान राखून, त्यांनी अहवाल पण दिला, आता अहवाल का दिला? कुठे दिला? त्याच्यात मी पडणार नाही, कारण, ती माझी रिस्पॉन्सिबिलिटी नाहीये. एक मिनिट पाटील तुम्ही बोलणार नाही, आता तो रिपोर्ट आल्यानंतर तो कंट्रोलर साहेबांनी, त्याला नाही शेअर करायचा म्हणून निर्णय दिलेला आहे, त्याला मला रिस्पेक्ट करावा लागेल, कारण माझी अपॉईटमेंट झाली इथं अध्यक्ष आणि यांची उपाध्यक्ष, ही आम्ही निवडून आलेलो कॅंडिडेट नाही आहोत, आम्ही आस्थापने नेमलेले आहोत आणि म्हणून मी परत म्हणतो तुम्हाला की मी न्यूट्रलच राहणार आहे. खारपाटे यांनी काय केलं, त्यांनी काय केलं, ओके त्यानी काय केलं त्याला मी काही बोलू शकत नाही, कारण मी तिथ नव्हतो कि मला त्याच्याबद्दल माहिती नाही, पण मी काय करायचं हे मला माहिती, ओके तर मी स्वतः न्यूट्रलच राहणार आहे, कोणीही काही म्हटलं तरी कोणी किती प्रेशर आणलं तरी मी न्यूट्रलच राहणार आहे, कारण मी आस्थापनेचा माणूस आहे, आस्थापनेला आन्सरेबल आहे, मी तुम्हाला आन्सरेबल नाही. कारण मी काय निवडून आलेला पदाधिकारी नाहीये. माझ्याकडे लेटर आहे ते आस्थापनेच आहे, मी आस्थापनेला रिस्पॉन्ड करणार जे काही इथं घडतय त्याचा रिस्पॉन्स मी देऊ शकतो, त्यांना ओके, तर तुम्ही याच्याबद्दल मला

तुम्ही सांगताय, ओके, तुमचं मत मी रिस्पेक्ट करतो, पण अल्टिमेटली मला काय करायचं मी ठरवणार आहे, कारण माझी अपॉईटमेंट तशी झालेली आहे, ओके.

**श्री. प्रकाश पाटील (एसआयआरडी) :** नक्की धन्यवाद साहेब, तुम्ही म्हणलात, आम्ही नक्कीच तुमचा आदर ठेवतो, पण मागच्या एजीएम मध्ये तुम्हीच कमिटमेंट केली होती, समिती नेमू त्याचा अहवाल तुम्हाला देऊ, तुम्हाला सादर करू, बर याच्यापूर्वी पण आपली एक काही ठराविक सभासदाची, आपल्या कॅबिनमध्ये मीटिंग झाली, त्यावर पण आम्ही सांगितलं चौकशी समित्या, साहेब एजीएमच्या आधी आम्हाला अहवाल देण्यात यावा, तुम्हाला जर नसता द्यायचा ना, कमीत कमी आम्हाला सांगितलं असतं, आम्ही कंट्रोल साहेबांकडे अप्रोच झालो असतो, आज ही वेळ आली नसती, बरोबर ना सर मध्ये किती वेळ यांनी घालवला, पण तुम्ही किंवा तिरपुडे साहेबांकडे आम्ही गेलो की नाही, इथे कंट्रोल साहेबांनी द्यायला नाही सांगितलय तो सेक्रेट आहे, किंवा सिक्रेट आहे, काय आहे ते आम्ही त्यांना अप्रोच झालो असतो ना, आता आम्ही एवढं बोलल्यानंतर तर आज एजीएम मध्ये आम्हाला जर तो रिपोर्ट अहवाल, जर आमच्या समोर नाही आला, मग एजीएमचा उपयोग काय, मग त्या चौकशी समितीचा उपयोग काय, मग त्यांनी दिलेला रिपोर्टचा उपयोग काय, बर त्याहीवर चौकशी समिती नेमली आपल्या आस्थापनने ट्रेजर आणि सेक्रेटरीना शोकेस नोटीस पण दिली, चूक पण मान्य आहे, रिपोर्ट पण द्यायचा नाही, आता आम्ही काय करायचं तुम्ही सांगा, म्हणून आम्ही म्हणलं रिपोर्ट जोपर्यंत येत नाही, तोपण सभा तहकूब करा, कंट्रोल साहेबांना सांगा एजीएम मानायला तयार नाही, त्यांना हा चौकशी समितीचा अहवाल पाहिजे एवढंच सांगा.

DRAFT 64th AGM

**श्री.राजेश कळके (सीडीएम):** असं नाही का जर चौकशी समितीचा रिपोर्ट संचालक मंडळाच्या फेवर मध्ये असता, तर तुम्ही डिक्लेअर केला असता, मग तुम्ही सहज डिक्लेअर केला असता कारण त्याच्यासाठी तर कमिटी बसवली होती. आता तो फेवरेबल नाहीये म्हणून तुम्ही दिरंगाई करताय, चार महिने साहेबांच्या आम्ही जात होतो साहेबांना वेळ नव्हता, तिरपुडे साहेबांकडे जात होते ते म्हणतात आम्हाला त्रास कशाला देता तुम्ही, अरे हे काय? तुम्ही अध्यक्ष -उपाध्यक्ष आम्ही जाणार कोणाकडे? का बीआरसी डायरेक्टर किंवा चेअरमन यांच्याकडे जाणार साध्या गोष्टीसाठी? असं काय त्या अहवालामध्ये आहे, आताही तुमच्या जवळ तो अहवाल असेल वाचून दाखवा लोकांना.

**श्री. दिनेश माने (पीडी) :** साहेब माझी एक विनंती आहे तुम्ही संपूर्ण अहवाल तर दाखवत नाही, परंतु जी काही शोकाज नोटीस असेल आणि वॉर्निंग लेटर असेल, ते तरी डिस्प्ले करा, लोकांना बघू द्या अहवाल, तर देतीलच परंतु स्टेप बाय स्टेप जाऊया ना, पहिला शोकाज नोटीस मध्ये काय लिहिलंय त्याच्यानंतर वॉर्निंग लेटर मध्ये काय लिहिलंय अहवाल तर आपण घेणार आहोत आपण सभासद आहोत.

**श्री. प्रभात सिंग (सीडीएम):** अध्यक्ष जी अवेलेबल आहे ना ? अगर अध्यक्ष जी नही है तो आप बोल सकते हो, उपाध्यक्ष करके. लेकिन अध्यक्ष अवेलेबल है, अध्यक्ष क्यू नही बोल रहे ? आप बताईये फिर आप अध्यक्ष क्यू नही बने ? जब कमिटी मे चर्चा हुई. आप अध्यक्ष से बुलवाये, आप क्यू बोल रहे है, आप बार बार घुमराह कर रहे है.

**श्री. विवेक भागडीया :** मै आपके शब्द का मान रखता हु.

**श्री. प्रभात सिंग (सीडीएम):** माननीय अध्यक्ष प्लीज, आपसे रिक्वेस्ट है, मेरी हमारी सोसायटी के अध्यक्ष कोळी साहेब अवेलेबल है, तो वो क्यू नही बोल रहे, वो क्यू नही बोल पा रहे, कुछ तो बोले,

**श्री. विवेक भागडीया :** मै आपके शब्द का मान रखता हु.

**श्री. प्रभात सिंग (सीडीएम):** सर आप उसी चक्कर में है, आप पब्लिक से सब निकल वा रहे हो, मै आप घूमराह कर रहे हो, मै नही.

DRAFT 64th AGM

**श्री. विवेक भागडीया :** मै फिर बोल रहा हू मैने ऐसा कुछ नही बोला.

**श्री. प्रकाश पाटील (एसआयआरडी) :** साहेब मी तुम्हाला एक प्रश्न विचारला आहे, प्लीज मला तसे उत्तर द्या, सभा पुढे कशी चालवायची?

**श्री. गिरीष शेणई साहेब (पदसिद्ध अध्यक्ष) :** सभा पुढे कशी चालवायची, हे सभेने ठरवायचं मी नाही ठरवणार.

**श्री. प्रकाश पाटील (एसआयआरडी) :** पदसिद्ध अध्यक्ष तुम्ही आहात, तुमच्या मनानुसार आम्ही चालायचं आम्ही तुमचा आदर ठेवतोय.

**श्री.राजेश कळके (सीडीएम):** सभेचा आमंत्रण कोणी दिलं? सभा कशी चालवायची? प्रोटोकॉल अहवालामध्ये कोणी टाकला? तुम्ही टाकला ना, सभा कशी चालवायची, कधी बंद करायची हे तुमच्या हातात आहे, काय निर्णय घ्यायचे तुमच्या हातात आहे, म्हणून तर तुम्हाला आम्ही निवडून दिले आहे.

**श्री. प्रकाश पाटील (एसआयआरडी) :**आस्थापनेने आपणास एवढ्या मोठ्या पदावर जबाबदार दिली आहे, ती तक्रार आम्ही तुमच्याकडेच मांडू.

**श्री.राजेश कळके (सीडीएम):**आम्ही कुणाकडे जायचं?

**श्री. गिरीष शेणई साहेब (पदसिद्ध अध्यक्ष) :**हा जो मुद्दा या रिपोर्ट साठी थांबत असेल, तर तुम्ही एक रिप्रेझेंटेशन द्या.

**श्री. प्रकाश पाटील (एसआयआरडी) :**रिप्रेझेंटेशन नाही आम्ही ठराव मांडतो, जोपर्यंत अहवाल रिपोर्ट येत नाही तोपर्यंत ही मीटिंग तहकूब करा.

**श्री. गिरीष शेणई साहेब (पदसिद्ध अध्यक्ष) :** हा सभेचा अधिकार आहे, हा माझा अधिकार नाही,

**श्री. प्रकाश पाटील (एसआयआरडी) :** आम्ही आमचाच सांगतो, पुढची जी काही डेट ठरेल त्यावेळेला आम्हाला अहवाल सादर करा, त्यावेळी फटाफट निर्णय घेऊ आणि सभा पुढे नेऊ. ठराव म्हणतो या ठिकाणी आजची सभा याच ठिकाणी तहकूब करूया, पुढच्या वेळी येणारा, तुम्ही वेळ सांगा किती दिवसाचा वेळ पाहिजे तोपर्यंत आम्ही थांबतो.

DRAFT 64th AGM

**श्री. गिरीष शेणई साहेब (पदसिद्ध अध्यक्ष) :** मी काही सांगू शकणार नाही, किती दिवस लागतील, मी काही बोलणार नाही, तुम्हाला जो काही ठराव करायचा तो ठराव तुम्ही करा.

**श्री. प्रकाश पाटील (एसआयआरडी) :** सभागृह पुढे तो रिपोर्ट अहवाल पाहिजे ना, सभागृह तेच विचारते.

**श्री. गिरीष शेणई साहेब (पदसिद्ध अध्यक्ष) :** माझ्याकडून आत्ता कुठलीही कमिटमेंट होणार नाही.

**श्री. प्रकाश पाटील (एसआयआरडी) :** गणपती गेले कि सभा घ्या. गणपतीला चार दिवस उरले, लोकांना खरेदी करायचे, गावाला जायचे, तिकीट काढायचे आहे,  यांनी ऐनवेळेला अशी सभा घेतली म्हणून, म्हटलं गणपती बाप्पाला, आपण निरोप देऊया, आरामात घेऊया तोपर्यंत रिपोर्टिंग येईल.  आपण पुन्हा सभा घेऊया.

**श्री. राम परब (युईडी) :** साहेबांच्या मताशी मी सहमत आहे , उपाध्यक्ष साहेब एक मिनिट, तुम्ही ना सभासदांचे शब्द धरू नका, इथे नको ते शब्द आम्ही सहन करतो, गेल्या वार्षिक सभेचं तुम्ही रेकॉर्डिंग आहे का?  गप्प बस रे ? आम्ही काहीच बोललो नाही, आताही काही बोलत नाही म्हणून प्रत्येक शब्दाला असू दाबू नका, होतो चुकीचे शब्द.

**श्री. मुकुंद वैराळकर (एऍण्डएसईडी) :** अध्यक्ष महोदय, जर काही अडचण असेल, आताच तुम्हाला जर काही या संचालक मंडळावर, तुम्हाला काही चर्चा करायची असेल किंवा तुमच्या अध्यक्षांनी उपाध्यक्ष, तुमच्या मनामध्ये काही शंका असेल, या संचालक मंडळाला, तर तुम्ही पाच मिनिटे तुम्हाला वेळ देत आहोत, शासकीय वेळ देतोय याच्यातून, तुम्ही बसा निर्णय घ्या, लांबू नका, कारण दुसरा दिवस हा इतिहास फार वेगळा होऊन राहिला ,आतापर्यंत या संचालक मंडळांनी दोन AGM झाल्या, दोन्ही AGM या २ दिवसाच्या झाल्या, चुकीचा पायांडा पडून राहिला आज तुम्ही फक्त दोन वर्ष राहणार तुम्ही निघून जाणार, अध्यक्ष उपाध्यक्ष परंतु हे जे सभासद आहेत, यांना इथे राहायचं, आहे ही सोसायटी आमच्या कष्टाच्या पैशाची आहे ही, आम्हाला चालवायची आहे, कारण फक्त निवडून येणं किंवा निवडणुकीची जमले दाखवून पुढे जाणं, हा कुठेतरी प्रकार बंद झाला पाहिजे, त्याच्या करता ही जी AGM आहे यापूर्वीच्या दोन याच प्रकारावर चालू आहेत, तुम्ही निर्णय घ्या तुमच्याजवळ वेळ नसेल तर संचालक मंडळाशी तुम्ही बोला, ते जर बांधील असतील जो काही निर्णय येईल ,मी तर मगाशीच उपाध्यक्ष न सांगितलं की, तुम्ही लीगल मॅटर जे आहे त्यामध्ये लीगल एक्सपर्ट ची सल्ला घ्या त्याच्यानंतर जे काही चौकशी होईल. संचालक मंडळ जर तयार असेल कशासाठी आपण यात अडकून राहिले जाऊद्याना, पुढे संचालक मंडळ तुमचंच आहे अध्यक्ष, उपाध्यक्ष, तुम्ही आहात आणि अध्यक्ष साहेब तुम्ही म्हणता मी काहीच करू शकत नाही, हे कितपत योग्य आहे तुम्ही जर असं म्हटलं तर या सभागृहाने जायचं कुठं हे एजीएम करायचं काय ? यापुढे असंच बसून राहायचं, त्याच्या करता आम्ही सांगतो तुम्हाला की संचालक मंडळ सोबत तुम्ही स्पेशली पाच दहा मिनिटांची मीटिंग करा आणि हा जो विषय आहे हा विषय पुढे लागू नका प्लीज हा विषय कसा तुम्हाला सॉल्व करता येईल यावर तुम्ही यांच्याशी सविस्तर चर्चा करा.

DRAFT 64th AGM

**श्री.राजेश कळके (सीडीएम):**तत्पूर्वी पतसंस्थेच्या चेअरमन साहेबांना मी अशी विनंती करतो की झालेल्या प्रकारावर त्यांनी त्यांचं मनोगत व्यक्त करावं, हेमंत कोळी साहेब तुम्ही चेअरमन आहात, तुम्ही या सगळ्या प्रकरणाला बांधील आहात, तुम्ही सभागृहाला बांधील आहात, तुम्ही तुमचं मत मांडा, कारण तुमच्या सहीने आमंत्रण दिले गेले आहे, सभागृहात या, मग कशाला आम्ही यायचं, यायचं कशाला बॅलन्स शीटच्या एका मुद्द्यावर जो वादग्रस्त मुद्दा आहे, त्याच्यावर चर्चा होणारच नाही, त्याचा रिपोर्ट नाही, याचा अर्थ गेल्या वेळची बॅलन्स शीट चुकीची आहे, आणि येणारी भविष्यातील आत्ताची वर्तमान काळातील बॅलन्स शीट देखील चुकीची आहे, हा अर्थ त्यातून निघतो, तर तुम्ही तुमचं मत मांडा, तुम्हाला विनंती आहे, जर मत मांडणार नसाल तर मग काहीतरी गडबड आहे.

**श्री. पितांबर साळुंखे :**सर एक विनंती आहे,  एक - दीड तास झाला आहे, सभा चुकीच्या दिशेने चालली आहे, विषय पत्रके नुसार सभा चालावी, माझी आणि  सभागृहाची इच्छा आहे, जो काही चर्चा निर्णय होईल, तो विषय पत्रिकेनुसार व्हावा जो कोणी दोषी असेल, त्यावर बोलणी व्हावं, विषय चेंज केल्यानंतर परत पुन्हा त्यानंतर वेगळी काहीतरी विषय आणायचे आणि त्यावर बोलायचं.  विषय पत्रिकेनुसार सभा चालावी आणि त्या त्या विषयावर

चर्चा करायला तयार असेल, त्या त्या व्यक्तीने त्या त्या विषयावर आपलं ऑब्जेक्शन मांडावं, परंतु जे काही होईल ते विषय पत्रके नुसार व्हावं, शेवटचा विषय आधी असं कधीही आजपर्यंत कुठलीही सभा झाली नाही, ऐनवेळी येणारे विषयावरती ऐनवेळी खूप विषय येतात, ऐनवेळी येणाऱ्या विषयावरती चर्चा करणे ऐनवेळीचे विषय कधी संपतात का ? ऐनवेळीचे विषय कधीही संपत नाहीत त्यामुळे येणाऱ्या विषय पत्रके नुसार विषय घ्यावा, जरी एका दिवसात विषय संपले नाही तर दुसरा दिवस घ्या, परंतु विषय पत्रिकेनुसारच बोला, ऐनवेळी येणाऱ्या विषयावर बोलायचं आणि विषय दुसरा काढायचा हे मला बरोबर वाटत नाही, अशा पत्रिकेनुसार विषय घ्या आणि त्यावर बोला वेळ लागला, तरी चालेल दोशी असला तरी चालेल परंतु विषय विषय पत्रिकनुसार घ्या, ही माझी कळकळीची विनंती तुम्हाला आहे.

**श्री. अविनाश तिरपुडे साहेब (पदसिद्ध उपाध्यक्ष):** शांत रहा, सभागृहाला माझी विनंती आहे की. प्लीज कीप सायलेन्स. कृपया शांत रहा. माझं असं म्हणणं आहे की जर सोसायटीने प्रशासनाला ॲप्रोच केला, की आम्हाला रिपोर्ट पाहिजे आहे तर त्या दृष्टिकोनातून आम्ही प्रयत्न करू,If we received the application from the society about them will submit the file to the Controller BARC and If Controller agreed we will provide the report.

DRAFT 64th AGM

**श्री. प्रकाश पाटील (एसआयआरडी) :**साहेब संचालक मंडळाला हे अप्रोच होणार नाहीत, त्यासाठीच तुम्हाला बसवले आहे, आम्ही तुम्हाला विनंती करतोय की पदसिद्ध अध्यक्ष, उपाध्यक्ष तुम्हाला विनंती करतोय की संचालक मंडळाला approach झाली तरी त्यांना देणार नाहीत,

**श्री. अविनाश तिरपुडे साहेब (पदसिद्ध उपाध्यक्ष):** संचालक मंडळांनी अप्रोच करावं किंवा तुम्ही अप्रोच करा,

**श्री. प्रकाश पाटील (एसआयआरडी) :** सेक्रेटरीने क्लिअर कट सांगितलं तो रिपोर्ट आमच्यापुढे आला नाही पण आम्ही show cause नोटिसा घेतल्या, खजिनदार आणि सेक्रेटरी ने, म्हणजे साहेब मी काय बोललो अध्यक्षांना आणि उपाध्यक्षांना, की तुम्ही कमीत कमी AGM च असं मत आहे,की त्यांना जो रिपोर्ट दिला आहे तो AGM समोर मांडा. कमिटमेंट मागच्या AGM मध्ये केली होती, बरं नाही देत तो रिपोर्ट, आम्हाला कळवा तो पर्यंत हे मीटिंग स्थगित करा, पुढच्या मीटिंगमध्ये हे सांगा की आम्हाला मना केले आहे, बघू पुढे काय करायचे ते.

**श्री. अविनाश तिरपुडे साहेब (पदसिद्ध उपाध्यक्ष):** स्थगित करून हा विषय संपणार नाही,.

**श्री. प्रकाश पाटील (एसआयआरडी) :**अकराशे करोडची संस्था आहे, अजून बॅलन्स शीटवर खूप काही बोलायचं आहे हा खूप छोटा विषय आहे,

**श्री. अविनाश तिरपुडे साहेब (पदसिद्ध उपाध्यक्ष):** याच्यावरच आपले चार तास गेले, जर हे लोक approach झाले, तर we will submit the file to the controller of BARC and we agreed if he has given approval.

**श्री. प्रकाश पाटील (एसआयआरडी) :** आणि ॲग्रीड नाही झाले तर अर्धवट राहणारा विषय, हा विषय अर्धवट राहणार ना, मग उपयोग काय, आम्ही वर्षभर पत्र व्यवहार करतोय त्याचा आम्हाला काहीच उत्तर मिळालं नाही, त्याचे उत्तर आम्हाला काहीच मिळत नाही, वर्षभरानंतर AGM येते आणि AGM मध्ये आम्हाला जर बोलायला मिळालं नाही, तर काय उपयोग.

**श्री. अविनाश तिरपुडे साहेब (पदसिद्ध उपाध्यक्ष):** त्यांना अप्रोच होऊ द्या ना.

**श्री.राजेश कळके (सीडीएम):** या गोष्टींचा पायंडा पडेल, संचालक मंडळ काही करेल, रिपोर्ट दाबला जाईल, हा पायंडा पडेल असं, नाही याला निर्णय झाला पाहिजे.

DRAFT 64th AGM

**श्री. अविनाश तिरपुडे साहेब (पदसिद्ध उपाध्यक्ष):** काय निर्णय पाहिजे सांगा तुम्हाला,

**श्री.राजेश कळके (सीडीएम):** जो तुम्ही चौकशीचा अहवाल डिक्लेअर करा, तुम्ही कबूल केलेला आहे.

**श्री. अविनाश तिरपुडे साहेब (पदसिद्ध उपाध्यक्ष):** हा प्रशासनाच्या अखत्यारीत विषय आहे.

**श्री. प्रकाश पाटील (एसआयआरडी):** साहेब प्रशासनाने तुम्हाला बसवले आहे,

**श्री. अविनाश तिरपुडे साहेब (पदसिद्ध उपाध्यक्ष):** बसवल आहे म्हणजे आम्हाला, काही पण करायची मुभा दिली नाही ,

**श्री. प्रकाश पाटील (एसआयआरडी):** अहो काही पण नाही, यांच्यावर अंकुश ठेवायला, म्हणूनच ती समिती नेमली ना. अहो साहेब समिती तुम्हीच निवडली ना, सभागृहाणे सांगितल्यानंतर मग समिती नेमल्यानंतर अध्यक्ष साहेबांनी सांगितलं, मिनिट मी दाखवतो.

**श्री. अविनाश तिरपुडे साहेब (पदसिद्ध उपाध्यक्ष):** रिपोर्ट आमच्याकडे एक्झामिन करण्याकरता आला होता आणि आम्ही सबमिट केला,

**श्री.राजेश कळके (सीडीएम):** साहेब त्याचवेळी बोलायचं होतं ना समिती म्हणते आम्हाला अधिकार नाही, त्याच वेळा बोलायचं कशाला आमचा वेळ वाया घालवला.

**श्री. अविनाश तिरपुडे साहेब (पदसिद्ध उपाध्यक्ष):** याच्यावर सिम्पल उत्तर हेच आहे, जर कोणी अप्रोच झालं, तर वुई विल सबमिट द रिपोर्ट.

**श्री. प्रकाश पाटील (एसआयआरडी):** Approach झालो, तुम्हाला किती वेळ झालं,

**श्री. अविनाश तिरपुडे साहेब (पदसिद्ध उपाध्यक्ष):** तुमचं म्हणणं मी साहेबांना दाखवलं,

DRAFT 64th AGM

**श्री. प्रकाश पाटील (एसआयआरडी):** हे कुठे बोललात की, साहेब म्हणले द्यायचं नाही म्हणून तुम्ही कुठे बोललात की हा रिपोर्ट तुम्हाला भेटणार नाही म्हणून.

**श्री.एस.एस.महाजन (एफआरडी) :**अख्खा सभागृह तुम्हाला एवढे सगळे तुम्हाला आत्ता समोरून approch होत आहेत अजून काही वेगळे पाहिजे तुम्हाला. समोर प्रत्यक्ष लोक आहात.

**श्री. मुकुंद वैराळकर (एऍण्डएसईडी) :** माननीय उपाध्यक्ष साहेब आम्ही अप्रोच व्हायचं तुम्ही म्हणता, तुम्ही अप्रोच व्हायचं, अहो या अख्ख्या सभागृहांना हात वरती करून ठराव संमत केला की तुम्ही हा जो ठराव आहे, हा कंट्रोलर साहेबांपर्यंत द्या, त्याच्या पेक्षा दुसरा आणखीन काय झालं पाहिजे अजून वेगळं काय पाहिजे ठराव हात वरती करून सभागृहानी मंजूर केला, तुम्ही सांगा ना ठीक आहे, मी पण प्रयत्न करतो सभागृहाच्या भावना मी कंट्रोलर साहेबांपर्यंत पोहोचवतो.

**श्री. अविनाश तिरपुडे साहेब (पदसिद्ध उपाध्यक्ष):** ठराव पास कराल मी त्यांच्यापर्यंत convey करेल,

**श्री. मुकुंद वैराळकर (एऍण्डएसईडी) :** मग हेच सांगा ना. तुम्हाला ठराव आम्ही संमत करून दिला आहे ना, तुम्ही द्या अहो केला आहे हात वरती करून ठराव संमत करून दिलाय, मग काय पाहिजे तुम्ही कंट्रोलर पर्यंत ठराव पोहोचवणार आहात की नाही हे सांगा तुम्ही.

**ठराव पास करण्यात आला की, दि बीएआरसी एम्प्लॉईज को-ऑप. क्रेडिट सोसायटी लिमिटेडच्या प्रीमियम नोटबुक खरेदीच्या प्रकरणाचा 'तपास अहवाल' आस्थापनाच्या सक्षम अधिकऱ्यांकडून मिळवून तो सोसायटीच्या रेकॉर्डवर ठेवण्याचा निर्णय एकमताने घेण्यात आला.**

**सूचक : श्री. प्रकाश पाटील (एसआयआरडी)**
**अनुमोदक : श्री. मुकुंद वैराळकर (एऍण्डएसईडी)**

**ठराव एकमताने मंजूर करण्यात आला.**

**श्री. प्रवीण सावंत (सीडीएम):** एकदा सभागृहने ठराव दिल्या नंतर, तो तिथे पोचवायची जबाबदारी तुमची आहे. त्याची ग्वाही द्या.

**श्री. अविनाश तिरपुडे साहेब (पदसिद्ध उपाध्यक्ष):** तुम्ही जो ठराव मांडलेला आहे, वरच्या अधिकारी पर्यंत, कंट्रोलर साहेबांपर्यंत पोहोचवण्याची माझी जबाबदारी आहे.

DRAFT 64th AGM

**श्री. प्रवीण सावंत (सीडीएम):** अध्यक्ष महोदय, अजेंडा पूर्ण कसा होईल, यासाठी आपण स्वतः प्रयत्न करा, आता न्यूट्रल राहून चालणार नाही, स्वतः भूमिकेत या, हा अजेंडा कसा पूर्ण होईल याचा विचार करा,

**श्री. गिरीष शेणई साहेब (पदसिद्ध अध्यक्ष) :** अजेंडा कसा पूर्ण करायचा हे सभागृहाच्या हातात आहे, मी किती प्रयत्न केला काही केलं तरी शेवटी सभागृह त्याला फायनल मूर्त स्वरूप देणार आहे, की हा अजेंडा आपण कसा पूर्ण करू शकतो किंवा नाही त्यामुळे माझ्यापेक्षा तुमच्या हातात आहे त्यामुळे माझे तुम्हाला विनंती आहे की हा अजेंडा त्या सिक्वेन्सने घेऊन पूर्ण करा, एका मुद्द्यावर जर दोन दोन तीन तास चालणार असेल तर कधीच संपणार नाहीये, त्यामुळे माझ्यावर ही रिस्पॉन्सिबिलिटी टाकण्याऐवजी ही रिस्पॉन्सिलीटी तुम्ही सर्वांनी शेअर केली तर मला वाटते की ती बरं होईल.

**श्री. दिनेश माने (पीडी) :** अध्यक्ष साहेब एक मिनिटं, आता वाजले सव्वा पाच एका विषयावर पहिल्या विषयावरून बाराव्या विषयावर आल्यात एक तर अजेंडा प्रमाणे कुठलेही विषय घेतले नाहीत. खऱ्या अर्थाने मला वाटतं एक मिनिट, पाटील साहेब मी बोलतोय ना मला वाटतं बघा माझा इथं कोणीही भावकीतलं नाही किंवा माझे इथे कोणीही भाऊबंद नाहीत बाजू घ्यायला, पहिली गोष्ट नेहमी सांगतो एक मिनिट काही सभासदांचा ग्रह असा झाला, असेल की माने कोणाची बाजू घेतोय काही गरज नाही, कुणाची बाजू घ्यायची, मी नियमाला धरून योग्य ते बोलणार आहे, एक तर पहिली गोष्ट अजेंडा नियमानुसार व्हायला पाहिजे होता एक दोन तीन बारापर्यंत, तुम्ही

डायरेक्ट बारापर्यंत आलाय ठीक आहे, चर्चा झाली पण चर्चेअंती काहीही निष्पन्न होत नाही. वाजले सव्वा पाच, या ठिकाणी सिक्युरिटी स्टाफ आहे. सहा वाजता सगळ्यांना बाहेर काढतील, एकालाही इथे ठेवणार नाहीत नियम आहेत, त्याच्यामुळे जर का माझी विनंती आहे ही सभा तहकूब झाली तर सहकार कायद्यानुसार पुन्हा एक आठवड्याच्या आत पुन्हा दुसरी सभा आपल्याला पुन्हा लावावी लागेल असे मी आपणास विनंती करतो धन्यवाद.

**श्री. अनिल (डीसिएसइएम) :** मी सभागृहावर सांगण्याचा प्रयत्न करत आहे की मी प्रत्येक सभासदाला बोलण्याचा अधिकार आहे, आणि कुठलेही सभासद माइक वरून बोलत असेल तर तो कमिटीच्या पक्षात असेल किंवा अपक्ष असेल त्याच्यावर धावून जाऊ नये, त्याचा माईक पकडू नये, आम्ही काही इथं कूपन घ्यायचं, चहा प्यायचा, लोन घ्यायचं आणि इंटरेस्ट भरायचं अध्यक्ष साहेब गेल्या वर्षी मी बोललो होतो माझं पर्सनल मत मांडलं होतं, माझ्या अंगावर दहा लोक आले होते हे कितपत योग्य आहे, मला सांगा प्रत्येकाला आपलं मत मांडू द्या, प्रत्येकाला कोणी थांबवू नका, आपण इथून नुसतं काय झोपा काढायचे का ? प्रत्येकाला मत मांडू द्या,

**श्री. प्रवीण सावंत (सीडीएम):** मी आता निघतोय मला एवढेच सांगायचे की या सभागृहात जे अनुपस्थित लोक आहेत, त्यांची अनुपस्थिती आपण क्षमापित करावी, आणि सर्व कमिटी मेंबर जेवढे आपले सभासद आहेत त्यांना काही ना काही गिफ्ट द्यायचं असेल, हे माझं दरवर्षी असतं, याही वर्षी माझे हेच मत आहे, काही ना काही रूपाने, त्यांच्या अकाउंट मध्ये पैसे जाऊ द्या, असा असा ठराव मी मांडतो,आणि आपण सर्वांनी ते कराल अशी अपेक्षा ठेवतो धन्यवाद.

DRAFT 64th AGM

**ठराव पास करण्यात आला की संचालक मंडळाने सुचविलेल्या सभासद कल्याण निधीच्या विनियोगाबाबतची नियमावली सर्वानुमते स्वीकारण्यात आली व माननीय सहकार आयुक्त सहकारी संस्था पुणे यांचे माहितीकरिता पाठविण्यात यावी असा ठराव सर्वानुमते पास करण्यात आला.**

**सूचक : श्री. प्रवीण सावंत**
**अनुमोदक : श्री. सचिन सोळसे**

**ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.**

**श्री. विवेक भागडीया :** विषय क्रमांक 12 - जो आता दोन क्रमांकावर आला आहे त्याला सूचक - अनुमोदक - द्यावे मग आपण तिसऱ्या मुद्द्यावर जाऊ.

**श्री. मुकुंद वैराळकर (एऍण्डएसईडी) :** अहो मिळणारच नाही, सोसायटीचे अध्यक्ष महोदय, माझी आता हे जे पदसिद्ध अध्यक्ष, उपाध्यक्ष ना बोलून झाले, हे त्यांचे काम नाही हे त्यांनी आता क्लिअर केले, कारण ते काहीच सांगायला तयार नाहीत, आम्ही न्यूट्रल आहोत आम्ही याच्यात काही करणार नाही, संचालक मंडळ तुमचं आहे, सोसायटीचे, अध्यक्ष साहेब संचालक मंडळ तुमचा आहे, आता तुम्हालाच हे ठरवायचं आहे की, आपल्याला मीटिंग पुढे घ्यायची आहे का स्थगित करायची आहे, कारण विषय फक्त एवढाच आहे की या प्रकरणांमध्ये डायरी प्रकरणांमध्ये जे काही झाले आहे. यामध्ये अनियमितता झाली आहे नाही झाली आहे कोण दोषी आहे कोण नाही, कारण आत्ताच परिस्थिती उपाध्यक्षांनी सांगितले की आपले सेक्रेटरी सुद्धा सांगतात की अहवाल, तुम्हाला सुद्धा अजून मिळालेले नाही, त्यामुळे निर्णय तुम्ही सुद्धा अजून घेऊ शकत नाही हे आम्हाला चांगल्या पद्धतीने माहित आहे. जेव्हा अहवाल तुमच्याजवळ येईल, तेव्हा पदसिद्ध अध्यक्ष आणि उपाध्यक्ष हे जे सांगतील ते सांगतीलच, पण एक सोसायटीचे अध्यक्ष म्हणून तुमच्या पूर्ण संचालक मंडळाच्या वतीने तुम्ही सांगा की, यामध्ये जे काही लीगल मॅटर असेल, त्यामध्ये लीगल ॲडव्हाइस आम्ही घेऊ यामध्ये जे काही दोषी ठरतील ते लीगल ॲडव्हायझरच्या सल्यानुसार नुसार त्यावरती कारवाई करू, आणि हा विषय संपवू सांगा, तुमचं संचालक मंडळ जर तयार असेल कोळी साहेब बोला तुमच्या संचालक मंडळाशी बोला, सविस्तर चर्चा करा.

**श्री. धनंजय धेंडे (डीसिएसइएम) :** कोळी साहेब तुम्ही या इथं माईक वरती आणि सभागृहाला संबोधीत करा.

DRAFT 64th AGM

**श्री. मुकुंद वैराळकर (एऍण्डएसईडी) :** त्यापूर्वी हे बघा कसा आहे इथे कोंडीत पकडायचा काही प्रकार नाहीये असं काही नाही की सोसायटी आमची आहे.
**श्री. मुकुंद वैराळकर (एऍण्डएसईडी) :** - हेमंत कोळी साहेब, मी तुम्हाला अजूनही पाच मिनिट देतो, तुमचा संचालक मंडळ एकत्र करा, त्यांच्याशी बोला. त्याच्यानंतर तुम्ही निर्णय द्या,

**श्री. धनंजय धेंडे (डीसिएसइएम) :** ह्या इथे बोला आता, तुमचं म्हणणं आहे

**श्री. हेमंत कोळी :**मी मान्य करतो आम्ही लीगल ॲडव्हायझर करायला तयार आहे, बस ठीक आहे.

**श्री. मुकुंद वैराळकर (एऍण्डएसईडी) :** झालं धन्यवाद. कारण या विषया करता सुचक,

**श्री.राजेश कळके (सीडीएम):** आहो टाईम सांगा किती वेळ लागेल ते नाही तर पुन्हा एक वर्ष लागेल .

**श्री. हेमंत कोळी :** मी रिटायर व्हायच्या आत लागेल.

**श्री.राजेश कळके (सीडीएम):** काय कोळी साहेब?

**श्री. प्रकाश पाटील (एसआयआरडी) :** अगदी रास्त आहे कारण पुढच्या एजीएम पर्यंत पुन्हा तोच विषय राहील याची काही ना काही तरी टाईम फ्रेम सांगा म्हणून तर मी बोलतो. तुम्ही निघून जाणार.

**श्री.राजेश कळके (सीडीएम):** चेअरमन साहेब चार महिन्यात रिटायर होत आहेत, मग त्यांची जबाबदारी संपली , कोण देणार मग बाकीचे संचालक मंडळ काय बोलणार, चेअरमनने आश्वासन दिले होते.

**श्री. प्रकाश पाटील (एसआयआरडी) :** आता गेले यांना विचारा.

**श्री. विवेक भागडीया :** कळके साहेब, एक मिनिट तुमच्यासारखे वरिष्ठ सभासद हे जे पतसंस्थेचे सभासद संचालक राहून गेलेले आहेत, तिथे तुम्ही पद भूषित केलेले आहेत तुमच्यासारख्या माणसाने हे शब्द वापरायला नको.

**श्री.राजेश कळके (सीडीएम):** अहो कार्यकाळ मागतो त्यांच्याकडे, मी सांगतो अहो, तुम्ही शब्द बदलू नका,

**श्री. विवेक भागडीया :** मी सांगतो बी हाफ ऑफ कमिटी.

**श्री. मुकुंद वैराळकर (एऍण्डएसईडी) :** अध्यक्षांना बोलू द्या

**श्री. हेमंत कोळी :** आम्ही लवकरात लवकर याचा रिपोर्ट तुम्हाला देऊ, अशी मी तुम्हाला ग्वाही देतो मी रिटायरमेंट व्हायच्या आधी देतो बस अजून काय सांगू,

**श्री.राजेश कळके (सीडीएम):** टाईम सांगा आम्हाला किती महिने एक, महिना दोन महिना, साहेब टाईम तुम्ही सांगा

**श्री. विवेक भागडीया :** साहेब चार महिन्यात रिटायर होत आहेत त्याआधी स्टेप घेतील.

**श्री.राजेश कळके (सीडीएम):** त्याच्या अगोदर होणार का? सभागृहाला मंजूर आहे का?

**श्री. विवेक भागडीया :** त्यांनी उत्तर दिले ना, तुम्ही मध्ये रोखताय,

DRAFT 64th AGM

**श्री.मनोज वाडेकर (आरईडी):** नाही रोखत, चार महिन्यात होईल का, अरे पण त्यांना बोलू द्या ना, सांगितलं ना, त्यांनी ते काय बोलले

**श्री. हेमंत कोळी :** मी रिटायर व्हायच्या आत तुम्हाला रिपोर्ट भेटेल,

**श्री.राजेश कळके (सीडीएम):** नाही एक महिन्याच्या आत द्या,

**श्री.मनोज वाडेकर (आरईडी):** एक महिना, दोन महिना काहीतरी बोला,

**श्री. हेमंत कोळी :** आणि नाही झाले तर तुम्ही मला बोलणार एक महिन्याच्या रिपोर्ट दिला नाही म्हणून.

**श्री. धनंजय धेंडे (डीसिएसइएम) :** एवढ्यावर पकडू नका.

DRAFT 64th AGM

**श्री. मुकुंद वैराळकर (एऍण्डएसईडी) :** तुमच्याजवळच अजून मिळाला नाही ऐका ना, त्या पद्धतीने तुम्ही सांगा ना, काहीतरी वेळ अशी की एका महिन्यात मला मिळेल त्यानंतर दोन महिन्यात मी तुम्हाला तीन-चार महिन्यात देईन सहा महिन्यात देईन,

**श्री. धनंजय धेंडे (डीसिएसइएम) :** तीन महिन्यात चालेल.

**श्री. हेमंत कोळी :** चार महिन्यांमध्ये.

**श्री. राम परब (युईडी) :** चार महिने ठेवू नका, एक मिनिट चेअरमन साहेब, चार महिने कसे साहेब तुमची रिटायरमेंट ची घाई असणार, रिटायरमेंटच्या घाईच्या वेळेला ठेवू नका, तीनच महिने करा, चार ठेवू नका, जर तर नको तीन महिने.

**श्री. यदुवीर सिंग (एचएलयुडी) :** महोदय अध्यक्ष महोदय रिपोर्ट रेडी आहे. तीन महिने किस लिये, अध्यक्ष महोदय उसको ओपन करने के लिए तीन महिने की जरुरत पड रही है, अध्यक्ष महोदय आपके पास रिपोर्ट रेडी है रिपोर्ट लेने के लिए आपको तीन महिने लगे क्या आगे बढते है,

**श्री. यदुवीर सिंग (एचएलयुडी) :** बगडीयाजी नियम ऐसा कहता है,सेक्रेटरी संचालन करता ही AGM का आप बार बार बोल रहे है, आप तो आपस मे डिसाईड करलो बार-बार बीच मे आ जाते हो, अध्यक्ष महोदय आपके पास रिपोर्ट आपको उनसे लेना है ,हमारे सामने रखना है कितना है काम तो उसके लिए तीन महिना क्यो,

**श्री. विवेक भागडीया :** साहबने आपको बोला है, कंट्रोलर तक रिपोर्ट पोहोचणे का काम साहब का है, साहब को साहब का काम करने दो आप बीच मे क्यू टोक रहे हो.

**श्री. यदुवीर सिंग (एचएलयुडी) :** आप दिशाभूल कर रहे है. गोल गोल कर रहे है, अभी डिसाईड हुआ है कि वो एप्रोच होंगे, रिपोर्ट करेंगे, सामने रखेंगे ओके.अध्यक्ष जी हमको आपके उपर विश्वास है ,आप बोलो की इनके साथ दो महिने मे करवा देंगे.

**श्री. प्रकाश पाटील (एसआयआरडी) :** अध्यक्ष महोदय, सभागृहाचे खूप खूप धन्यवाद, आज पासून दोन महिन्याच्या आत चौकशी समितीचा अहवाल कुठे देणार,सभागृहात, आपल्या वेबसाईटवर संस्थेच्या वेबसाईटवर.

DRAFT 64th AGM

**श्री. संतोष ढमढेरे :**पाटील साहेब, जरा एक मिनिट, वेबसाईटवर नका देऊ, थांबा जरा चुकीच्या गोष्टींचा पायंडा पाडू नका पाटील साहेब, सभागृहाने याचा विचार करावा, सभागृहाने जरा लक्षात घ्यावे आपण काही गडबडीमध्ये कोणतीही गोष्ट बोलून चुकीच्या पद्धतीने करणार नाही,

**श्री. प्रकाश पाटील (एसआयआरडी) :** आम्हाला तो अहवाल कसा मिळणार, अध्यक्ष आम्हाला कमिटमेंट करतायेत, मला दोन महिन्यानंतर अहवाल कसा मिळणार, कुठल्या पद्धतीने मिळणार,

**श्री. संतोष ढमढेरे :** अध्यक्ष च्या परवानगीने मी बोलतो,

**श्री. प्रकाश पाटील (एसआयआरडी) :** नाही हो त्यांना बोलू द्या, प्लीज जरा त्यांना बोलू द्या, अध्यक्षांचा कमिटमेंट आहे, संस्थेचे अध्यक्ष आहेत त्यांना पावर आहे, अहो विषय झाला.

**श्री. संतोष ढमढेरे :** ज्या लोकांनी सातत्याने पत्रव्यवहार केला आहे, त्या लोकांना बोलवून तो अहवाल आम्ही त्यांना देऊ,

**श्री. प्रकाश पाटील (एसआयआरडी) :** दोन महिन्याच्या आत.

**श्री. हेमंत कोळी :** दोन महिन्याच्या आत.

**श्री. प्रकाश पाटील (एसआयआरडी) :** तुम्ही जसा असेल तसा पूर्ण अहवाल देणार हे मिनिट्स मध्ये नोंद करा.

**एक सभासद :**अध्यक्षांना नम्र विनंती आहे की अध्यक्षांनी जो काही निर्णय झाला आहे तो सगळयांना सांगावा कृपया.

**श्री. प्रकाश पाटील (एसआयआरडी) :** रिपीट करा, मी जे बोललो ते सभागृहाला रिपीट करा.

**श्री. हेमंत कोळी :** ठीक आहे, अहवाल आमच्याकडे आल्यानंतर दोन महिन्याच्या आत सभागृहाला आम्ही सबमिट करू,

**श्री. संतोष ढमढेरे :** संस्थेमध्ये बोलावून देण्यात येईल, आपल्याला सभा पुढे न्यायची आहे तर आपल्याला बोलावं लागेल आणि त्या पद्धतीने योग्य पद्धतीने कामकाज चालवावे लागेल, योग्य पद्धतीने त्याचे शब्दरचना करून आपल्याला पुढे न्यावे लागेल,

DRAFT 64th AGM

**श्री. प्रकाश पाटील (एसआयआरडी) :** आता वेगळं बोलू नका अहवाल आल्यानंतर दोन महिन्यांनी - दोन महिन्याच्या आत पत्रव्यवहार केलेला आहे, त्यांना तो सुपूर्त करण्यात यावा,आल्यानंतर गेल्यानंतर नाही दोन महिन्याच्या आत.

**श्री. संतोष ढमढेरे :** ऐका ना, तुम्ही जे शब्द मांडले त्याच्यावर मी एक क्लेरिफिकेशन देतो, तेवढं ऐकाल का विनंती आहे, तुम्ही आता म्हणताय रिपोर्ट आल्यावर आता प्रॉब्लेम काय पदसिद्ध अध्यक्ष आणि उपाध्यक्षांनी क्लिअर कट सभागृहाला त्यांनी सांगितलं त्यांनी रिपोर्ट मागितला त्यांना कंट्रोलरने सांगितले की त्यांना मिळाला नाही. आता मॅनेजमेंट तर्फे सभागृहामध्ये जो काही ठराव पास झाला आहे काय ठराव पास झाला की जो काय अहवाल आहे तो आपण परत मागायचा तर आम्ही पदसिद्ध अध्यक्ष अध्यक्ष आणि उपाध्यक्षांनी न्यूट्रल राहतात, तर मॅनेजमेंटनी कमिटीच्या वतीने हा अहवाल ठराव जो दिला आहे तो आम्ही घेऊन पुन्हा कंट्रोलरकडे जातो आणि त्यांच्याकडे मागतो की आम्हाला हा अहवाल दोन महिन्याच्या आत ठराव असा असा पास झालेला आहे तो त्यांनी आम्हाला द्यावा, तुम्ही बघा त्यांनी जर दिला नाही तर आपण त्यांना जबरदस्ती करू शकतो का?

**श्री. प्रकाश पाटील (एसआयआरडी) :** नाही करू शकत,

**श्री.संतोष ढमढेरे :** जो काही पत्र व्यवहार, ऐकून घ्या जो काही पत्र व्यवहार होईल समजा आम्ही त्यांना अहवाल बघण्यासाठी जो काही पत्र व्यवहार करू त्याच्या संदर्भातली जी काही माहिती आहे. ज्याच्या लोकांनी सातत्याने पत्रव्यवहार केला आहे,  त्या लोकांनी या विषयावर मागणी केली होती त्या सर्व लोकांना बोलावून त्याची दोन महिन्याच्या आत बोलावून वेळोवेळी बोलावून सातत्याने त्याची माहिती दिली जाईल तुम्हाला बोलावलं जाईल.

**श्री.राजेश कळके (सीडीएम):** चला तुमचं मान्य पण सभागृहातील पाच माणसे तुमच्या बरोबर घ्या आणि कंट्रोल कडे जायला तो अहवाल मिळवायला सभागृहातील काही तज्ञ माणसं घ्या तुमच्याबरोबर म्हणजे लवकरात लवकर अहवाल येईल,

**श्री.संतोष ढमढेरे :** हो चालेल

**श्री.राजेश कळके (सीडीएम):** आणि त्यांची नेमणूक आत्ताच करा म्हणजे वेळ जाणार नाही

**श्री. संतोष कांबळे :**  आणि साहेब हा अहवाल मिळाला नाही तर काय.

DRAFT 64th AGM

**श्री. प्रभात सिंग (सीडीएम):** अध्यक्ष मेरी इसमे एक आपसे एक गुजारिश है, आप किसने एक पॉईंट और जोडे, अगर अहवाल फ्रॉड निकलता है, तो तब तक उसके मेंबर्स को नही छोडा जाता है, तब तक इनमे से, जब तक ये मॅटर क्लियर नही होगा, किसी भी सोसायटी के आदमी का हिसाब किताब सोसायटी मे नही किया जायेगा, क्योंकि अगर आज आप डिफॉल्टर है, दो लाख रुपये - चार लाख रुपये, आपने रहे है तो तबतक आपके ग्यारेंटर को पकडा जाता है, उसने नोट किया जाये सोसायटी का तक तक किसी के भी अकाउंट, सेविंग अकाउंट, हो या कुछ भी हो एक पैसा भी ना निकाला जाये, तब तक उसके अकाउंट को सील किया जाये, कोई रिटायर होके भी जाता, है तो उसका पूरा हिसाब किताब तबतक पुरा ना किया जाये, जब तक तक ये मॅटर क्लोज न हो, क्योंकि कल अगर वो बंदा चला जायेगा, आराम से घर मे सोयेगा, हम क्या इधर भागते रहेंगे, प्लीज भाई आप बताओ आप मेरे से सहमत हो, सर मैं 35 साल से नोकरी कर रहा हूं, मै पहिली बार ऐसी मीटिंग हुई, है जिसमे कोई भी खडा हो रहा है, और जाके बडबड बोलना चालू कर रहा है, अध्यक्ष सेक्रेटरी का मान होता है, वो अध्यक्ष सेक्रेटरी मीटिंग लेते है ,अध्यक्ष जी या सचिव वहा से बोलते है, यहा पे कोई भी बगाडिया खडे हो रहा, है कभी हमारे आणि जो एक्सपर्ट है उनको बोलवाते है, ना जो एक्सपर्ट को हम खजिनदार  बनाते है, पहिली बार ऐसा हो रहा है, सभी को जल्दी से खतम करो घर जाना है,

**श्री. विलास घोरपडे (एफडी) :** हा त्याला मी पुढे करतो बायलॉज वाचा, प्रत्येकाने सचिवाची कामे पान नंबर 31 सगळ्यात शेवटच आहे, दरवर्षी वार्षिक साधारण सभा तीस सप्टेंबर पूर्वी मुदतीत घेणे हे सचिवाचे काम आहे,

हे कोणी येता का बाजार चाललेला नाही? हा येतो तो येतो हे काय आहे? बायलॉज काय सांगतो तुम्ही एक निवडा, जर का सचिव आजारी आहे, तर एक माणूस फक्त इथे निवडा आणि त्यालाच बोलू द्या.  तो दहा वेळा इकडे येतो, तो येतो, हा येतो काय चाललंय हे बायलॉज आहे ना इथे आहे, म्हणजे काय तुम्हाला जे येत तुम्ही बोलणार, यांना येत तर ते बोलणार,

**श्री.संतोष ढमढेरे :** आता तुम्ही ज्या काही गोष्टी बोलला, प्रभात सिंग जे काही बोलला, त्यांनाच धरून मी प्रभात सिंग आणि आत्ता विलास घोरपडे यांनी जे काही भाषण केलं त्याला धरूनच मी बोलतोय.

**श्री.राजेश कळके (सीडीएम):** ऍक्च्युली आपल्या कमिटीमध्ये जी काही माणसं येतील, आपल्या सभासदांपैकी पाच जणांची नावे आत्ताच डिक्लेअर करा म्हणजे वेळ होणार नाही,

**श्री.संतोष ढमढेरे :** ऐका ना सभासदांची नावे जे लोक डिमांड करतायेत त्यांनी नावे द्या कमिटी कडून नावे दिली

**श्री. प्रकाश पाटील (एसआयआरडी) :** सर्वप्रथम मी राजेश कळके यांचे नाव देतो बाकी सभागृहाला मंजूर आहे, मंजूर दुसरं सतीश महाजन, डी एस राजापुरे,

DRAFT 64th AGM

**श्री. विलास घोरपडे (एफडी) :** मनोज वाडेकर,

**श्री. हेमंत कोळी :** नाही ज्यांना इच्छा त्यांना येऊ द्या ना तुम्ही कशाला ठरवताय,

**श्री. प्रकाश पाटील (एसआयआरडी) :** नाही सभागृह ठरवून देते सभागृह तुम्हाला ठरवून देतंय ही माणसं त्यांना तुम्ही घ्या मनोज वाडेकर, सतीश महाजन, राजेश कळके, रवी हंकारे ही पाच माणसं.

**श्री.राजेश कळके (सीडीएम):** यांच्यावर ऑब्जेक्शन आले आहे सभागृहाने ठरवू दे ना. कोण माणसं पाहिजे धेंडे,धेंडे तुमचा ऑब्जेक्शन आलं ना नावावर, सभागृहाने ठरवू दे ना. त्यांचा ऑब्जेक्शन आलं, तुमचा ऑब्जेक्शन आहे ना, म्हणून काय आपण स्वतःची नाव ठरवायचे का?  इकडे या दळवी, इकडे या.

**श्री. दिनेश माने (पीडी) :** पाच जण कमिटीमध्ये जाणार आहे, त्यानीं स्वइच्छेने आपली नवे ध्या, कोणी कोणावर जबरदस्ती लागू नका, ज्याला इच्छा आहे त्या कमिटीत काम करण्याची त्यांनी इथं माइक वर येऊन आपलं नाव पुकारायचा आहे, नाव द्यायचं आहे,

**श्री. मुकुंद वैराळकर (एऍण्डएसईडी) :** दहा नाव घ्या, 10 नाव घ्या, जी येणार आहेत.

**श्री.संतोष ढमढेरे :** प्लीज मी सभागृहाला विनंती करतो, आपण आपसामध्ये चर्चा करून दहा नावे मीटिंग मध्ये चर्चा करून द्यावीत. ती दहा नावे आम्ही वर्ग करून घेतो,

**श्री. किशोर पवार (ट्रान्सपोर्ट) :** चार-पाच माणसांच्या कमिटीसाठी नावे सुचवण्याची विनंती करता येईल, परंतु तुम्ही सभागृहाला विनंती करतो प्रत्येक जण प्रत्येकाचं नाव घेतोय, आता जी पुढे दहा-बारा माणसे बोलत होती त्यांच्यातील सर्वांना सर्व काही कळतंय, आम्हाला खरंच कळत नाही, तर कृपया आमचंही नाव घेण्यात यावं म्हणजे तो अहवाल काय आहे ते आम्हालाही कळेल. प्रत्येक गोष्टीसाठी एक स्पेसिफिक माणसं बोलतात, सभागृहात आलेल्या सर्वांनाच आपलं मत मांडण्याचा अधिकार आहे, आतापर्यंत दोन ते अडीच तासाचा कालावधी गेला, तो फक्त डायरी- डायरी याच गोष्टीवरती केला, इथून पुढेही विषय आहेत दुसरे एक किरकोळ गोष्ट होती अमुक अहवाल सादर करू, वगैरे त्या पद्धतीचा चांगला वाईट जो असेल त्या पद्धतीचा, त्यात कुणी काय केलं, आम्हाला जास्त सहकार खात्याचा कळत नाही, परंतु एक मिनिट मला, बोलू द्या पदसिद्ध अध्यक्ष सभागृहात मी बोलत असताना मी काही वेळोवेळी आलो नाही, सहकार खात्याचं जरी कळत नसलं तरी परंतु जो काही अहवाल आलाय, त्याच्यात आर्थिक काही त्रुटी आहेत किंवा फक्त त्यांनी जी टेंडरिंग प्रोसेस केली आहे ती चुकलेली आहे, या दोनच गोष्टी सोप्या होतात त्या आपणही कोणी बोलू शकला असता, आणि जो अहवाल अगदी सोप्या पद्धतीचा असेल उगाचच आमची पाचशे माणसं आठशे माणसं बाहेर उभे राहतात चार माणसे पुढे भरून बोंबा मारतात माझ्या भाषेत, एक मिनिट मी माझा शब्द मागे घेतो.

DRAFT 64th AGM

**श्री.राजेश कळके (सीडीएम):** आमचा अपमान आहे, आम्ही अभ्यास करून बोलतो, आज यासाठी चार महिने गेले.

**श्री. किशोर पवार (ट्रान्सपोर्ट) :** मी माझा शब्द मागे घेतो. मला असं बोलायचं नव्हतं, मी माझा शब्द मागे घेतो,

**श्री. प्रकाश पाटील (एसआयआरडी) :** तुम्ही पत्र व्यवहार केला का ?

**श्री. किशोर पवार (ट्रान्सपोर्ट) :** हे बघा माणसं माझ्या अंगावरती येणं हे योग्य नाही, मी माझा शब्द मागे घेतो., मी अगोदर बोललो आहे मला एवढं कळत नाही.

**श्री. संतोष ढमढेरे :** सभागृहाला विनंती आहे थोडं शांत रहा, त्यांनी त्यांचा शब्द मागे घेतला आहे, त्यावर ती जास्त चर्चा करू नका, आपल्याला विषयाला घेऊन पुढे जायचं आहे.

**श्री.एस.एस.महाजन (एफआरडी):** मी आपल्या सर्वांना एक विनंती करतो जर आपल्याला सहकार क्षेत्र आणि आर्थिक व्यवहार यातलं काही कळत नाही तर वेळ वाया घालवू नका

**श्री. संतोष ढमढेरे :** सभागृहाला विनंती आहे किशोर पवार यांनी त्यांचा शब्द मागे घेतला आहे, हा शब्द प्रोसेसिंग मधून वगळण्यात यावा.

**श्री. किशोर पवार (ट्रान्सपोर्ट) :**अध्यक्ष महाराज मी माझा शब्द मागे घेतो मी खरंतर जास्त शिकलो नाही, त्यांनी मात्र खूप अभ्यास केला आहे मला ज्या गोष्टी बोलायच्च्या होत्या, मी माझ्या मनापासून बोललो, मी माझ्या भावना व्यक्त केल्या,

**श्री. संजीव वर्मा (आरआरएमडी) :** संजीव वर्मा आरआरएमडी से.

DRAFT 64th AGM

**श्री. संतोष ढमढेरे :**आपण पुढच्या विषयाकडे वळूया का पाटील साहेब, सभागृहाला विनंती करतो. प्लीज महाजन बसून घ्या.

**श्री. प्रकाश पाटील (एसआयआरडी):** काय होतं विषयांतर होतो, गेली वर्षभर पत्रव्यवहार ही मंडळी करता येत, कारण ज्यांनी पत्र व्यवहार केला असतो, ना त्यांना माहीत असतं? काय लागतं बोलायला काय लागतं माइक वर सगळे बोलू शकतात? सगळ्यांना अधिकार आहे पण या सगळ्या मंडळींनी जो पत्रव्यवहार केलाय ते त्यांची तळमळ आहे आज एवढा वेळ का लागतो? आणि याचा फायदा कोणाचा आहे आपल्या सगळ्या सभासदांचा आहे. याच्यामध्ये काही वाटून घेऊ नका तोही आपला बंधू आहे, हरकत नाही.

**श्री. संजीव वर्मा (आरआरएमडी) :** संजीव वर्मा हे इन्वेस्टीगेशन कमिटी का मेंबर बनाना चाहता, हु मेरा नाम नोट किया जाये,

**श्री. संतोष ढमढेरे :** थोडा माइक से पीछे,

**श्री.मनोज वाडेकर (आरईडी):** जी काही कमिटी बनणार आहे, त्यात माझे नाव घ्या.

**श्री. शेबाज अन्सारी (एअँडएमपीडी)**: सर चार घंटे से हम भी वेट कर रहे है, एक भी मुद्दा अभी क्लियर नही होगा, कभी नीचे वाले उपर रहते थे कभी ऊपर वाले नीचे रहते थे, सर पच्चीस साल के बाद हमको पहिली बार डायरी मिली है. हम लोगो ने खुशी खुशी अपने घर मे दिखाया, इसके पहिले SO/E के नीचे किसी को कुछ मिलता नही था, पहिली बार लोगो ने किसी की तरफदारी नही कर रहा हु, ये जो मुद्दा है हम लोगो ने पहिली बार निकाला हें.

**श्री. संतोष ढमढेरे :** बोलू दया त्याना.

**श्री. शेबाज अन्सारी (एअँडएमपीडी)** : यही बात में सुना चाहता था ये साहेब, किसी ने पैसे ज्यादा ले लिया, खा लीया, इसके अलावा बहुत सारे मुद्दे है, ये थोडे चीज के वास्ते आप कॅल्क्युलेशन करो दो लाख, पाच लाख से ज्यादा रेक्टिफाय नही कर रहा हु, साडेचार घंटे से एकही मुद्दे पर निकल गया, शेणई साहेब तो हम कब बोलेंगे, हमारे भी बहुत सारे मुद्दे है, तो ठीक है पैसा कट रहा है, तो इसके अंदर सब मे बडी बात है, इसकी पहचान है उसका पैसा कटता नही है, इसके अंदर सब लोग फसेंगे है. मेरा मुद्दा ये नही है

**श्री. गिरीष शेणई साहेब (पदसिद्ध अध्यक्ष) :** प्रकाश पाटील.

DRAFT 64th AGM

**श्री. शेबाज अन्सारी (एअँडएमपीडी)** : डायरी से मुझे कोई लेना देना नही है.

**श्री. संतोष ढमढेरे :** सभागृहाला विनंती आहे त्यांना बोलून द्या,

**श्री. मुकुंद वैराळकर (एऍण्डएसईडी) :** प्रकाश पाटील, त्यांना बोलून द्या,

**श्री. शेबाज अन्सारी (एअँडएमपीडी)** : जिसका पैसा मैने खाया के बात करो, अध्यक्ष आप देखिये मैने डायरी से मुझे कोई लेने नही है, साडेआठ हजार लोगो मे से काफी लोगो ने डायरी लिया है, सबको डायरी अच्छा लगा है, मेरा मुद्दा ये नही है की आपने पचास लाख की बिल बनाई है, या 30 लाख की बनाये है, इससे हमारा कोई लेन देण नही है, पर आज ये मुद्दा है. की पूरा बारा के बारा पॉईंट स्टॉप रहे गया, अभी हम लोग नेक्स्ट टाईम क्यू है, नेक्स्ट टाईम वापस हम लोग क्यू आने का? ये मॅटर को अभी क्लियर करो, हम लोगो को किसी से कोई लेना देना नही, डायरी के लिए हम आपके आभारी है, की 25 साल मे डायरी मिली है, दो ना किसी मै हिम्मत है तो, आखे दो. दुसरा मुद्दा आने दो मुद्दा, किसी ने आने दिया नही, मेरा मुद्दा वो नही है, मै सिर्फ ये बात बोल रहा हु, सब लोग पीछे से आ गये, मेरे को कोई कुछ मत बोलो, मै सामने बात कर रहा हू, पीछे से आवाज क्यू नही, पैसा खाया? क्यू छोड दु मे ? मैने किसका पैसा खाया, किसका पैसा मैने खाया ओ सामने के खडा होकर बोले? मै एकही बात

बोलता हु 25 साल मे पीचे से कुछ मत बोलो, मैने किसी के बाप का पैसा नही खाया, तो फिर पीछे से क्यू बोल रहे है,

**श्री. संतोष ढमढेरे :** सभागृहाला विनंती आहे, प्रत्येक सभासदाला बोलण्याचा अधिकार आहे, त्यांना त्यांचे वक्तव्य संपू द्या, जो बोलतोय त्याला बोलूनच द्यायचं नाही आणि सगळा गलका करायचा हा प्रकार करायचा नाही, वेगळ्या प्रकारची दहशत होते, याचा सभासदांनी विचार करा.

**श्री. शेबाज अन्सारी (एअँडएमपीडी)** : जितने भी टॉपिक ते हम लोगो ने इंटरेस्ट लिया, दस दिन पहिले.

**श्री. प्रकाश पाटील (एसआयआरडी) :** डायरीचा विषय झाला तोच तोच विषय होतोय रिपीट होतोय आता सभागृहातून आपल्याला जी नावे आली आहेत, ती जरा दाखवा, आता सगळ्यांनी आपापली नावे स्वतःहून दिली आहेत, ती नावे सांगावेत कारण सभासदांना माहिती पडेल. आता तुमच्यासोबत या डायरीसाठी ज्या पाच माणसांची नावे दिली आहेत ती तशी जरा नावे द्या, शांतता राहा

**श्री. अविनाश तिरपुडे (पदसिद्ध उपाध्यक्ष)** : अन्सारी जी की कीप सायलेन्स.

DRAFT 64th AGM

**श्री. शेबाज अन्सारी (एअँडएमपीडी)** : पुरा दिन हमारा चला गया क्या प्रॉब्लेम है, डायरी से.

**श्री. अविनाश तिरपुडे (पदसिद्ध उपाध्यक्ष)** : कृपया चला जरा बसून घ्या. बसून घ्या एकाने बोला,

**श्री. प्रकाश पाटील (एसआयआरडी) :** सर्वांनी जागेवर बसा बसून घ्या, सुरक्षा विभागाची आपल्याला विनंती आहे,
**श्री. हेमंत कोळी :** सर्वांनी खाली बसा,

**श्री. संतोष ढमढेरे : विषय क्रमांक तीन संचालक मंडळाने सादर केलेल्या दिनांक 1 एप्रिल 2024 ते 31 मार्च 2025 या कालावधीचा वार्षिक अहवाल 31 मार्च 2025 रोजीचे नफा-तोटा पत्रक व ताळेबंद यास मंजुरी देणे.**

**श्री. हेमंत कोळी :** सर्वांनी बसून घ्या.

**श्री.डी.एस राजापुरे (डीआरएचआर) :**अध्यक्ष महोदय, एनी अदर मॅटर संपलेल्या नाही, त्यामुळे तुम्ही अजेंडा नंबर दोन वर जाऊ नका. ही माझी तुम्हाला कळकळीची विनंती आहे, यांनी ऑदर मॅटर अजून संपलेले नाहीत,

**श्री. गिरीष शेणई साहेब (पदसिद्ध अध्यक्ष) :** यांनी ऑदर मॅटर मध्ये काय घ्यायचं हे अध्यक्षांच्या परवानगीने असतं.

**श्री.डी.एस राजापुरे (डीआरएचआर) :**ठीक आहे बरोबर आहे.

**श्री. गिरीष शेणई साहेब (पदसिद्ध अध्यक्ष) :** सभागृहाला हे ठरवायचं आहे, की बाकीचे अजेंडे घ्यायचे आहेत, की यावरच बोलत बसायचं आहे

**श्री. प्रकाश पाटील (एसआयआरडी) :** सभागृहाचे मत घ्या साहेब,

**श्री. गिरीष शेणई साहेब (पदसिद्ध अध्यक्ष) :** पहिली गोष्ट ही आहे की या मीटिंगची वेळ दोन ते सहा पाच 51 झालेले आहेत.

आता आपल्याला हे ठरवायला पाहिजे, की सभागृहाला अजेंड्याप्रमाणे जायचं की बारा मध्येच आपल्याला डिस्कस करायचा आहे. माझ्या मते आपण ह्याच्यावर डायरीवर चर्चा करायची होती ती झालेली आहे, ती कन्क्लुड झालेली आहे,

DRAFT 64th AGM

**श्री. प्रकाश पाटील (एसआयआरडी) :** थोडसं त्याला अनुमोदन द्यायचा आहे,

**श्री. गिरीष शेणई साहेब (पदसिद्ध अध्यक्ष) :** डायरीची तुमची जी मागणी होती त्याला मी मान्यता दिली होती, मी सगळ्या मुद्द्यांना मान्यता दिलेली नाही, त्यामुळे याच्यावर चर्चा होणार नाही, नंबर वन , नंबर टू आपला वेळ संपत आलेला आहे बाकीचे अजेंडे घेऊन आपण जर वेळ उरला, तर आपण बाकीच्या मुद्द्यांवर चर्चा करू.

**श्री. प्रकाश पाटील (एसआयआरडी) :** ढमढेरे सभागृहातून जी पाच माणसांची नावे आले ती जरा सांगा दहा माणसांची,सॉरी

**श्री. संतोष ढमढेरे :** सध्याला जी नावं समोर आलेली आहेत राजेश शेळके, प्रकाश पाटील, रवींद्र हंकारे, मनोज वाडेकर, सतीश महाजन, किशोर पवार, राजन बागवे, मुकुंद वैराळकर, संजीव वर्मा.

**श्री. प्रकाश पाटील (एसआयआरडी) :** राजन बागवे, संजीव वर्मा हे स्वतः इच्छुक आहेत ते समोर आलेत आपल्या,

**श्री. संतोष ढमढेरे :** ओके धन्यवाद, धनंजय धेंडे आणि आपली परत एकदा विनंती या विषयाला अनुसरून मुकुंद वैराळकर, राजन बागवे, धनंजय धेंडे, संजीव वर्मा दहा नावे झाली आहेत. श्री. विलास घोरपडे, श्री. डी.एस धोतरे

**श्री. प्रकाश पाटील (एसआयआरडी) :** फक्त दहा माणसांची नाव आपण ठरवली होती,

**श्री. मुकुंद वैराळकर (एएॅण्डएसईडी)** : मी श्री. मुकुंद वैराळकर सूचक

**श्री. प्रकाश पाटील (एसआयआरडी) :** श्री. प्रकाश पाटील, या ठरावाला सभागृहातून अनुमोदक म्हणून प्रकाश पाटील

**ठराव :- ठराव पास करण्यात आला की सभासद श्री राजेश कळके, श्री प्रकाश पाटील, श्री. रवी हंकारे, श्री मनोज वाडेकर, श्री सतीश महाजन, श्री किशोर पवार, श्री मुकुंद वैराळकर, श्री. डी.एस धोतरे, श्री संजू वर्मा, श्री धनंजय धेंडे, श्री. विलास घोरपडे, श्री. राजन बागवे, यांची संचालक मंडळास आवश्यक असणाऱ्या, संस्थेच्या कामकाजासंदर्भात आस्थापनेकडून आवश्यक असणाऱ्या मदतीस सहकार्य करण्यासाठी एकमताने कमिटी नेमण्यात यावी असा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.**

DRAFT 64th AGM

**ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.**

**श्री. विलास घोरपडे (एफडी) :** अध्यक्ष, हे काय तुम्ही एकाला ठरवा कोण बोलणार आहे.?

**श्री. हेमंत कोळी :** हाच, बोलणार बाहुबली झोपला, संतोष ढमढेरे मीटिंग करणार आता,

**श्री. संतोष ढमढेरे :** घोरपडे साहेब, अध्यक्ष साहेब सगळ्यांना मी विनंती करतो, बाहुबली चौगुले यांची तब्येत वीस - पंचवीस दिवसापासून ठीक नाही, पदसिद्ध अध्यक्ष, उपाध्यक्ष यांना त्यांनी पत्र लिहिलं, पत्र लिहिल्यानंतर त्या संदर्भात त्यांनी त्याची परमिशन घेतलेली आहे, बरोबर चार - पाच दिवस अगोदर त्यांना पत्र दिले आहे की सोमवारी त्यांची सर्जरी आहे, त्यामुळे त्यांनी वेगळ्या वेगळ्या व्यक्तींना तिथे अपॉइंट केले आहे, त्या पद्धतीने आपण जाणार आहोत. तुम्ही जो बोलताय की एकच व्यक्ती अजेंडा घेईल तर त्या व्यक्तीला ते चार्टर्ड अकाउंटंट साहेब आले आहेत ते बॅलन्स शीट वर बोलतील,

**श्री. संतोष ढमढेरे : विषय क्र.2: संचालक मंडळांनी सादर केलेल्या दिनांक 1 एप्रिल 2024 ते 31 मार्च 2025 या कालावधीचा वार्षिक अहवाल व दिनांक 1 एप्रिल 2024 ते 31 मार्च 2025 अखेरचे वैधानिक लेखा परीक्षित ताळेबंद व नफा-तोटा पत्रक स्वीकारून त्यास मान्यता देणे.**

**श्री. संतोष ढमढेरे :** या विषयाला सुद्धा 18 ऑगस्ट 2025 पर्यंत कोणत्याही सभासदाने लिखित पत्र दिले नव्हते तर यासाठी मी सभागृहाला विनंती करतो की सूचक आणि अनुमोदक द्यावेत.

**श्री.डी.एस राजापुरे (डीआरएचआर) :** या विषयावर भरपूर काही बोलायचे आहे चर्चा करायची आहे भरपूर प्रश्न दिले होते त्यावर त्यामुळे मला या विषयावर बोलायचे आहे.

**श्री. संतोष ढमढेरे :**राजापुरे साहेब तुम्ही संस्थेमध्ये आलात बॅलन्स शीट वर मोठ्या प्रमाणावर तुम्ही प्रश्न विचारले, त्यावर तुम्हाला उत्तरे दिली

**श्री.डी.एस राजापुरे (डीआरएचआर) :** जे उत्तरे मिळाले नाहीत त्यावरच मी बोलणार आहे ,जे उत्तरे मला मिळाली त्यावर मी भाष्य करणार नाही.

DRAFT 64th AGM

**श्री. धनंजय धेंडे (डीसिएसइएम) :** साहेब, माझी एक विनंती आहे की राजापुरे साहेबांना पीसी उपलब्ध करून द्या आणि त्यावर फटाफट कामे होऊन जातील.

**श्री. संतोष ढमढेरे :** प्लीज आपल्याला विषय पुढे न्यायचे आहेत.

**श्री. धनंजय धेंडे (डीसिएसइएम) :** तुम्ही पीसी उपलब्ध करून द्या राजापुरे साहेबांना ते बरोबर त्या ठिकाणी काम करतील.

**श्री.एस.एस.महाजन (एफआरडी):** राजापुरे साहेबांनी जो काही विषय मांडला, त्याला जो काही रिप्लाय दिलेला आहे तो पूर्णपणे तो चुकीचा आहे, कुठल्याही सभासदाला जर तो प्रश्न विचारतो, म्हणून शेवटच्या टोकाला जाऊन त्याचा काहीतरी अपमान करणे हे जे म्हणाले, त्यांना काहीतरी पीसी मिळवून द्या तुम्ही त्यांना तिथे बसवा, तुम्हाला राजापुरे आणि पत्र देणे त्यांना तुम्ही त्यांना सर्व प्रश्नांची उत्तरे दिली असं तुम्ही म्हणताय, त्यावेळी पण त्यांच्या काही प्रश्नांची उत्तरं तुम्ही दिली नाहीत असं ते म्हणतात, तुम्ही प्रत्येकाला दिलेल्या पत्रामध्ये काहीही उत्तर देत नाही मी ही दिलेल्या पत्रामध्ये तुम्ही काही उत्तर दिले नाहीत, तुम्ही फक्त सांगितले की हा विषय चर्चेला घेण्यात

येईल प्रत्येक पत्राला तुमचे उत्तर ठरलेले आहे. त्या दृष्टीनेच ते म्हणतायेत याची उत्तरे मला द्या आणि सभागृहाला माहिती होऊ द्या पाच मिनिटांचा वेळ द्या पटकन, संपवून टाका,

**श्री. संतोष ढमढेरे :** राजापुरे साहेब शॉर्ट मध्ये, जे काही आहे ते शॉर्ट मध्ये चार्टर्ड अकाउंटंट त्यावर उत्तर देतील

**श्री.डी.एस राजापुरे (डीआरएचआर) :**महत्वाचं नाही बॅलन्स शीट चुकीचे बनलेला आहे, मी प्रूव्ह करून दाखवतो 100% चुकीचा आहे. तुमची जर तयारी असेल तर असे भरपूर काही विषय आहेत. तुम्ही कर्ज संरक्षण निधीमध्ये 0.5 ने अमाऊंट ॲड केलेले नाही. आपलं क्लोजिंग बॅलन्स होतं 828 कोटी 828 कोटीच्या 0.5% कोटी किती होतं बघा आणि तुम्ही तिकडे किती वर्ग केलं, म्हणत नाही मी ओपनिंग बॅलन्स, 828 कोटीच्या 0.5 वर्ग केले ना बघा, तुम्ही किती वर्ग केले? उत्तर मला माहिती आहे. प्रत्येक प्रश्नाचं जर मीच उत्तर दिले तर ते कशाला आहेत, 828 कोटी चार कोटी आणि तिथं चार कोटी सहा लाख आणि एका फायनान्स मध्ये 128 कोटी डिस्बस झाले आहेत.

**श्री. संतोष ढमढेरे :** राजापुरे साहेब तुमचा प्रश्न समजला फक्त चार्टर्ड अकाउंटंट ला तो प्रश्न रिपीट करत आहे त्यांना समजला नाही, आपण कर्जावरती कर्ज सुरक्षा निधी योजना सुरू केली आहे त्या अंतर्गत आपण पॉईंट फाईव्ह पर्सेंट निधी आपण वर्ग करत असतो तर 828 करोड रुपये असताना त्याच्यावर अपेक्षित रक्कम वर्ग झाली नाही असे त्यांचे म्हणणे आहे.

DRAFT 64th AGM

**श्री. बाहुबली चौगुले (मानद सचिव) :** सभासदांसाठी मी नेहमी इथेच राहील घरी जाणार नाही, राजापुरे साहेब पेज नंबर फोर्टी सिक्स मध्ये शेड्युल लास्ट इयर ची ओपनिंग होती पाच करोड पंचवीस लाख वीस हजार एकशे पाच रुपये, ओपनिंग बॅलन्स या आर्थिक वर्षात जमा झाले चार कोटी सहा लाख 66 हजार 668 प्रोविजन यावर्षी आपण काही केली नाही आपण यावर्षी म्हणजे गेल्या वर्षी जी फिगर होती श्रीवास्तव यांची संचालक मंडळाने जे काही परत रिकवरी केली ती होती, दहा लाख रुपये 24 लाख 741 रुपये आणि या स्टेजला फिगर आहे विक्रम कर्ज सुरक्षा निधी सात कोटी 30 लाख 914 याच्यामध्ये आता क्वेरी सांगा.

**श्री.डी.एस राजापुरे (डीआरएचआर) :** या करंट फायनान्शियल एअर मध्ये रिसिव्ह ड्यूरिंग द इयर 46 नंबर त्यांनीच आता सांगितलं की 46 पेज नंबर वर फोर करोड सिक्स लाख, तुम्ही जमा केले अस पर कॅल्क्युलेशन यायला पाहिजे होते 4 करोड 52 लाख यायला पाहिजे होते आणि जर ते फक्त मंथवाईस डेटा काढला तर मी फक्त ओपनिंग चा डेटा घेतला तरी तो चार करोड अकरा लाख येतो आहे ही तरतूद कमी झाली आहे आता धोतरे साहेबांनी काढला, त्यांनीच काढलं मी नाही, ते तर त्यांनी ओपनिंगचं केलं, एका आर्थिक वर्षांमध्ये प्रत्येक महिन्याला 25, 20, 10 कोटी आपण देतो असं करून वर्षाच्या एंडिंगला आपण ॲडिशनल 175 आपण डिसबस

केले. 175 च्या जरी एवरेज काढलं 80 करोड 90 करोड त्याच्याही पॉईंट फाईव्ह केले तर ते किती मोठे जाते आणि हे फक्त तुम्ही 4 करोड 6 लाख कशी जमा केली.

**श्री. बाहुबली चौगुले (मानद सचिव) :** सर मी तुम्हाला बोललो होतो तुमच्याबरोबर डिस्कस झालं होतं.

**श्री. गिरीष शेणई साहेब (पदसिद्ध अध्यक्ष) :** एक मिनिट,जस्ट फॉर द प्रोसिजर सहा वाजलेले आहेत, बाय प्रोसिजर फॉलो करायला पाहिजे हे रेकॉर्डिंग तुम्ही करू शकत नाही ही सभा आपण एका तासासाठी वाढवून घेऊया,

**श्री.  बाहुबली चौगुले (मानद सचिव) :**  थँक्यू सर,

**श्री. बाहुबली चौगुले (मानद सचिव) :**  राजापुरे साहेब, मी तुम्हाला बोललो होतो की ओपनिंग बॅलन्स पाच् करोड 25 लाख आणि या वर्षात चार कोटी सहा लाख 66 हजार जमा झाले तुमचे प्रश्न होता की ही फिगर जमा मॅच होत नाही. संस्थेच्या कार्यामध्ये आपण याचा मंथली डेटा पुन्हा काढून बऱ्याच सभासदांचे काय होतं रिकवरी येत नाही, आम्ही डिमांड ज्यावेळी पाठवतो, एखाद्या सभासदाचे लोन आहे दहा लाख रुपये, त्याचा EMI आहे दहा हजार रुपये, जो असेल तो त्याची लेस रिकवरी कधी कधी पाच हजार, सहा हजार येते, विक्रम सुरक्षा कर्ज योजनेचा हेड एवढेच सांगतो, सभासदांच्या त्या महिन्याला जी रक्कम शिल्लक असेल त्याच्यावरती आपण पॉईंट फाईव्ह ही निधी आपण विक्रम सुरक्षा कर्ज निधीमध्ये वर्ग करतो, त्या फायनान्शिअल इयरला ऍक्च्युली किती निधी आली, त्याच्यामध्ये नमूद केले आहे, हा विषय सभासदांच्या विषय समोर मांडतो,मला असं वाटतं की पदसिद्ध अध्यक्षांच्या परमिशनने, सभागृहाला आधी कोणी सांगितलं की नाही हे माहित नाही,मला असं वाटतं की हा विषय आलाय म्हणून मी सांगतो की, बघा बॅलन्स शीट बद्दल डिस्कशन होतं, पण लक्षात घ्या बॅलन्स शीट बनते की बनवली जाते हा प्रश्न मी सरांना त्यावेळेला विचारला होता. संपूर्ण महाराष्ट्रामध्ये जर बघितलं तर कुठल्याही पगारदार पतसंस्थेची बॅलन्स शीट ही आपल्या इतकी कुठेही स्वच्छ विथ हेड शेड्युल कुठेही भेटणार नाही. इतकी पारदर्शक आहे आपली बॅलन्स शीट. साहेब मी तुला एक्सप्लेन करण्याचा प्रयत्न करतो, बॅलन्स शीट मध्ये तुम्ही म्हटलं ना बॅलन्स शीट चुकीचे आहे, त्यादिवशी मी तुम्हाला विचारलं बॅलन्स शीट मध्ये दोनच गोष्टी असतात एका बाजूला इन्कम आहे एका बाजूला बाकीचा खर्च आहे, इन्कम साईडला आपण काहीही करत नाही, बॅलन्स शीट आपोआप सिस्टीम मध्ये बनते, ऑटोमॅटिक.

DRAFT 64th AGM

**श्री.डी.एस राजापुरे (डीआरएचआर) :** आपल्याकडे एवढे मोठे मोठे कॉस्टली प्रोग्रॅम आहेत, आता मी जेवढे सांगितलं 828 कोटीच्या पॉईंट फाईव्ह किती चार करोड अकरा लाख तुम्ही बॅलन्स शीट ला वर्षांमध्ये 180 कोटी

वाटले त्याचे तर वेगळेच, हे ओपनिंग झालं क्लोजिंगची अजून मोठी फिगर आहे, माझ्याकडे कॅल्क्युलेशन साठी चार कोटी 52 लाख येते.

**श्री. बाहुबली चौगुले (मानद सचिव) :** सर मी तुम्हाला विनंती करतो की तुम्ही संस्थेच्या कार्यालयात या.

**श्री.डी.एस राजापुरे (डीआरएचआर) :** संस्थेचे कार्यालयात नाही, ऐकून घ्या याच्यामध्ये जर तफावत निघाली तर नवीन बॅलन्स शीट बनवून तुम्ही संस्थेपुढे मांडणार का ?

**श्री. बाहुबली चौगुले (मानद सचिव) :** सर ही बॅलन्स शीट परफेक्ट आहे.

**श्री.डी.एस राजापुरे (डीआरएचआर) :**एक दोन टक्के इकडे तिकडे होईल मान्य आहे, हा विषय मी गेली चार वर्षे बोलतोय,  घसा फोडून बोलतोय की हे चुकतंय,  पैसा सोसायटी मधून बाहेर गेला नाही, या हेड मधून त्या हेड मध्ये जातोय गेल्यावर्षी पण मी बोललो होतो.

DRAFT 64th AGM

**श्री.डी.एस राजापुरे (डीआरएचआर) :**तेव्हा गेल्यावर्षी श्रीराम सरांनी मला पर्सनल बोलवून घेतलं आणि रिक्वेस्ट केली की बॅलन्स शीट पास करा,  तेव्हा कुठे दुसऱ्या मिटींगला ती पास झाली,  बॅलन्स शीट पास होणार नाही असं आश्वासन दिलं होतं आजही मी बोलतोय, कारण एक दोन लाख इकडे तिकडे होऊ शकतं, 50 लाखाचा डिफरन्स, ओपनिंग बॅलन्स कॅल्क्युलेशन तुम्ही करा, मी नाही करत तुम्ही ऑडिटर ला विचारा,

**श्री. बाहुबली चौगुले (मानद सचिव) :** ऑडिटर साहेब इथे बसले आहेत ठीक आहे, आपण त्यांना विचारू

**श्री. जगदिश रणदिवे (लेखापरीक्षक):** तुम्ही प्रश्न चांगला विचारला आहे त्याबद्दल धन्यवाद, हा कॅल्क्युलेशन पार्ट आहे, आपण PEOCIT सॉफ्टवेअर घेतले आहे, त्याच्यामध्ये यांना कुणालाही बदल करता येत नाही, M/S. PEOCIT ही खूप मोठी कंपनी आहे महाराष्ट्रातील, बॅलन्स शीट मध्ये तुम्हाला काहीही चेंज करता येत नाही, कारण त्याला रितसर संचालक मंडळाने पत्र द्यावा लागतं,  त्यानंतर एखादी एन्ट्री जरी त्यांना फिरवायची असेल तरी परमिशन घ्यावी लागते. बॅलन्स शीट ही सिस्टीम मधूनच निघते. एक सिस्टीम ऑडिट आपलं पेंडिंग आहे त्यावर सिस्टीम ऑडिट करून घ्या.

**श्री.डी.एस राजापुरे (डीआरएचआर) :** चार वर्षे आम्ही बोलतोय प्रत्येक वर्षी दहा ते पंधरा लाख सिस्टीमवर खर्च करतोय तरी पण बॅलन्स शीट बरोबर येत नाही, मी आजही बोलतोय चूक आहे तर कोणी सुधारायची.

**श्री. जगदिश रणदिवे (लेखापरीक्षक):** यासाठीच तुम्हाला सिस्टीम ऑडिट करून घ्यावे लागेल

**श्री.डी.एस राजापुरे (डीआरएचआर) :** हे गेल्या वर्षीच ठरलं होतं की सिस्टीम ऑडिट करून घ्यायचं अजून नाही झालं.

**श्री. जगदिश रणदिवे (लेखापरीक्षक):** ते करणं गरजेचं आहे आमचं रेकमेंडेशन आहे आम्ही रिपोर्टमध्ये तसं लिहिलं आहे.

**श्री.डी.एस राजापुरे (डीआरएचआर) :** यावर्षी सुद्धा आम्ही बारा लाख 40 हजार सिस्टीमवर खर्च केले आहेत अशी आम्ही किती खर्च करायचे ऑडिट रिपोर्ट बरोबर मिळत नाही, 2020 पासून मी हेच सांगतोय आज सगळेच रिपोर्ट आला नाही.

**श्री.संतोष ढमढेरे :** राजापुरे साहेब, तुम्हाला माहितीये आपण सिस्टीम ऑडिट साठी प्रोसेस केला आहे, पुढच्या आठवड्यामध्ये सिस्टीम ऑडिट होणार आहे, माणसे येणार आहेत, प्रोविजन केले आहेत पहिल्यांदा आपण कोपरेटिव्ह कन्सल्टंट आपण बोलावलं, त्यावेळेला कंपल्सरी त्यांच्याकडून कळालं की सिस्टीम ऑडिट करणे गरजेचे आहे तर प्रत्येक वर्षी आपण सिस्टीम ऑडिट करण्यासाठी यावर्षी त्याची तरतूद केली आहे, त्याचबरोबर एखादा लिगल एक्सपर्ट एडवोकेट लागतो त्या ऍडव्होकेट च्या संदर्भात सुद्धा गेल्या वर्षीच्या मिनिट्स मध्ये आपण सांगितलं होतं की, चार्टर्ड अकाउंटंट पाहिजेत मी त्यांना प्रश्न विचारले त्यांनी आता क्लिअर कट सांगितलं की सॉफ्टवेअर मध्ये बनते तशी येते त्यात बदल करता येत नाहीत माझी सभागृहाला विनंती आहे, की आपल्या सभागृहामध्ये गेल्या तीन वर्षापासून बघतो, राजापुरे साहेब बॅलन्स शीट वर बोलतात राजापुरे साहेबांना विनंती करतो की आपण या बॅलन्स शीट संदर्भात जे काही आपण काम करणार आहोत त्यावेळी आम्ही तुम्हाला बोलू त्यावेळेला तुम्ही या आणि सोबत आमच्या काम करा, कारण आम्हाला सगळ्या गोष्टी प्रॉपर पद्धतीने पुढे न्यायचे आहेत.

**श्री.डी.एस राजापुरे (डीआरएचआर) :** नाही नाही पण प्रोग्राम आपण केला आहे मग चुकीचं काय येते.

**श्री.संतोष ढमढेरे :**आपण प्रोग्राम केलंय, रणदिवे साहेबांनी सांगितलं की, सूचना केल्या जातात, अपडेट केले जाते यावेळी मी असं म्हणेन की सिस्टीम ऑडिट, पीओसीटच्या सॉफ्टवेअर वाल्यांना बोलावले आहे तेव्हा तुम्हालाही बोलावतो त्यावेळेला तुमच्या ज्या डिमांड्स आहेत त्या कमिटीसमोर सूचना संस्था आपली आहे सभागृहातून मी तुम्हाला विनंती करतो, त्या कमिटीमध्ये या आणि तिकडे बोला आणि ज्या काही गोष्टी आहेत

DRAFT 64th AGM

त्या, करून घ्या ज्या गोष्टी पॉसिबल आहेत त्या पण करून घेणार आहोत निगेटिव कोणीही बोलत नाही आपल्याला विषय पुढे  म्हणून मी विनंती करतोय.

**श्री.डी.एस राजापुरे (डीआरएचआर) :** सभागृहामधून तीन वर्ष हेच आश्वासन होते की आपण एक कमिटी नेमु, करू गेली तीन वर्षे काहीही झाले नाही. असं मी बोलतोय.

**श्री.संतोष ढमढेरे :**राजापुरे साहेब मी विनंती करतोय सभागृहाला मान्य आहे का राजापुरे साहेब मॅनेजमेंट कमिटीमध्ये येण्यासाठी.

**श्री.डी.एस राजापुरे (डीआरएचआर) :** फक्त आश्वासनांची खैरात वाटली जाते ऐक्चुअल ॲक्शन टेकन काहीही होत, नाही गेल्या वर्षी माझा हा प्रश्न होता त्याच्या गेल्या वर्षी सुद्धा माझा प्रश्न होता.

**श्री. प्रकाश पाटील (एसआयआरडी) :** विनंती करतोय तुम्ही कमीत कमी त्यांच्या पत्राचे उत्तर त देत जावा.

**श्री.डी.एस राजापुरे (डीआरएचआर) :** नाही पुढच्या वर्षी सुद्धा होणार नाही मी गेल्यावर्षी बोललो होतो.

DRAFT 64th AGM

**श्री. प्रकाश पाटील (एसआयआरडी) :** राजापुरे साहेब, कृपया एक विनंती ते म्हणतात मंचावरून तर थोडं त्यांना सहकार्य करा.

**श्री.डी.एस राजापुरे (डीआरएचआर) :** तुम्ही त्यांच्या वतीने आश्वासन देऊ शकता का?

**श्री. हेमंत कोळी :**मी देतो, पुढचं हप्त्यामध्ये आम्ही सिस्टीम ऑडिट करणार त्यांना सोबत घेणार त्यांना बोलावणार .

**श्री.डी.एस राजापुरे (डीआरएचआर) :** मला सिस्टीमशी देणे घेणे नाही मला जी फिगर आहे ती परफेक्ट आली पाहिजे काय करायचं त्यासाठी तुम्ही ठरवायचं तो मी ठरवणार नाही तुम्हाला संस्थेने निवडून दिले आहे मला जे बॅलन्स शीट मिळाले सभासद म्हणून मला ते चुकीच आढळला आहे, दुरुस्त करण्याचं तुमचं कर्तव्य आहे माझं नाही,

**श्री.संतोष ढमढेरे :** राजापुरे साहेब बघा संचालक मंडळाला तुम्ही निवडून दिला आहे आम्ही इथून विनंती करतोय की तुम्ही फक्त आमच्या सोबत राहून आम्हाला मार्गदर्शन करा सल्लागार म्हणून.

**श्री.डी.एस राजापुरे (डीआरएचआर) :** ढमढेरे साहेब हे तिसरी बॅलन्स शीट आहे तिन्ही वर्षी VKSY ची प्रॉपर तरतूद होत नाही ,पुढच्या वर्षी नाही होणार, गेल्या वर्षीच्या मिनिट्स मध्ये पण हे आले आहे,

**श्री. राहुल शर्मा (एचडब्लूडी) :**अध्यक्ष महोदय, बॅलन्स शीट की ई रेग्युलरिटी हर साल सभा के सामने आती है, ये चूक होती है की नही, आप किसको स्वीकार करते है या नही, मेरे सवाल का अन्सर दिजीये हर साल बॅलन्स शीट मे इरेगुलेटी है स्वीकार करते है या नही. आप सीए हायर किया हुआ है, सी ए के रिमार्क आपने कभी हमे दिखाये है, किसी की क्या रेकमेंडेशन है? कभी हाऊस के सामने लाया है कि उनकी क्या ऑब्झर्वेशन है ?

**एक सन्मानीय सभासद :** अध्यक्ष महोदय, मला कोणाच्याही पक्षात किंवा कोणाचे विरोधात बोलायचं नाही एक टेक्निकल प्रॉब्लेम आहे, तो दोघांपैकी कोणालाही क्लिअर करता येत नाही, मी सध्या ऑडिटला गेल्या दहा वर्षापासून काम करतोय खरा मुद्दा असा आहे या ठिकाणी की आपलं मार्च जी सॅलरी आहे ते एप्रिलला अकाउंटला क्रेडिट होतं त्यानंतर salary section लोणचे EMI त्यानंतर देत असतो. त्यामुळे ही कमिटी काय किंवा कुठलीही कमिटी बसली तरी ती फिगर यांच्या कॅल्क्युलेशन नुसार टेली होणार नाही, आणि तुम्ही सुद्धा करू शकत नाही तो टेक्निकल मुद्दा आहे तो कोणी समजून घेत नाही, फक्त वादविवाद करून सभागृह वेळ वाया जातो, दोन महिन्याचा सॅलरी आपण एप्रिल मध्ये टाकतो, सॉफ्टवेअर मध्ये अशी ऍडजेस्टमेंट नाही, सॉफ्टवेअर 31 मार्च बॅलन्स दाखवतो, तुमचे लोन दाखवतं, साहेब रिकवरी येत नाही त्यामुळे फिगरवाईज ही पर्सेंटेज बॅलन्स शीट कधीही ठेवली होणार नाही,

DRAFT 64th AGM

**श्री.एस.एस.महाजन (एफआरडी):** मला फक्त ना, एका गोष्टीचा क्लिअरच पाहिजे, आपण इंस्टॉलमेंट जे घेतो, आपण जे हप्ते घेतो, आपण जे एखाद्याचे कर्जाचे हप्ते घेतो ते दर महा घेतो आता, तसे यांनी सांगितलं एक की तत्वतः ते कुठेच पटत नाही कारण आपण वर्षाची टार्गेट घेत असतो आणि कितीही काही झालं तरी एका वर्षात 13 हप्ते येत नाहीत मग एकाच वर्षात 12 हप्ते येतात तर त्या त्याच्याने ते शक्य नाही मगाशी आपण सीए अपॉइंट केले आहेत की त्यांनी गेली किती वर्ष मी हे दाखवतोय की तुमच्या सिस्टीम अपडेट करून घ्या ऑडिट करून घ्या ऐका ऐका जर तुम्हाला गेली काही वर्षे सांगताहेत तर तुम्ही आता परवा करणार आहोत इतके दिवस मग का नाही केलं.

**श्री.संतोष ढमढेरे :** जेव्हा चार्टर्ड अकाउंटंट नी आपलं ऑडिट केलं आणि सिस्टीम ऑडिट पद्धतीचे शेरे येतात, जेव्हा चार्टर्ड अकाउंटंट कडून सिस्टीम ऑडिट करण्यास शेरा आला, इमॅजिएटली आपण टेंडर प्रोसेस केली, योग्य सिस्टीम ऑडिट करणारे कोण आहेत, त्यांचे नंबर घेतले ,त्यांच्याकडून माहिती घेतली की कशा पद्धतीने सिस्टीम ऑडिटची प्रक्रिया असते आणि ती सगळी आपण फॉलो करून पुढच्या आठवड्यात ते लोक आपल्या सिस्टीम

ऑडिट साठी येणार आहेत गेल्या 65 वर्षात आपल्या संस्थेचे सिस्टिम ऑडिट झाले नाही, 2020 पासून याची मागणी होती पण तोपर्यंत कोणाला माहिती नव्हतं आता आपल्याला ते माहीत झाले आपण ते करून घेतोय प्रश्न मांडलात त्या पद्धतीने आपण कारवाई करतोय आपला विषय पुढे घेऊन जाऊया.

**श्री. हेमंत कोळी :** महाजन साहेब, वेळेचं भान ठेवा नाहीतर आपली मीटिंग होणार नाही,

**श्री.एस.एस.महाजन (एफआरडी):** ठीक आहे, आपण आपल्या ताळेबंदा मधून येतो 1000 करोडची आपली उलाढाल झाली म्हणजे कर्जाला त्याच्या अगोदर आपण दाखवतोय गेल्यावर्षी आपली साडेआठशे करोड होती पॉईंट फाईव्ह च्या हिशोबाने चार करोड सहा लाख वगैरे काहीतरी आलं गुणिले 200 फक्त, तुमचे 406 गुणिले 200= 812 होतात, तुम्ही साडेआठशे होतात माझ्या सारख्या दहावी पासला होतात तुम्हाला लोकांना कळत नाही.

**श्री.संतोष ढमढेरे :** जसं सिम्पल कॅल्क्युलेशन करतो तसं सॉफ्टवेअर मध्ये होत नाही तुम्ही एकदा येऊन बघा बॅलन्सशीट वर प्रश्न येऊ दे.

DRAFT 64th AGM

**श्री. विलास घोरपडे (एफडी) :** आपल्या येथे दिवंगत सभासद झालेले आहेत 19, त्यांचे दोन कोटी 41 लाख 60 हजार 610 रुपये आपण कर्ज माफ केले आहेत, पान नंबर सहा वरती आहे, तशी तरतूद पुन्हा आपण साडेतीन कोटीची केली आहे, आणि पॉईंट फाईव्ह ने आपल्याकडे साडेचार कोटी पण आले आहेत, सात कोटी 56 लाख म्हणजे ही तरतूद फुगावठा होत चालली आहे, आपली सरासरी बघायला गेले तर दोन अडीच कोटी जातात, आपण तीन कोटी धरू आणि इकडून तुम्ही साडेतीन कोटी टाकता येत आणि येणारे साडेचार कोटी असे सात कोटी होत आहेत, त्यासाठी तुम्ही सभासदांना इंटरेस्ट मध्ये मुंबई बँकेनुसार दिलासा देऊ शकत नाही तर आपल्या सभासदांना कर्ज धारकांना दिलासा देणार 0.3 % असाल तर याच्यामध्ये खूप फायदा आहे.

**श्री.संतोष ढमढेरे :**ऍक्च्युली या बॅलन्स शीट मध्ये आम्ही विक्रम कर्ज सुरक्षा मध्ये मागील वार्षिक सभेच्या चर्चे मध्ये सूचना केली होती की तुम्ही प्रॉफिट मधून जास्त नफा विक्रम सुरक्षा योजनेमध्ये वर्ग करा आणि त्या जर तुम्हाला काही कमी करता आले, तर करता येतील आणि त्यालाच अनुसरून यावर्षीच्या वार्षिक अहवालामध्ये आम्ही 0.5% पर्यंत जे होतं तिथे आम्ही आता हलकासा बदल करून तो नियम अहवालामध्ये छापली आहे, सभागृहाने ते मंजूर करावं, 0.5 % आम्ही नियम बदल करून 0.3% करत आहोत. मागे सांगितलं होतं, आम्ही 9.6 ने कर्ज व्याज कमी करू, आम्ही कर्ज व्याज कमी केले आहे.

**श्री. विलास घोरपडे (एफडी) :** तुम्ही चुकीचं सांगताय.

**श्री.संतोष ढमढेरे :** 0.5% च्या ऐवजी 0.3% आम्ही करत आहोत असे आम्ही या ठिकाणाहून डिक्लेअर करत आहोत, सूचक आणि अनुमोदक द्यावे.

**श्री.डी.एस राजापुरे (डीआरएचआर) :** सूचक अनुमोदकाला अजून खूप टाईम आहे एवढं का पळवताय, पुढे जाऊन जर आपल्याला निधी कमी पडला तर त्याच्यामध्ये निधी वाढवण्याचा अधिकार आपण त्याच्यामध्ये घेतलेला आहे आता सध्याला आपल्याकडे फुगवटा दहा करोड रुपये, घोरपडे बॅलन्स शीटवर अजून सुचक अनुवादक घेऊ नका.

**श्री. विलास घोरपडे (एफडी) :** बॅलन्स शीटवर सुचक नाही, त्या नियमाला फक्त सूचक आहे, बॅलन्स शीटला नाही.

**ठराव : ठराव पास करण्यात आला की विक्रम कर्ज संरक्षण योजनेच्या व्याजदरामध्ये 0.5% वरून 0.3% कपात करण्याच्या विक्रम कर्ज संरक्षण योजनेच्या नियमातील संचालक मंडळाने सुचविलेला बदल सर्वानुमते स्वीकारण्यात आला व माहितीसाठी माननीय सहकार आयुक्त सहकारी संस्था पुणे यांचे माहितीकरिता पाठविण्यात यावा असा ठराव सर्वानुमते पास करण्यात आला.**

DRAFT 64th AGM

**सूचक : श्री. सचिन सोळसे**
**अनुमोदक.:- श्री. धनंजय धेंडे (डीसिएसइएम)**

**ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.**

**श्री.डी.एस राजापुरे (डीआरएचआर) :** ते बॅलन्स शीट ला मागत आहेत.

**श्री. विलास घोरपडे (एफडी) :** सर अजून प्रश्न आहेत माझे.

**श्री.डी.एस राजापुरे (डीआरएचआर) :** पण हे सिम्पल कॅल्क्युलेशन तुमचा प्रोग्राम कसं काय चुकीचं करतय हा प्रश्न आहे तसं महाजन साहेबांनी सांगितलं.

**श्री.बाहुबली चौगुले (मानद सचिव) :** सर आपण संस्थेमध्ये या तुम्हाला 100- 200 अकाउंट रँडमली दाखवतो

**श्री.डी.एस राजापुरे (डीआरएचआर) :** पण चेक करू मला शंभर दोनशे नाही रेड्यूसिंग बॅलन्स नुसार फिगर कमी होते.

**श्री.बाहुबली चौगुले (मानद सचिव) :** तुम्ही संस्थेत या.

**श्री.डी.एस राजापुरे (डीआरएचआर) :** हो गेल्या वर्षी पण असेच बोलले होते पण काही झाले नाही

**श्री. हेमंत कोळी :** नाही यावर्षी करू आपण तुम्ही या संस्थेत हे मिनिट मध्ये नोट करा,

**श्री.बाहुबली चौगुले (मानद सचिव) :** राजापुरे सर, तुम्ही संस्थेमध्ये या आपण शंभर संपल्स चेक करू.

**श्री. विलास घोरपडे (एफडी) :** दुसरा पॉईंट घेतो मी पान नंबर सहावर जो एनपीए तुम्ही दाखवला आहे ती एक कोटी 51 लाख 27,586 आणि खाली पुन्हा दाखवलाय तीन कोटी 68 लाख 948 यामध्ये तफावत आहे नेमकं ही एनपीए कशी आली वाढली कशी? याचे उत्तर सेक्रेटरी साहेबांनी द्यायचे आणि एनपीए वाढला असेल तर ती एनपीए वाढला कसं ? तुम्ही कसे डिसाईड केलं किती एनपीए आहे.

DRAFT 64th AGM

**श्री.बाहुबली चौगुले (मानद सचिव) :**दोन मिनिटं मला फाईल डिस्प्ले करू दे, घोरपडे एनपीए प्रोसेस कशी झाली ती खालची फाईल मी मेन्शन करतो. स्टॅंडर्ड ऍसेट एन पी ए प्रोविजन कशी असते बघा, टोटल आपले सभासद आहेत 18500, त्यांची आऊटस्टँडिंग लोन अमाऊंट आहे 11 कोटी 64 लाख यानुसार आऊटस्टँडिंग अमाऊंट आपण काढत गेलो, त्यानंतर प्रोव्हिजनची येते 2 कोटी 48 लाखाची ही स्टॅंडर्ड ऍसेट मध्ये आहे, सब स्टॅंडर्ड ऍसेट त्याच्यामध्ये जातात ना आणि त्याच्या डाऊटफुल असेटमध्ये, डाऊट फुल ऍसेट 1, डाऊट फुल ऍसेट 2 , डाऊट फुल ऍसेट 3 जर काढले तर आपल्याकडे 10660 जे सभासद आपल्याकडे कर्ज घेतात , या सगळ्यांची टोटल अमाऊंट कर्जाची काढली ना ती आहे 3 कोटी 68 लाख 9 हजार 448 ही स्टॅंडर्ड जी प्रोविजन आहे, त्यानुसार ही प्रोव्हिजन आपण काढली आहे.

**श्री. विलास घोरपडे (एफडी) :** तुम्ही सांगताय पेंडिंग आणि तुम्ही लिहिताय एनपीए, तुम्ही सांगता न येणारी अमाऊंट आहे तुम्ही दाखवताय.

**बाहुबली चौगुले (मानद सचिव) :** एनपीए म्हणजे ती मिळणारच नाही, ही एनपीएचे प्रोविजन, सर जर नाहीच आली तर. स्टॅंडर्ड आपल्याला गाईडलाईन नुसार एन पी ए म्हणजे नॉन परफॉर्मिंग ऍसेट मध्ये येतो. प्रोव्हिजन करून ठेवली आहे ती त्यामध्ये येते आणि बऱ्याच वेळेला काय होतं की सभासद दोन महिने तीन महिने डिफॉल्टर मध्ये

जातात परत त्यांची सॅलरी येते मग ती आपल्याला स्टॅंडर्ड मध्ये मेंशन करावी लागते म्हणून आपण इथे मेन्शन करतोय.

**श्री. यदुवीर सिंग (एचएलयुडी) :** सबस्क्रीप्शन के जो इंटरेस्ट जो अपने 11 तारीख से चालू किया है, मै लास्ट टाईम बोला था. आपका प्रॉफिट अच्छा हो रहा है, बहुत अच्छी बात है, आप लोग काम कर रहा है, लेकिन सबस्क्रीप्शन पे 10 % इंटरेस्ट  हमको एप्रिल में क्यू नही मिलता मिल सकता बताओ,

**श्री. बाहुबली चौगुले (मानद सचिव) :** सर प्रचलित प्रथे प्रमाणे दरवर्षी गणेशोत्सव ला देतो, पण लास्ट टाईमला तुम्ही असाच प्रश्न विचारला होता, पण मार्चमध्ये आपण याची प्रोव्हिजन करतो आणि गणपतीला देतो, त्याच्या आधी या वेळेला आपण आधी प्रयत्न केला की गणपतीच्या आधी देता येईल का पुढच्या वेळेला आम्ही प्रयत्न करू की एप्रिल मे च्या आसपास तुम्हाला दिला जाईल बॅलन्स शीट फायनल झाली आम्ही देऊ आणि पुढच्या वर्षी प्रयत्न करू.

**श्री. राम परब (युईडी) :** पण सोसायटीमध्ये असे काही तरतूद आहे का, जे व्याज येईल, त्या मी कुठे टेम्परिरी डिपॉझिट करू शकतो का ? आणि त्याच्यावर आम्हाला किती व्याज मिळेल? आम्ही त्यावेळी पैसा पाच सहा महिने ठेवू.

DRAFT 64th AGM

**श्री. बाहुबली चौगुले (मानद सचिव) :** या सजेशन नुसार आम्ही नक्कीच वर्कआउट करू हे सजेशन खूप छान आहे.

**श्री. दिनेश माने (पीडी) :** हॅलो, सबस्क्रीप्शनवर जे व्याज मिळतं ना ते आम्हाला एप्रिलमध्ये मिळालं पाहिजे, आज एप्रिल, मे, जून, जुलै, ऑगस्ट, तुम्ही ऑगस्टमध्ये दिलं. चार महिने आमचे इंटरेस्ट आहे,  माझा साडेबावीस हजार रुपये होता तर तो चार महिने तुम्ही बिना व्याज वापरला,

**श्री. बाहुबली चौगुले (मानद सचिव) :** जितक्या लवकर बॅलन्स शीट होईल तितक्या लवकर तो वर्ग करण्यात येईल.

**श्री. दिनेश माने (पीडी):** प्रत्येक वर्षी तुम्ही बोलताय की नेहमीप्रमाणे चालेल परंतु माझी एक विनंती आहे तुम्हाला की जेणेकरून ते फायनान्शिअल इयर संपल्यानंतर लगेचच आम्हाला दिलं तर बरं होईल.

**श्री. संतोष ढमढेरे :** माने साहेब तुम्ही जो आता प्रश्न विचारला तो चार्टर्ड अकाउंटंट बरोबर त्यावर डिस्कशन केलं ते म्हणाले की आपली बॅलन्स शीट अप्रूव्ह झाल्या झाल्या आपण इमिजिएट एप्रिल मे महिन्यामध्ये व्याज देऊ शकतो.

**श्री. दिनेश माने (पीडी) :** मान्य ऑडिटर जे बोलतात ते आम्हाला मान्य आहे परंतु एप्रिल मध्ये द्या मे जून मध्ये द्या तुमची बॅलन्स शीट ज्यावेळेला अप्रूव्ह होईल त्यावेळेला द्या पण आम्हाला जेवढं लेट देताय तेवढ्या महिन्यांचं व्याज आम्हाला मिळालं पाहिजे अशी आमची इच्छा आहे.

**श्री. संतोष ढमढेरे :** माने साहेब तुम्ही जे बोलतोय ना ते तशा पद्धतीने शक्य होत नाही, त्याचं कारण सगळे पैसे रोलिंग मध्ये आहेत त्याच्यावर प्रॉफिट मिळतच त्याच्यावर तुम्हाला कंपाऊंड इंटरेस्ट आहे तुम्ही जे बोलताय ते सभासदांच्या खात्यामध्ये पैसे असेही जात आहेत तसेही जात आहेत. आता तुम्ही जो मुद्दा मांडला की एप्रिलमध्ये चार्टर्ड अकाउंटंट म्हणाले की तुम्ही देऊ शकता व्याज तर पुढच्या वर्षी इथून आम्ही तुम्हाला हे करतो की फायनान्शिअल इयर जसा आमचं कम्प्लीट होईल बॅलन्स शीट आपली पास झाली की त्यानंतर आपण त्यांना व्याज देऊन टाकू.

DRAFT 64th AGM

**श्री. राम परब (युईडी) :** मला एक सांगा की तुम्ही सांगितलं की एप्रिलमध्ये आम्ही तुम्हाला ते व्याज देऊ ठीक आहे पण आपल्या सोसायटीमध्ये अशी तरतूद आहे का ? टेम्पररी आम्ही डिपॉझिट ठेवू आम्ही गणपतीला घेऊन किंवा दिवाळीला घेऊ ते जे काही आम्हाला व्याज मिळेल, पाच टक्के माझ्या माहितीनुसार पाच टक्के मिळायला पाहिजे आहे की नाही मला सांगा तरतूद आहे की नाही साहेब.

**श्री. बाहुबली चौगुले (मानद सचिव) :** तुम्ही तुमची अमाऊंट टर्म डिपॉझिटमध्ये ठेवू शकता. एक लक्षात घ्या.

**श्री. राम परब (युईडी) :** मी काय बोलतो तीन महिन्याची सहा महिन्याची तरतूद आहे का? आम्ही इन्वेस्ट करू आमचा डिव्हिडंट आम्ही तिकडे ठेव आम्हाला पाचशे रुपये मिळू.

**श्री. हेमंत कोळी :** सेविंग वर ठेवले तर चार टक्के व्याज मिळेल.

**श्री. राम परब (युईडी) :** ठीक आहे जे काय असेल ते स्कीम आम्हाला सांगा.

**श्री. विलास घोरपडे (एफडी) :** सेक्रेटरी साहेब, हॅलो एनपीए ची फिगर तुम्ही सांगता, ती काहीतरी मिस्टेक होती आहे, आपला एनपीए तेवढा आहेच नाही, ही प्रोव्हिजन का करताय एनपीए तेवढा नाही तर हा मुद्दा आहे .

**श्री. बाहुबली चौगुले (मानद सचिव) :** मी समोर आता इथे व्यासपीठावर मांडले आपल्याला स्टॅंडर्ड ऍसेट नुसार ती प्रोविजन करायला लागते.

**श्री. विलास घोरपडे (एफडी) :** स्टॅंडर्ड काय आपला एनपीए तर तेवढा नाहीच.

**श्री. बाहुबली चौगुले (मानद सचिव) :**तुम्हाला पर्सेंटेज हवाय का ? इथं पर्सेंटेज टाकले ना हे बघा प्रत्येक ॲसेट नुसार परसेंटेज नुसार टाकले आहे

**श्री. संतोष ढमढेरे :** माने सरांनी जो प्रश्न विचारला होता त्यावरती आपल्या बायलॉजमध्ये सबस्क्रीप्शन वरती व्याज बॅलन्स शीट पास झाल्यावरतीच द्यावा लागतं. तर आपल्याला त्या पद्धतीने द्यावे लागेल आणि जर आपल्याला तसं वाटतं की ते एप्रिलमध्ये आपल्याला द्यायचा आहे जर आपल्याला तसे बायलॉज मध्ये चेंजेस करावे लागतील आता एक्सपर्ट कडून आलेला आहे तर त्यानंतर बॅलन्स शीट पास झाल्यानंतर आम्ही लवकरात लवकर ते तुम्हाला देण्याचा प्रयत्न करू.

DRAFT 64th AGM

**श्री. दिलीप राणे (सीडीएम) :**पान क्रमांक 11 सभासद भविष्य सहाय्य निधी बोनस 14 लाख 49 हजार 153 पण हा दहा वर्षांपासून हा बोनस आम्हाला मिळतच नाही.

**श्री. शिवाजी हगवणे :**दहा वर्षापासून तो बोनस आमच्या अकाउंटला जमाच झाला नाही. अध्यक्षांच्या परवानगीने ऍक्च्युली कोळी साहेबांच्या काळातच ही स्कीम चालू झाली होती, डेफिनेटली तुम्ही सांगताय गेल्या वर्षी अजून एक दोन सभासदांच्या वतीने या विषयावर विनंती होती एक्चुअली जुन्या सॉफ्टवेअरमध्ये असल्यामुळे ती फाईल क्रॅश झाली होती, त्याचा डेटा संपूर्ण रिकव्हर झाला आहे .आता डेटा रिकव्हर झाल्याच्या नंतर यावर्षी आपण जो बोनस ज्या पद्धतीने सभासदांना द्यायचा आहे त्याच्यावर आता जो बोनस आहे तो प्रयत्न म्हणजे आपण देऊ ते.

**श्री. दिलीप राणे (सीडीएम) :** हो पण तुम्ही 6 टक्के बोनस म्हणताय प्रत्येक वर्षी तो जर जमा झाला असता तर तो आतापर्यंत वाढला असताना?

**श्री. शिवाजी हगवणे :** डेफिनेटली बरोबर आहे साहेब. डेटा क्रश झाल्यानंतर ती क्रश झालेली हार्ड डिस्क आपण डिपार्टमेंट कडे जाऊन त्यांच्याकडून जाऊन तो डेटा त्यांच्याकडून संपूर्णपणे घेतला आणि आता यावर्षी आपण त्याच्यावरचा तो बोनस आपल्याकडे आहे काही सभासद, रिटायर पण झाले आहेत त्यांचाही तो आहे. माझे सारखे सभासद ज्यांनी तो विथड्रॉवल केला आहे त्याचाही तो बोनस लाभांश हा सगळा लाभांश ज्या पद्धतीने आपण

इंटरेस्ट दिला आणि न घेतलेला डिव्हिडंट जो गंगाजळीमध्ये जात होता, तो आपण विशेष प्रयत्न करून, त्या लोकांना फाईंड आऊट करून, त्यांच्या अकाउंट मध्ये पाठवण्याचा प्रयत्न केला आणि पाठवला, त्याच पद्धतीने हा अलाउन्स प्रत्येक सभासदांच्या पर्यंत पोहोचण्याची ग्वाही या मंचावरून मी तुम्हाला देतो.

**श्री. बाहुबली चौगुले (मानद सचिव) :** माझी विनंती आहे की आता या बॅलन्स शीट ला मंजुरी द्यावी

**श्री.डी.एस राजापुरे (डीआरएचआर) :** आता मला पेज नंबर 40 वर विचारायचा आहे आपण बुडीत कर्ज निधी आणि एनपीए असे वेगळे वेगळे फंड क्रियेट केले आहेत पेज नंबर 40 वर आपण लायबिलिटी मध्ये, बुडीत कर्ज निधी हा वन करोड 98 लाख दाखवते आणि परत एनपीए अडीच कोटीची प्रोविजन यावर्षी करतोय दोन दोन वेगळे हेड हे एकाच हेतूसाठी दिसत आहेत असं मला वाटतंय? एनपीए आणि बुडीत कर्ज निधी ची तुम्ही अडीच कोटीची प्रोव्हिजन केली यावर्षी हे बघा? उत्पादित कर्ज एनपीए तरतूद हे असं तुम्ही लिहिलंय अडीच कोटी आणि ऑलरेडी आपली जुनी वन करोड 98 लेक ची आपली तरतूद आहे.

**श्री. बाहुबली चौगुले (मानद सचिव) :** दोन नाही, साहेब वरचा बघा तो फंड आहे आणि खालची आहे ती प्रोव्हिजन आहे

DRAFT 64th AGM

**श्री.डी.एस राजापुरे (डीआरएचआर) :** पण शेवटी जे कर्ज आहे त्यासाठीच आहे ना.

**श्री. बाहुबली चौगुले (मानद सचिव) :** तो आधीचा फंड करून ठेवलेला आहे आणि आता या आर्थिक वर्षामध्ये आपण त्याची प्रोव्हिजन करून ठेवली

**श्री.डी.एस राजापुरे (डीआरएचआर) :** तुम्ही अलग तुम्ही अलग हेड करून का टाकलं, तुम्ही त्याच फंडात टाकायचं ना ?

**श्री. शिवाजी हगवणे :** अध्यक्षांच्या परवानगीने ऍक्च्युली साहेब कसा आहे की बुडीत कर्ज निधी ही पूर्वीपासून एक डाऊटफुल डेप्थ होतं आणि पूर्वीपासून हे फंड काढलेला होता की जो एखादा सभासद असेल ज्यांनी कर्ज काढलं त्याचा मृत्यू झाला त्याची जामीनदार सुद्धा मृत्यू झालेले आहेत, अशा भरपूर जुन्या केसेस आपल्याकडे आहेत, तर यांचं डाऊटफुल जे डेप्थ आहे ते कर्ज माफ करण्यासाठी सभागृहामध्ये त्या केसेस आणून सभागृहाच्या अनुमतीने ती गरजे आपल्याला निरस्त करता येऊ शकतात हा त्यासाठीचा निधी आहे , एक निधी आहे आणि एक फंड प्रोविजन आहे, सहकार खात्याच्या नियमाप्रमाणे आता गेल्या वर्षीपासून, साहेबांनी सांगितलं की जे एन पी एम मध्ये जातं आणि एनपीए मध्ये गेल्यानंतर 5%, 180 दिवसांच्या पुढे गेल्यानंतर हंड्रेड परसेंट त्याच्यासाठीची

ती प्रोविजन केली गेली आहे. काय होतं साहेब जे डाउट फुल खर्च आहे तो गेला म्हणजे ते डाऊट फुल आहे, पण एनपीए हा फिरत असतो म्हणजे एखाद्या सभासदाने कर्ज काढलं त्याचं जर तीन महिने जर ईएमआयआला नाही तर तो एनपीए मध्ये घेतो, त्याचं काय होतं त्याचा इ एम आय आला तो रेग्युलर झाला की तो एनपीए मधून बाहेर जातो, दुसरा सभासद एनपीए मध्ये जातो ही सर्वस्वी शासनाची प्रोव्हिजन या पद्धतीने केली आहे आणि तशा पद्धतीचं परिपत्रक आहे म्हणून यावर्षी आपण ऑडिटर चे रिमार्क होते त्याच्यामुळे आपणही प्रोव्हिजन केली आहे हे दोन्ही हेड वेगळ्या वेगळ्या कारणासाठी वापरायचे आहेत.

**श्री.डी.एस राजापुरे (डीआरएचआर) :** दुसरा प्रश्न आहे पेज नंबर 50 वर, जसं मी संस्थेला लेटर दिलं होतं मला व्हाउचर बघायचे आहेत, त्यानुसार मी बघितले आणि त्याच्यामध्ये जे बराबर दिसलं नाही त्यामुळे हा प्रश्न आहे की, आऊटस्टँडिंग लॅबिलिटीज फॉर प्रिंटिंग अँड स्टेशनरी हा एक लाख 75 हजार 604 जो दिसतो, आहे तो माझ्या माहितीनुसार किंवा मी जे वाचन केले आहे त्यानुसार आपली लास्ट मंथली मीटिंग 28 मार्चला झाली आणि तुम्ही जे व्हाउचर बनवले आहे 31 मार्च च्या तारखेला दाखवून त्याची प्रोव्हिजन केली किंवा त्या तारखेला तू काही नवीन बिल आली 28 तारखेच्या मीटिंगमध्ये ही बिल नव्हती, 28 तारखेला तुम्ही तुमचं इयर एंडिंग क्लोज केलं ऑफिशिअल मीटिंग घेऊन, पण तुम्ही 31 तारखेला परत प्रोव्हिजन केली. पण 28 तारखेनंतर संस्थेत काही बिले आली. सर्व 15 कमिटी मेंबर्स ला माहित आहेत का आहेत का? कारण तुम्ही 28 तारखेला जो अजेंडा काढला होता तो मला दाखवला नाही, काल साडेपाच वाजेपर्यंत मी मागितला तुम्हाला दाखवला नाही, त्या अजेंडा मध्ये तुम्ही त्या महिन्याची खर्चाची तरतूद किती केली होती जे तुम्ही इंटरनल सर्क्युलेट करता, तो पेपर मी मागितला होता तो तुम्ही दाखवला नाही म्हणून मला डाउट आला मी पुन्हा बॅलन्स शीट ची स्टडी केली तर तुमच्या बुक मधली फिगर आणि जेव्हा मी वाउचर बघितले त्यावर मध्ये बॅलन्स नव्हती नंतर चौगुले साहेबांनी काही बिले दाखवली 29 मार्चची आहेत पण तुमची मीटिंग 28 मार्चला झाली होती, तर असं संस्थेमध्ये चालतं का आणि हे फक्त दोन-चार लोकं करतात काही सगळ्यांना माहित आहेत का? मला पडलेला प्रश्न आहे तो मी विचारला.

DRAFT 64th AGM

**श्री. बाहुबली चौगुले (मानद सचिव) :** तुम्ही काल संध्याकाळी मला भेटून गेला, त्यानंतर मी सरांना पण विचारलं, सगळी बिले काढली पण तोपर्यंत तुम्ही निघून गेला होतात, तुम्ही जी बिल एक लाख 75 हजार ची विचारत आहात ती त्या दिवशी ते बिल पण मी तुम्हाला दाखवलं.

**श्री.डी.एस राजापुरे (डीआरएचआर) :** नाही सर सगळी वेळ तुम्ही दाखवली नाहीत सगळी बिले अजूनही दाखवली नाहीत,

**श्री. बाहुबली चौगुले (मानद सचिव) :** सोमवारी सकाळी तुम्ही या मी सगळी बिले तुम्हाला दाखवतो.

**श्री.डी.एस राजापुरे (डीआरएचआर) :** नाही पण ही काम करण्याची पद्धत चुकीची आहे हे मला सभागृहाच्या निदर्शनास आणून द्यायचे आहे की 28 तारखेला तुम्ही मीटिंग घेता इयरइंडची त्यात प्रोविजन करता आणि 31 तारखेला वाउचर लिहून प्रोविजन करता मग हे बाकीच्या सभासदांना मान्य आहे का. 28 तारखेला अजेंडा तुम्ही फिरवला पंधरा लोकांना माहित आहे, पण जेव्हा हे तुम्ही केलं हे पंधरा लोकांना माहित नाही, हे चुकीचे होत आहे हे चुकीचे व्हायला नको कारण तुम्ही 29 तारखेची बिले बॅलन्स शीट ला जोडली हे बाकीच्या लोकांना माहित आहे का सेक्रेटरी साहेब, एक सेक्रेटरी साहेबांना मी विचारतो सेक्रेटरी साहेबांनी 28 तारखेला मिनिट्स मध्ये क्लिअर कट केला आहे, की मी आजपासून मी संस्थेचा सेक्रेटरी नाही मी मिनिट्स मध्ये वाचलं, हगवणे साहेब बरोबर असं तुम्ही मांडले मिनिट्स मध्ये मग 31 तारखेला बिले आली ती तुम्हाला माहीत होती का कारण, 31 तारखेपर्यंत लायबिलिटी आहे as a सेक्रेटरी, तुम्हाला हे माहीत होतं कारण मी जेव्हा तुमची डॉक्युमेंट्स चेक केले त्यावेळी मला हे निदर्शनास आलं सर तुम्ही परत संस्थेच्या कार्यालयात या त्या दिवशी तुम्हाला डेट बिल मिनिट्स आहे हे परत एकदा तुम्हाला दाखवण्यात येईल नाही ते सेक्रेटरी होते मग त्यांना माहीत होतं का हे मी त्यांना विचारतोय ते सेक्रेटरी 31 तारखेपर्यंत ऑफिशियल होते ना मग त्यांना माहीत होतं का

**श्री. बाहुबली चौगुले (मानद सचिव) :** सर मी त्या दिवशी तुम्हाला म्हटलं जी प्रोव्हिजनची बिल आहेत.

DRAFT 64th AGM

**श्री.डी.एस राजापुरे (डीआरएचआर) :** साहेब, हे बघा तुमची मीटिंग झाली 28 तारखेला 28 तारखेला तुमचं इयर क्लोज झालं ऑफिशिअली तुम्ही केलं आणि 29 तारखेला तुम्ही बिल घेतलं एवढी काय घाई होती ते परचेस करायचे तुम्हाला.

**श्री. बाहुबली चौगुले (मानद सचिव) :** सर तुम्ही संस्थेमध्ये या याचा सगळा खुलासा तुम्हाला मी तुम्हाला देतो

**श्री.डी.एस राजापुरे (डीआरएचआर) :** मला संस्थेला एकट्यामध्ये येऊन नव्हे,

**श्री. बाहुबली चौगुले (मानद सचिव) :** टेकनिकली त्यांनी राजीनामा दिला, पण संस्थेने जी कामे दिली होती, त्याचीच ती बिली होती, ही त्यांच्याच कार्य काळामध्ये, ती काम दिलेली आहेत आणि तीच बिले पास झाली आहेत, त्यामुळे त्यांना त्याची माहिती असणारच आहे,.

**श्री.डी.एस राजापुरे (डीआरएचआर) :** त्यांनी त्या प्रश्नाचं उत्तर दिलं नाही हगवणे साहेब, मी तुम्हाला प्रश्न विचारला 28 तारखेला तुम्ही राजीनामा दिला 29 तारखेला संस्थेमध्ये काही मटेरियल आलं, त्याची जी बिले संस्थेमध्ये आली 29 आणि 30 ला आणि ती बिले तुम्हाला आणि तुम्ही राजीनामा दिला कारण तुम्ही मिनिट्स बुक वर सही नाही केली, त्याच्या मागचा गौडबंगाल काय आहे, तुम्ही मिनिट्स बुक वर सह्या का नाही करत,

मंथली मीटिंगचं मिनिट्स लिहिले हे सगळं त्यात जमाखर्च लिहिला आहे, मग तुम्हाला माहीत होतं तर तुम्ही सही का केली नाही, चेअरमन साहेबांनी सही नाही केली आणि सेक्रेटरी सही नाही केली, 28 मार्च च्या मंथली मिटींगला दोघांच्याही सह्या नाहीत साहेब, आम्ही कसं अजून करायचं किती बिले पास केली आहेत, तुम्हाला मान्य आहेत तुम्हाला सगळे माहित आहे हे सगळे मागण्या मागचं कारणच आहे की तुम्ही ट्रान्सपरंट कारभार करता की नाही असं तुम्ही म्हणतात पण तसे दिसत नाही.

**श्री. बाहुबली चौगुले (मानद सचिव) :** सर कार्यालयामध्ये या मी तुम्हाला परत सगळी माहिती देतो, सोमवारी या सगळी माहिती सांगतो

**श्री.डी.एस राजापुरे (डीआरएचआर) :** मग जनरल बॉडी कशाला ठेवायची कार्यालयातच बोलवा वर्षभर आम्हाला,

**श्री. हेमंत कोळी :** राजापुरे साहेब तुम्ही सोमवारी या.

DRAFT 64th AGM

**श्री. बाहुबली चौगुले (मानद सचिव) :** राजापुरे सर, सोमवारी या, सगळं समाधान मी तुमचं करून देतो, फाईल चेक करायला लागतील, मिनिट चेक करतो.

**श्री.डी.एस राजापुरे (डीआरएचआर) :** मी काय बोललो ती चार बिले एक लाख 75 हजार ची बिले हगवणे साहेबांनी पाहिली का याचं उत्तर त्यांनी दिलं नाही ते गप्प का बसले आहेत, ते का गप्प बसलेत त्यांनी एक लाख 75 हजार ची विले पाहिली आहेत का, त्यांनी हो म्हणावं किंवा नाही म्हणावं कारण त्यांनी 28 तारखेला मिनिट्स मध्ये क्लियर कट लिहिलय की आजपासून संस्थेचा सचिव या नात्याने राहणार नाही, मी वाचले मग 29 तारखेला संस्थेमध्ये आलेली बिले आणि 31 तारखेला.

**श्री. बाहुबली चौगुले (मानद सचिव) :** सर मी तुम्हाला परत एकदा विनंती करतो की ती सोमवारी संस्थेच्या ऑफिसमध्ये या हगवणे साहेब असतील संचालक मंडळ असेल.

**श्री. विलास घोरपडे (एफडी) :** संस्थेमध्ये त्यांनी येऊन बघितले त्याचवेळी ते तुमच्याशी बोलत आहेत पुन्हा बघायला बोलावताय हे चुकीच आहे.

**श्री. बाहुबली चौगुले (मानद सचिव) :** विलास घोरपडे जी त्यांनी असंच मांडलेलं नाही, मी याबद्दल काहीही दुमत मांडत नाही. विलास घोरपडे जी काल संध्याकाळी जेव्हा साहेब संस्थेमध्ये आले होते साडेपाच वाजता,

निघून गेले,त्यावेळी देखील मी हे सगळं काढून ठेवलं होतं. त्यांना विनंती केली होती, कार्यालय मध्ये या तुमचे सगळे डाउट्स क्लिअर करतो,

**श्री. विलास घोरपडे (एफडी) :** पहिल्या सचिवांनाच बिले माहित नाहीत असं वाटायला लागले.

**श्री.एस.एस.महाजन (एफआरडी):**: एकूण चर्चा पाहता चौगुले, सांगा त्यांना माहीत नाही म्हणून, साहेब व्हाउचर वर बिले लक्षात येतं, ऑडिटर साहेबांनी पण बोलावं, तुम्ही पण बोलावं, जर तुमचं 28 तारखेला इयर एंडिंग क्लोजिंग झालं याचा अर्थ तुमचा त्या फायनान्शिअल इयरचा पूर्ण जमा खर्च झाला, त्यानंतर जो काही तुम्ही जमा खर्च कराल तो पुढच्या आर्थिक वर्षात जाईल मग ती 29 तारखेला संक्शन केलेली बिल कमिटीने फायनान्शियल एअर क्लोजिंग केल्यानंतर पुन्हा ॲड का केली कशी आली?

**श्री. बाहुबली चौगुले (मानद सचिव):** सर, प्रोविजन असतात त्या नेक्स्ट फायनान्शिअल इयरला जातात त्या वर्षात खर्च झाले नाहीत त्याचे पेमेंट होत नाही ते नेक्स्ट फायनान्शिअल इयरला जाऊन पडतं.

DRAFT 64th AGM

**श्री. डी.एस धोत्रे (सीडीएम):** सेक्रेटरी साहेब जर आता साहेबांनी बघितलं फाईल बघितली आहे, वाउचरच्या एक लाख 75 हजार च्या जर 28 तारखेच्या नंतर सेक्रेटरी साहेबांनी सांगितलं की मी लायबिलिटी किंवा मी सही करायला त्याच्यावर लायबल नाहीये तर 29 30 तारखेची बिल असतील ते ऑडिटरच्या निदर्शनास आले का ऑडिटरला आपण भरमसाठ फी देतो ऑडिटरने त्याच्यावरती काही रिमाक्स केले आहेत का? राजापुरे साहेबांना कळतं मग एवढे जर आपले निष्णात ऑडिटर आहेत, ऑडिटरच्या डोळ्याखालून ते कसं गेलं नाही त्यांची रीमार्क्स आहेत की नाहीत.

**बाहुबली चौगुले (मानद सचिव):** धोत्रे साहेब या प्रोव्हिजन्स आहेत.

**श्री. डी.एस धोत्रे (सीडीएम):** 29 तारखेची बिल प्रोव्हिजन कशी असतील प्रोव्हिजन म्हणजे तुम्ही करायचा आहे आणि बिल आली म्हणजे तुम्ही घेतले, अहो तुम्ही संस्थेच्या कार्यालयात या म्हणजे आम्ही सगळे व्हाउचर तुम्हाला दाखवतो अहो दाखवले ना राजापुरेंनी बघितले ना बाबा ऑडिटरचा काही रिमार्क आहे का ऑडिटरला बोलू दे त्यांनी बघितले आहे का जो क्लियर है वो क्लियर है त्यांना बोलू दे ना.

**श्री.डी.एस राजापुरे (डीआरएचआर) :** शिवाजी कुठे गेले? शिवाजीने माझ्या प्रश्नाचे उत्तर दिले नाही, तुमचाच विषय आहे कारण ते त्यावेळी सेक्रेटरी होते, शिवाजीने त्या प्रश्नाचे उत्तर द्यावं हा किंवा ना ते न्यूट्रल राहतात म्हणजे काय?

**श्री. डी.एस धोत्रे (सीडीएम):** नाही, शिवाजीचे नाही ऑडिटरच्या डोळ्याखालून का गेले नाही? ऑडिटरला फी दिली ना आपण, ते जाऊ दे सेक्रेटरीनी सही केली नाही? ऑडिटरने कार्य मार्क मारले नाहीत.

**श्री. विलास घोरपडे (एफडी) :** नाही त्यांचं उत्तर द्या. कस आहे माहिती आहे का? अहो सोमवार काय, आम्ही पंधरा दिवस झालं येतोय, एकेक तास बसवता तुम्हाला वाटतं की हे जातील.

**श्री. बाहुबली चौगुले (मानद सचिव):** मी सभागृहाला विनंती करतो की सात वाजत आलेत आपल्याला अजून बरेच अजेंडा पास करायचे आहेत.

**श्री.मनोज वाडेकर (आरईडी):** कोळी साहेब जवळपास मी दोन वाजता आलो होतो, वॉचर बघायला मला पावणे चार वाजता फाईल देण्यात आली, जरा ते तुम्ही जे बोलताय, या आम्ही दाखवतो तर तिथं आल्यानंतर खूप अडवणूक होते, ती प्लीज सगळ्यांसमोर मी सांगतो, मी संस्थेचा मी आमचाही वेळ थोडासा वेळ लक्षात घ्या आम्ही वाटल्यास तुम्हाला फोन करून आधी येतो मोरे साहेबांना मोरे साहेब त्यावेळेला उत्तर काय देतात की चेअरमन साहेबांचा माझ्याकडे फोन येईल किंवा ते मला संमती देतील त्यावेळी मी देईन मग त्यांची संमती आल्यानंतर ते दुसऱ्याचे नाव घेतात ही पद्धत चुकीची आहे ना आम्ही एखादी गोष्ट मागितली आहे तुम्हाला तिथे बसून तुम्ही कॅमेरे लावलेले आहेत सगळ्या गोष्टी आहेत आणि मग दोन ला आलेला माणूस पावणेचार पर्यंत बसतो आणि तो साडेचारला निघून जाईल म्हणजे याच्या पाठी त्याला दमवायचा आणि तो वैतागून निघून गेला पाहिजे आणि मग हे तुमची पद्धत आहे का

DRAFT 64th AGM

**श्री. बाहुबली चौगुले (मानद सचिव):** वाडेकर साहेब साहेब मला एकच गोष्ट बोलू द्या.

**श्री.मनोज वाडेकर (आरईडी):** बाहुबली साहेब हा महत्त्वाचा प्रश्न आहे.

**श्री. बाहुबली चौगुले (मानद सचिव):** वाडेकर साहेब संस्थेचा मानद सचिव या नात्याने मी गेल्या महिन्याच्या बावीस तारखेपासून मेडिकल लिव वर आहे, या काळात कुठल्याही सभासदांनी काही प्रश्न संस्थेकडे दिले असतील त्याला उत्तर द्यायला त्याला काही दिरंगाई झाली, असेल तर मी त्याची दिलगिरी व्यक्त करतो, माझा प्रयत्न होता की माझ्या संपूर्ण संचालक मंडळाने सगळ्या प्रश्नांचे उत्तर द्यावं, थोडीशी दिरंगाई झाली असेल तर दिलगिरी व्यक्त करतो, अजूनही राजापुरे साहेबांना विनंती करतो की या तुम्ही अजूनही कुणाला यायचं असेल, त्यांनीही या मी सर्वांना उत्तर देतो.

**श्री.मनोज वाडेकर (आरईडी):** एक मिनिट, ऐका ना तुम्ही जे दिलगिरी व्यक्त करता,मी तुम्हाला दाखवतो मी केवढे लेटर दिले आणि त्यावर तुमची उत्तर काय असतात, मागील वर्षांमधील त्या अहवालाचा, अरे आता बॅलन्स शीट कशी येईल याच उत्तरावर येईल ना एखादी गोष्ट मागितली बिल्स आणि व्हाउचर तुम्ही काय सांगता हे मागच्या वर्षीच्या बिल आणि वाउचर मध्ये क्लियर झाले आहे पास झाले आहे ते तुम्हाला दाखवू शकत नाही आणि यावर्षीची बिल्स आणि वाउचर एजीएम झाल्यानंतर दाखवण्यात येतील याचा काय मेळ आहे, तुमच्या उत्तराचा तुमची साईन आहे, आता बोला की तुम्ही जे वागताय ते बरोबर वागताय का ? सर अगोदरची बिल आपली वार्षिक सभा झाल्यानंतर ती पारित झाल्यामुळे ती दाखवता येत नाहीत आणि यावर्षीची मागितली तर तुम्ही बोलताय किती पारित झाल्यानंतर दाखवता येतील तुमच्याच उत्तरात विसंगती येत आहे, तुमचे पेपर्स दाखवतो वाटल्यास

**श्री. प्रभात सिंग (सीडीएम):** सेक्रेटरी सर, आपका कहना ठीक है.

**श्री. बाहुबली चौगुले (मानद सचिव):** तुम्ही म्हणताय की 32 कलमाच्या अंतर्गत द्या, मध्ये जेवढे देता येतं ते सगळं द्या.

DRAFT 64th AGM

**श्री.मनोज वाडेकर (आरईडी):** प्लीज मी बील आणि वाउचर मागितली होती त्याचं उत्तर असं मिळालं की मागील वर्षाचे आर्थिक वर्षातील बिल्स आणि व्हाउचर पास झालेली आहेत ते तुम्हाला दाखवता येणार नाहीत आणि या आर्थिक वर्षातील बिल्स आणि वोउचेर तुम्हाला जे बघायचे आहेत ते एजीएम पास झाल्यानंतर तुम्हाला दाखवण्यात येईल.

**श्री. बाहुबली चौगुले (मानद सचिव):** एजीएम पास असं नसेल, साहेब ऑडिट नंतर असेल.

**श्री. प्रभात सिंग (सीडीएम):** एक मिनिट, सर बार बार एक आदमी को जो जवाब देते है, की आपको ऑफिस मे दिखा देंगे, ये इस तरह का मत करो की आजाओ चुकी मे दिखायेंगे, ऐसा मत करो. साब आपके जो मॅनेजर है जब उनसे बात करने जाते है, तो क्या करते है मालूम है. सबसे पहले आपने जेबसे इतनी गोलिया दिखाते है. कि देखो मुझे बीपी की प्रॉब्लेम है, मुझे डायबिटीस है.

**श्री. बाहुबली चौगुले (मानद सचिव):** कोणाच्या दुखण्यावर जाऊ नका, माझी तुम्हाला विनंती आहे तो त्यांचा प्रश्न आहे, व्यक्तिगत का जाताय ? एखाद्यावर तुम्ही कसं बोलू शकता,

**श्री. प्रभात सिंग (सीडीएम):** जब आपके हर एक बात को राजापुरे साहेब विरोध कर रहे है, वो आपके हर एक बात को पकड रहे है, तो आप सलाकर राजापुरे साहेब को रखो, वहा पर उनको, वहा पे पोस्ट दो, ना बैठेंगे आपके

पास मे उनको प्रपोज करिये चार साल से राजापुरे जी आपकी हर एक कमिया पकड रहे है, तू राजापुरी जी को सलाहकार क्यू नही बनाया उनको क्यू नही, पूजा नही.

**श्री. बाहुबली चौगुले (मानद सचिव):** राजापुरे साहेबांना आम्ही संस्थेत या म्हणतो, नेहमी येतात सकाळपासून संध्याकाळपर्यंत येतात.

**श्री. बाहुबली चौगुले (मानद सचिव):** मला असं वाटतं प्रभात जी सगळे डॉक्युमेंट्स राजापुरे साहेबांना दाखवले आहेत, त्यांनी सांगावं की दाखवलं नाही,

**श्री. विवेक भागडीया :** साहेबांच्या परमिशनने बोलतोय, राजापुरे साहेब मी स्वतः तुमच्या सोबत तीन-चार दिवस बसलोय, आपण एकदम सविस्तर चर्चा केली जेवढं मी तुम्हाला सॅटिस्फाय करू शकतो, तेवढे मी तुम्हाला सॅटिस्फाय केलेले आहे तरीपण तुमचे डाऊट्स आहेत तर आपण मंडेला सोसायटीमध्ये बसूया

**श्री. हेमंत कोळी :** सॉल करूया.

DRAFT 64th AGM

**श्री.डी.एस राजापुरे (डीआरएचआर) :** ठीक आहे

**श्री. विलास घोरपडे (एफडी) :** हे बघा एजीएम झाल्यानंतर सोमवारी तुमचा तो कुठलातरी नियम लागू आहे ना, एजीएम झाल्यानंतर काही दाखवता येत नाही तो, सोमवारी आम्हाला लागू राहील,आता वर्षभर लागू करायचा नाही तर असेल तर बरे

**श्री. हेमंत कोळी :** सोमवारी दाखवतो या सगळ्यांनी.

**श्री. विलास घोरपडे (एफडी) :** तो वर्षभर नियम लागू करायचा नसेल तर आम्ही यायला तयार आहोत, ठीक आहे माझा प्रश्न दुसरा एक आहे आणि विसरतो ना यार तुम्ही गडबड करता आकस्मित दायित्व एक नवीन हेड आले आहे या वर्षात, तशी थोडी आहे ना सविस्तर ना सभागृहाला माहिती द्या, पेज नंबर सांग ना हा पेज नंबर 11 मध्ये. हे आकस्मित का आले, काय आकस्मित तुम्ही काय करणार आहात का आकस्मित काही झालंय त्याची आम्हाला सविस्तर माहिती पाहिजे आहे.

**श्री. सचिन सोळसे (एचपीडी):** माननीय अध्यक्ष यांना मी एक कळकळीची विनंती करतो, अध्यक्षांना माझी एक कळकळीची विनंती आहे गेल्या आठवड्यात माझ्याबरोबर माझ्या च्या बाजूला ,माझ्या वर्ड मध्ये बाहुबली

हा ऍडमिट होता, त्याची किडनी आणि बाकी सर्व पॅरामिटर हे खूप नाजूक आहेत, साहेब हेल्थ इज वेल्थ, तुम्ही खाली बसून बोला सभेची मान्यता घेऊन बोला.

**श्री. बाहुबली चौगुले (मानद सचिव):** धन्यवाद साहेब, विलास जी तुमचा जो प्रश्न आहे तो नफा विभागणी मध्ये पुढच्या याच्यात येतो तुम्ही आत्ताच हा प्रश्न उपस्थित करून नफा विभागणीला मंजूर दिली तर मला अजून चांगलं होईल, लोकांचे डिव्हिडंट लोकांच्या खात्याला पडतील

**श्री.डी.एस राजापुरे (डीआरएचआर) :** पेज नंबर 52 वर आपण ज्या एस एल एफ च्या डिपॉझिट केले होते, सिक्स पी मध्ये आणि सिक्स जी मध्ये आपण प्री मॅच्युअर काढल्या का? का आपण मॅच्युरिटी नंतर काढल्या ? सारस्वत बँकेमध्ये चार कोटी 48 लाख होते आणि पेज नंबर 52 ला हो पेज नंबर 52 आणि टिळक नगर बँकेत एक कोटी 34 लाख होते पण आपण ते मॅच्युरिटीला काढले का प्रि मॅच्युरिटीला काढले

**श्री. बाहुबली चौगुले (मानद सचिव):** सगळे मॅच्युरिटीला काढले आहेत आणि री इन्वेस्ट केले आहेत.

DRAFT 64th AGM

**श्री.डी.एस राजापुरे (डीआरएचआर) :** जर मॅच्युरिटी ला काढले आहेत असे तुम्ही म्हणता तर गेल्या वर्षी आपलं ऍक्युअर्ड इंटरेस्ट मध्ये गेल्यावर्षीची प्रोव्हिजन केली होती त्या बँकेच्या अगेन्स यावर्षी आपल्याला त्या बँकेकडून मिळालेला इंटरेस्ट तो मॅच होत नाही, मग जर तुम्ही मॅच्युरिटीला काढले तर बिफोर काढले असले तर बरोबर आहे.

**श्री. बाहुबली चौगुले (मानद सचिव):** मॅच्युरिटीला काढले आहेत, बँकेने आपल्याकडे त्याचे इंटरेस्ट सर्टिफिकेट, येथे सायमल टेनिस ली ते 26 AS मेंशन होतं, जे बँक देते तेच घेतो.

**श्री.डी.एस राजापुरे (डीआरएचआर) :** म्हणजे यावर्षी चुकीचे दिले का गेल्या वर्षी चुकीचे दिले होते.

**श्री. बाहुबली चौगुले (मानद सचिव):** दोन्ही पण बरोबर आहे,

**श्री.डी.एस राजापुरे (डीआरएचआर) :** मग बरोबर आहे तर बॅलन्स शीट ला मॅच होत नाही म्हणून तर विचारलं मॅच्युरिटीला काढल्या की प्री मॅच्युरिटी ला काढल्या, नाही मी दाखवू का तुम्हाला आपल्याकडे बँक सर्टिफिकेट दाखवू का तुम्हाला राजापुरे नाही, तुम्ही जर म्हणताय तर मी दाखवतो असं काही प्रॉब्लेम नाही सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँकेकडून गेल्यावरती आपल्याला असेट मध्ये दाखवलं होतं. सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँकेतून गेल्या वर्षी आपल्याला असेट मध्ये दाखवले आहे, 35 लाख 1000 येणे इंटरेस्ट दाखवला आहे असे मध्ये, आणि यावर्षी

आपल्याला यामध्ये सारस्वत बँकेकडून पाच लाख तीस हजार मिळालेले दाखवला आहे, मग मग जर तुम्ही फ्री मॅच्युअर नाही काढलं जेवढे गेल्यावर्षी दाखवलं तुम्ही तेवढं यायला पाहिजे होतं.

**श्री. बाहुबली चौगुले (मानद सचिव):** त्या दिवशी सर यार्ड इंटरेस्टच्या वरती पेज नंबर 53 च्या वरती ज्या फिगर आहेत या अगदी परफेक्ट आहेत तीच अमाऊंट आहे, त्याच्यामध्ये जो इंटरेस्ट सर्टिफिकेट मधून सुद्धा येतो तुम्हाला काही डाउट असेल तर तुम्ही या

**श्री.डी.एस राजापुरे (डीआरएचआर) :** मग गेल्यावर्षी चुकीचे दाखवला का.

**श्री. बाहुबली चौगुले (मानद सचिव):** नाही.

**श्री.डी.एस राजापुरे (डीआरएचआर) :** मग पैसे गेले कुठं अहो इन्वेस्टमेंट होते ना इन्व्हेस्ट केले तिथं त्या बँकेत पैसे काढून घेतले तुम्ही त्या बँकेत आता पैसे नाहीत ठीक आहे.

**श्री. बाहुबली चौगुले (मानद सचिव):** डाउट येत असेल तर ती पण फिगर आम्ही तुम्हाला चेक करून सांगतो, सोमवारी या.

DRAFT 64th AGM

**श्री.मनोज वाडेकर (आरईडी):** अध्यक्ष महोदय, पेज नंबर 47 वर मेंबर वेल्फेअर फंड मध्ये एक्सप्रेस फोर रिटायर मेंबर्स, ड्यूरिंग द इयर याच्यात जी फिगर दाखवली आहे ती जवळपास एक करोड ते 30 लाख 71 हजार 211 रुपये दाखवली आहे, तर ही फिगर आपण माझ्या माहितीप्रमाणे सभासदांच्या ज्या भेट वस्तू देतो. सन्मानचिन्ह देतो, शाल आणि काही राशी जी, त्यांचे पर इयर इंटू 500 बरोबर आहे, परंतु शाल विषय ना मला थोडासा डाऊट आहे, त्याच्याविषयी मला थोडंसं बोलायचं आहे, सोसायटीची बिल्स आणि वाउचर ची फाईल बघितली असता, दिनांक 19/ 4/ 2024 इंवोईस नंबर 96 आणि वाउचर JV 10195 डेट आहे 25 एप्रिल 2024 रोजी आपल्या संचालक मंडळाने मेंबर्स वेल्फेअर फंडातून संगम टेक्स्टाईल या काळबादेवी मुंबई, येथून 100 शाल 350/- रुपयांनी आणि 50 शाल 280 रुपये विकत घेतल्या त्यानंतर लगेचच दोन महिन्यांनी बिल्स अँड व्हाउचर ची फाईल दाखविल्याप्रमाणे, वाउचर मध्ये JV 224 ,06 जून 2024 रोजी हेमंत टेक्सटाईल, ओल्ड लक्कड मंडी अमृतसर पंजाब, येथून 350 शॉल 500/-रुपये प्रति नग पद्धतीने प्रमाणे विकत घेतल्या, एप्रिल 2024 मध्ये संगम टेक्सटाईल मुंबई मधून तुम्हाला 280 रुपये प्रमाणे शॉल मिळत होती, तर लगेच दोन महिन्यानंतर तुम्ही अमृतसर येथून रेल्वे शिपिंगने 500 रुपये प्रति प्रमाणे का शॉल विकत घेतली? अजून जरा थोडसं, मग एक साथ तुम्ही एक्सप्लेन करा, अमृतसर येथील हेमंत टेक्स्टाईल मधून यांनी ज्या 350 शॉल विकत घेतल्या त्या 500/- रुपये प्रति नगाने, जर आपण बघितलं तर त्या 75 हजार प्लस 5% GST जर आपण बघितलं तर एकूण एक लाख 83 हजार 750 रुपये

दिसतात, पण जर ही शाल त्यांनी दोन महिने अगोदर विकत घेतलेल्या संगम टेक्सटाईल मुंबई इथून विकत घेतली असती तर साडेतीनशे इंटू 200 98000 म्हणजेच प्लस फाईव्ह पर्सेंट जीएसटी जर आपण मिळवला तर एक लाख 2 हजार 900 रुपये इतकी किंमत झाली, असती म्हणजेच सोसायटीचे जवळपास 80 हजार 850 रुपये वाचले असते, मग आता तुम्ही सांगा अमृतसरवरून 80 हजार 850 रुपयाची महाग शाल आणायची काय गरज होती.

**श्री. संतोष ढमढेरे :** धन्यवाद वाडेकर साहेब, तुमच्या प्रश्नाचे उत्तर देतो ऍक्च्युली ह्या ज्या सगळ्या गोष्टी या एप्रिल 2024 मध्ये संगम टेक्सटाईल मधून आपण या शाल घेत होतो त्या सभासदांना वाटत होतो, बीआरसी आस्थापना सुद्धा आपल्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा सत्कार करते, शाल देऊन तर तिकडे जा शाल होत्या त्याची क्वालिटी चांगली होती. सभागृहामध्ये आपले सभासद ज्यावेळेला इकडे आले त्यावेळेला तिने सांगितले की तिकडे आम्हाला कॉलिटी चांगली मिळते आम्ही स्वतः ते बघितलं संचालक मंडळाच्या मीटिंगमध्ये तो विषय झाला त्यामध्ये असं ठरवलं की संचालक मंडळाने की जी शॉल तिकडे सभासदांना मिळते, तिकडून तशी शाल आपण घेऊया त्यामुळे त्यानंतर आपण BARC आस्थापनेमध्ये चौकशी करून चौकशी केल्यानंतर ते जिथून ओपन टेंडरिंग मध्ये ते जिथून शॉल घेतात तिथून आपण शॉल मागवली आणि ती शॉल आपण तिकडून घेतली आणि तुम्ही जो काही बिल व्हाट्सअप वरती व्हायरल केला होता त्याच्यामध्ये तुम्ही जे म्हटलं होतं मी नाही व्हाट्सअप वरती व्हायरल केलं कोटेशन आणि मुळात मी व्हाट्सअप वरची गोष्ट करत नाही.

DRAFT 64th AGM

**श्री.मनोज वाडेकर (आरईडी):** तुम्ही इथली गोष्ट करा.

**श्री. संतोष ढमढेरे :** त्याच्याबरोबर तुम्ही ज्यावेळी त्या गोष्टी सगळ्या व्हाट्सअप वरती ज्या पद्धतीने मांडल्या.

**श्री.मनोज वाडेकर (आरईडी):** परत तुम्ही व्हाट्सअप वर गेलात, मी इथे ज्या गोष्टी मांडल्या त्या विषयी बोला

**श्री. संतोष ढमढेरे :** संचालक मंडळाने तेव्हा त्या शॉल त्या पद्धतीने तिकडून डायरेक्टर ऑफिस मधून घेतल्या आपण तिकडून घेतले आहेत यावर्षी त्याच क्वालिटीच्या सेम शॉप आपण इकडे मागवल्या आणि इकडे आपण त्या देत आहोत

**श्री.मनोज वाडेकर (आरईडी):** आता परत तुम्ही मला सांगा या संचालक मंडळाला कोणी सांगितलं होतं का की तिथून घेतल्या तिकडूनच घेतल्या पाहिजेत जर आपल्याला इथे मिळतील 280 रुपयाला चांगली शाल.

**श्री. संतोष ढमढेरे :** आपण एखाद्या दुकानांमध्ये गेलो तर आपल्याला शंभर रुपयाची देखील शाल मिळते 2000 रुपयाची शॉल मिळते आणि 20- 25 हजाराची पण शॉल मिळते कॉलिटी नुसार तुम्ही या गोष्टी समजून घ्या

आपली सोसायटी आपण जर अकराशे बाराशे कोटी रुपयांची चालवतो, कळके साहेब एक मिनिट एक मिनिट बोलू द्या त्या शॉलला आपण जेव्हा चांगलीच शॉल घेतो जी डिपार्टमेंटने त्याच कॉस्ट घेतली आहे, आपणही त्याच कॉस्ट ला घेतली आहे आणि तीच शाल आपण देत आहोत आणि त्याचं तुम्हाला पाहिजे असेल तर आम्ही पुरावे दाखवतो.

**श्री.राजेश कळके (सीडीएम):** सेम शॉल चा मॉडेल नंबर आहे.

**श्री.मनोज वाडेकर (आरईडी):** एकच मिनिटं बगाडिया साहेब बसा, एकाला बोलू द्या,आता मी काय सांगतोय ते ऐका त्यांनी ज्या 350 शॉल आपल्या सभासदांना वाटल्या, त्या निवृत्त कर्मचाऱ्यांकडून आम्ही ती शॉल घेतली आणि ती शॉल अमृतसरच्या पंजाबच्या दुकानदाराला दाखवली व त्याने सांगितले की, आम्ही अशी शाल, तुम्हाला 220 रुपये प्रमाणे देऊ. तेव्हा त्यांना आम्ही सांगितले की आम्हाला तसं कोटेशन द्या, तेव्हा त्यांनी आम्हाला 220 /- रुपयाप्रमाणे 350 शाल चे कोटीशन दिले आहे, म्हणजेच तुम्ही पाचशे रुपयांची शाल दाखवून ती 220 रुपयांना आणली म्हणजे जवळपास सोसायटीचे एक लाख 5 हजार रुपयांचे नुकसान झाले असे माझे मत आहे.

DRAFT 64th AGM

**श्री.राजेश कळके (सीडीएम):** कारण. या शाल चा फोटो अमृतसरच्या व्यापाऱ्याला, आम्ही पाठवला त्याने ती शाल ताबडतोब ओळखली मॉडेल नंबर वगैरे, जास्तीत जास्त हे सगळं 250/- रुपयांमध्ये बसत आहे, तुम्ही 500 आणि तुम्ही डिपार्टमेंट मध्ये का गेले शाल हे करण्यासाठी जर हिंदमातामध्ये, पुरी दुनिया येते शाल घ्यायला त्याच्या अगोदर पण तुम्ही तिथूनच आणले आहेत शाल.

**श्री. संतोष ढमढेरे :** कळके साहेब उत्तर देऊ का ?

**श्री.राजेश कळके (सीडीएम):** अरे नुकसान झाले हो एक लाख रुपयाचं एका फोनवर एक लाख रुपयाचे नुकसान झाले आहे.

**श्री. संतोष ढमढेरे :** कळके साहेब तुम्ही ज्या काही गोष्टी मांडताय त्या आता मांडल्या ना मग आता बोलायला तर संधी द्या.

**श्री.राजेश कळके (सीडीएम):** ठीक आहे बोला बोला,

**श्री. संतोष ढमढेरे :** मी विनंती करतो की आपण ज्या काही शॉल मागवल्या त्या संचालक श्री. आनंद मेदार यांनी त्या परचेस केल्या होत्या मी त्यांना विनंती करतो त्या विषयावरती मांडणी करतील.

**श्री. आनंद मेदार:** नमस्कार,

**श्री. विलास घोरपडे (एफडी) :**हे पहा तुमच्या संचालक मंडळ, कारण जो परचेस करतो तो इथे येऊन बोलतो. ऐका म्हणजेच सेक्रेटरीला वगैरे काही माहितीच नाहीये.

**श्री. आनंद मेदार:**थोडसं व्यवस्थित ऐकलं ना,विषय महत्त्वाचे आहेत की बोलणारा व्यक्ती महत्त्वाचा आहे. विषय लोकांना ऐकायला, ऐका माझी पूर्ण गोष्ट ,लोकांना खरी परिस्थिती समजू द्या, मला पाच मिनिटे द्या, मी लोकांना खरं खोटं सांगतो.

**श्री.मनोज वाडेकर (आरईडी):** अर्ध्यात तुम्ही आले.

DRAFT 64th AGM

**श्री. आनंद मेदार:** मी काय म्हणतो वाडेकर.

**श्री. हेमंत कोळी :** वाडेकर तुला उत्तर भेटेल ना, उत्तर देतोय ना तो, प्रश्नाचं निरसन झालं पाहिजे की नाही? तुम्हाला काय प्रॉब्लेम आहे?

**श्री. आनंद मेदार:** रिक्वेस्ट करतो वाडेकर, हात जोडून नमस्कार करतो, दोन मिनिटं पेशंस घ्या. कळके साहेब ऐका, तुम्ही जो पहिला बोलला 280 रुपये काळबादेवी वरून शॉल घेतली, पूर्वी दोन शॉल यायच्या संगम टेक्सटाईल वरून. एक मेल आणि एक फीमेल, एका मला पूर्ण बोलू दे, नंतर तुम्ही पूर्ण बोला साहेब, नाहीतर तुम्ही आधी बोलून घ्या, नंतर मी बोलतो, वाडेकर साहेब, पहिला तुम्ही बोलता, बोलू ऐका ना, एकदा मला तरी बोलू द्या, नाहीतर तुम्ही तरी बोला थोडा पेशंस घ्या, जेव्हा मी बोलत होतो, तेव्हा तुम्ही बोललात मला बोलल्या आता तुम्ही म्हणता मला बोलू दे मग सगळ्यांना सांगतो मी थांबतो वाडेकर बोलतील मग मी बोलेन.

**श्री.राजेश कळके (सीडीएम):** वाडेकर साहेबांनी संपूर्ण अभ्यास केला आहे त्याच्यावरती त्यांना संपूर्ण बोलू द्या.

**श्री.मनोज वाडेकर (आरईडी):** ऐका व्हाट्सअप वर काय झालं काय नाही, हा प्रश्न इथे नाही, मी इथे जे प्रश्न विचारले त्याची मला उत्तर द्या आपल्याला अशी कुठली गाईडलाईन होती का की तिथूनच घ्यायचा आहे. जर इथे चांगल्या क्वालिटीची शाल मिळत होती तर तुम्ही तिकडे का गेला असा प्रश्न आहे.

**श्री. आनंद मेदार:** ठीक आहे तुमचे दोन प्रश्न आहेत, वाडेकर साहेब आता मी बोलू, थोडंसं पेशन्स घ्या पाच मिनिट साहेब आपण मुंबईतून संगम टेक्सटाईल म्हणून दोन शाल मागवायचं लोकांचा सत्कार करायला, पहिला त्याच्यामध्ये मेल आणि फिमेल मेल जो शाल होता तो 350/- रुपयाला यायचा आणि फीमेल 280 /-रुपये, आता आपण तिथून अमृतसरवरून पाचशे रुपयांची शाल मागवली, कुठली जेन्ट्स एक्झिक्यूटिव्ह, चेअरमन शाल हे तिथे जाण्याची गरज का लागली, कारण आपले सभासद जे रिटायर झाले निवृत्त झाले त्यांची रिक्वेस्ट होती आणि डायरेक्टर कडून एवढी चांगली शाल भेटते, टी शाल आम्हाला का नाही भेटते , म्हणून आम्ही त्याच मार्गावर आलो. मग आपण तसाच जो शाल सेम आस्थापनाने केला आहे त्याच माध्यमातून अमृतसरवरून 500/- रुपयाला तो शॉल घेतलेला आहे आता तुम्ही जो बोलता 280 वरून पाचशे रुपयाला गेलो आम्ही 280/- रुपयावरून 500/- रुपयाला गेलो नाही आम्ही 350/- रुपयावरून 500/- रुपयाला गेलो आहे ओके.

**श्री.मनोज वाडेकर (आरईडी):** पण तुम्ही मुंबईमध्ये फिरला का ? मुंबईतली दुकान बंद झाली होती? का ?

**श्री. आनंद मेदार:** नाही नव्हते.

DRAFT 64th AGM

**श्री.मनोज वाडेकर (आरईडी):** मग तुम्ही अमृतसरला का पोहचला?

**श्री. आनंद मेदार:** कारण ही कॉलिटी अमृतसर वरूनच येते आणि मार्केटला ही अवेलेबल नाही.

**श्री.राजेश कळके (सीडीएम):** अवेलेबल आहे.

**श्री. आनंद मेदार:** तुमचा प्रश्न असेल तर कळके साहेबांच्या प्रश्नाचे उत्तर देऊ का मी,

**श्री.राजेश कळके (सीडीएम):** अरे काय उत्तर देता तुम्ही, तुम्हाला तर माहित आहे का ?

**श्री. आनंद मेदार:** एक एक बोलू या, कारण प्रश्न ॲक्च्युली समजायला पाहिजे ,तुमचं म्हणणं काय आणि आमचं म्हणणं काय

**श्री.राजेश कळके (सीडीएम):** अरे शालीची किंमत कमी नाही आहे, जास्त आहे, कमी असतं तर मान्य केलं असतं.

**श्री. आनंद मेदार:** कळके साहेब बोला ना तुम्ही.

**श्री.राजेश कळके (सीडीएम):** शालीची किंमत कमी असती तर मान्य केलं,असतं तुमची धडपड शालीची किंमत रेग्युलर पेक्षा जास्त आहे.

**श्री. धनंजय धेंडे (डीसिएसइएम) :** एक मिनिट वाडेकर साहेब, तुम्ही जे म्हणाला ते 380/- रुपये वरून 500/- रुपयाला त्यांनी शॉल घेतली.

**श्री. आनंद मेदार:** वाडेकर साहेब 350/- बोललेच नाहीत 280/- रुपये बोलले दिशाभूल करतात,

**श्री. धनंजय धेंडे (डीसिएसइएम) :** बरोबर आहे, तर मी तुमच्या मताशी सहमत आहे, की इथे काही मुंबईला शाली मिळत नाही, आता मला हे म्हणायचं आहे, की आपला मुद्दा काय आहे की 280 वरून ते 500/- पर्यंत गेले म्हणजे तुम्हाला असं म्हणायचं आहे का या लोकांनी 150/- रुपयाचे करप्शन केलं आहे ? का नक्की तुम्हाला काय म्हणायचं आहे? 500/- रुपये पर्यंत तुम्ही का गेलात हा मुद्दा आहे बरोबर ना ?

**श्री. आनंद मेदार:** आता यांचा दुसरा प्रश्न होता तुम्ही अमृतसर पर्यंत का गेला आहे ? मनोज सर आणि कळके साहेब, अमृतसर पर्यंत जाण्याचा उद्देश या मार्केटमध्ये त्या शॉल ज्या मागवल्या त्याची किंमत 750/- रुपये किंमत आहे. आणि अमृतसरला ही शाल 500/- रुपयाला मिळते. आणि आमचं डिफरन्स किती झालं 350/- रुपयांवरून 500/- रुपयांची खरेदी केली आणि डायरेक्ट मॅन्युफॅक्चरर कडून 150/- रुपयाची फरक आता बोला 500/- रुपयांचं घेतलेलं प्रॉब्लेम आहे? म्हणजे 500/- रुपयांचं शॉल लोकांना रिटायरमेंट होता ना तीस-पस्तीस वर्षे सर्विस करून जाणाऱ्या लोकांना 500/- रुपये खर्च करू शकत नाही ? हे आपल्याला लज्जास्पद आहे असं मला वाटतं एवढं निर्णय बोर्ड ऑफ डायरेक्टर घेऊ शकत नसेल? तर आम्ही सांगा आम्ही 15 जण सगळेजण त्या लायकीचे नाही आहे का? लवकर रिटायर होताना चांगल्यातली चांगली सुंदर शाल देण्याचा आमचा प्रयत्न होता? महाजन साहेब माझं साहेब दोन मिनिटं, बऱ्याच वर्षांनी जरा एकदाच संधी भेटली आहे बोलायला.

DRAFT 64th AGM

**श्री. प्रकाश पाटील (एसआयआरडी) :** तुमचं काय होतंय आधीच्या मॅनेजमेंटने एवढं केलं मग आता आम्ही करतोय आधीच्या लोकांनी कसे जास्त केलं आणि आम्ही कमी करून हा तुमचा विषय होता, आता तर तुम्ही वाढतच चालला आहात. त्यांनी कॅलेंडर छापलं तुम्ही डायरी छापली त्यांनी 300 ची दिली तुम्ही पाचशे देत आहे म्हणजे तुमचा हेतू काय आहे, तुम्ही काय बोलला होता आधीच्या मॅनेजिंग कमिटी पेक्षा खर्च आम्ही कमी करू तुम्ही वाढवत चालला आहात.

**श्री. आनंद मेदार:** पाटील साहेब खर्च नाही वाढवला.

**श्री. प्रकाश पाटील (एसआयआरडी) :** अरे वाढवला नाही म्हणजे काय त्यांनी कॅलेंडर छापलं, तुम्ही डायरी छापली,

**श्री. आनंद मेदार:** ऐकून घेण्याची क्षमता ठेवा, तुमची क्षमता असेल, तर मी सांगेन तुम्हाला पाटील साहेब ऐका.

**श्री. प्रकाश पाटील (एसआयआरडी) :** त्यांनी 150/- दिली, तुम्ही 500/- देत आहात.

**श्री. आनंद मेदार:** पाटील साहेब तुम्ही विषयांतर करताय, शॉलला पकडून चला, तुम्ही दोन मिनिटं द्या, मी हाऊसला सांगण्याचा प्रयत्न करतोय की तुम्ही दिशाभूल करू नका दोनच मिनिटे मला, द्या कळके साहेबांचं काय म्हणणं आहे, त्यांना काय आरोप करायचंय ते ऐकून घ्या, आरोप तर त्यांना करू द्या.

**श्री.एस.एस.महाजन (एफआरडी) :** आत्ता मगाशी वाडेकरांनी तुम्हाला काय सांगितलं तुम्ही जी 500/- रुपयाची आणली. वाडेकरांनी तुम्हाला काय सांगितलं, काय ऑब्जेक्शन घेतलं ,तुम्ही 500/- रुपयाची का घेतली? टॅक्स दिला, त्या गोष्टीसाठी त्याच दुकानात आम्ही चौकशी केली. त्यावेळेला समोरच्यांनी तुम्ही जी 500/- ला घेतली तेवढीच शाल 250/- रुपयाला द्यायला तयार झाला, जर तीच गोष्ट आम्हाला समोरची व्यक्ती 250/- ला 200/- ला देतोय तर हे असे आमचे पैसे एक्स्ट्रा का घालवले, मुद्दा चर्चेचा आहे, तुम्ही 500/- ला गेला त्याच्यावर आमचं ऑब्जेक्शन नाही.

DRAFT 64th AGM

**श्री. आनंद मेदार:** साहेब तुमचा मुद्दा मी परत एकदा रिपीट करतो की तुमचा मुद्दा असा आहे की 500/- रुपयाचा शाल हे 200/- रुपयांना भेटते? कुठून भेटते? त्याच दुकानातून मग अमृतसर, वरून मागून टाका ना? एक नव्हे quantity मागवा.

**श्री. संतोष ढमढेरे :** हॅलो, महाजन साहेबांनी जो मुद्दा उपस्थित केला.

**श्री.मनोज वाडेकर (आरईडी):** ढमढेरे, आता ते बोलले की तुम्ही मध्ये बोलतात, आता तुम्ही मध्ये का आलात.

**श्री. संतोष ढमढेरे :**एकाच माणसाला वेगवेगळ्या पद्धतीने विचारणारं असाल, तर इथून उत्तर देताना जे मुद्दे आम्हाला सुचतात ते मांडण्याचा अधिकार तरी आम्हाला द्या, तुम्ही जेव्हा प्रश्न विचारताना दहा ठिकाणाहून विचारला, मुद्दा जर एखाद्याला नवीन सुचतोय तर तो मांडू शकतो ना? तो मांडण्याचा अधिकार तरी संचालकांना आहे की नाही? आता महाजन साहेबांनी जो प्रश्न विचारला त्याच्यावरती मी उत्तर देतोय 250/- रुपयाची शॉल 500/- रुपयाला? तर मला हेच म्हणायचं आहे की 250/- रुपयांची शॉल 500/- रुपयाला आम्ही आणली असं

ते म्हणतायेत, तर त्या वेंडरला कळके साहेबांनी कॉन्टॅक्ट केला, त्या कोटेशन वरती त्यांचा नंबर असेल त्या नंबर वर कॉल करा, आणि ती शॉल मिळेल का? मला हेच सांगायचं आहे,

**श्री. धनंजय धेंडे (डीसिएसइएम) :** जर अडीचशे रुपयाला शाल त्याच वेंडरला मिळत असेल आणि तुम्ही 500 /- नी घेतली ? तर आता तुम्ही कॉल करा त्या वेंडरला दूध का दूध पाणी का पाणी होईल.

**श्री. शबीर आलम (एफटीडी) :** कळके साहेब, मालकाला अभी का अभी फोन लगाओ.

**श्री. आनंद मेदार:** मालकाला फोन करून ती अडीचशे रुपयाची जी शाल आहे ती पाचशे रुपयाला बिल मागा. आणि सभेला दाखवा वाढीव बिल मिळतं मॅन्युफॅक्चरर कडून.

**श्री. आनंद मेदार:** धेंडे साहेब ऐका, दंडे साहेब दोन मिनिटं, ऐका दोन मिनिटे, तुम्ही थांबा,

**श्री. धनंजय धेंडे (डीसिएसइएम) :** ऐका मला काय म्हणायचं, अमृतसरवरून यांनी जी शाल आहे ती 250/- रुपयाला मिळत होती. तुम्ही त्याच वेंडर कडे 500/- ने आणली ना, तर आत्ताच्या आत्ता त्या वेंडरला फोन लावा आणि सभागृहाला माहिती होऊ द्या की 250/- रुपयाची शाल तुम्ही पाचशे 500/- का आणली आणि 250/- रुपये तुम्ही खाल्ले असतील आणि 500/- रुपयांचं बिल भेटते का हे पण विचारा?

DRAFT 64th AGM

**श्री. आनंद मेदार:** 500/- रुपयांचं बिल भेटते का हे पण विचारा?, माइक वर लावा त्याला फोन ऑनलाईन. अभी मोबाईल ऑनर को बोलिये, हे बघा वाडेकर फोन लावा, तुम्ही फोन लावा, आप जो बोल रहे है, अमृतसर वरून का आणली.

**श्री. आनंद मेदार:** हा रिप्लाय जरा सभासदांनी नीट वाचावा, ही विनंती,

**श्री. संतोष ढमढेरे :** हा रिप्लाय जरा बोर्डवर वाचा, त्याच वेंडरचा ऐका सर्वांनी बसून घ्या,

**श्री. हेमंत कोळी :** बसून घ्या खाली.

**श्री.संतोष ढमढेरे :** सभागृहाला कोणीही मिसगाईड करू नका, आज कळके साहेबांनी कोटेशन मागवलं, त्या कोटेशन वरती जे काही आलं, त्यांच्याकडून ते पत्र व्हायरल झालं, त्याचं उत्तर आम्ही त्यांच्याकडून मागवलं, आम्ही त्यांना म्हटलं की आमच्या एम्पलोयीने तुमच्याकडे शाल मागितली आणि त्या शाली वरती तुम्ही आम्हाला

जी शाल 500/- रुपयाला दिली, ती शाल तुम्ही त्यांना 250/- रुपयांना दिली, हे अशा पद्धतीने तुम्ही केलं कसं ? त्यासाठी आम्ही त्यांना रिप्लाय मागितला आहे, त्यांचा रिप्लाय आम्ही तुम्हाला इथे दाखवत आहे, तो सगळ्या सभासदांना आम्ही दाखवत आहे. तो तुम्ही सगळ्यांनी वाचून घ्या. बघा आता याच्यामध्ये एक गोष्ट लक्षात घ्या. जेव्हा आपण एखादी गोष्ट करतोय आणि चुकीच्या पद्धतीने जर त्याचं भांडवल बनवून संस्थेची आणि संचालक मंडळाची बदनामी होती है. तर त्याला जबाबदार कोण याचाही प्रत्येकाने विचार करावा

**श्री.राजेश कळके (सीडीएम):** मी जबाबदार राहील जर खोटं बोलत असेल तर, सगळं आहे ना,आम्ही हे रेकॉर्ड केलेले आहे, आता तुम्ही त्याच्यावर काही दबाव आणून जर काही सांगत असेल ना, की चुकीचं मुळात प्रश्न असा आहे, अमृतसर वरून का मागवली, बघा नाही त्याच्या अगोदर तुम्ही मुंबईमधून मागवली ?

**श्री.मनोज वाडेकर (आरईडी):** मुंबईमध्ये एवढे चांगले दुकान आहेत शॉलचे मार्केट आहे ते सोडून तुम्ही अमृतसरला का गेलात ?

**श्री.राजेश कळके (सीडीएम):**तुम्ही आता त्या दुकानदारावर दबाव आणला आणि त्याला फोटो पाठवला ,

DRAFT 64th AGM

**श्री.बाहुबली चौगुले (मानद सचिव):** मी सन्माननीय सभागृहाला लेटर वाचून दाखवतो सगळ्यांनी दोन मिनिटे शांत रहा,

मानद सचिव श्री. बाहुबली चौगुले यांणी M/s. हेमंत टेक्सटाईल, अमृतसर यांच्या कडून संस्थेला आलेलं दिनांक २२/८/२०२५ रोजीचे पत्र वाचुन दाखविले

**श्री.बाहुबली चौगुले (मानद सचिव):**

प्रति,
मा. श्री. हेमंत कोळी
अध्यक्ष
दि भाभा अणुसंशोधन केंद्र कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्यादित, मुंबई .

विषय: शाल क्र. 780 च्या किंमतीबाबत स्पष्टीकरण

मा. महोदय,

आपल्या संस्थेसोबत आमचे पूर्वीपासून शालींच्या पुरवठ्याबाबत व्यावसायिक संबंध आहेत. यापूर्वी आम्ही आपल्या संस्थेसाठी "चेअरमन" नावाची खास बनवलेली शाल पुरवली होती. ही शाल आपल्या संस्थेच्या गरजांनुसार व मानकांनुसार विशेषतः तयार करण्यात आली होती. ती Acrowool साहित्याची, मऊ फिनिशसह आणि विशेष कोपऱ्यांच्या डिझाइनसह तयार करण्यात आली होती. ही शाल आपल्या संस्थेला रु. 530 अधिक 5% जीएसटी या दराने पुरविण्यात आली होती.

अलीकडे आपल्या संस्थेतील सदस्य श्री. राजेश रामचंद्र कळके यांनी आमच्याकडे गुणवत्ता क्रमांक 780 असलेल्या वेगळ्या प्रकारच्या शालीबाबत मागणी केली. शाल क्र. 780 ही आमच्याकडून सर्वसाधारण विक्रीसाठी संपूर्ण भारतात मोठ्या प्रमाणात उत्पादित केली जाते. ही शाल "चेअरमन" शालीपेक्षा कमी दर्जाची व किमतीने स्वस्त आहे. तसेच तिचे डिझाइन व तपशील "चेअरमन" शालीपेक्षा पूर्णतः वेगळे आहेत. त्यामुळे शाल क्र. 780 ची किंमत रु. 220 अधिक 5% जीएसटी अशी आहे.

सदर दरपत्रक पाठविल्यानंतर श्री. राजेश रामचंद्र कळके यांनी पुन्हा संपर्क साधून त्याच शाल क्र. 780 साठी रु. 500 अधिक 5% जीएसटी असा सुधारित दरपत्रक देण्याची विनंती केली. मात्र, आमच्या उत्पादन युनिटमध्ये कोणत्याही प्रकारचे चुकीचे दरनिर्धारण किंवा अनियमित व्यवहार केले जात नाहीत. आमची किंमत धोरण पूर्णपणे स्पष्ट व पारदर्शक आहे. त्यामुळे आम्ही ही विनंती स्पष्टपणे नाकारली.

भविष्यात अशा प्रकारच्या विनंत्या करण्यात येऊ नयेत, ही नम्र विनंती. अशा गोष्टींमुळे दोन्ही संस्थांचा मौल्यवान वेळ वाया जातो.

M/s. हेमंत टेक्सटाईल, अमृतसर

**श्री.राजेश कळके (सीडीएम):**आता मी बोलतो,

**श्री.बाहुबली चौगुले (मानद सचिव):** आता मी बोलतो हा जो Model No. 780 आहे हा आपण मागवतोय.

DRAFT 64th AGM

**श्री.राजेश कळके (सीडीएम):**आता मला बोलू द्या, आमचे सीडीएमचे जूनला रिटायर झाले वारंग साहेब त्यांच्यातून मी फोटो मागवले, आणि ते फोटो मागून सेम फोटो मी त्यांना मागवले, आणि त्यांना सांगितलं आम्हाला, किती घ्यायचेत 350 शाल घ्यायचे, तर याची किंमत किती मला काय सांगितलं 240/- रुपये, सेम शॉप त्यांनी ताबडतोब ओळखली कारण ते मॅन्युफॅक्चरर आहेत. एवढे वर्ष काम करत आहेत तर मी बोललो बघा 200/- ला द्या ते म्हणले बघा आम्हाला नाही देता येणार.

**श्री. आनंद मेदार:** बोला बोला तुम्ही बरोबर बोलताय.

**श्री.राजेश कळके (सीडीएम):**सर तुम्ही सत्याला समोर जात नाही,

**श्री. आनंद मेदार:**: बरोबर चाललंय.

**श्री.राजेश कळके (सीडीएम):**मग मी त्यांना काय बोललो मला 215/- ला द्या ते म्हटले नाही 220/- ला देतो, मी बोललो मग मला कोटेशन मग मी मला त्यांनी सगळं सांगितलं आमच्याबरोबर चर्चा झाली सर्व रेकॉर्डिंग केला आहे आणि त्यांनी मेलवर टाकलं आता तुम्ही म्हटला ना मॉडेल नंबर त्याला ते सांगितलं हा मॉडेल नंबर तर तो

बोलतो हाच आहे हीच शाल आहे मग आणखीन काय सांगणार मी आणि ही शॉल बघा तीच आहे सभासदांना दिलेली.

**श्री.संतोष ढमढेरे :** मी तुम्हाला काय सांगितलं एकच शॉल एकच डिझाईन आपण तो पाच हजार रुपयाला पण विकत घेतो पाचशे रुपयांना पण विकत घेतो, स्वतः हेमंत टेक्स्टाईल तुम्ही कोटेशन पाठवलं त्यांचा तुम्हाला रिप्लाय आला त्यानंतर तुमचं व्हाट्सअप वर आलेला जे लेटर आहे, त्यांना चौकशीसाठी पाठवलं, त्यांचा रिप्लाय इथं आम्ही मांडलेला आहे,

**श्री. आनंद मेदार:** ऐका मनोज सर.

**श्री.राजेश कळके (सीडीएम):**तुमच्या संचालक मंडळालाच माहीत नाही शाल घेतली का नाही,

**श्री.मनोज वाडेकर (आरईडी):** अध्यक्ष महोदय.

**श्री. आनंद मेदार:** दोन मिनिटं थांबा, ऐका कळके साहेब, ऐका मिस कम्युनिकेशन काय झालं आहे, ऐकून घ्या, तुमचं क्लिअर करतो, ऐकून घ्या. तुम्ही जो फोटो पाठवला त्यांना, त्याने तो फोटो मला पाठवला, मी त्याला म्हटलं तुम्ही असं कसं करू शकता, समजलं का त्या फोटोमध्ये तुम्ही काय केलं अर्धा फोटो पाठवला आहे. तुमच्या टेंडरला त्यांनी नंबरिंग कोटेशन जो दिला आहे, ऐका तुम्ही पूर्ण फोटो त्याला पाठवला नाही, तुम्ही पाठवलेला फोटो पण त्याने मला पाठवला. सर उन्हाने जो फोटो भेजा उसका यही कॉस्ट है और तुमको भेज रहा हू. तुम्ही साइटवर जाऊन चौकशी करा, खरं असेल तर फोन करा आणि पाचशे रुपयांचं बिल मागवा, उगाच तुम्ही लोकांना गुमराह करू नका.

DRAFT 64th AGM

**श्री.राजेश कळके (सीडीएम):**चौकशी करा,

**श्री. आनंद मेदार:** कळके साहेब चुकीचं करू नका आणि बोर्ड ऑफ डायरेक्टरला चुकीचं ठरवू नका, आम्ही जे काही केलंय, तर तुम्ही चुकीचं करून दाखवत आहे आम्हाला.

**श्री.राजेश कळके (सीडीएम):** तुम्ही अमृतसरवरून आणायची गरजच काय ?

**श्री. आनंद मेदार:** गरज काय पहिलेच बोललो मी कळके साहेब,

**श्री.राजेश कळके (सीडीएम):**आता तुम्ही ना, अरे तू कुठे राहतो परेलला,

**श्री.संतोष ढमढेरे :**आपण असा विषयाला धरून बोलतोय मनोज वाडेकर आणि प्रश्न विचारला कोटेशन दाखवलं, त्याला आम्ही आमचं उत्तर दिलं

**श्री. धनंजय धेंडे (डीसिएसइएम) :**याचा दूध का दूध और पाणी होईल, तुम्ही फोन लावा ना, फोन लावा सगळ्यांना ऐकू द्या, आपण फोन करूया.

**श्री.संतोष ढमढेरे :** सभागृहाला मी विचारतोय या मुद्द्यावर आपल्याला क्लेरिफिकेशन मिळाला असेल तर नफा विभागणी या ठरावाला सूचक अनुमोदक द्या.

**श्री. अनिल (डीसिएसइएम) :** हॅलो साहेब भांडण करण्यापेक्षा त्या डीलरला फोन लावा, कोळी साहेब डीलर ला फोन लावा.

DRAFT 64th AGM

**श्री. मुकुंद वैराळकर (एऍण्डएसईडी):** अर्धा पाऊण तास झाला या शाल वरती आणि वेळ पण बरीच झालेली आहे जवळपास साडेसात होत आले, सर्वांच्या जिव्हाळ्याचा प्रश्न जे काही नफा वेगाने आहे ते करा आणि लोकांना मोकळे करून टाका कारण शाल हा जो विषय आहे मला असं वाटतं की, हा थोडासा इन्वेस्टीगेशन चा विषय आहे एक वस्तू आहे ती पाच रुपयाला पण मिळते आणि पन्नास रुपयाला पण मिळते हा इन्वेस्टीगेशन चा विषय आहे, थोडसं याच्यावरती,

**श्री. अनिल (डीसिएसइएम) :** अध्यक्ष महोदय जर 1100 करोडचा टर्नओव्हर असेल, तर काय चुकीचं आहे का?
**श्री. मुकुंद वैराळकर (एऍण्डएसईडी) :** या विषयावरती सविस्तर इन्वेस्टीगेशन झालं पाहिजे अशी सभागृहाची इच्छा आहे आणि तुम्ही जे आहे हा विषय शालचा थोडासा वेगळा बाजूला ठेवून याच्यावरती एक कमिटी चार-पाच लोकांची कमिटी क्लिअर करा ते इन्वेस्टीगेशन करतील.

**Security officer, Anushaktinagar:** सभी सभासदांचे बोला जा रहा है की साडे सात बजे खतम होगा, आप तक तक जो करना है. आपका प्रोग्राम है शांती रूप से, करिये आराम से बात करिये.

**श्री.बाहुबली चौगुले (मानद सचिव):** वैराळकर साहेब झालाय ना विषय क्रमांक दोन, मी विषय क्रमांक तीन घेतो

**श्री.डी.एस राजापुरे (डीआरएचआर) :** चौगुले साहेब

**श्री.बाहुबली चौगुले (मानद सचिव):** विषय क्रमांक तीन यास मान्यता देणे.

**श्री.डी.एस राजापुरे (डीआरएचआर) :** एक मिनिट विषय क्रमांक दोन मध्ये मी जे काही पेपर मागितले होते, आम्हाला डॉक्युमेंट दाखवलेले नाहीत, जेव्हा तुम्ही एसीची AMC ची कोटेशन मागवली, त्या कोटेशन मध्ये खूप प्रॉब्लेम आहेत, आम्ही ते नोट केले, आजपर्यंत आम्हाला ते एनवलप दाखवलेले नाही. ज्या L1 ला तुम्ही अलोट केलं, त्याचं बाय पोस्ट आलेलं तुम्ही आम्हाला दाखवलंच नाही, तीन दिवस विचारलं तरी दाखवलं नाही, जो L1 अलोट झालाय तो फॅब्रिकेशनचं काम करतो. त्याला एसीची AMC कशी काय दिली गेली,

**श्री. हेमंत कोळी :** ए भाऊ, ते कसं दिलं विषय मांड, सोमवारी या तुम्हाला दाखवतो,

**श्री.डी.एस राजापुरे (डीआरएचआर) :** त्याला एसीची AMC कशी काय दिली गेली?

DRAFT 64th AGM

**श्री.बाहुबली चौगुले (मानद सचिव):** सोमवारी या तुम्हाला दाखवतो.

**श्री.डी.एस राजापुरे (डीआरएचआर) :** मी पाच दिवस सोसायटीत आलो तरी नाही दिलं, आता सोमवारी काय दाखवणार कोणी नाही दाखवलं, तुम्हीच नाही दाखवलं साहेब,

**श्री.बाहुबली चौगुले (मानद सचिव):** तुम्हाला दाखवतो,

**श्री.डी.एस राजापुरे (डीआरएचआर) :** P32 नियम दाखवला, वाडेकर तुम्हाला दाखवलं का त्यांनी ?

**श्री.बाहुबली चौगुले (मानद सचिव):** ऐका सरांच्या प्रश्नाला उत्तर देतो, मुकुंद वैराळकर सर विनंती आहे सगळ्यांनी डिस्प्ले कडे बघा, त्यांचा प्रश्न होता संस्थेने एसी मेंटेनन्स साठी कोटेशन काढलं की त्याचं L1 त्यांनी ज्या पार्टीला दिलं त्याचं एन्व्हॉलप नाही, स्पीड पोस्ट नाही, इनवर्ड नाही, त्या अनुषंगाने सोशल मीडियावर काही पत्रे आली त्यावर जे काही झालं, पण सचिव म्हणून मी परत तुम्हाला दाखवतो, 1. शिवा इंजीनियरिंग वर्क्स, 2. फ्रेंड्स एअर कूल, 3. युनिक इंजीनियरिंग या तीन कंपन्यांची टेंडर तिथे आल्या हे बघा, त्याची कोटेशन हे तुम्ही नोट केले, तुमचा प्रश्न होता त्या दिवशी की त्याचं एनवलप नाही. हा एनवलप त्याचा तिथेच आहे, तुमच्या बघण्यात नाही आला,

**श्री.मनोज वाडेकर (आरईडी):** एक मिनिट ऐका ,मी मोरे साहेबांना विचारलं, मोरे साहेबांनी त्यावेळी आम्हाला सांगितलं एन्व्हलप नाही म्हणून ते मॅनेजर आहेत त्यांना माहित नाही.

**श्री.बाहुबली चौगुले (मानद सचिव):** असं कसं म्हणता साहेब.

**श्री. हेमंत कोळी :** हॅलो वाडेकर साहेब, स्पीड पोस्ट नंबर आहे,

**श्री.मनोज वाडेकर (आरईडी):** हेमंत साहेब गोष्ट काय चालू आहे ती अवेलेबल नाही, असं मला सांगण्यात आलं. दाखवतो ना तुम्हाला, ते आता मिळाला,

**श्री.बाहुबली चौगुले (मानद सचिव):** तुम्हाला दाखवलं, हरवलं नव्हतं, तिथेच होतं,

**श्री.मनोज वाडेकर (आरईडी):** ऐका ना बाहुबली साहेब, मुळात मुद्दा काय आहे माहिती आहे, का त्यांना जेवा विचारलं गेलं त्यांनी सांगितले नाही, मी त्यांना दुसऱ्या दिवशी परत गेलो, त्यांना बोललो तुम्हाला इंव्हल्प मिळालं का तर त्यांनी त्यावर नाही सांगितलं.

DRAFT 64th AGM

**श्री.बाहुबली चौगुले (मानद सचिव):** आहे साहेब, दिसतोय ना व्यासपीठावरून मी बोलतोय तुम्हाला, त्याचा इनवर्ड तुम्हाला दाखवतोय,

**श्री.मनोज वाडेकर (आरईडी):** त्यादिवशी नव्हतं हे सांगण्यात येते,

**श्री. आनंद मेदार:** वाडेकर, साहेब मी खरंतर तुम्हाला मनापासून निवेदन करतो, तुम्ही काय करताय माहिती आहे, तुम्ही लोकांचा वेळ खाताय, वेळ जात आहे.

**श्री.राजेश कळके (सीडीएम):** जी नाहीये गोष्ट ते जेव्हा मागितलं तेव्हा नव्हतं,

**श्री.बाहुबली चौगुले (मानद सचिव):** चेअरमन साहेब थोडं मागे या, विनंती करतो चेअरमन सर थोडं मागे या.

**श्री.मनोज वाडेकर (आरईडी):** आम्ही ज्या वेळेला चेक केलं तेव्हा ते आढळले नाही. ऐका तरी पूर्ण ऐका का पूर्ण ऐकून घ्या, त्यावेळी जेव्हा फाईल चेक केली त्यावेळी ती वस्तू नव्हती, त्यावेळेस काय झालं मोरे साहेबांना

आवाज दिला, ते आले बोलले की, ऐका मी त्या वेळची घटना सांगतोय, तुम्ही आत्ताच वर्तमान काळातलं नका बोलू, या गोष्टीला जास्त दिवस नाही झाले, त्यावेळेला ती गोष्ट मिळत नव्हती,

**श्री. हेमंत कोळी :** अरे सगळं आहे ना तुला काय पाहिजे अजून सगळं आहे ना सर्व आहे.

**श्री.मनोज वाडेकर (आरईडी):** मला खोटं पाडण्याचा प्रयत्न करू नका.

**श्री. हेमंत कोळी :** तुम्ही खोटेच पडणार याच्यामध्ये, लोकांची दिशाभूल करताय, व्हाट्सअप वर दिशाभूल केले, तुम्ही खोटेच पडणार आता, यांनी व्हायरल केलं होतं.

**श्री.बाहुबली चौगुले (मानद सचिव):** अख्ख्या सभागृहाला विनंती करतो की प्लीज थोडं डेस्क टॉप वरती बघा. यांनी सरळ सरळ इथे दाखवला आहे क्रमांक L1 फेक आहे, तुम्ही व्हाट्सअप वरती पाठवलेला, माझा हक्क आहे आता दाखवायचा.

DRAFT 64th AGM

**श्री.मनोज वाडेकर (आरईडी):** मला बोलू द्या, का ऐकत नाही तुम्ही, मी मांडायच्या आधीच तुम्ही मांडताय.

**श्री.बाहुबली चौगुले (मानद सचिव):** प्लीज, मी विनंती करतो साहेब मला बोलू द्या.

**श्री.मनोज वाडेकर (आरईडी):** मी विषय मांडतोय,

**श्री. हेमंत कोळी :** तुला सगळं दाखवतो. अहो प्रूफ आहे,

**श्री.मनोज वाडेकर (आरईडी):** मला विषय मांडू द्या, सभागृहाच्या समोर मांडू द्या,

**श्री. राहुल शर्मा (एचडब्लूडी):** बहुत मुद्दे है अभी, सभा अँडजरण कर दीजिए, अध्यक्ष साहेब टाईम हो गया है सभा अँडजरण करके प्लान कीजिए.

**श्री. मुकुंद वैराळकर (एऍण्डएसईडी):** तुम्हाला सुद्धा विनंती करतो की आवाज कमी करा,

**श्री.बाहुबली चौगुले (मानद सचिव):** ओके, सॉरी बाकी मी संपूर्ण सभागृहाला आणि संचालकांना विनंती करतो की आप आपल्या चेअर वरती जाऊन बसायचं आहे, सर्वांनी आपापल्या जागेवर जाऊन बसायचे आहे,

2024 -25 च्या आर्थिक नफा विभागणीला मान्यता देण्यासाठी सभागृहाला विनंती आहे की सूचक अनुवादक द्या. आपल्याला नफा विभागणी करायची आहे.

**श्री. हेमंत कोळी :** हॅलो सूचक द्या, अनुमोदक द्या

**श्री. राहुल शर्मा (एचडब्लूडी):** मीटिंग अँडजरण कर दीजिए,

**श्री.बाहुबली चौगुले (मानद सचिव):** विषय संपतील,

**श्री.मनोज वाडेकर (आरईडी):** हॅलो मला बोलू द्या माझा विषय संपला नाही,

**श्री.बाहुबली चौगुले (मानद सचिव):** त्यानंतर पुढचा विषय वाचतो,

**श्री.मनोज वाडेकर (आरईडी):** मला बोलू द्या आहे, मीटिंग नंबर 3 मासिक सभा 01/07/2024 पेज नंबर 19 ठराव पास करण्यात येत आहे की संस्थेच्या एयर कंडीशन AMC करिता, सन 2024 25 च्या आर्थिक वर्षासाठी एकूण चार निविदा आल्या त्या पुढील प्रमाणे, आता तुम्ही लिहिल्या होत्या त्या चार, निविदा हे छापले आहे की नाही, तुम्ही तुमच्या मिनिट्स बुक मध्ये बघा.

DRAFT 64th AGM

**श्री.बाहुबली चौगुले (मानद सचिव):** साहेब ती प्रिंटिंग मिस्टेक आहे.

**श्री.मनोज वाडेकर (आरईडी):** आता त्या बाजूनेच आलात, तुम्ही म्हणजे मी खोटं बोलत होतो, आता प्लीज काहीतरी सत्य आहे माझ्या बोलण्यात आता. सभासदांनी प्लीज आपल्या चेअर वरती बसावं थोडंसं बाकी आहे.

**श्री.मनोज वाडेकर (आरईडी):** माझी प्लीज माझी लिंक तोडू नका, ऐका ना माझं, हा दोन मिनिटे बोलून तरी होऊ द्या, सर्वप्रथम आता मी तुम्हाला सांगतो चार कंपन्यांचे एसी टेंडर आले मंथली मिटिंग मध्ये नोंद होते, त्यातल्या तीनच कंपन्यांची निवेदन माहिती पहावयास मिळाली, आता याच्यामध्ये जे तीन कोटेशन आले आहेत, शिवा इंजीनियरिंग, दुसरी आहे फ्रेंड्स एअर कूल, आणि तिसरी आहे युनिक इंजीनियरिंग, तर आता याचा आपण जर ॲड्रेस बघितला जो आहे आपल्या युनिक इंजिनिअरिंगचा, चाळ नंबर तीन, एल एक्स ए टू फाईव्ह नाईन कुर्ला, सफेदफुल आणि याला जेव्हा आपण बघितलं तेव्हा ना हा नेताजी नगर भलत्याच ठिकाणी, आहे सफेद पूल भलत्याच ठिकाणी आहे, आणि चाळ नंबर तीन त्या ठिकाणी अस्तित्वात नाही, तर हा ॲड्रेस खोटा होता तर आता ही गोष्ट पहिली झाली.

**श्री.बाहुबली चौगुले (मानद सचिव):** ऐकून घ्या,

**श्री.मनोज वाडेकर (आरईडी):** थोडसं मी तुम्हाला विनंती करतो याच्यानंतर याचा HSN नंबर आहे 9954280 नंबर नुसार ना त्यांनी जे दिलेलं होतं जीएसटीच्या इथे दिलेलं त्यांचं वर्क फ्रॉम हांडलींग ऑफ पाईप अँड फॅब्रिकेशन वर्क तिथे फॅब्रिकेशन च काम चालतं आता युनिक इंजिनिअरिंगला जेव्हा फोन लावला त्यावेळेला त्यांनी सांगितलं की भाई आम्ही मुळात एअर कंडिशनच काम करत नाही, आमची कंपनी करत नाही, आम्ही फॅब्रिकेशनचं काम करतो, यानंतर आहे L2 आहे फ्रेंड्स एअर कूल ही खरोखर काम करते, त्यांच्या जीएसटी नंबर प्रमाणे एस जी एन नंबर प्रमाणे काम करते, यानंतर आहे शिवा इंजिनीयरिंग ही कंपनी उळवे ची आहे याच कंपनीने अगोदर मंदाकिनी शेडचे आपले काम केले होते, आणि ती कंपनी फॅब्रिकेशन काम करते या कंपनीचे वर्क प्रोफाइल आहे, ऑल टाइप्स ऑफ फॅब्रिकेशन वर्क्स आणि हे एस जी एन नंबर मध्ये सुद्धा नोंद आहेत, आणि यांना देखील फोन लावला असता त्यांनी सांगितलं की आम्ही एअर कंडिशन, एसी रिपेरिंग आणि एएमसी या पद्धतीची कुठलीही कामे आम्ही करत नाही, तर मग यातले दोन कोटेशन फेक आहे की नाही हे तुम्ही सध्याची वस्तूस्थिती बघता कळवा मला सांगा काय खरं आणि काय खोटं.

DRAFT 64th AGM

**श्री. हेमंत कोळी :** बस झालं भाऊ दाखवा आता.

**बाहुबली चौगुले (मानद सचिव):** वाडेकर साहेब आणि संपूर्ण सभागृहाने थोडे इकडं लक्ष द्या वाडेकर साहेबांनी हे पत्र टाकलं, व्हाट्सअप वर लिहिलं की हे एनवलप टेंडर वॉज मिसिंग, त्यानंतर मी त्याचं एनवलप दाखवलं पॉईंट नंबर वन, त्यांचं आम्ही तिथे खोडून पडलं, दुसरा विषय जातो यांनी फेक, फेक , फेक लिहिलं आता याच्यामध्ये मी सरळ सरळ दाखवतो की, या दोन ज्या कंपन्या आहेत, पहिली कंपनी शिवा इंजिनिअरिंग वर्क्स या कंपनीकडे BARC तले 30 ते 40 ऑर्डर्स आहेत. याच्यामध्ये वर्क ऑर्डर मी संपूर्ण सभागृहासमोर मांडतो. यांच्याकडे पायपिंग इन्स्टॉलेशन व्हेंटिलेशन सिस्टम चीलिंग याची सगळी कामे आहेत, मी सभागृहासमोर हे शंभर पानांचं वर्क मी इथे मांडतो, ज्याला बघायचं त्याला संस्थेच्या कार्यालयामध्ये येऊन बघू शकता, आता हे सगळीकडे दाखवतो, वर्क कम्प्लिशन. त्यानंतर मी सेकंड पॉईंट कडे जातो, साहेब तुमचा प्रश्न संपला ना. तुम्ही फेक, फेक,फेक, हा शब्द टाकला, ना तर त्याच्यानंतर दुसरी पार्टी युनिक इंजीनियरिंग, हा त्याचा ऍड्रेस आहे, याही फर्म कडे 2014 पासून ते 2025 पर्यंत BARC मधले साधारणता मोर देन 50 lakh च्या ऑर्डर्स आहेत. AMMD डिव्हिजन, टीएसडी, CED, च्या भरपूर सगळ्या डिव्हिजनच्या ऑर्डर्स आहेत या इथे त्यांना GEMची ऑर्डर आहे, DPS ची ऑर्डर आहे सगळ्या ऑर्डर्स आहेत, इथे मी सभागृहासमोर मांडतो त्याच्यामुळे या दोन्ही कंपन्या फेक नाही आहेत हे सिद्ध होतंय. एनवलप नाहीये हा मुद्दा, पूर्णपणे संचालक मंडळाला आणि संपूर्ण संस्थेला बदनाम करण्याचा हा

प्रकार आहे, आता तुम्हाला कोटेशन दाखवलं, मी ऑलरेडी, हे L1 आहे, एक मिनिट साहेब तुम्ही पण ओरडू नका, मी पण शांत बोलतो, दोघांचा बीपी शांत होईल, ही त्याची कोटेशन आहे.

**श्री. शिबू सिंघा रॉय :** अध्यक्ष महोदय, बोलने का परमिशन चाहता हु, शिवा इंजिनिअरिंग वर्क्स और युनिक इंजीनियरिंग ये जो दो कंपनी है, डिफरंट डिफरंट जॉब्स के लिये BARC मे कॉन्ट्रॅक्ट लेता है .उसकी वर्क प्रोफाइल डिफाइन करने के बाद, हमने टेंडर ओपन किया है. उनको टेंडर ओपन के बाद हमने देखा है कि ये पार्टीने कोटेशन दिया है, मंदाकिनी ऑफिस मे ये कंपनी को एक्सपिरीयन्स के लिये एक AC मेन्टेनन्स के लिये दिया, ऊनोने AC ठीक किया, मंदाकिनी का एसी मेंटेन करके दिया है, best on that उनको दस दिन के बाद उनको वर्क ऑर्डर इशू किया गया है, प्रेझेन्टली करोडेको काम ये दोनो कंपनी BARC के अंदर काम कर रहा है. आज के दिन मे कम से कम पचास लोक BARC के अंदर काम कर रहा है.

**श्री. गिरीष शेणई साहेब (पदसिद्ध अध्यक्ष) :** वाडेकर आम्ही ऑलमोस्ट वर्षाला दोनशे ते तीनशे कोटींची काम करतो, प्रत्येक वेळेला जर सेम पार्टी, अरे सुनो मैने पुरा किया क्या, सेम वेंडर BARC मे अगर उसको काम दिया गया है, वो बहुत स्कुटीने के बाद दिया जाता है, ओके उपर का लेटर छोड दो जभी देखा जाता है, उसका किमान 25 पॉईंट रहता है, ओके उसके हिसाब से उसका इव्हॅल्युएशन होके उसको काम दिया जाता है, लेटरहेड पर व्हॅल्युएशन होता नही है, अगर BARC मे उसने काम किया है, या एनी DAE Unit or गव्हर्नमेंट युनिट तो लेटरहेड पे मत जाये, He is a gunion party, वाडेकर एक लक्षात घ्या, BARC ने Evaluate केलेला आहे की मला नाही वाटत की तुम्ही एक तर ते कुठल्या कसोटीवर लावायची गरज आहे.

DRAFT 64th AGM

**श्री.मनोज वाडेकर (आरईडी):** फोनवर त्यांच्याशी संपर्क साधला आम्ही,

**श्री. गिरीष शेणई साहेब (पदसिद्ध अध्यक्ष) :** मला तेच म्हणायचंय एक्झॅक्टली, मी काय म्हणतोय ते लक्षात घ्या जर वेंडरच नाव सेम असेल जर त्याचा ऑफिस ॲड्रेस सेम असेल त्याचा जीएसटी नंबर सेम असेल जी वर्क ऑर्डर BARC मिळालेली आहे, आणखी पण बरेच पॅरामीटर्स, तुम्ही वर्क ऑर्डर मध्ये बघू शकता, त्यामुळे तुम्ही मला वाटत नाही की त्याच्यावर शंका घेण्याची जरुरी आहे, आणि ती स्क्रुटीने बघितली तर, या तुम्ही मी तुम्हाला दाखवतो की कशी टेक्निकल स्क्रुटीने होते ही व्हॅल्युएशन कमिटी असते, SO/G लेवल कमिटी असते, पहिले पार्ट ए पार्ट, बी पार्ट ए मध्ये 25 तर कमीच सांगतोय, जवळपास 3 पेज त्याचं फायनान्शियल टर्नओव्हर, त्याचा प्रॉफिट अँड लॉस, त्याच्या सिमिलर वर्कची काय डेफिनेशन आहे, आणि त्याप्रमाणे त्यांनी किती काम केले आहे, कामाप्रमाणे टक्केवारी हे सगळं खूप डिटेल्स कमिटी असते, कमिटी असते या चार-पाच लोकांचे आणि त्यातला सीनियर एस ओ जी च्या लेव्हलचा एक माणूस त्यांचा Chairman असतो, तसं असेल मी त्याच्यात जात नाही, मी असं म्हणतोय की टेंडर प्रोसेस कुठेतरी लेटरहेड वर, निर्णय हे नाही ते नाही यापेक्षा खूप डिटेल इन्वेस्टीगेशन

केलं जातं आपल्या BARC मध्ये,  ओके, तर मला वाटतं तीच पार्टी असेल आणि कामाचं स्वरूप तेच असेल तर त्यात शंका घेण्याची गरज नाही असं माझं पर्सनल मत आहे,  Have a neutral stand.

**श्री. गिरीष शेणई साहेब (पदसिद्ध अध्यक्ष) :** मी तेच सांगतोय की राजापुरे, एक सेकंद वाडेकर ॲक्च्युली टेंडरिंग प्रोसेस मध्ये तुम्हाला त्या वेंडरला पर्सनली कॉन्टॅक्ट करायची परवानगी नाही, आज पर रुल तुम्हाला जे डॉक्युमेंट्स मिळतात कुठल्याही पार्टीला पाच लाखाचं काम आहे की 500 कोटीचं काम आहे ते जे डॉक्युमेंट घेतो, तो सबमिट करतो त्याच्या बेसिसवर त्यांचं टेक्निकली इव्होल्युशन होतं, ऐका, L1 जो पार्टी असते We are not supposed to contact directly, ओके हे रुल्स आणि रेग्युलेशन गव्हर्मेंट नुसार आहेत, आपण इकडे तिकडे फिरू या नको, वाडेकर मी फक्त याबद्दल बोलतोय, वाडेकर लीसन आपण उड्या मारूया नको. आपण बोलतोय कशाबद्दल? टेंडर बद्दल नाही या AMC बद्दल चर्चा चालू आहे त्याबद्दल मी बोलतोय, मी तुम्हाला हेच सांगतोय, त्याची उत्तर देण्यास मी लायक नाही, मी तुम्हाला फक्त टेंडरिंग प्रोसेस BARC मध्ये काय असते ती सांगतोय.

**श्री.बाहुबली चौगुले (मानद सचिव):** प्लीज मीटिंग का थांबवायची मीटिंग संपवायची आहे, आपल्याला सगळे विषय आपण मांडणार आहोत,

DRAFT 64th AGM

**श्री.डी.एस राजापुरे (डीआरएचआर) :** 54 लाखाचे नुकसान झालंय त्याला जबाबदार कोण त्याच्यावर काय कारवाई केली गेली वर्ष दोन वर्ष आम्ही लेटर लिहितोय, तुम्ही काहीही कारवाई करत नाही आणि तुम्ही त्याच पॉईंटवर निवडून आलात हे लक्षात घ्या, टीडीएस या मॅटरवर तुम्ही संस्थेचं 54 लाखाचे नुकसान झाले त्याच्यावर तुम्ही कायदेशीर कारवाई का करत नाही, मोनेटोरियम या विषयावर संस्थेचे 50 लाखाचं नुकसान झाले, अजून किती वर्ष करणार ?

**श्री.बाहुबली चौगुले (मानद सचिव):** साहेब बॅलन्स शीट मंजूर झाले ना आता?

**श्री.डी.एस राजापुरे (डीआरएचआर) :** बॅलन्स शीट कोणी मंजूर केली ?

**श्री.बाहुबली चौगुले (मानद सचिव):**  सभागृहामध्ये मंजुरी आली साहेब.

**श्री.डी.एस राजापुरे (डीआरएचआर) :** नाही केली बॅलन्स शीट मंजूर

**श्री.बाहुबली चौगुले (मानद सचिव):**  झाली, परत विषय घेतला तुम्ही आणि तुम्ही जे बोलताय, ते गेल्या आर्थिक वर्षातील मंजूर झालेल्या बॅलन्स शीट मधली फिगर आहे साहेब.

**श्री.डी.एस राजापुरे (डीआरएचआर) :** नाही होत तर चालवा अर्धा तास आणि  तुम्ही ज्या गोष्टी सांगतात,

**श्री.बाहुबली चौगुले (मानद सचिव):** संस्थेमध्ये या त्या गोष्टी क्लिअर केल्या जातील.

**श्री.डी.एस राजापुरे (डीआरएचआर) :** संस्थेमध्ये नाही गेल्या वर्षी तुम्ही मीटिंगमध्ये ॲग्री केलं होतं, आम्ही जुन्या कमिटीला लेटर पाठवून कायदेशीर कारवाई करू काय कारवाई केली ? आपलं 54 लाखाचं नुकसान झालं कोण भरून देणार त्यादिवशी अध्यक्षांच्या इथे इन फॉर्मल मीटिंग झाली तेव्हा लीगल एक्सपर्टनी सांगितलं हे दोन्ही संचालक मंडळाची जबाबदारी आहे,  54 लाखाचं नुकसान झालंय त्याची जबाबदारी कोण घेणार ? उद्या तुम्ही पण जाणार

**श्री.बाहुबली चौगुले (मानद सचिव):** 34 लाख म्हणायचे का?

**श्री.डी.एस राजापुरे (डीआरएचआर) :** 54 लाख म्हणायचे,

DRAFT 64th AGM

**श्री.बाहुबली चौगुले (मानद सचिव):** 54 लाख कसं, कॅल्क्युलेट केलं तुम्ही ?

**श्री.डी.एस राजापुरे (डीआरएचआर) :** सांगतो ऐका, ऐका आता मी बोलतो 54 लाखाचा सांगतो पत्र पाठवा,

**श्री.बाहुबली चौगुले (मानद सचिव):** कायदेशीर लीगल नोटीस पाठवतो परत.

**श्री. हेमंत कोळी :** राजापुरे ठराव मांडा, आणी कोणावर केस करायची, सूचक आणी अनुमोदक द्या,

**श्री. आनंद मेदार:**साहेब ऐका उत्तर देतो, राजापुरे साहेब तुमचं खरं खरं तळमळ आम्हाला समजते पण या टीडीएस वर आपण सगळे मिळून काम करून करूया ना आपण काम करूया त्याच्यासाठी वेळ घालवून तुम्ही लोकांचा वेळ का खात आहे. हे कोणी जाणून बसून बोर्ड डायरेक्टरने टीडीएस घात केला आहे का आरोप आहे?  का सांगा ना राजापुरे साहेब टीडीएस कोणी घात केलाय?

**विषय क्र.2: संचालक मंडळांनी सादर केलेल्या दिनांक 1 एप्रिल 2024 ते 31 मार्च 2025 या कालावधीचा वार्षिक अहवाल व दिनांक 1 एप्रिल 2024 ते 31 मार्च 2025 अखेरचे वैधानिक लेखा परीक्षित ताळेबंद व नफा-तोटा पत्रक स्वीकारून त्यास मान्यता देणे.**

**वार्षिक सर्वसाधारण सभा ठराव क्र.2: ठराव पास करण्यात आला की दिनांक 1 एप्रिल 2024 ते 31 मार्च 2025 या कालावधीचा वार्षिक अहवाल व दिनांक 1 एप्रिल २०२४ ते दिनांक 31 मार्च 2025 अखेरचे वैधानिक लेखा परीक्षित ताळेबंद पत्रक व नफा तोटा पत्रक स्वीकारून त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.**

**सूचक : श्री. प्रकाश पाटील (एसआयआरडी)**
**अनुमोदक : श्री. मुकुंद वैराळकर (एऍण्डएसईडी)**

**ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.**

**श्री. अविनाश तिरपुडे (पदसिद्ध -उपाध्यक्ष)** : आता पावणे आठ वाजले आहेत आणि मुद्दे भरपूर आहेत, जर सभा पूर्ण करायचे असेल तर पुढे जावे लागेल,

DRAFT 64th AGM

**विषय क्र.3: सन 2024- 25 या आर्थिक वर्षाच्या नफा विभागणीस मान्यता देणे.**

**श्री.बाहुबली चौगुले (मानद सचिव):** नफा विभागणीस मान्यता देणे, विनंती करती सूचक आणी अनुमोदक द्या.

**वार्षिक सर्वसाधारण सभा ठराव क्र.3: ठराव पास करण्यात आला की संस्थेस सन 2024-25 या आर्थिक वर्षात निव्वळ नफा रु.15,60,06,904/- इतका झाला व गतवर्षीचा शिल्लक नफा रु.25,18,962/- असून विभागणीसाठी एकूण नफा रु.15,,85,25,866/- उपलब्ध आहे.**

**सदर नफ्याची संचालक मंडळाने सुचविलेली नफा विभागणी खालीलप्रमाणे असून त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.**

| | |
|---|---|
| **नफा रु.15,60,06,904/- वर 10% प्रमाणे वैधानिक राखीव निधी** | **1,56,00,690** |
| **भाग रकमेवर 15% लाभांश** | **4,11,45,263** |
| **आकस्मिक दायित्व** | **2,15,00,000** |

| | |
|---|---|
| **निवडणूक तरतूद खर्च** | **5,00,000** |
| **सभासद कल्याण निधी** | **22,50,000** |
| **वैधानिक तरलता निधी** | **4,00,00,000** |
| **विक्रम कर्ज संरक्षण निधी योजना** | **3,50,00,000** |
| **सभासद भविष्य सहाय्य निधीला बोनस** | **14,49,153** |
| **मृत्यू सहाय्य निधी** | **5,40,000** |
| **सहकारी प्रशिक्षण निधी तरतूद** | **5,00,000** |
| **कर्मचारी कल्याण निधी** | **25,000** |
| **शिल्लक नफा पुढील वर्षासाठी वर्ग केला** | **15,760** |
| | **15,85,25,866** |

**सूचक - श्री. सचिन सोळसे**

**अनुमोदक.:- श्री. धनंजय धेंडे (डीसिएसइएम)**

DRAFT 64th AGM

**ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.**

**श्री.बाहुबली चौगुले (मानद सचिव):** त्यानंतर पुढील विषय वाचून दाखवतो,

**विषय क्र.4: सन 2024-25 या आर्थिक वर्षाकरिता मंजूर केलेल्या अंदाजपत्रकापेक्षा जास्त झालेल्या खर्चास मंजुरी देणे व सन 2025-26 या आर्थिक वर्षाकरिता संचालक मंडळाने मांडलेल्या अंदाजपत्रकास मान्यता देणे.**

**श्री.बाहुबली चौगुले (मानद सचिव):** तीन विषय बाकी आहेत, मग आपण करू ना, पुढच्या विषयाला पटपट जातोय, टाईम वेस्ट होतोय, पाटील जी मीटिंग ची वेळ वाढवून घेऊ, तुम्ही बसून घ्या, तुम्ही बसून घ्या सुरक्षारक्षकांनी वेळ वाढवून दिला आहे, तुम्ही बसून घ्या,जाणून-बुजून चालले प्लीज विनंती आहे सभागृहाला, आपापल्या जागेवर बसा,

**श्री. अविनाश तिरपुडे (पदसिद्ध -उपाध्यक्ष) :** प्लीज सायलेन्स,

**श्री.बाहुबली चौगुले (मानद सचिव):** सभागृहाला विनंती आहे, प्लीज आप आपल्या जागेवर जा, कृपया आपल्या जागेवर बसून घ्या, माननीय सभासद बंधू भगिनी. महाजन सर सिक्युरिटीने परमिशन दिली आहे, सभागृहात मागचे लोक ऐकतात, तुम्ही ओपोज करताय सगळे ऐकतात. तुम्ही स्वतःहून का एड जर्न करताय साहेब, तुम्हाला ॲड जर्नल करून सभा चालवायची आहे का ? पदसिद्ध अध्यक्ष अजून त्यांच्या सीटवर आहेत.

**श्री. हेमंत कोळी :** बसून घ्या सगळ्यांनी, अरे त्या सगळ्यांना बसवा कांबळे सर, प्लीज सोनवणे साहेब,

**श्री.बाहुबली चौगुले (मानद सचिव):** प्लीज पदसिद्ध अध्यक्ष, उपाध्यक्ष, संस्थेचे अध्यक्ष अजून सभागृहात मंचावर आहेत, सिक्युरिटीने अजून टाईम दिलेला आहे, तुम्ही स्वतःहून सभा का तहकूब करता? सभासदांच्या जिव्हाळ्याचा विषय आहे. पुढील विषय वाचून दाखवतो, सण २०२४- २५ या आर्थिक वर्षाकरिता मंजूर केलेल्या अंदाजपत्रकापेक्षा जास्त झालेल्या खर्चास मंजुरी देणे व सन 2025 2026 या वर्षाकरिता संचालक मंडळाने मांडलेल्या अंदाजपत्रकास मान्यता देणे या अजेंडाच्या विषयानुसार आपण आठ तारखेला अजेंडा इशू केला होता.

**श्री. प्रकाश पाटील (एसआयआरडी) :** चौगुले साहेब, विषय कुठला चालू आहे, नऊ विषय बाकी आहेत,

DRAFT 64th AGM

**श्री.बाहुबली चौगुले (मानद सचिव):** साहेब तुम्ही बसून घ्या, तुम्ही बसा ना,

**श्री. हेमंत कोळी :** प्रकाश पाटील खाली बसून घ्या तुम्ही टाईमपास करता, तुम्ही खाली बसा

**श्री. मनोज खेडेकर (एसआयआरडी):** एक मिनिट अध्यक्ष साहेब हॅलो मागील चार - पाच तासापासून आम्ही इकडे बसलेलो आहोत, पण टेंडरिंग प्रोसेस हा असा विषय आहे ना, याच्यावरती कमिटीकडे उत्तर बरोबर आले का नाही, याच्यावरती याच्यावरती काय उत्तर आहे, तुमच्याकडे

**श्री. संतोष कांबळे (इएमएडी) :** भाऊ अजून अहवाल मंजूर झाला नाही,

**श्री.डी.एस राजापुरे (डीआरएचआर) :** तुम्ही कसं काय जबरदस्तीने पास करू शकता नफा विभागणी तुम्ही कसं काय विषय पास करत आहे.

**बाहुबली चौगुले (मानद सचिव):** साहेब नफा विभागणीला सभेतून सूचक अनुमोदक झाले, तुम्ही इकडे गोंधळ चालू आहे साहेब,

**श्री.डी.एस राजापुरे (डीआरएचआर):** दोन कोटी पंधरा लाखाचं आम्हाला एक्सप्लेनेशन द्या, नफा विभागणीमध्ये दोन कोटी पंधरा लाख, Contingent लायबिलिटी हा काय विषय आहे सांगा ते.

**श्री.राजेश कळके (सीडीएम):** नोकर भरती विषय राहिलेले आहेत.

**श्री. हेमंत कोळी :** तुम्ही बसून घ्या सर्वांनी.

**श्री. मनोज खेडेकर (एसआयआरडी):** सर्व टेंडरिंग प्रोसेस मध्ये काहीतरी घोळ वाटतोय याच्यावरती बरोबर उत्तर आलेले नाही,

**श्री.डी.एस राजापुरे (डीआरएचआर) :** लायबिलिटी हा काय विषय आहे?

**श्री. प्रकाश पाटील (एसआयआरडी):** तुम्हाला बॅलन्स शीट ला मान्यता दिली मान्य आहे, तिसरा सुद्धा अजेंडा सूचक - प्रकाश पाटील

DRAFT 64th AGM

**श्री.डी.एस राजापुरे (डीआरएचआर) :** एक मिनिट.

**श्री. हेमंत कोळी :** हो राजापुरे शांत बसा.

**श्री. प्रकाश पाटील (एसआयआरडी):** त्यांच्या विनंतीला मान्य – तिसरा सुद्धा अजेंडा

**श्री.बाहुबली चौगुले (मानद सचिव):** 2025 - 26 सालाकरिता संचालक मंडळाने मांडलेल्या अंदाजपत्रकास मान्यता देण्यास विनंती करतो, या वेळेचं जे अंदाजपत्रक आहे, ते सभेसमोर मांडताना 105 करोड 25 लाखाचा अंदाजपत्रक मी या सभेसमोर मंजुरीला मांडतो. पान क्रमांक 58 - 59 ला मजुरीसाठी ठेवली आहे, विनंती करतो सूचक आणी अनुमोदक द्या.

**वार्षिक सर्वसाधारण सभा ठराव क्र.4: ठराव पास करण्यात आला की सन 2024-2025 या आर्थिक वर्षाकरिता मंजूर केलेल्या अंदाजपत्रकापेक्षा जास्त झालेल्या खर्चास सभासदांनी सर्वानुमते मंजुरी दिली.**

**पुन्हा ठराव पास करण्यात आला की सन 2025-2026 या आर्थिक वर्षाकरिता संचालक मंडळाने सुचविलेल्या अंदाजपत्रकास सभागृहाने एकमताने मंजुरी दिली.**

**सुचक - श्री. विलास घोरपडे**
**अनुमोदक - श्री. संतोष कांबळे**

**ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.**

**श्री. गिरीष शेणई साहेब (पदसिद्ध अध्यक्ष) :** साहेबांशी बोललोय मी, साहेब आठ पर्यंत बोलले होते, मी साडेआठ पर्यंत त्यांच्याकडून एक्सटेन्शन घेतले आहे ,तेव्हा प्लीज साडेआठ पर्यंत आपण हे सगळं संपवूया.

**श्री.बाहुबली चौगुले (मानद सचिव): विषय क्र.5: वैधानिक लेखापरीक्षक यांच्या सन 2024-25 या आर्थिक वर्षाच्या हिशोब तपासणी अहवालाची नोंद घेणे.**

DRAFT 64th AGM

**श्री.बाहुबली चौगुले (मानद सचिव):** विनंती करतो सूचक आणी अनुमोदक द्या.

**वार्षिक सर्वसाधारण सभा ठराव क्र.5: ठराव पास करण्यात आला की शासकीय लेखापरीक्षक M/s. SAAJ & Associates पार्टनर सीए जगदीश रणदिवे यांनी सन 2024-2025 या आर्थिक वर्षाचा सादर केलेला वैधानिक लेखापरीक्षण अहवाल व त्यात दिलेले शेरे स्वीकारण्यात यावेत व त्यांनी दिलेल्या शेऱ्यांची पूर्तता करण्यात यावी असा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.**

**सूचक : श्री. मुकुंद वैराळकर (एऍण्डएसईडी)**
**अनुमोदक : श्री. डी.एस धोत्रे (सीडीएम)**

**ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.**

**श्री.बाहुबली चौगुले (मानद सचिव):**

विषय क्र.6: सन 2025 26 या आर्थिक वर्षासाठी वैधानिक लेखापरीक्षकाची नियुक्ती करणे.

**श्री. प्रकाश पाटील (एसआयआरडी):** तुमच्या विश्वासातला कोण आहे ते सांगा त्याचं कोटेशन दाखवा.

**श्री.बाहुबली चौगुले (मानद सचिव):** या आर्थिक वर्षाच्या वैधानिक लेखापरीक्षकांची पाच निविदा पत्रिका आपल्याकडे आले आहेत, - Proposal for Statutory Auditor Financial year 25 - 26 याच्या अनुषंगाने प्राप्त निविदा.

1. M/s. D. G. Kango Associates, Pune
2. M/s. Jain Chowdhary & Company
3. M/s. AVSM & Associates,
4. M/s. Nikita Jadhav & Associates,
5. M/s. SAAJ Associates, (L1)

या पाच निविदा पत्रिका आपल्याकडे आले आहेत, त्याच्यामध्ये सगळ्यात लोवेस्ट कोट कोटेशन आहे, M/s. SAAJ Associates – 12,58,238.79/-

**PROPOSAL FOR STATUTORY AUDITOR FOR THE F.Y.2025-26**

Ref. BARC/CS/1958

| Sr. No | Name of Firms | Offer / Quaoted Value | | GST Amount @18 % | Total Final Value | Vendor Status |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | M/s. D G Kango Associates Pune | 98% | 1229385.85 | 221289.45 | 1450675.30 | L-5 |
| 2 | M/s. Jain Choudhary & Company | | 1150000 | 207000.00 | 1357000.00 | L-3 |
| 3 | M/s. ASVM & Associates | | 1100000 | 198000.00 | 1298000.00 | L-2 |
| 4 | M/s. Nikita Jadhav & Associates | 95% | 1191751.59 | 214515.29 | 1406266.88 | L-4 |
| 5 | M/s. SAAJ Associates | 85% | 1066304.056 | 191934.73 | 1258238.79 | L-1 |

**श्री. डी.एस धोत्रे (सीडीएम):** सेक्रेटरी सर, एक मिनिट हा याच्यामध्ये 85 टक्के वाला, तो एल वन असेल ना ,त्याच्या अगोदर पण साज असोसिएट्स यांनीच केले, त्याच्यामध्ये एवढ्या चुका आहेत मग साज वाल्यांनाच देणे योग्य आहे का ?

**श्री.बाहुबली चौगुले (मानद सचिव):** काय चुका आहेत?

**श्री. डी.एस धोत्रे (सीडीएम):** राजापुरे, प्रुव्ह करून सांगितलं ना तो पॉईंट फाईव्ह चा विषय हिशोब सगळ्यात चुका आहेत.? त्याच्यामध्ये मग त्या साजलाच द्यायची काय गरज आहे पॉईंट फाईव्ह साजलाच का द्यायचं तुम्हाला हे एटी फाईव्ह पर्सेंट गेल्या वर्षीचा त्याचा कोटेशन किती 90% यावर्षी तो 85 टक्के वर का आला.

**श्री.बाहुबली चौगुले (मानद सचिव):** साहेब,

**श्री. डी.एस धोत्रे (सीडीएम):** गेल्या वर्षी 90% यावर्षी 85 टक्के, दुसरी गोष्ट आतापर्यंत अहवाल वरती रणकंदन चालू आहे, त्या साजला वार्षिक सर्वसाधारण सभेसमोर सभागृहाला द्यायची इच्छा नाही, तुम्हाला द्यायचं असेल तर देऊन टाका यातच त्यांनी इतक्या चुका केल्या असतील तर त्याला देऊ नका

**श्री. प्रकाश पाटील (एसआयआरडी):** धोतरे साहेब तुम्हाला काय हवंय ते सांगा?

**श्री. डी.एस धोत्रे (सीडीएम):** त्याच्यानंतरचा कोण आहे त्याला द्या, माझी अशी इच्छा आहे की L2 ला द्या, 95% वाला, जो आहे चुका तरी आपल्या कमी होतील ना.

DRAFT 64th AGM

**श्री. विलास घोरपडे (एफडी) :** नियमाप्रमाणे जे आहे ते करा कारण याच्यामध्ये कोटेशन भरले आहे, त्याप्रमाणे जे होतंय ते करा, त्यांनी कोर्टामध्ये गेली केस असं व्हायला नको, या गोष्टीचा सरळ विचार करा, लीगल ॲडव्हायझर बसले आहेत त्यांचा सल्ला घ्या.

**श्री. शबीर आलम (एफटीडी) :** घोरपडे साहेब, पिछले बारबी जब आवाज उठाया गया था, तो L1 के बजाये L2को अपॉइंट किया गया था. क्या रूल मे था क्या कोर्ट में गया क्या कोई?

**श्री. प्रकाश पाटील (एसआयआरडी):** आपण बोललो होतो गेल्यावर्षी.

**श्री. शबीर आलम (एफटीडी) :** इतना सारा गलतिया पकडा है राजापुरे ने, तो योग्य है क्या?

**श्री. संतोष ढमढेरे :** लीगल ॲडव्हायझर म्हणत आहेत,

**श्री.राजेश कळके (सीडीएम):** लास्ट टाईम एल टू ला घेतले होते.

**श्री.संतोष ढमढेरे :** एडवोकेट निंबाळकर यांना विचारलं विलास घोरपडे यांनी जी सूचना केली त्या पद्धतीने त्यांना विचारलं त्यांनी सांगितलं जनरल बॉडी जो चार्टर्ड अकाउंटंट सांगेल तो आपण घेऊ शकतो. असं त्यांनी आत्ता आपलं मत दिलं आहे.

**श्री. शिवाजी हगवणे :** एक मिनिट, टेक्निकल प्रॉब्लेम मी सांगतो, L2 जे आहे यांनी ऑलरेडी statutory audit ला कोटेशन टाकले होते, आणि त्यांचे कोटेशन आले होते सोबतच त्यांनी इंटरनल ऑडिट साठी सुद्धा कोटेशन टाकलं आणि इंटरनल ऑडिट मध्ये ते L1 असल्यामुळे इंटरनल ऑडिटर जे आहे तिथे त्यांची ती अपॉइंटमेंट झाली, त्यांचे इंटरनल ऑडिटर ची अपॉइंटमेंट झाल्यामुळे त्यांना या ठिकाणी statutory audit देता येणार नाही. परंतु आपल्याकडे जी कोटेशन्स आली आहेत, ती कोटेशन या ठिकाणी आपण मांडली आहेत, सभागृहाला खरोखर प्रामाणिकपणे या ठिकाणी विनंती करतो की गेल्या वर्षी मी मानद सचिव पदावरती काम केलं आहे.

**श्री. डी.एस धोत्रे (सीडीएम):** L2 मग L3 घ्या,

**श्री. शिवाजी हगवणे :** मला माझं एक मत मांडायचा आहे, कुठले ही घ्या, आपण पार्शली विड्रॉल आपण सभासदांच्या टीडीएस साठी आणलं आणि अजून एक दोन तीन गोष्टी आपण पास करून आणले आहेत, त्यासाठी या ठिकाणी मी खरोखर प्रामाणिकपणे सभागृहाला मला सांगायचे की या ऑडिटरचं खूप सारं मार्गदर्शन त्या ठिकाणी झालं आहे. त्याच्यामुळेच संस्थेच्या हितासाठी, धोत्रे साहेब मार्गदर्शन होत आहे.

DRAFT 64th AGM

**श्री. डी.एस धोत्रे (सीडीएम):** मार्गदर्शन होत असेल तर, कोटेशन घेऊच नका, डायरेक्ट सभागृहाला सांगा ना आम्हाला हाच घ्यायचाय म्हणून. मी तर वैयक्तिक सांगतो घ्या साजला बाबा कोटेशन दाखवूच नका, कशाला दिशाभूल करताय.

**श्री. शिवाजी हगवणे :** ऐका ना धोत्रे साहेब संस्थेच्या हितासाठी आणि संस्थेच्या हितासाठीच जर इथे चूक झाली असेल साहेब तर तुम्ही त्या ऑडिटर वरती केस टाका, पण मी या ठिकाणी खरोखर रेकमेंड करतो, जर इथे चूक झाली तर त्या ऑडिटर वरती केस संस्था सुद्धा टाकेल, संस्थेचे एकही रुपयांचं नुकसान झाला असेल आणि भविष्यात झालं तर संस्था या ऑडिटरवर डायरेक्ट केस टाकेल, परंतु माझी खरोखर नम्र विनंती आहे, की संस्थेच्या हितासाठी आणि सहकार क्षेत्राची काम जे होतात त्यासाठी विनंती करतोय

**श्री. प्रकाश पाटील (एसआयआरडी):** बाकी आम्ही सभागृहाला सांगतोय L3 घ्या ना,

**श्री. गिरीष शेणई साहेब (पदसिद्ध अध्यक्ष) :** पाटील पूर्ण ऐकून घ्या तुम्ही, ऐकून घ्या,

**श्री. एस. एस. महाजन (एफआरडी):** साहेब मला एकच वाक्य बोलू द्या, आम्ही साजला हो म्हणतो, पण अशा चुका परत केल्या तर त्यांना त्याच्यावर फाईन भरावा लागेल. त्यांची तयारी आहे का?

**श्री. गिरीष शेणई साहेब (पदसिद्ध अध्यक्ष) :** टेंडरिंग प्रोसेस मध्ये L1 ला रिजेक्ट करणे हे खूप त्रासदायक होऊ शकतो. लिगली, कोणी आर्बीटेशन मध्ये गेलं तर त्याच्यासाठी खूप खर्च करावा लागेल सोसायटीला,

**श्री. मुकुंद वैराळकर (एऍण्डएसईडी):** या प्रोसेस मध्ये थोडेसे हितसंबंध पण जपले जातात साहेब,

**श्री. गिरीष शेणई साहेब (पदसिद्ध अध्यक्ष) :** मी फक्त डॉक्युमेंटेशन वरती बोलतोय.

**श्री. मुकुंद वैराळकर (एऍण्डएसईडी):** हा प्रॉब्लेम येईल तो प्रॉब्लेम येईल, आपल्याला कागदोपत्री प्रॉब्लेम येतात, परंतु तुम्ही सांगितले संचालक मंडळाचा पण तसाच आग्रह दिसतो कुठेतरी हे हितसंबंध जपले जात आहेत, हा याच्यामध्ये दुमत नाही, परंतु तरीसुद्धा आम्ही संचालक मंडळाच्या विनंतीला मान देऊन L1 स्वीकारतो,

DRAFT 64th AGM

**वार्षिक सर्वसाधारण सभा ठराव क्र.6: ठराव पास करण्यात आला की एकूण 5 निविदा आल्या होत्या त्यापैकी M/s SAAJ & Associates यांचा मागील आपल्या संस्थेच्या कामकाजाचा अनुभव व त्यांनी सन 2024-25 या आर्थिक वर्षाच्या ताळेबंद पत्रकाच्या खेळत्या भांडवलाच्या 85% प्रमाणे फी नमूद केल्यामुळे 64 व्या वार्षिक सर्वसाधारण सभेने M/s SAAJ & Associates यांची सन 2025- 2026 या कालावधीसाठी वैधानिक लेखापरीक्षक म्हणून नियुक्ती केली व पुढील कार्यवाहीसाठी संचालक मंडळास अधिकार देण्यात आले.**

सुचक - **श्री. मुकुंद वैराळकर (एऍण्डएसईडी)**
अनुमोदक - **श्री. डी.एस धोत्रे (सीडीएम):**

**ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.**

**श्री.बाहुबली चौगुले (मानद सचिव):** विषय क्रमांक पुढचा वाचून दाखवतो
**विषय क्र.7: सन 2023 24 या आर्थिक वर्षाच्या लेखापरीक्षणातील दोषांचे जाहीर वाचन करून त्या संबंधीच्या दोष दुरुस्ती अहवालाची नोंद घेणे.**

**श्री.बाहुबली चौगुले (मानद सचिव):** हा संस्थेकडे अहवाल आलेला आहे साधारणतः 11 पानांचा हा अहवाल आहे,

**श्री. प्रकाश पाटील (एसआयआरडी):** डिस्प्ले करा, वाचून दाखव,

**श्री.बाहुबली चौगुले (मानद सचिव):** सर याच्यामध्ये मेजर पॉइंट आहेत ते मी तुम्हाला वाचून दाखवतो, याच्यामध्ये त्यांनी लिहिले की सिस्टीम ऑडिट करून घ्या, सिस्टीम ऑडिट होत नाही आपण कारवाई चालू केली आहे, त्यानंतर त्यांनी सांगितले आहे की टीडीएस तुम्ही आता कॉटरली घेताय, मंथली घ्या त्याची फायलिंग पण मंथली चालू करा, त्यानंतर दुसरा पॉईंट त्यांनी टाकला आहे की इंटरनल ऑडिट हे न चुकता दर तीन महिन्याला करून घ्या, त्याच्या आलेल्या रिपोर्टनुसार त्यावर उचित कारवाई करा अशा काही सूचना केल्या आहेत, चौथा पॉईंट मेन्शन केला आहे की पीएफ जो आहे तो संस्थेचा पीएफ अकाउंट मध्ये गुंतवा, असा रिमार्क त्यांनी मारला आहे त्याच्या अनुषंगाने आम्ही एलआयसी मध्ये कॉन्टॅक्ट केलेला आहे, पीएफ साठी रजिस्टर पुणे यांच्या कडे पत्र व्यवहार केला आहे.

DRAFT 64th AGM

**वार्षिक सर्वसाधारण सभा ठराव क्र.7: ठराव पास करण्यात आला की सन 2023-2024 या आर्थिक वर्षाच्या लेखापरीक्षणातील दोषांचे वाचन करून त्यासंबंधी दोषांची दुरुस्ती केलीबाबतची नोंद घेण्यात आली व या दोष दुरुस्तीच्या अहवालाची घेतलेली नोंद माननीय सहकार आयुक्त, सहकारी संस्था, पुणे यांच्या माहितीसाठी सादर करावी असा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.**

**सुचक - श्री. प्रकाश पाटील (एसआयआरडी)**
**अनुमोदक - श्री. डी.एस धोत्रे (सीडीएम)**

**ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.**

**बाहुबली चौगुले (मानद सचिव):** आठ क्रमांकावर जातो,

**विषय क्र.8: संचालक मंडळाने सुचविलेल्या उपविधी दुरुस्तीस परिशिष्ट 'अ' प्रमाणे मंजुरी देणे.**

**बाहुबली चौगुले (मानद सचिव):** संचालक मंडळांनी सुचवलेल्या उपविधी दुरुस्ती परिशिष्ट अ प्रमाणे मंजुरी देणे. प्रस्तावित उपविधी दुरुस्ती परिशिष्ट 1 मध्ये संस्थेचे अधिकृत भाग भांडवल हे 50 कोटी रुपये होतं, नवीन amendment proposal नुसार शंभर कोटीचा प्रपोजल यामध्ये ठेवतो, कारण सभासदांच्या भाग धारणेच्या

क्षमतेचा त्यानंतर त्याच्यामध्ये संस्थेचे सन्माननीय सभासद शेअर्स होल्डिंग कॅपॅसिटी जी आपली 15000 आहे त्याच्यामध्ये आपण महाराष्ट्र सहकारी कायदा 1960 चे कलम 28 याला अधीन राहून, आपण त्याची अमाऊंट 5 लाख रुपये करण्याचं सन्माननीय सभागृह समोर मांडतो.

**श्री. विलास घोरपडे (एफडी) :** हे बघा, सेक्रेटरी साहेब आपण पंधरा हजारच, पाच लाख करतोय पण ज्याला कुणाला पन्नास लाख कर्ज घ्यायचे आहे त्याला पाच लाखाचे शेअर्स असणे गरजेचे आहे.

**श्री.बाहुबली चौगुले (मानद सचिव):** दोन लाख, महाराष्ट्र शासनाचे जे परिपत्रक आले होते. त्या परिपत्रकात मेंशन केले आहे की पाच लाख रुपयांची भागधारणा मिनिमम. शब्दरचना अशी. म्हणून आपण ही पाच लाखाची शब्दरचना आपण याच्यामध्ये करतोय. आपण पाठवताना तीस हजाराची पाठवतो. याच्यामध्ये 30000 -45000 नाही टाकली. आपण पंधरा हजार ते 30 हजार करतोय ना, ही शब्दरचना ही जी शासनाचे परिपत्रक आहे.

**श्री. शिवाजी हगवणे :** अध्यक्षांच्या परवानगीने ऍक्च्युली शासनाचे परिपत्रक आहे. पूर्वी मॅक्झिमम कर्जदार यांना कॅपॅसिटी होती ती दोन लाखाची होती ती आता दोन लाखाची संपून पाच लाखाची झाली आहे, आता पाच लाख हे मॅक्झिमम आपलं इंडिव्हिजल शेअर्स कॅपिटल होऊ शकतं, असं आपल्या याच्यात लिहिलं आहे पण आपण पाच लाखाला गेलाच पाहिजे असं नाही, तर संचालक मंडळ आणि अजून एक अतिशय महत्त्वाचं या ठिकाणी मला सांगायचं आहे की जो एप्रिल 2020 नंतर 194 आर्टिकल मुळे टीडीएस बऱ्याच आपल्या सभासदांना लागला आणि या फायनान्शिअल एअर मध्ये तो व्याजावरती पन्नास हजार,इकडे दहा हजार इकडे झाला लाभांशावरती जर आपण घोरपडे साहेब, आपण एक मिनिट तीस हजार किंवा 45000 याला आपण मजुरी पाठवली आणि 45 हजार पर्यंत गेलो तर, जे लोक टीडीएसच्या उंबरठ्यावर आहेत की जे 52- 53 हजारावरती ज्यांचा व्याज होतंय, ते कन्वर्ट होईल शेअर्स कॅपिटल मध्ये आणि त्याचा जो लाभांश आहे तो आपल्याला पुढच्या वर्षी 7000-800 जो आपल्याला 2250 इथे आपण अडकून पडलो होतो, तो साडेसात हजार आठ हजार नऊ हजार इथपर्यंत जाण्याचा आपण प्रयत्न करू 100% करू म्हणून मी सभागृहाला विनंती करतो, की या उपविधीस आपण मान्यता द्यावी सूचक अनुमोदक याच विषयाशी बोलायचं आहे.

DRAFT 64th AGM

**श्री. डी.एस धोत्रे (सीडीएम):** शिवाजी कर्जदाराची काय लायबिलिटी.

**श्री. विजय शेळके (टीपीडी):** मला याच मुद्द्यावर बोलायचं, आहे एक मिनिट आपण हा जो 15000 चे 25000 केले 30 हजारावर मला जे मिळालं 9 प्लस 6 तेवढे मला मिळेल मला किती मिळेल मला आत्ता 2250 जे मिळतं परंतु याच्यावरती मॅक्झिमम किती व्याज मिळेल मला आता पंधरा हजार वरती मी तुम्हाला 15000 वरती किती मिळतं मला 15% नाईन प्लस सिक्स 2250 मिळतं बरोबर आहे. जर आपण यावेळी एक लाख करायचं किंवा

5000 करायचे आज तुम्ही 45 केले तर मला किती मिळतील त्याच्या पटीत मिळतील, ना माझी कॅपॅसिटी आहे मला दोन लाख करायचा आहे का करू शकत नाही,

**श्री. शिवाजी हगवणे :** आपण ऍक्च्युली मी याच्यावरती तुम्हाला सांगतो ऐका साहेब मी उत्तर देतोय, त्याचा ऍक्च्युली तुम्हाला आत्ता पंधरा हजारा वरती पंधरा टक्के भेटत होतं आणि एक एक्झाम्पल घ्या आपण 45000 केलं म्हणजे 30000 वरती त्या ठिकाणी तुम्हाला किती मिळत होते दहा टक्के, बरोबर प्रत्येक वर्षीच फायनान्शिअल इयर बॅलन्स शीट आपल्याला ज्या पद्धतीने सांगेल, त्या पद्धतीने आपल्याला नफा विभागणी त्या काळात करता येईल, नफा विभागणीच्या बाबतीत आपण कधीच आधी कमेंट करू शकत नाही, तरीसुद्धा या ठिकाणी मी शब्द देतो तुम्हाला जे 45 हजारावर आत्ता तुम्हाला मिळतंय, सभासदांना 2250 प्लस वरच्या 30000/- वर 3000/- किती होतात 5200/- याच्यापेक्षा नक्कीच ती रक्कम जास्त असेल हे मी या ठिकाणी सभागृहाला आश्वस्त करतो.

**श्री.डी.एस राजापुरे (डीआरएचआर) :** इंडीविज्युअल शेअर होल्डिंग कॅपॅसिटी 45, 000/ -

**वार्षिक सर्वसाधारण सभा ठराव क्र.8: ठराव पास करण्यात की, संस्थेच्या मंजुर उपविधी क्र. क.1.3 अधिकृत भागभांडवल मर्यादेमध्ये सभासदांच्या भागधरण क्षमतेमध्ये वाढ करण्यासाठी संस्थेचे अधिकृत भागभांडवल रु. 50 कोटीवरून रु. 100 कोटी करण्याच्या उपविधी दुरुस्तीस सभागृहाने एकमताने मंजुरी दिली.**

**पुन्हा ठराव पास करण्यात आला की, सहकार विभागाच्या सभासदांच्या वैयक्तिक भागधारण मर्यादेच्या दि. 24.04.2024 च्या शासन अधिसूचना व महाराष्ट्र सहकारी कायदा 1961 च्या कलम 28 शी अधिन राहून संस्थेच्या सभासदांची भाग धारण मर्यादा रु. 15,000/- (500 चे 30 भाग) वरुन रु. 5 लाख (रु. 500 चे 1000 भाग) होईपर्यंत स्वीकारण्यात यावेत असा ठराव सभागृहात एकमताने मंजुर केला.**

**या उपविधी दुरुस्तीस सभागृहाने एकमताने मंजुरी दिली व सदर उपविधी दुरुस्ती मा. सहकार आयुक्त पुणे यांचे मंजुरीसाठी लवकरात लवकर पाठविण्यात यावी असा ठराव सभागृहाने एकमताने मंजूर केला.**

**सूचक – श्री. विजय शेळके (टीपीडी)**
**अनुमोदक - श्री.डी.एस राजापुरे (डीआरएचआर)**

**ठराव सभागृहात एकमताने मंजुर करण्यात आला.**

**श्री. डी.एस धोत्रे (सीडीएम):** कर्जदाराचा काय किती शेअर कॅपिटल व्हायला पाहिजे ज्याला खर्च काढायचा आहे, त्याला दोन लाख राहील, का पाच लाख?

**श्री. शिवाजी हगवणे :** एक मिनिट कर्ज दारासाठी त्याची आपल्या बायलॉज प्रमाणे शेअर्स प्लस सबस्क्रिप्शन दॅट अमाऊंट बी टू लॅक, ती जर दोन लाखाची असेल तर त्याच्या वरती त्याला ते 50 लाख मिळणार आहेत,

**श्री. विलास घोरपडे (एफडी) :** यांच्यामध्ये शेवटचा मुद्दा आहे व्याजाचा दर, हा सभासद कर्ज व्याजाच्या दरापेक्षा कमी असला पाहिजे

**श्री. शिवाजी हगवणे :** हा सबस्क्रिप्शन वरच्या व्याजाचा आहे.

**श्री. विलास घोरपडे (एफडी) :** मग तुम्ही किती देता? सबस्क्रीप्शन वर व्याजाचा दर, मी आता हा मुद्दा मांडलाय तुम्ही किती देता?

DRAFT 64th AGM

**श्री. शिवाजी हगवणे :** लाभांश आणि सबस्क्रिप्शन वरचे व्याज हा वेगळा विषय आहे, हा विषय चाललाय लाभांश, याविषयी सबस्क्रीप्शन वरचा व्याज जे असेल, ते आपण बायलॉस प्रमाणे यावर्षी किती दिले, 10% दिलाय, ओके परंतु शेवटच्या कॉटर मध्ये आपण व्याजदर कमी केल्यामुळे आपण त्या ठिकाणी 10% दिले घोरपडे साहेब, भविष्यातले तुम्ही संचालका आहात.

**श्री. विलास घोरपडे (एफडी) :** नाही भविष्यातलं मी सांगत नाही,

**श्री. शिवाजी हगवणे :** बॅलन्स शीट ज्याप्रमाणे सांगते त्याप्रमाणे होईल,

**श्री. डी.एस धोत्रे (सीडीएम):** हे चुकीचं वक्तव्य करू नका.

**श्री. गिरीष शेणई साहेब (पदसिद्ध अध्यक्ष) :** पुढचा विषय.

**श्री.बाहुबली चौगुले (मानद सचिव )**
**विषय क्र.9: संस्थेच्या उपविधीनुसार सेवानिवृत्त सभासदांना नाममात्र सभासद करून घेणेबाबत सविस्तर चर्चा करून निर्णय घेणे.**

**श्री. प्रकाश पाटील (एसआयआरडी):** जरा याचं स्पष्टीकरण द्याना,

**श्री.डी.एस राजापुरे (डीआरएचआर) :** संस्थेच्या सभासदांना रिटायरमेंट नंतर नामा मात्र सभासद करून घेण्यास माझा विरोध आहे,

**श्री. प्रकाश पाटील (एसआयआरडी):** विरोध आहेच आपला त्यांना स्पष्टीकरण देऊ द्या, स्पष्टीकरण द्या ?

**श्री.बाहुबली चौगुले (मानद सचिव):** थोडसं सभासदांना विनंती करतो की थोडंसं तुम्ही संपूर्ण डेटाकडे जा, गेल्या दहा वर्षाचा डेटा सभासदांच्या समोर इथे मांडायचा प्रयत्न करतोय ॲन्यूल रिपोर्ट आणि त्यात इयर आणि मेंबरशिप. गेल्या दहा वर्षात 22500 सभासदांपासून आपण हळूहळू 18510 पर्यंत आलो आहोत. दरवर्षी साधारण 900 ते 1000 सभासद सेवानिवृत्त होतात, आणि साधारण हार्डली 400 ते 500 सभासद आपल्याकडे येतात, हा झाला मेंबरशिपचा डेटा. सायमन टेनिस ली जर संस्थेकडे बघितलं जी संस्थेची loan कॅपॅसिटी, गेल्या दहा वर्षात 370 पासून 1000 कोटी पर्यंत आपण आता वाढत चाललो आहोत, हा जो रेट आहे संस्था स्वनिधी आणि फंड वाढत नाहीये. भविष्यात हे बघा दोन इंटरेस्ट बघा आणि इन्व्हेस्टमेंट जी आहे संस्थेकडे ही गेल्या 21 -22 पासून इन्कम टॅक्स चा जो प्रोविजन केला त्यानुसार आपल्याकडे हळूहळू ठेवी देखील कमी होत चालले आहेत, संस्थेच्या संचालक मंडळाचे असं प्रपोजल होतं की भविष्यात 2026 मध्ये पे (Pay) कमिशन आलं आणि जर त्यावेळेस लोन घेण्याची सभासदांची कॅपॅसिटी वाढली, आता जे दहा हजार सहाशे सभासद आहेत म्हणजे साधारणतः 35 लाखापर्यंत एलिजिबल आहेत आणि काही सभासद 50 लाखापर्यंत एलिजिबल आहेत, ते कमिशनच्या नंतर हे सगळे सभासद जेव्हा 50 लाखापर्यंत जातील, तेव्हा संस्थेला बाहेरून लोन उचलावे लागेल, कारण ठेवी कमी आहेत, कारण लोन उचलायचं झाल्यास संस्थेकडे स्वनिधी असणं खूप महत्त्वाचा आहे, किंवा दुसरी गोष्ट म्हणजे आपल्याकडे ठेवी तरतूद कुठून तरी करावी लागेल या अनुषंगाने संचालक मंडळ येथे सभागृह समोर निवृत्त सभासदांकडून त्यांना परत नाममात्र सभासद बनवून त्यांच्याकडून ठेवी स्वीकाराचा प्रपोजल तुमच्यासमोर ठेवत आहे ,आपल्या बॉयलजमध्ये देखील हे आहे की आपण नाममात्र सभासद भरून त्यांना मेंबरशिप देऊ शकतो.

**श्री. मुकुंद वैराळकर (एऍण्डएसईडी) :** सचिव साहेब आपण सांगितले की आपले सभासद आहेत हे जवळजवळ 900 ते 950 रिटायर होतात, आपली सभासद कमी झालेत आपल्या ठेवी कमी झाल्या आहेत, 4300 नवीन व्याकन्सी आली हे सगळे आलेले आहेत हे आज ना उद्या आपल्या संस्थेची सभासद होणार आहेत आणि राहिला आपल्या एफडी चा विषय आपल्या या संचालक मंडळाचा जो गोंधळ आहे ना दरवर्षीच्या या गोंधळामुळे आपली विश्वासहार्यता कुठेतरी कमी झाली आहे त्यामुळे आपल्याकडे येणाऱ्या एफडी आहेत त्या एवढी करायच्या आधी प्रत्येक माणूस चार वेळा विचार करतो आणि नंतर एफडी करतो.

DRAFT 64th AGM

**श्री.बाहुबली चौगुले (मानद सचिव):** सर हे तुमचं व्यक्तिगत मत आहे,

**श्री. मुकुंद वैराळकर (एऍण्डएसईडी) :**ते असू द्या ना आता तुम्ही जो प्रस्ताव मांडला याला तर व्यक्तिगतच विचारवं लागेल ना की कोण कोणाचं या संदर्भात काय मत आहे

**श्री.बाहुबली चौगुले (मानद सचिव):** एफडी कमी होण्याचं कारण वेगळं आहे कारण आपण संस्थेमध्ये जेव्हापासून आपल्याला इन्कम टॅक्स लागला तेव्हापासून FD कमी होत चालले आहेत,

**श्री. मुकुंद वैराळकर (एऍण्डएसईडी) :** माझं व्यक्तिगत मत हेच आहे की माझा तुम्ही म्हणलेल्या या प्रस्तावाला स्पष्टपणे विरोध आहे.

**श्री. डी.एस धोत्रे (सीडीएम):** बाहुबली सर याच्यावरती आता ही तुम्ही amendment आणली होती त्या अगोदर आपल्या संस्थेमध्ये ती चालू होती आणि ती चालू असताना ती का बंद झाली यावर पण स्पष्टीकरण दिलं पाहिजे ती बंद केली गेली कारण का की इन्कम टॅक्स च्या केसेस वाढल्या त्याच्यामुळे तर याच्या वरती अजून कोणी तज्ञ असतील. तज्ञ संचालक आहेत अरुण कोळी सर त्याच्यावर त्यांनी त्यांचं आपलं मार्गदर्शन द्यावं बोलावं, तज्ञ संचालक म्हणून त्यांनी सभागृहाला थोडं स्पष्टीकरण द्यावं,

DRAFT 64th AGM

**श्री.संतोष ढमढेरे :** महत्त्वाचा विषय आहे

**श्री. अरुण कोळी (सीडीएम) :** धन्यवाद मित्रांनो सोसायटीला एक महाराष्ट्र शासनाच्या नियमानुसार ए टी पी अंतर्गत एक्झामशन आहे आपण जवळजवळ 2012 पासून इन्कम टॅक्स बरोबर आपण केस लढत आहोत आणि 2016 पर्यंत जवळपास निकाल आपल्या बाजूने लागला आहे, तर भविष्यात संस्था ही बाहेरील सभासद निधी म्हणजे आपल्या उपविधीप्रमाणे जो नोकरदार आहे आपली पतसंस्था पगारदार नोकरांची संस्था आहे तर त्या व्यतिरिक्त आपण सभासद घेतल्यानंतर इन्कम टॅक्स ऑफीस भविष्यात आपल्याला तिचे एक्झामशन आहे ते काढू शकत, कारण ज्या वेळेला कोर्ट मॅटर होईल त्यावेळेला इन्कम टॅक्स म्हणजे सध्या आम्ही असा पॉईंट मांडलेला आहे की आमच्याकडे फक्त एम्प्लॉईजच सभासद आहेत, आणि जर अशा पद्धतीने आपण निर्णय घेतला तर इन्कम टॅक्स सरळ म्हणजे की तुम्ही बाहेरचे सभासद घेतलेले आहेत ते तुमच्या संस्थेचे सदस्य नाहीत तर अशामुळे भविष्यात आता, सध्या ते होणार नाही. पण भविष्यात जर नियम इन्कम टॅक्सचा बदलला, तर परत मागच्या संचालक मंडळाने तो निर्णय घेतला बंद करावा लागला, त्याच पद्धतीने आपल्यालाही बंद करावा लागेल,

**श्री. हेमंत कोळी :** तेव्हा बंद करू.

**श्री. अरुण कोळी (सीडीएम) :** निर्णय सभागृहांनी घ्यावा.

**श्री. मुकुंद वैराळकर (एऍण्डएसईडी) :** नाही आता कशासाठी एवढी घाई आहे, त्यावेळेस इन्कम टॅक्स कडच्या जर केसेस आल्या तर हे संचालक मंडळ लिहून देईल की त्या केसचा खर्च आम्ही करू,

**श्री. संतोष ढमढेरे :**राजापुरे साहेब साहेब हा विषय सभागृहामध्ये चर्चेला घेतला, त्याला जर मान्यता नाही तर तुम्ही सूचक , अनुमोदक घ्या आपण तो ठराव तसा लिहून घेऊ.

**वार्षिक सर्वसाधारण सभा ठराव क्र.9: ठराव पास करण्यात आला की सर्वसाधारण सभेने, सेवानिवृत्त सभासदांना नाममात्र सभासद करून घेतल्यास, आयकर कायद्याच्या 80 (P) (I)(II) अन्वये येणाऱ्या त्रुटींचा विचार करून, सदरचा विषय सभेच्या कामकाजातून काढून टाकण्याचा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.**

DRAFT 64th AGM

**सूचक : श्री. प्रकाश पाटील (एसआयआरडी)**
**अनुमोदक : श्री.डी.एस राजापुरे (डीआरएचआर)**

**ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.**

**श्री.बाहुबली चौगुले (मानद सचिव):**

**विषय क्र.10: व्यवस्थापक भरती, गो कॅशलेस (तात्काळ बँकिंग) आणि करिअर जंक्शन प्लेसमेंट-1 संदर्भातील माहिती सभागृहात सादर करून चर्चा करणे.**

**श्री.बाहुबली चौगुले (मानद सचिव):** पुढील विषय विषय क्रमांक दहा मध्ये करिअर जंक्शन प्लेसमेंट, नोकर भरतीमध्ये व्यवस्थापक भरती आणि गो कॅशलेस तात्काळ बँकिंग बाबतीत माहिती सभागृहात सादर करून चर्चा करणे. त्या अनुषंगाने गो कॅशलेस इंडिया प्रायव्हेट लिमिटेड माहिती मी सभागृहासमोर मांडतो. व्यवस्थापक भरती आणि तात्काळ बँकिंग माहिती सभागृह सादर करून चर्चा करणे आपल्या संस्थेच्या मॅनेजर भरती बाबत मी सभागृहास माहिती देतो.

**श्री. बाहुबली चौगुले (मानद सचिव):** व्यवस्थापक भरती अजेंडा वाचतो, व्यवस्थापक भरती; संस्थेच्या मॅनेजर भरती बाबत मी सभागृहास माहिती देतो 2019- 2020 यावेळी तत्कालीन संचालक मंडळाने संस्थेमध्ये मॅनेजर भरण्याचा प्रयत्न केला होता आणि त्या अनुषंगाने या संचालक मंडळाने जानेवारी 2024 आणि डिसेंबर 2024 अशा दोन प्रकारे मॅनेजर भरतीचा प्रयत्न केला यावेळी या संचालक मंडळाच्या प्रयत्नांना अपयशला आता या दोन्ही या काळातील ज्या एडवर्टाइज झाल्या, त्या एकदा मी तुमच्यासमोर मांडतो जी ऍडव्हर्टाईस 2024 साली आम्ही काढली होती त्याच्या अनुषंगाने टोटल एप्लीकेशन 32 आले होते, त्या 32 एप्लीकेशन मधल्या फक्त दोनच अँप्लिकेशन व्हॅलिड होत्या, पण त्यामध्ये डॉक्युमेंटचा प्रॉब्लेम होता. कमिटीने हे खारीज केलं आणि पुन्हा डिसेंबरमध्ये आपण हे ऍड दिली. डिसेंबर मध्ये जी ऍड दिली त्या मध्ये पण साधारण 54 एप्लीकेशन आल्या आणि ज्यावेळी चार एप्लीकेशन या व्हॅलिड होत्या, या एप्लीकेशन ही सभागृहासमोर मांडतो याचा सगळा डेटा आपण अनालिसिस करायला घेतला, तर तो ॲनलाईज डेटा मी तुमच्या समोर मांडतो. 2011 च्या संचालक मंडळामध्ये गांगुर्डे साहेबांच्या अहवालानुसार जी मॅनेजरची क्वालिफिकेशन होती ते बी काम विथ - 50% मार्क ॲडिशनल एज फोर्टी फाईव्ह इयर्स आणि एक्सपिरीयन्स इन असिस्टंट मॅनेजर दहा वर्ष टाकलं होतं 2020 मध्ये जी ऍड केली ती M. COM. MBA अशी टाकली कारण त्यावेळेस संस्थेची आर्थिक परिस्थिती चांगली झाली होती त्यांना असं वाटलं की आपण थोडसं हायर क्वालिफिकेशन चा मॅनेजर आणला तर चांगलं होईल आणि त्यावेळी इन्कम टॅक्स च्या प्रोसिजर वगैरे चालू झाल्या होत्या 2024 ला आम्ही तोच बेस पकडून एम कॉम जीडीसी अँड ए असं टाकलं बाकी एज 45 इयर्स जो गांगुर्डे कमिटीने केला होता तोच ठेवला त्याच्यामध्ये पण प्रॉब्लेम आला ते खारीज केलं. परत स्क्रुटीनी कमिटीने सांगितलं की तुम्ही या दोन मध्ये जर फेल झाला असाल तर गांगुर्डे कमिटीचा जो ॲक्च्युअल रिपोर्ट आहे, त्यातलं क्वालिफिकेशन टर्म अँड कंडिशन मेन्शन केल्या आहेत.

DRAFT 64th AGM

**श्री.संतोष ढमढेरे :** सभासदांना या सर्व गोष्टींची माहिती आहे, आपण कशा पद्धतीने केलं, आपण सध्याला त्याच एका गोष्टीप्रमाणे मागे एकदा सभा झाली होती, अध्यक्षांच्या बोर्ड रूम मध्ये त्यामध्ये आपण को-ऑपरेटिव्ह कन्सल्टंट यांना बोलावलं आहे आपल्यासमोर आता सध्याला प्रॉब्लेम आहे की आता दहा वर्ष जो सेवाकाल दिला आहे, त्यामुळे आपल्याला आता असिस्टंट मॅनेजर पदाचा माणूस भरती करता येत नाही को-ऑपरेटिव्ह कन्सल्टंट यांनाही आत्ता आम्ही विचारलं तर ते म्हणतायेत, आत्ता आपला प्रॉब्लेम असा झाले की गांगुर्डे कमिटीच्या अहवाल या सभागृहांनी मंजूर केला होता, आता त्याच्याबद्दलच्या अटी ज्यावेळी आम्ही विचारतोय त्या अटी आम्ही आम्हाला शिथिल करता येतील का? तर कंट्रोलरला आम्ही त्या प्रशासनाला विचारलं, तर सभेने आज हा विषय घ्यायला हवा की त्या एका प्रोसेस मध्ये आपण जेव्हा पण आस्थापनेकडे जातोय, खूप प्रत्येक गोष्टीमध्ये उशीर होतोय, तर आत्ता को-ऑपरेटिव्ह कन्सल्टंट जे आपल्या आत्ता सहकार तज्ञ आहेत ते इथे आहेत, त्यांना विचारणा केली तर ते असं म्हणतायेत सहकार खात्याच्या नियमाप्रमाणे आपल्याला जर सहकार खात्याच्या शासनाच्या ऑर्डर प्रमाणे काही इन्स्टिट्यूशन आहेत, ते जर आपल्याला मॅनेजर भरती करून देणार असतील, त्यासाठी प्रोसेस करतील जसे की एप्लीकेशन आले का तोच माणूस आहे का या सगळ्या गोष्टी ते करतील आणि

तर आता सभागृहाला विनंती आहे की आपण गांगुर्डे समितीच्या अहवालाला अनुसरून ज्या काही गोष्टी केल्या होत्या त्याला शिथिलता आणून परत डिपार्टमेंट करूनच नवीन कमिटी करून घ्यायची तर या प्रोसेसला अजून वेळ जाईल. हा जो प्रश्न आहे हा फोरम मी ओपन करतो, या संदर्भात जर काही प्रश्न असतील तर आपल्याकडे सहकार तज्ञ आपण बोलावले आहेत, तुम्ही त्याच्याबद्दल त्यांना प्रश्न विचारा आणि माझी संचालक मंडळाची अशी प्रामाणिक इच्छा आहे की या मीटिंगमध्ये आपण एका योग्य निर्णयापर्यंत पोचलो तर लवकरात लवकर आपण मॅनेजर भरतीच्या प्रक्रियेत जाऊ हा फोरम आपल्या सभासदांसाठी ओपन केला आहे तर यासाठी आपण आपल्या भाष्य ठेवावं. धन्यवाद प्लीज या वयाची अट वाढवावी लागेल, कारण 45 मध्ये तेवढं मिळत नाहीये नाही मिळत कारण आपण तो प्रयत्न करून पाहिला आहे तुमच्याकडून कारण इथे सगळे जुने जाणते सगळे संचालक आहेत आणि बराचसा अभ्यास करणारे जर क्रायटेरिया आपण डिसाईड करतोय तर आपण तसा प्रयत्न करूया का

**श्री. विलास घोरपडे (एफडी) :** याच्यामध्ये काय माहिती आहे का, कारण तुम्ही क्रायटेरिया इथल्या इथे डिसाईड करू शकणार नाही, याचा पूर्ण पण फक्त एक मॅनेजर पदाचा विचार करून चालणार नाही, क्रायटेरिया पूर्ण आर आर रिक्रुटमेंट रुल जो आपण फॉलो करतो आहे आपल्याकडे तोच बदलावा लागेल मग आपण काय करायचं एका विषयासाठी शिथिलता देऊन चालणार नाही तशी मग आपण रिक्रुटमेंट रूलमध्ये काही बदल करायचा अधिकार आहे त्यामध्ये बदल करावा लागेल मग त्याच्यामध्ये सर्वांचाच बदल होईल आता एवढ्या घाईघाईत ते होणार नाही

DRAFT 64th AGM

**श्री.संतोष ढमढेरे :** मग असा निर्णय घेऊ या का व्यवस्थापक भरतीच्या संदर्भात आपण पुन्हा एकदा आपण ज्या गांगुर्डे समितीच्या गाईडलाईन आहेत त्याच्यावरती पुन्हा आपण सभागृहात माध्यमातून डिपार्टमेंटला लिहायचं की आपण स्वतःहून करायचं ते सांगा कारण डिपार्टमेंटकडे आपण जेव्हाही जातोय त्याच्याकडून पूर्वी ज्या पद्धतीने आपल्याला आजही डिपार्टमेंटचा सपोर्ट आहे पण आत्ता ज्या काही गोष्टी घडतायेत त्यामुळे थोडंसं डिले होत चाललंय.

**श्री. डी.एस धोत्रे (सीडीएम):** सभागृहाला थोडसं झालं तरी चालेल पण सभागृहाला बाहेर आपण पण चौकशी केली आहे , मॅनेजर आपण कुठल्या पद्धतीने भरतो त्यांनी काय केलेल्या त्याच्यामध्ये दोनच लोक आहेत ऑफिस बेरर आणि त्याचा एक मॅनेजर झाला आहे असे पण भरपूर लोक येतात खाली पाच माणसे आहेत आणि तो एक मॅनेजर झालेला आहे हे आपल्या संस्थेला खूपच घातक ठरणार आहे त्यामुळे आपण आता अकराशे पुढच्या वर्षी बाराशे तेराशे तर त्या नियमामध्ये बदल करू नका कारण आता तुम्ही आता मॅनेजर भरलं आणि लॉंग टर्म इफेक्ट जो जाणार आहे तो नंतर होणार आहे सात आठ वर्षांनी इफेक्ट होईल त्यावेळेला ते सडनली इतक्या जोरात कॉलॲप्स होईल की त्याला कोणीही वाचू शकणार नाही

.

**श्री.संतोष ढमढेरे :** धन्यवाद! धोत्रे साहेब मी सभागृहाला विनंती आहे की आपण एक दहा जणांची कमिटी घेतली होती की पुन्हा त्याच लोकांना त्यावरती चर्चेला घेऊन तसेच जाता येईल का?

**श्री. विलास घोरपडे (एफडी) :** नाही मी काय बोलतो आपले ऍडमिनिस्ट्रेटिव्ह आहेत त्यांना तुम्ही एप्रोच करा की बाबा तुम्ही आम्हाला याच्यामधून मार्ग काढून द्या. तुम्ही ते एकदा नाही बोलले तर तुम्ही पुन्हा दुसऱ्यांदा जा

**श्री. राम परब (युईडी) :** विषय बरेच दिवस चाललेला आहे मॅनेजर नेमणुकीचा आता आपण बऱ्याच कमिट्या करत असतो, मला काय म्हणायचंय पुढच्या एजजीम पर्यंत वाट बघण्याची आवश्यकता होण्यापेक्षा जर एखादी कमिटी बनत असेल, चांगल्या जाणकारांची आणि त्याच्यातून मार्ग निघत असेल तर पहिला प्रयत्न करा ना,

**श्री.संतोष ढमढेरे :** ओके,

**श्री. राम परब (युईडी) :** किंवा त्याच्याशिवाय एखादी स्पेशल मीटिंग करू शकतो.

DRAFT 64th AGM

**श्री.संतोष ढमढेरे :** जसं आत्ता परब साहेबांनी सांगितलं त्या पद्धतीने व्यवस्थापक भरतीच्या संदर्भामध्ये त्याच्या सहकार तज्ञ त्यांच्याकडे अप्रोच केला तर मिळतील.

**श्री. विजय शेळके (टीपीडी):** सर माझं एक सजेशन होतं, जे काही रिटायर झालेले आपले सभासद आहेत पक्त BARC, त्यांच्याकडे अप्रोच केला तर मिळतील

**श्री. गिरीष शेणई साहेब (पदसिद्ध अध्यक्ष):** माझ एक सजेशन अश आहे की, कोणीतरी हे काम बरेच दिवस रेंगाळलेला आहे ते जर फास्ट करायचा असेल तर एक छोटी कमिटी तज्ञांची बनवा. सीनियर लोकांची फास्टर होईल आणि हा तुमच्याकडे डेटा आहे की याचा काय प्रॉब्लेम होतोय किती वेळ आपण प्रयत्न केला आणि तो फेल झाला या कमिटीला ते बघू दे अलोंग विथ मॅनेजमेंट कमिटी आणि त्याचा एक लेटर बनवून आस्थापनेला द्या की या गांगर्डे कमिटीचा जे काही रेकमेंडेशन आहेत, त्याच्यात काही आपण चेंज करू शकतो का? तर ते होईल असं मला वाटतं जर आपल्याला प्रॉब्लेम होत असेल तर आपल्याला कोणीतरी सपोर्ट करेल नाही असं नाही आस्थापना असं नाही करणार,

**श्री. विलास घोरपडे (एफडी) :** हाच आमचा हे आहे की त्याच्यावरती खूप विश्वास आहे की त्यांनीच त्याच्यावर मार्ग काढावा असं आमचं म्हणणं आहे

**श्री.संतोष ढमढेरे :** ठीक आहे आपण सर्वांमध्ये व्यवस्थापक भरतीच्या संदर्भात गांगर्डे कमिटीच्या अहवालाचा रिव्ह्यू करून त्याच्यामध्ये आपल्याच तज्ञ लोकांची एक कमिटी बनवून त्यात शितलता करून आपण तो ठराव त्या पद्धतीने त्या विषयावरती घेत आहोत व्यवस्थापक भरतीच्या संदर्भामध्ये ही माहिती आपण मिनिट्स मध्ये नमूद करत आहोत,

**श्री. विलास घोरपडे (एफडी) :** आपण आर आर चेंज करण्याबद्दल बोलतोय ते तर सर्वांचच चेंज झालं पाहिजे

**श्री.संतोष ढमढेरे :** हा तोच गांगर्डे समितीचा जो अहवाल आहे,

**श्री. डी.एस धोत्रे (सीडीएम):** बिंदू नामावलीला अनुसरून.

**श्री.संतोष ढमढेरे :**व्यवस्थापक भरतीच्या संदर्भात रिक्रुटमेंट रुल्स, आपण पुन्हा एकदा होणार विचार करून त्यावरती सहकार क्षेत्र  सभासदांची माझी तज्ञ संचालकांची कमिटी म्हणून त्यावरती आपण काम करू आणि स्पेशल मध्ये आपण त्याला लवकरात लवकर अप्रू करून घेऊ.

DRAFT 64th AGM

**श्री. गिरीष शेणई साहेब (पदसिद्ध अध्यक्ष):** ती मला वाटतं एजीएम मध्ये तुम्ही पास केले तरी आस्थापना त्याला रिस्पेक्ट करेल असं काही जरुरीचं नाही. तुम्ही आणि मॅनेजिंग कमिटी एकत्र बसा, तुम्हाला काय प्रॉब्लेम आले आहेत त्याचे लिस्ट आऊट करा आणि तुमचं प्रपोजल जे आहे ते आस्थापनेला द्या.

**श्री. राम परब (युईडी) :** संतोष जसं तू बोललास की मॅनेजमेंट कमिटी मध्ये काम केलेले घ्या, पण इथे आमचे राजापुरे साहेब आहेत, त्यांचा अनुभव प्रत्येक जनरल बॉडीला बघतो. ज्याला नॉलेज आहे, अशा माणसाला घ्या, त्या गोष्टीला चांगलं काम करतायेत.

**वार्षिक सर्वसाधारण सभा ठराव क्र.10: ठराव पास करण्यात आला की व्यवस्थापक भरतीबाबत भरतीचे नियम पुन्हा नव्याने बनविण्याचा विचार करण्यात यावा व नियम बनविण्यासाठी आज/माजी सदस्यांच्या अनुभवाने नियम बनविण्यात यावेत व भरती प्रक्रिया करावी आणि यासाठी सर्वसाधारण सभेची गरज नाही असा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.**

**सूचक : श्री. विलास घोरपडे (एफडी)**
**अनुमोदक : श्री. डी.एस धोतरे (सीडीएम)**

**ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.**

**श्री. हेमंत कोळी :** धन्यवाद, धन्यवाद पुढे गो कॅशलेस च्या संदर्भामध्ये आपल्याकडे फक्त चार मिनिट आहेत ते साडेआठला बंद करणार आहेत पुढचा विषय गो कॅशलेस अरे बोल.

**श्री.बाहुबली चौगुले (मानद सचिव):** गो कॅशलेस प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीचा संदर्भात मी सभागृहाला थोडी माहिती देतो 2019 साली तत्कालीन संचालक मंडळांनी सभासदांच्या सेवेसाठी त्वरित अकाउंट त्यांच्या खात्यावर जाण्यासाठी एक पुण्याची गो कॅशलेस प्रायव्हेट लिमिटेड तात्काळ बँकिंग नावाची कंपनी होती त्यांच्याशी ऑक्टोबर 2021 मध्ये करार केला. करार करण्याच्या आधी संस्थेची बारावी स्पेशल मीटिंग होती त्यात अजेंडा क्रमांक चार मध्ये या कॅशलेस प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीला जे फ्युचर्स किंवा एडवांटेज बद्दल डिस्कस केलं, आणि त्यानंतर पंधरावी स्पेशल मीटिंग झाली अजेंडा क्रमांक चार त्यामध्ये त्यांनी हे अप्रो केलं. की आपण संस्थेच्या सभासदांना ही सेवा देणार आहोत. त्यानुसार एग्रीमेंट बनवलं, एग्रीमेंट बनवलं 2019 च्या ऑक्टोबर मध्ये आणि हे तीन वर्षाचं म्हणजे 36 महिन्याचं सात ऑक्टोबर 2022 ला संपलं, ते त्याच्यानंतर रिन्यू झालं नाही. हे एग्रीमेंट होतो शंभर रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर मायक्रो एटीएम चार लाख त्या सॉफ्टवेअरची किंमत प्लस १८ टक्के जीएसटी असं त्या मशीन मध्ये 13/ 11/ 2019 ला हे झालं. त्याच्यानंतर 2022 डिसेंबर मध्ये या संचालक मंडळाने पदभार स्वीकारल्यावर लक्षात आलं की गो कॅशलेस प्रायव्हेट लिमिटेड यांच्याकडे संस्थेची किती अमाऊंट बाकी आहे, त्या अनुषंगाने संस्थेने Orlay त्यांना सांगितलं, सर्व मेल, बऱ्याच वेळेला कम्युनिकेशन केला आहे, कम्युनिकेशन केलेला डेट्स आहेत 2023- 24 मध्ये. त्यानंतर गो कॅशलेस प्रायव्हेट लिमिटेड कंपनीकडून संस्थेला एक मेल मिळाला की ते जे ओनर होते श्री.कृष्णात मारुती चन्ने यांचा निधन झालं, त्यानंतर संस्थेने परत त्यांना मेल केला की आम्ही त्यांना श्रद्धांजली वाहतो. पण आमची जी डिमांड आहे जी 22/ 6/ 2024 ला आम्ही त्यांच्याकडे पाठवली, 28/ 6/ 2024 ला संस्थेला असलेला संस्थेला मेल आला त्याच्यामध्ये संस्थेचे जे डायरेक्टर आहेत जे एक्सपायर झाले त्याच्यानंतर आता डायरेक्टर आहेत आकाश जाधव आणि कोमल पाटील.

DRAFT 64th AGM

**श्री.संतोष ढमढेरे :**या संदर्भातील आपले जागृत सभासद सातत्याने मागत होते की त्यासाठीच या वार्षिक सर्वसाधारण सभेसाठी हा विषय चर्चेला घेतला आहे आणि आता या विषयाची जी काही माहिती आहे ती इथे बोधक ही सगळी माहिती आपण सोसायटीमध्ये सगळ्यांना दाखवू यामध्ये शॉर्ट मध्ये फक्त दोनच गोष्टी सांगतो की यामध्ये आपण जो करार झाला, करार संपला त्या सगळ्या टेक्निकली गोष्टी आहेत ते सगळं तुम्हाला तिकडे बघायला मिळेल पण यामध्ये 1 करोड 64 लाख रुपये आपले संस्थेचे राहिलेले आहेत, त्या गोष्टींसाठी आपण त्यांच्याकडे पत्र व्यवहार करतोय आणि त्यालाच अनुसरून बोर्ड मध्ये आपण ज्या पद्धतीने बोललो होतो की लीगल ॲडव्हायझर म्हणजे आपल्याला कॉपरेटिव्ह ऍक्ट एक्सपर्ट वकील आपण बोलावलेले आहेत तर ते इथे

त्या विषयावर अगदी त्यांनी जो अभ्यास केला आहे त्यावर ते म्हणतील माझी सभागृहाला विनंती आहे की आपण ते ऐकावं जेणेकरून त्याच्या संदर्भात आपल्याला निर्णय घ्यायला वेळ मिळेल कारण की होतंय काय कारण की प्रत्येक वेळेला सभासद प्रश्न विचारतात त्याच्यावरती पुन्हा वेळ काढून पणा होतो तर माझी तुम्हाला विनंती आहे की.

**श्री.राजेश कळके (सीडीएम):** निंबाळकर सर एक मिनिट , फक्त go cash ला मान्यता दिली होती AGM ने ?

**एडवोकेट श्री.विशाल निंबाळकर :** ए जी एम ने मान्यता दिली की, मान्यता दिली नाही त्याच्यामध्ये काही गोष्टी आहेत एग्रीमेंट मध्ये तुमच्या मागच्या बोर्ड ऑफ डायरेक्टरने काही चुका केल्या हा सगळा तुमचा लीगल पार्ट आला, पण आता तुमचे एक करोड समथिंग अमाऊंट जी आहे ती रिकव्हेरेबल आहे, बरोबर आहे तर ती रिकव्हर करायची असेल तर को-ऑपरेटिव्ह ऍक्ट आणि सिविल लॉग हे दोन तुम्हाला एप्लीकेशन आहेत, जर तुम्हाला गो कॅशलेस कंपनीकडून पैसे घ्यायचे असतील तर तुम्हाला सिविल कोर्टात तुम्हाला प्रकरण दाखल करावा लागेल, आणि जर ती प्रायव्हेट लिमिटेड कंपनी आहे त्यातून किती रिकवरी होईल हा दुसरा पार्ट तुम्हाला सिविल लॉ मध्ये ऑप्शन अवेलेबल आहे. सेकंड को-ऑपरेटिव्ह ॲक्ट मध्ये माझी संचालक यांनी हे सगळं केलं आणि समजा हे AGM मध्ये ते पास केलं, नाही केलं? याबाबत तुम्ही सेक्शन 83 आणि सेक्शन 88 आणि Re Audit (री ऑडिट) या पद्धतीने तुम्ही त्यांच्यावर एन्क्वायरी बसवू शकता, आणि सेक्शन 83 मध्ये जर ती एन्क्वायरी आढळलं की ही संचालकांची जबाबदारी आहे, तर ती सेक्शन 88 मध्ये जबाबदारी निश्चित होऊन जी काही अमाऊंट आहे ती त्यांच्याकडून रिकव्हर करू शकतात तर हा जनरल बॉडीचा निर्णय वेदर आपण सिव्हिल ला एक्सेप्ट करायला पाहिजे की को-ऑपरेटिव्ह ऍक्ट सिविल लॉ एक्सेप्ट केला तर गो कॅशलेस वर ॲक्शन होईल आणि को-ऑपरेटिव्ह घेतलं, तर तुमच्या माझी संचालकांवर कारवाई होईल.

DRAFT 64th AGM

**श्री. डी.एस धोत्रे (सीडीएम):** दोन्ही ॲक्शन होऊ शकतात?

**एडवोकेट श्री.विशाल निंबाळकर :** दोन्ही ॲक्शन होऊ शकतात सायमल टेनिस दोन्ही ॲक्शन होऊ शकतात.

**श्री. डी.एस धोत्रे (सीडीएम):** मग दोन्ही ॲक्शन घेऊया ना? त्याचा निर्णय दोन्ही करू शकतो

**एडवोकेट श्री.विशाल निंबाळकर :** एस

**श्री.राजेश कळके (सीडीएम):** त्याच्यात री ऑडिट पार्ट आहे ना ?

**एडवोकेट श्री.विशाल निंबाळकर :** को-ऑपरेटिव्ह पार्ट मध्ये जो येईल, त्यात री ऑडिट होईल.

**श्री. प्रभात सिंग (सीडीएम):** कोळी सर, आप भी हमारे नये एक्सपर्ट है, तो आप भी इसमे आपकी राय दे. रिक्वेस्ट है आपसे थोडा, आप भी बोलो यार, आपको लिया गया है कुछ तो बोलो इस बारे मे,

**श्री. प्रकाश पाटील (एसआयआरडी) :** टोटल किती दिले होते ?

**श्री.संतोष ढमढेरे :** आपण गो कॅशलेस ला साधारण, मागच्या तीन वर्षाच्या कार्यकाळामध्ये 641 करोड रुपये , त्याच्यामध्ये टर्नओव्हर झाला आणि री कॅन्सलेशन मध्ये आपल्याला जी काही अमाऊंट आली ती एक करोड 64 लाख रुपये मायनस आहे, ती आपल्या बॅलन्स शीट ला सातत्याने आपण दाखवली आहे

**श्री. डी.एस धोत्रे (सीडीएम):** निंबाळकर सरांना माझा थोडा प्रश्न आहे, जर सिविल नुसार गेलो तर कोर्टाचा खर्च किती येईल? अंदाजे किती भरावी लागेल?

**एडवोकेट श्री.विशाल निंबाळकर :** लीगल फी 2% अंदाजे,

DRAFT 64th AGM

**श्री. डी.एस धोत्रे (सीडीएम):** कशाच्या ?

**एडवोकेट श्री.विशाल निंबाळकर :** क्लेम रकमेच्या,

**श्री. यदुवीर सिंग (एचएलयुडी) :** निंबाळकर सर आपकी फीस कितनी रहेगी ?

**श्री. प्रकाश पाटील (एसआयआरडी) :** कालावधी?

**श्री. प्रकाश पाटील (एसआयआरडी) :** निंबाळकर सर तुमची फी किती असेल ?

**एडवोकेट श्री.विशाल निंबाळकर :** तुम्ही यासाठी पत्र पाठवा, ज्यांनी या गोष्टींवर फॉलोअप केला आहे, कंप्लेंट केली आहे, ज्यांना या गोष्टीचं नॉलेज आहे, किती पैसे गेले, कसा करार झाला, असे दोन-तीन लोक जमा करा, जनरल बॉडीने सगळ्यांना अधिकार द्या, आणि त्यातले काय करायचं, दोन्ही निर्णय घेऊ शकतो, असा आता जनरल बॉडी सांगितला आहे तर त्याचे अधिकार तुम्ही त्या कमिटीला आणि मॅनेजमेंट कमिटीला द्या, ते त्याचं व्यवस्थित उत्तर देतील आणि त्याच्या खर्चास मंजूर घेऊन पुढील कार्यवाही करतील,

**श्री.बाहुबली चौगुले (मानद सचिव):** सरांनी सांगितलं की साधारण एकूण रकमेच्या 2% लागेल तर या खर्चास मजुरी, पण आत्ताच द्या.

**श्री.संतोष ढमढेरे :** बघा आता वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये आपण निर्णय घेतला की दोन्ही सिव्हिल आणि कोपरेटिव्ह दोन्ही कारवाई ही झाली पाहिजे.

**श्री. प्रकाश पाटील (एसआयआरडी) :** दोन्ही सिव्हिल आणि कोपरेटिव्ह दोन्ही कारवाई ही झाली पाहिजे.

**श्री.संतोष ढमढेरे :** दोन्ही कारवाया करतोय त्यासाठी आपण आत्ता कमिटी नेमतोय, त्या कमिटीला तरी अधिकार द्या

**श्री. प्रकाश पाटील (एसआयआरडी) :** ढमढेरे तिसरं वर्ष आहे,

**श्री. गिरीष शेणई साहेब (पदसिद्ध अध्यक्ष):** पाटील साहेब कशाला उगाच या वाटेला जात आहे.

DRAFT 64th AGM

**श्री.संतोष ढमढेरे :** ऐकून घ्या हे जे आता एडवोकेट साहेबांनी सांगितलं आहे कमिटी बनतील, त्या कमिटीला तरी अधिकार द्या, की सभागृहातले पाच-सहा लोक आणि संचालक मंडळाचे टीम हे दोघे मिळून जे काही टेंडर प्रोसेस होईल, किंवा इतर लीगल ॲडव्हायझरच्या संदर्भात ज्या काही गोष्टी होतील, त्या सगळ्या गोष्टींना ती कमिटी मान्यता द्यावी, तेवढेच मी सभागृहाला विनंती करतो, म्हणजे या मुद्द्यावर आपण फास्ट ट्रॅकवर काम करू शकतो, सगळ्यांना मान्य आहे का?

**श्री.मनोज वाडेकर (आरईडी):** माझी थोडीशी शंका, की याची जी वर्कऑर्डर होती ती 7/10/2022 ला एक्सपायर झाली त्याचा काही कालावधी असतो का? की तुम्ही काही फाईल करायला पाहिजे.

**एडवोकेट श्री.विशाल निंबाळकर :** नाही , आपण केव्हाही फाईल करू शकतो.

**श्री.मनोज वाडेकर (आरईडी):**गो कॅशला आपण आत्तापर्यंत कुठली नोटीस दिली आहे का कधी दिली आहे ?

**श्री.बाहुबली चौगुले (मानद सचिव):**संचालक मंडळातर्फे आपण त्यांना लीगल नोटीस पाठवली आहे

**श्री.संतोष ढमढेरे :**सगळे कागदपत्र आपल्या सगळ्यांसाठी खुले आहेत कारण की त्या पद्धतीनेच आपण तो विषय घेतला आहे तर माझी सभागृहातल्या सर्व जागरूक सभासदांना विनंती आहे की आपण या विषयावरती तातडीने नक्कीच पुढे काम करणार आहोत तर आपण पुढच्या विषयाकडे वळूया

**श्री.बाहुबली चौगुले (मानद सचिव):** पुढचा विषय आहे

**श्री.डी.एस राजापुरे (डीआरएचआर) :** एक मिनिट चौगुले साहेब, याच्याच बरोबर मागच्या संचालक मंडळाच्या निष्काळाचे पणामुळे आपल्या संस्थेचे नुकसान झाले आहे, त्याविषयी सुद्धा त्यात कारवाई करण्यात यावी,

**श्री.बाहुबली चौगुले (मानद सचिव):** टीडीएस बोलायचा आहे का तुम्हाला.

**श्री.डी.एस राजापुरे (डीआरएचआर) :**आश्वासन द्या,

**श्री.संतोष ढमढेरे :** करिअर जंक्शन आणि गो कॅशलेस असेल या दोन्ही विषयावरती या ज्या काही गोष्टी झालेले आहेत या सर्वच गोष्टींचा आपण री ऑडिट करू. आता सभागृहातून आपण सभासद घेतोय म्हणजे आपण त्या कमिटीला दोघांना, मिळून एकत्र अधिकार आहेत, फक्त त्या कमिटीला आपण अधिकार द्या, प्रॉपर पद्धतीने काम होईल आणि खर्चाची मान्यता जी काय असेल, त्या कमिटीला अधिकार द्या, की यासाठी जो काही खर्च होईल तर ती कमिटी मंजूर करेल, एवढेच विनंती आहे त्यामध्ये तुम्ही लोक आहातच. नोकर भरतीच्या संदर्भात मी विशाल निंबाळकर यांना पुन्हा एकदा बोलावतो, आपण सूचक अनुमोधक घेऊया, आपण या दोन्ही गोष्टी मधले एक्सपोर्ट नाही आहोत.

**एडवोकेट श्री.विशाल निंबाळकर :** सेम गोष्ट एप्लीकेबल आहे तुम्हाला तीन वर्ष आणि त्या पिरेड मधलं काही गोष्टी झाले आहेत त्या तुम्ही री ऑडिट मध्ये घ्या तुमची लीगल टीम असेल ते ऑडिट मध्ये ते मुद्दे काढेल की तुमचं नोकर भरतीची प्रोसेस ची चुकीची झाली आहे, प्लस गो कॅशलेस जो काही खर्च झाला आहे, ते मुद्दे द्याल ना, त्या पद्धतीने रिऑडिट पण होईल आणि त्याप्रमाणे 83 ची एन्क्वायरी होईल आणि 83 मध्ये ते दोषी आढळले तर 88 प्रमाणे त्यांच्यावर लायबिलिटी फिक्स होईल,

**श्री.राजेश कळके (सीडीएम):** आता मला एक मिनिट द्या, एप्लीकेशन जो करतो ना, Applicant सही नाही ते येतं का त्याच्यामध्ये ?

**एडवोकेट श्री.विशाल निंबाळकर :** सगळं येणार.

DRAFT 64th AGM

**पुन्हा ठराव पास करण्यात आला की गो कॅशलेस इंडिया प्रायव्हेट लिमिटेड यांचेकडून येणे असलेली रक्कम रु. 1,64,11,098/- (रुपये एक कोटी सत्त्याण्णव लाख सत्त्याहत्तर हजार सहाशे अठयाण्णव फक्त) वसूल करण्यासाठी दोन मार्ग अवलंबिण्यत यावेत. त्यापैकी एक को-ऑपरेटिव्ह कोर्टामार्फत कारवाई करावी किंवा मागील संचालक मंडळावर लीगल ॲक्शन घेऊन वसूल करण्यात यावेत असा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.**

**पुन्हा ठराव पास करण्यात आला की भरती प्रक्रिया राबविण्यासाठी मेसर्स करिअर जंक्शन प्लेसमेंट वन वाशी यांना कामकाज दिले होते व यासाठी त्यांना ॲडव्हान्स रुपये 1,50,000/-दिले होते याची कायदेशीर कारवाई करून रक्कम वसूल करण्यात यावी असा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.**

**सूचक : श्री. विलास घोरपडे (एफडी)**
**अनुमोदक : श्री. डी.एस धोत्रे (सीडीएम)**

DRAFT 64th AGM

**ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.**

**श्री. गिरीष शेणई साहेब (पदसिद्ध अध्यक्ष):** पुढचं लास्ट मुद्दा घ्या आणि संपवा.

**विषय क्र.11:अधिमंडळाच्या 64व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत अनुपस्थित असलेल्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करणे.**

**वार्षिक सर्वसाधारण सभा ठराव क्र.11: ठराव पास करण्यात आला की 64 व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत जे सभासद त्यांच्या आस्थापनातील कामकाजामुळे सभेस उपस्थित राहू शकले नाहीत अशा अनुपस्थितीत राहिलेल्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करण्यात यावी असे सर्वानुमते ठरविण्यात आले.**

**सूचक : श्री. निलेश कामटेकर (एनआरजी प्रोजेक्ट)**
**अनुमोदक : श्री. डी.एस धोतरे (सीडीएम)**
**ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.**

**श्री. राम परब (युईडी) :** हा जो अहवाल आहे , बघा या गोष्टीसाठी आपण खूप हंगामा केला होता हे, किती सिम्पल असावं,? त्यात किती फोटो असावेत? पण बघा मला यावर्षी जरा वेगळं वाटलं, जुन्याने केलं तिथे आलो,

तर माझी रिक्वेस्ट आहे पुढच्या वेळेला सिम्पल छापा आणि महत्त्वाचे फोटो टाका. आम्ही विरोध नाही करत पण एवढं चमकवायची काही गरज नाही.

**श्री. गिरीष शेणई साहेब (पदसिद्ध अध्यक्ष):** एक मिनिट, मला वाटते की खूप लोकांना याचं महत्त्व माहित नाही, सी डी एम मध्ये कोण आहे? सीडीएमच्या लोकांना याचा महत्त्व माहित पाहिजे हे इंटरनॅशनल लेवल ची गोष्ट आहे, ओके म्हणून सांगतोय असंच यायला पाहिजे, यासाठी सीडीएमच्या लोकांना याचा खूप श्रेय जातं,

**श्री. मुकुंद वैराळकर (एऍण्डएसईडी) :** सर आम्ही कव्हर बद्दल नाही बोलत, हा जो लग्नाचा अल्बम आहे, ना त्या संदर्भात आम्ही बोलतोय, खूप मोठा हंगामा झालेला आहे,

**श्री. गिरीष शेणई साहेब (पदसिद्ध अध्यक्ष):** ठीक आहे ठीक आहे, कव्हर वरती नका जाऊ पण ही गोष्ट खूप ॲप्रिसिएट करा, विषय संपलेला आहे, ओके, आभार प्रदर्शन आता ही सभा संपल्याचे मी जाहीर करतोय आणि आता सर्वांनी राष्ट्रगीतासाठी उभा राहायचं आहे.

**श्री. हेमंत कोळी:** आजच्या सभेला उपस्थित आपल्या सन्माननीय सभासदांचे मनापासून आभार, आपले अध्यक्ष श्री. गिरीष शेणई साहेब, उपाध्यक्ष, सी एस ओ श्री. व्ही. टी. पवार सर, डीसीएसओ श्रीराम साहेब व त्यांचा सिक्युरिटी स्टाफ, कन्वेंशनल साऊंड सिस्टिम स्टाफ, आपली चार्टर्ड अकाउंटंट रणदिवे साहेब, सहकार क्षेत्र तज्ञ श्री. संदीप पाटील साहेब, एडवोकेट श्री.विशाल निंबाळकर, इंटरनल ऑडिटर श्री.सतीश साहेब, यांचे सर्वांचे मनापासून आभार व्यक्त करतो आणि आजची सभा संपल्याची घोषित करतो.

**श्री. बाहुबली चौगुले (मानद सचिव):** मी सर्वांना विनंती करतो की त्यांनी राष्ट्रगीतासाठी उभा राहायचं आहे

**श्री. बाहुबली चौगुले (मानद सचिव):** सर्व सभासदांचे खूप खूप धन्यवाद.

DRAFT 64th AGM